Marathi Society of B.C. Canada
MSBC



दिवाळी २०२५

# संपर्क

मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया

# Thanks to our 2025 Platinum & Sports event sponsor




# Thanks to Our 2025 Platinum Sponsors
























# संपर्क

## दिवाळी अंक २०२५



**मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया**

# श्रेयनामावली

- **संपादिका**
  विदुला नायगांवकर-कुलकर्णी
- **संपादन साहाय्य**
  पराग सहस्रबुद्धे
- **शब्दांकन, देवनागरीकरण, मुद्रित शोधन**
  विदुला नायगांवकर-कुलकर्णी, पराग सहस्रबुद्धे
  अश्विनी खाडीलकर
- **मुखपृष्ठ**
  विशाखा पाटील
- **रेखाटने**
  श्रेयस मराठे, विशाखा पाटील, देवयानी गोखले
- **अंक सजावट साहाय्य**
  शाल्मली सिवराजन्, दिप्ती मोकाशी,
  प्राची नरवणे, श्रेयस मराठे, आकांक्षा म्हैसकर,
  देवयानी गोखले, नीरज इंगळे, जयदीप जोशी
- **अक्षरजुळणी**
  मानसी घाणेकर
- **प्रकाशक**
  मराठी सोसायटी ऑफ बीसी (MSBC)
- **मुद्रक**
  ट्रीनिटी अकॅडमी, पुणे

**२०२५ कार्यकारी मंडळ**

अध्यक्ष - आकांक्षा म्हैसकर

उपाध्यक्ष - देवयानी गोखले

कोषाध्यक्ष - शैलेश भाटे

सचिव - जयदीप जोशी

सांस्कृतिक समन्वयक - आदिती गोखले

समाजमाध्यम आणि क्रीडा उपक्रम समन्वयक - नीरज इंगळे

कार्यक्रम समन्वयक - अनिकेत आंबवकर

---

ह्या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यातील विचार आणि मते ही सर्वस्वी लेखक-लेखिकांची आहेत. त्या मतांशी संपादक आणि एमएसबीसी कार्यकारी मंडळ सहमत असेलच असे नाही. कृपया अधिकृत परवानगीशिवाय या अंकातील साहित्य पुनः मुद्रित करू नये ही नम्र विनंती. हा अंक आपल्या पुढे ठेवताना त्यात त्रुटी राहू नयेत यासाठी आम्ही विशेष काळजी घेतलेली आहे, तरीही आमच्या नजरचूकींने काही त्रुटी, मुद्रणदोष राहिले असल्यास आम्ही दिलगिरी व्यक्त करतो. धन्यवाद!

आपले नम्र,
**संपादक मंडळ**

Copyright @ Marathi Society of BC

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

यंदाचा 'संपर्क' हा मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबियाचा दिवाळी अंक सर्व रसिक वाचकांसमोर ठेवताना आम्हाला अतिशय आनंद होतोय. ज्ञानोबाच्या मराठीचा वटवृक्ष मेपलच्या सावलीत आता चांगलाच रुजला आणि फोफावला आहे. १९९३ पासून सुरू झालेले आपले मंडळ आज नवनवीन कार्यक्रमांनी आपले क्षितिज रुंदावत आहे आणि आजही तोच ओलावा आणि कळकळ घेऊन आपल्या संस्कृतीची धुरा पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील आहे.

जागतिक पटलावर होणाऱ्या संभाव्य राजकीय, आर्थिक आणि सामाजिक बदलाचा पायरव नॉर्थ अमेरिकेत फार पटकन ऐकू येतो. या अस्थिरतेच्या काळात टिकून राहण्यासाठीचा संघर्ष आपण वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवरही अनुभवत आहोत. जगातले समाज आपापल्या सांस्कृतिक मुळांना घट्ट धरून ठेवायच्या प्रयत्नात दिसत आहेत. आपली तर 'अमृताते हि पैजा जिंके' अशी मराठी परंपरा. त्यामुळेच की काय आपल्यातला ज्ञानोबांचा अंश आपल्याला कुठल्याही परिस्थितीत लिहितं ठेवतो!

दिवाळी अंकांची आपली मराठी परंपरा राखत यावर्षीचा दिवाळी अंक तुमच्या पुढे ठेवताना हे नमूद करावेसे वाटते की हा अंक अनेक अर्थांनी विशेष आहे. यातल्या बाल/युवा लेखक-लेखिकांचे प्रमाण पाहून ज्यांनी-ज्यांनी इथे मराठी रुजवण्यासाठी प्रयत्न केले त्यांना अभिमान वाटल्याखेरीज राहणार नाही. शाळा-कॉलेजातली उमेदीची वर्षं भारतात काढलेली पिढी आणि इथेच जन्मलेली, शिकणारी आत्ताची पिढी अशा वेगवेगळ्या सामाजिक चौकटीत घडलेल्यांना मराठीत व्यक्त व्हावेसे वाटते हे दिलासा देणारे आहे.

अजून एक सांगायचा मुद्दा असा की आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सर्रास रुजून एवढ्या मोठ्या प्रमाणात वापरात येणारे हे पहिलेच वर्ष! या अंकाचे संपादन करीत असताना चॅट जीपीटी/को-पायलट किंवा तत्सम साधनांचा वापर हा ठळकपणे लक्षात आला. यांचे मराठीचे अल्गोरिदम अजून तितकेसे चांगले नाही त्यामुळे, ही साधने वापरून तयार होणारी वाक्ये ही कधी-कधी टाकसाळीतून नाणी छापावीत तशी छापलेली वाटतात. अंकसंपादन करताना AI वापरून केलेल्या लिखाणात थेट लक्षात येणाऱ्या त्रुटी म्हणजे इंग्रजी वाक्यांचे निरर्थक शब्दशः भाषांतर, शब्दभांडाराचा तुटवडा आणि क्रियापदांच्या शेपट्या पकडून त्यांना गरागरा फिरवल्यासारखे वाक्यप्रयोग! आपल्याला जो अर्थ अभिप्रेत आहे तो, ही साधने वापरून केलेल्या आपल्या लिखाणातून वाचकांपर्यंत पोहोचतोय का हा विचार करणे लेखक-लेखिकांना क्रमप्राप्त आहे. भाषेचा वापर करताना त्यातले अंगभूत सौंदर्य जपले जायला हवे. फक्त शब्द किंवा भाषाच नव्हे तर आपली सर्जनशीलता ही देखील देवाने आपल्या पोतडीत टाकलेली फार प्रभावी जादूची कांडी आहे. आपली उत्पादनक्षमता वाढवताना आपली सर्जनशीलता कमी होणार नाही ही काळजी आपण घ्यायला हवी. AI चा वापर कदाचित अपरिहार्य होणार आहे, पण ते मदतीपुरते ठेवून सुकाणू आपल्याच हातात असेल ही खबरदारी आपणच घ्यायची आहे.

या अंकातल्या 'कॅनडा डायरी' या विशेष विभागाद्वारे लेखक-लेखिकांच्या इथल्या अनुभवांचा घेतलेला आढावा हे याचे आणखी एक वैशिष्ट्य. चार भारतीय टाळकी एकत्र आली की हिरीरीने होणाऱ्या संभाषणात राजकारण, क्रिकेट आणि बॉलीवूड सोडून फक्त 'कॅनडाची थंडी' या विषयाची वर्णी लागू शकते असे निरिक्षण कुणीसा शहाणा आधीच नोंदवून गेला आहे. यामुळे हा विशेष विभाग तुम्हाला जवळचा वाटेल याची खात्री आहे. याव्यतिरिक्त यातील ललित लेखांचे वैविध्य, कथा-कविताही तुम्हाला सुखावतील अशी आशा आहे. लहान मुलांच्या 'निसर्गरम्य कॅनडा'वरील चित्रांनी अंक जिवंत झाला आहे.

हा अंक बनविण्यात योगदान असलेल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. अंकाच्या मुखपृष्ठ-मांडणी आणि अंतर्गत सजावटीसाठी रेखाटन-समितीने घेतलेली मेहनत पानोपानी जाणवते. आपले MSBC चे हितचिंतक, प्रायोजक आणि कार्यकारी मंडळ यांच्या सहकार्याशिवाय कुठलाही प्रकल्प तडीस नेणे अशक्य आहे. त्यांच्या सततच्या पाठिंब्यासाठी त्यांना धन्यवाद! अंक वाचकांच्या हाती सोपवताना अंकाचा दर्जा अबाधित राखण्याचा आपला प्रयत्न असतो, त्यामुळेच सजग वाचकांच्या प्रतिक्रियांचं मनापासून स्वागत असेल.

तेव्हा वाचकहो, आपल्याला दिवाळीच्या आनंदमय आणि स्वास्थ्यपूर्ण शुभेच्छा देऊन हा अंक तुम्हाला सादर करतो!

**- विदुला नायगांवकर-कुलकर्णी**

# अध्यक्षीय

नमस्कार,

सर्वप्रथम तुम्हा सर्वांना दिवाळीच्या खूप शुभेच्छा! दिवाळी अंकाच्या निमित्ताने मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया या संस्थेची अध्यक्षा म्हणून आपल्याशी संवाद साधताना मला अत्यंत आनंद होत आहे. १९९३ पासून आपली ही संस्था आपल्या मराठी भाषिक मंडळींसाठी कार्यरत आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ आपण एकत्र येऊन आपल्या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचे कार्य सातत्याने करत आहोत. आपण सगळे वेगवेगळ्या वाटांनी कॅनडामध्ये आलो, पण आपल्या मनात एक समान ओढ आहे– मराठी भाषेची, आपल्या मातीची, आपल्या परंपरांची. ही ओढच आपल्याला एकत्र आणते, आणि मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया हे त्या ओढीचं सजीव रूप आहे.

दर वर्षी नवीन कार्यकारणी उत्साहाने नवं नवीन संकल्पना घेऊन येतात आणि जुन्या आणि नव्या (रंग माझा वेगळा, अंताक्षरी) कार्यक्रमांची सांगड घालत वर्षभर सदस्यांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. कार्यकारीणीतले सर्व सदस्य हे स्वयंसेवक म्हणून काम करतात. आपल्या नोकऱ्या आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळूनही, ते मंडळाचे उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी आपला अमूल्य वेळ देतात.

प्रत्येक वयोगटातल्या सदस्याला आवडतील असे कार्यक्रम करण्याचा प्रयत्न सातत्याने आपण करतो. संक्रांत हळदी कुंकू, मंगळागौरी, गणपती, दिवाळी असे सण साजरे करतो आणि आपली संस्कृती नवीन पिढी पर्यंत पोचवतो. तसेच गाणं, नाटक,नृत्य, साहित्य, क्रीडा, फोटोग्राफी, ढोल–ताशा अशा आणि अनेक उपक्रमातून मंडळातील सदस्यांची आवड जोपासली जाईल, त्यांना अशा उपक्रमात सहभागी होता येईल, त्यांना समान संधी मिळेल ह्यासाठी प्रयत्नशील असतो. आपल्या मंडळांने 'पती गेले ग काठेवाडी' ह्या संगीत नाटकाचे प्रयोग ५ शहरांमधून केले. ह्या सादरीकरणामुळे आपल्या मंडळाची ओळख कॅनडातच नाही तर अमेरिकेतही झाली आहे.

आपली 'किलबिल' मराठी शाळा पुढच्या पिढीला मराठी भाषेची ओळख करून देते, त्याची आवड निर्माण करते.

आपल्या सहभागामुळेच ही संस्था आज इतकी समृद्ध झाली आहे. आपल्या संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी आपला उत्साह, सहभाग आणि प्रेम हेच आमचे बळ आहे. नवीन कल्पना, उत्साह आणि एकत्रित प्रयत्न यामुळेच आपली मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया अधिक प्रभावी आणि सर्वसमावेशक होईल.

पुन्हा एकदा तुम्हा सर्वांना दिवाळीच्या खूप साऱ्या शुभेच्छा!!

**– आकांक्षा म्हैसकर**

# BMM अध्यक्षांकडून शुभेच्छा

नमस्कार मंडळी,

मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबियाच्या सर्व सभासदांना दिवाळीच्या शुभेच्छा! दिवाळी म्हटलं की फराळ, आकाश कंदील, फटाके, किल्ला, आणि रोषणाई जसे असणारच, तसे मंडळ म्हटलं की दिवाळीचा एक छानसा सांस्कृतिक कार्यक्रम असणारच.

गेल्या वर्षीच मंडळाने तिसावा वर्धापन दिन प्रचंड उत्साहात साजरा केला. मंडळातील कार्यकर्त्यांचा उत्साह खरोखरच वाखाणण्याजोगा होता. तुम्हा सर्वांचे परत एकदा अभिनंदन!

क्रीडा, संगीत, नाट्य, मराठी साहित्य, फोटोग्राफी, आणि मराठी शाळा अशा विविध उपक्रमांमधून तुमचे मंडळ आपल्या संस्कृतीला पुढे नेत आहे. या उपक्रमांमुळे आपली परंपरा जपली जाते आणि आपल्या मुलांचे मराठी भाषा व संस्कृतीशी नाते जोडले जाते. त्यामुळे मंडळाने सर्व मराठी भाषिकांसाठी एक सुंदर आणि जिवंत असे व्यासपीठ तयार केले आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

या सगळ्या कामामागे मेहनतीने काम करणारे स्वयंसेवक, शिक्षक आणि समिती सदस्य आहेत. त्यांचा वेळ, आणि कष्ट यामुळेच प्रत्येक कार्यक्रम यशस्वी होतो. बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे मी सर्व स्वयंसेवक, शिक्षक आणि पदाधिकाऱ्यांचे मनापासून आभार मानतो.

बृहन्महाराष्ट्र मंडळाला, मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबियासारख्या संस्थांचा अभिमान आहे. आपण सगळे मिळून आपली भाषा आणि संस्कृती पुढील पिढीपर्यंत घेऊन जाऊया. मला खात्री आहे की मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया उत्तरोत्तर प्रगती करेल आणि पुढील पिढ्यांसाठी प्रेरणा बनेल.

बृहन्महाराष्ट्र मंडळाकडून अनेक उपक्रम राबविले जातात, तरी शक्य झाल्यास बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर (https://bmmonline.org/) जाऊन याबद्दल अधिक माहिती घ्यावी, तसेच या उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आम्हाला सहकार्य करावे ही कळकळीची विनंती.

सियाटल येथे पुढील वर्षी बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन होणार आहे आणि त्या अधिवेशनात तुमच्या मंडळाकडून निश्चितच जोरदार सहभाग असणार आहे, त्यामुळे तुम्हा सर्वांना तयारीसाठी खूप खूप शुभेच्छा!

परत एकदा मंडळाच्या सर्व सभासदांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा, त्याचप्रमाणे मंडळाच्या या वर्षातील उर्वरित कार्यक्रमांसाठी खूप खूप शुभेच्छा!

जय हिंद जय महाराष्ट्र!

**– प्रसाद पानवळकर**

अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

# अनुक्रम


■ **कथा**

- आठवणींची दिवाळी – अश्विनी खाडीलकर ७
- १९४७ – केतकी पाटील पारखी ७२

■ **भ्रमणगाथा**

- मी आणि आजी 'सॉलिड टीम' – जय अनिरुद्ध म्हैसकर ११
- लॅपलँड – सांताक्लॉजच्या गावाची सफर – अनिरुद्ध म्हैसकर ७४
- सफरनामा– आईसलँड प्रवास, एक स्वप्नवत आठवडा – अनघा सुरा ७९

■ **किशोरगाथा**

- तायक्वोंडो – श्लोक पाटील १४
- तबल्याशी मैत्री – श्रीमयी खाडीलकर २२
- माझी सिॲटल ते पोर्टलँड सायकल राईड – रिया सहस्रबुद्धे ३०
- कॅनडामधील माझे पहिले अनुभव – सारा सावंत ४५
- मी आणि किलबिल मराठी शाळा – आयुष फडके ७०
- माझा एअर कॅडेट्स कार्यक्रमाचा अनुभव – क्षितिश गद्रे ७७
- माझ्या शाळेची कॅम्पिंग ट्रीप – आर्यन सोनजे ८८

■ **कविता**

- बहावा – विदुला नायगांवकर-कुलकर्णी ३४
- हे सत्य की ते सत्य – भूषण पाटील ६०

■ **कॅनडा डायरी**

- माझा कॅनडामधील सुरवातीचा प्रवास – प्रतिमा पराडकर ३६
- लॉक-डाऊनच्या दारात आयुष्याची चाहूल; कॅनडातील बाळंतपणाची गोष्ट – सोनाली मयूर पिंपरकर ३९
- नवा देश, नवी आशा, स्वतःला घडवण्याची नवी संधी – प्रांजल भोसेकर ४२
- कॅनडा डायरी २०२४– २०२५ – स्वाती हेमंत ४८
- आमचं कॅम्पिंग – मेघना मेडीथी ५१
- निसर्गभ्रमणाचा धाडसी प्रसंग – डॉ. राम कुंभारे ५४
- आमची पहिली कॅनडा भेट – अनुभवकथन – सीमा फाटक ५७

■ **शब्दलालित्य**

- अपमान गदेचा की.. – अभिजीत देसाई १६
- उद्यानगाथा – पराग सहस्रबुद्धे १८
- माणसातला देव – भक्ती वाघमारे २४
- पसायदान – वैशाली भिडे २७
- दुधावरची साय – अनिता दाणी ३२
- उंदीर मामा की जय! – दीपिका विद्याधर रानडे ६१
- जीवन आणि पंढरपूरची वारी – श्रद्धा इंगळे ६४
- सासर-माहेरची सावली – मैत्रेय ६७
- जगी सर्व सुखी असा कोण आहे? – शैलेश भाटे ८३
- सुगंधी वाऱ्यांच्या पाठशिवणीचा खेळ – कोमल बोंगाळे ८६
- टीव्ही, मालिका आणि बरंच काही! – पुस्तक परिचय – निलेश अग्निहोत्री ९०



# आठवणींची दिवाळी

● अश्विनी खाडीलकर ●

ऑक्टोबर महिना संपत आला तशी दिवाळीची चाहूल लागली. रस्ते, बाजारपेठा माणसांनी फुलून गेल्या. दिवाळीचा उत्साह ओसंडून वाहत होता. घराघरांतून खमंग, चविष्ट वास दरवळत होते. देशपांडे वाडासुद्धा याला अपवाद नव्हता. भाऊ महाराज बोळात उरलेला शेवटचा वाडा. आता चौथी पिढी राहत होती तिथे. देशपांड्यांचं कुटुंब सांगलीहून आलेलं. हृषिकेशचे पणजोबा लोकमान्यांचे भक्त. लोकमान्यांचं दर्शन होतं राहावं म्हणून ते सांगलीहून पुण्यात आले. इथेच केसरीमध्ये कामाला लागले आणि स्थायिक झाले. वाडा जुना असला तरी उत्तम स्थितीत होता. खाली जोश्यांच्या घरातून बेसन भाजल्याचा खमंग वास येत होता. हृषिकेशने मधल्या अंगणात त्याची मोटारसायकल लावली आणि तो ती पुसायला लागला. तेवढ्यात वरून रोहनची – बाबा आला! अशी आरोळी त्याने ऐकली. हसत वरती बघत त्याने हात हलवला. आणि गाडी पुसण्याचं काम सुरू ठेवलं. तेवढ्यात रोहनची स्वारी वरून खाली पोहोचलीच. ''काय चिरंजीव, कशी सुरू आहे सुट्टी?'' प्रश्न संपायला वाव न देता रोहन म्हणाला, ''मस्त, धमाल सुरू आहे. सकाळी उठलो की, दिवाळीचा अभ्यास करून टाकतो म्हणजे दिवसभर आई कटकट करत नाही. आमचा किल्ला बघितलास का बाबा? आज मोहरी टाकलीय त्यावर, आणि आज्जी म्हणाली उद्या ती मावळे आणि शिवाजी महाराज देणारे मला. तुला माहितीये बाबा, आज चिन्मयने दुपारी मला घरी बोलावलं होतं त्याचे दिवाळीचे कपडे दाखवायला आणि आज तो फटाके आणायला जाणारे.'' वर घरी पोहोचेपर्यंत रोहनची बडबड चालूच होती. हृषिकेश हात पाय धुवून बाहेर येईपर्यंत अपर्णाने चहा आणून ठेवला होता. त्याच्या आईची आणि अपर्णाची स्वयंपाकघरात कसलीतरी चर्चा सुरू होती, बहुतेक दिवाळीच्या फराळाबद्दल. त्याने लक्ष दिलं नाही. तसा त्याचा आप्पा गेल्यापासून दिवाळीचा उत्साह ओसरला होता. त्यांच्यासोबत कुंभारवाड्यात जाऊन पणत्या आणायच्या, अप्पा बळवंत चौकातून कंदील बनवायचं सामान आणायचं, घराची साफसफाई करायची हे सगळं तो आणि आप्पा उत्साहाने करायचे आणि आई फराळाचं डिपार्टमेंट सांभाळायची. आठ वर्षांपूर्वी आप्पा गेले. पण ते होते तोपर्यंत देशपांडे वाड्यातली दिवाळी वेगळीच असायची. मोठ्या अंगणातला कंदील ते दोघे मिळून तयार करायचे. बाकी झगमगाट असायचाच पण अंगणातला कंदील हृषिकेशसाठी खास होता. रोहनच्या बडबडीमुळे तो वास्तवात परत आला. रोहनची अखंड बडबड अजूनही चालूच होती. आता तो त्याच्या खरेदीचे प्लॅन्स करत होता. कपडे आणि फटाक्यांवरून विषय कंदिलावर आला. ऋषिकेशच्या आईने त्याच्याकडे कौतुकाने

पाहिलं आणि एक कटाक्ष हृषिकेशकडे टाकला. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बघून सुनंदाताईंना लक्षात आलं की लेकाचा विचार यावर्षीही बदललेला नाही. अपर्णाने सासूकडे एक नजर टाकली आणि रोहनला आता तिथून घेऊन गेलं पाहिजे हे तिने चाणाक्षपणे ओळखलं. आणि ती त्याला घेऊन गेली आतल्या खोलीत.

रोहन थोडासा वैतागला. त्याला चुचकारत अपर्णा म्हणाली ''अरे, बाबा आत्ता दमून आलाय ना! ठरवू की आपण, अजून आठ दिवस आहेत दिवाळीला. आणि आपण तुझी खरेदी करणार.'' हे ऐकून खूष झालेल्या रोहनने विचारलं, ''प्रॉमिस? अपर्णाने म्हंटलं, नक्की, पिंकी प्रॉमिस!''

तेवढ्यात सुनंदाताई आल्या, अपर्णाला म्हणाल्या, ''लेकरू शहाणं आहे गं, माझाच लेक वेडेपणा करतोय. थकले मी समजावून!'' रोहन आजीला म्हणाला, तुला माहितीये चिन्मयने किती मस्त कंदील आणलाय आणि किती फटाके आणलेत. त्याने यावर्षी प्राणी आणलेत, जे त्यांच्या शेपटीला आग लावली की पळतात. मी ते पण आणणार आहे आणि जास्त अनार आणणार आहे. आणि लांब, मोठ्या फुलबाज्या! अपर्णाने म्हंटलं, हो रे, सगळं आणायचं! आता तू मोठा झालास, खालच्या दीपेश दादाबरोबर जाऊ शकतोस.

दुसऱ्या दिवशीची शनिवार सकाळ उजाडली, तसं रोहनने सकाळी सगळं न सांगता उरकलं, आजीला व आईला एकदाही एकाही गोष्टीची आठवण करावी लागली नाही. आज खरेदीला जायचं हे त्याने गृहीत धरलं होतं. बाबा सोफ्यावर निवांत बसलेला बघून त्याने हृषिकेशच्या मागे लकडा लावला, खरेदीला जायचा!

हृषिकेश त्याला म्हणाला, ''रोहन कपडे, फटाके आणूयात पण कंदील आहे आपल्याकडे. तो नवीन आणायची गरज नाहीये.'' रोहनने चमकून हृषिकेशकडे बघितलं. आणि काहीसा चिडून म्हणाला, ''का? बाबा, चौकातला मोठा कंदील किती जुना झालाय. तो सेम कंदील वापरतोय आपण दिवाळीला. चिन्मयने किती मस्त कंदील आणलाय. त्याचं डिझाईन किती भारी आहे बाबा! एकदा त्यातून चांदण्या दिसतात आणि एकदा पणती दिसते! आपण पण आणूयात ना नवीन कंदील. मला नवीन कपडे नकोत पण कंदील आणूयात. आहेत कपडे माझ्याकडे खूप! दिपेशदादाने आणलेला कंदील फोल्डिंगचा आहे. आणूयात ना रे नवीन कंदील! यावर्षी नाही लावायचा हा घाणेरडा कंदील म्हणजे नाही लावायचा!'' हे म्हणताना रोहनचा आवाज चांगलाच वाढला होता. पाय आपटत तो जोरात म्हणाला, ''आणि तू ऐकणार नसशील तर तर दिवाळीच नको करूयात आपण कशाला करतो आपण दिवाळी! मला आवडत नाही दिवाळी अजिब्बात! कारण हा घाणेरडा कंदील लावतो आपण. जुना झालाय तो आता.''

हे ऐकून इतका वेळ संयम ठेवलेल्या हृषिकेशचा धीर सुटला, आणि पाय आपटत जाणाऱ्या रोहनला दोन्ही हातांनी गच्च धरून गदागदा हलवत तो त्याच्यावर ओरडून म्हणाला, ''वाड्याच्या अंगणात हाच कंदील लागेल. मी आहे तोपर्यंत हाच कंदील वापरायचा. कळलं? आता पुन्हा हा प्रश्न विचारलास ना तर याद राख.'' अपर्णा आणि सुनंदाताई धावत आल्या आतल्या खोल्यांमधून. अपर्णाने रोहनला बाजूला घेतलं आणि आतल्या खोलीत घेऊन गेली. हृषिकेशकडे एक जळजळीत नजर टाकून सुनंदाताईही रोहनच्या मागोमाग गेल्या. जाताना स्वयंपाकघरातून वाटीत एक लाडू न्यायला त्या विसरल्या नाहीत. आत अपर्णा आणि सुनंदाताई रोहनची समजूत घालायचा प्रयत्न करत होत्या.

पण रोहन आता हट्टाला पेटला होता, कोणाचंही ऐकायच्या मन:स्थितीत नव्हता. सारखा म्हणत होता, ''नकोय दिवाळी मला. माझ्या सगळ्या मित्र-मैत्रिणींचे आई बाबा किती खूष असतात आणि माझा बाबा बघ! माझ्याबरोबर फटाके उडवायला येत नाही. काही काही करत नाही... मला नाही आवडत दिवाळी! तो कंदील नको आणि दिवाळी नको.'' हिरमुसल्या होऊन त्या दोघी बाहेर आल्या.

सुनंदाताईंनी बाहेर येऊन हृषिकेशला ऐकवलंच; आप्पा जाऊन ८ वर्ष झाली, किती दिवस तू हे मनात धरून त्या पोराच्या आनंदावर पाणी फिरवत राहणार आहेस? त्यावर काहीही न बोलता हृषिकेश सरळ उठून बाहेर निघून गेला.

सुनंदाताई काहीतरी ठरवून आत गेल्या. रोहनजवळ बसत त्याच्या डोक्यावरून मायेने हात फिरवून म्हणाल्या, सोन्या, तुझं म्हणणं अगदी बरोबर आहे, कंदील अगदी जुना झालाय आणि नवीन आणायला हवाय. पण बाबा का ऐकत नाही माहितीये का? रोहन म्हणाला, कारण तो वाईट्ट आहे. मी पण त्याचं नाही ऐकणार कधी, तो ऐकत नाही नं माझं. सुनंदाताई समजुतीच्या सूरात रोहनला म्हणाल्या, अरे, आपल्याला राग आला की कान बंद होतात ना आपले? मग मोठा श्वास घे बरं, म्हणजे कान उघडतील तुझे. रोहन जरा घुश्श्यात म्हणाला, माझे नको बाबाचे कान उघड, त्याने मोठा श्वास घेतला पाहिजे. आज्जी तुला नाही का वाटत असं? बाबा का हट्ट करतोय? पुन्हा एकदा त्याचा डोळ्यात पाणी जमा व्हायला लागलं. आज्जीने नातवाला कुशीत घेतलं आणि म्हंटलं, ''बाबाला पण मी हेच सांगून आलीये बरं... पण तू त्याच्यापेक्षा जास्त शहाणं बाळ आहेस, तू ऐकतोस आमचं म्हणून तुला सांगतीये

आधी. बाबाला समजावून सांगायला खूप वेळ लागेल. बरं ऐक, हा कंदील आहे ना, तो आप्पांनी आणि तुझ्या बाबाने एकत्र बसून केलाय. ते दोघे दरवर्षी सुंदर कंदील करायचे. दिवाळीत आपल्या घरी नुसती झगमग असायची. आपल्या घरचा कंदील बघायला या गल्लीतले सगळे लोक यायचे. दरवर्षी डिझाईन वेगळी असायची. आत्ता तू जो जुना झालेला कंदील बघतोस ना, तो अप्पांनी आणि हृषिकेशने बसून केलेला शेवटचा कंदील. म्हणून तो तुझ्या बाबाला एवढा जवळचा आहे. त्याला दर दिवाळीत त्याचे बाबा भेटतात त्यातून. म्हणून तो जुना कंदील वापरतो. पण तुझ्यावर त्याचं खूप प्रेम आहे बरं. आज जरी तो चिडला असला ना तरी खूप खूप प्रेम करतो तो आपल्या सगळ्यांवर. आता आपल्यात आप्पा नाहीत ना, म्हणून त्यांची आठवण म्हणून हा कंदील लावतो तो.'' रोहनने सगळं शांतपणे ऐकून घेतलं आणि काही न बोलता तो उठून निघून गेला. सुनंदाताईंनी हताशपणे मान हलवली. बापासारखाच आहे, मनातलं काही सांगणार नाही! असं म्हणत निघून गेल्या.

अपर्णाही हे सगळं ऐकत होती बाहेरच्या खोलीतून. रोहन बाहेर पडला तशी ती त्याच्यामागे गेली. तिला माहिती होतं, अशा वेळी तो वरच्या गच्चीवर जातो. त्याच्यामागे जाऊन तीही गच्चीत त्याच्यापासून काही अंतरावर न बोलता बसून राहिली. रोहन खाली मान घालून बसला होता, जरा वेळ तशाच शांततेत गेला. खालून दिपेशने रोहनला हाक मारली. 'आलो दादा ' म्हणत रोहन तुडतुडत खाली पळाला. अपर्णा जरा वेळ तशीच बसून राहिली. मग सावकाश उठून खाली आली आणि तिने सुनंदाताईंना सांगितलं, की ती जरा बाहेर जाऊन येतीये. ती तडक घराबाहेर पडली आणि ऋषिकेश जायचा त्या मोदी गणपतीच्या देवळात गेली. तिचा अंदाज बरोबर होता. हृषिकेश तिथेच बसलेला होता. गणपतीला नमस्कार करून, प्रदक्षिणा घालून ती हृषिकेशच्याजवळ येऊन बसली.

थोड्या वेळाने ते दोघे बाहेर पडले. तशी अपर्णा हृषिकेशला म्हणाली, ''मला तुझं मन कळतंय रे, आणि आप्पा तुझ्यासाठी किती खास आहेत तेपण माहितीये मला. वडील जवळ नसण्याचं दुःख मी समजू शकते. पण तू बाबा झाला आहेस आता. रोहन मोठा होतोय, ९ वर्षांचा झालाय तो. आणि तू सांग, आजच्या एवढा चिडलेला त्याला तू कधी पाहिलं आहेस का? हट्टाला पेटलेला आणि मुख्य म्हणजे असं भान सोडून बोलताना कधी ऐकलं आहेस का? त्याला बाबा हवे आहेत. त्याचं स्वतःच व्यक्तिमत्त्व शोधायला, बाबाचा आधार हवाय. तुझ्याजवळ आप्पांच्या जशा छान आठवणी आहेत तशा रोहनकडेपण त्याच्या बाबाच्या आठवणी हव्यात असं तुला नाही का वाटत?''

हृषिकेश तावातावाने म्हणाला, ''मी करतो की सगळं प्रेमाने, कधी काही कमी पडू नये म्हणून धडपडत असतो. आजचा प्रसंग सोडला तर मी कधी ओरडलोसुद्धा नाहीये त्याच्यावर. आज अंत पाहिलं गं त्याने माझा... म्हणून संयम सुटला.''

अपर्णा शांतपणे म्हणाली,

''मी तुला दोष देत नाहीये फक्त सावध करतीये. मुलगा मोठा होतोय, त्याच्याशी मनाचं नातं बांधायला सुरुवात करायला हवीये, तुला एकट्यालाच नाही तर आपल्या दोघांनाही. आणि आपल्याला माहितीये की, हे एका दिवसाचं काम नाही, ही वीण रोज घालावी लागेल, सैल झालेली वीण घट्ट करत राहावी लागेल आणि कधी कधी आपले एकतर्फी प्रयत्न असतील, त्याच्याकडून हवा तसा किंवा काहीच प्रतिसाद मिळणार नाही, पण आपल्याला सतत ते करत राहावं लागेल, -judgemental न होता! तुला कळतंय ना मी काय म्हणतीये. आप्पांनी ते तुझ्याबरोबर सातत्याने केलंय, तुझ्या न कळत केलंय म्हणून तुला त्यांची कमी इतकी जाणवते.''

हृषिकेश आता शांत झाला होता आणि काहीसा अंतर्मुखही. त्याचं भावनेनं म्हणाला, ''आप्पा मला कायम मित्रासारखे वाटले ग, त्यांनी त्यांचं वडिलपण कधी लादलं नाही माझ्यावर, त्यांचा धाक होता, पण त्याचा जाच नाही वाटला कधी.''

अपर्णा त्याच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाली, ''मी तुला आणि आप्पांना जेवढे काही दिवस एकत्र पाहिलंय, तुझ्याकडून जेवढं ऐकलंय, आजसुद्धा ऐकतीये तेव्हा तुमच्या नात्यात आप्पांनी घेतलेला समंजस पुढाकार जास्त होता असं मला नेहमीच वाटत आलंय. म्हणून मी तुझा त्या नात्यातला वाटा अजिबात अमान्य करत नाहीये. पण तूच विचार कर, तू अनुभवलेलं वडिलपण रोहनला पण मिळालं पाहिजे की नाही?''

''देतोय की मी, प्रेम, वस्तू, मजा सगळं,'' उद्वेगाने हृषिकेश म्हणाला. 'चल निघूयात', विषय न वाढवता अपर्णा म्हणाली. काही वेळ हृषिकेशला द्यावाच लागणार होता या सगळ्याबद्दल विचार करायला. तो चांगला नवरा आणि बाबा होता यात अजिबात शंका नव्हती तिला, पण आत्ता गाडी रूळावरून घसरत होती ते तिला दिसत होतं, आणि वेळीच ती पुन्हा मार्गावर आणायला हवी हेही तिच्या संवेदनशील मनाला कळत होतं. ते दोघे घरी निघाले. पुढचे २-३ दिवस घरात दिवाळी असूनही शांत शांतच गेले. कपडे, फटाके सगळं आणलं गेलं. रोहन शांतच होता. विशेष उत्साह त्याने कशातही दाखवला नव्हता. तो सकाळचं सगळं आवरून, अभ्यास करून चिन्मयकडे पळायचा. अपर्णाने त्याला

फारसं टोकलं नाही.

बुधवारी संध्याकाळी हृषिकेशने ऑफिस मधून आल्या आल्या रोहनला हाक मारली. बाजारात जाऊन तुला हवा तसा कंदील आणूयात म्हणाला. सुनंदाताईंच्या डोळ्यात पाणीच आलं. माझाही लेक शहाणा झाला बरं', अपर्णाकडे बघून डोळे टिपत त्या म्हणाल्या. अपर्णाने हसून मान डोलावली.

रोहन म्हणाला, ''मला नकोय कंदील. बाबा, मी आणलाय मला हवा तसा कंदील, माझ्या खाऊच्या पैशातून.'' असं म्हणून तो गेला आणि पाच मिनिटांनी परत आला. हृषिकेश, अपर्णा आणि सुनंदाताई सगळेच थोडेसे चकित झाले आणि ऋषिकेश थोडासा मनातून दुखावलासुद्धा. पण वरकरणी तसं न दाखवता तो शांत राहिला. रोहनने आणलेला कंदील बघितला आणि हृषिकेशने एकदम त्याला जवळ ओढून मिठी मारली. रोहनने जुन्याच कंदिलाला बहुतेक सगळ्या बाजूंनी नवा कागद चिकटवला होता, पण एक बाजू रिकामी ठेवली होती आणि एका बाजूला जुना कागद तसाच ठेवला होता. हृषिकेशकडे बघून तो म्हणाला, बाबा आता कंदील तोच आहे, पण एक नवीन tradition आपण सुरू करूयात. यात एक बाजू तुझी आणि आप्पांची असेल आणि एक बाजू तुझी आणि माझी असेल. मला तू आणि आप्पा दोघेही हवे आहात. तू जसा आप्पांसोबत करायचास तसा कंदील आपण दोघे मिळून करत जाऊ. मी नवीन कंदिलासाठी हट्ट नाही करणार. उलट मी चिन्मय आणि दीपेश दादाला जाऊन सांगेन की हा कंदील बाबा आणि आजोबा करायचे तसा मी आणि बाबाने मिळून केलाय. We should preserve our good tradition and heritage, right?''

रोहनचं एवढं समजूतीचं बोलणं ऐकून हृषिकेशला काय बोलावं ते सुचेना. पण त्याच्या डोळ्यातलं पाणी आणि आनंदाचा भाव खूप काही बोलून गेला. सुनंदाताई आणि अपर्णा तर हसत मुसमुसत होत्या. रोहन आणि हृषिकेशने लगेच मिळून उरलेल्या बाजूला कागद लावला आणि काही वेळात तो कंदील दिमाखाने देशपांडे वाड्याच्या मुख्य अंगणात विराजमान झाला. खऱ्या अर्थाने ती दिवाळी प्रकाशमय झाली, आनंदाची झाली. सुनंदाताईंनी देवाजवळ जाऊन साखर ठेवली. तीन पिढ्यांमधली उसवलेली नात्याची वीण घट्ट व्हायला अलगद सुरुवात झाली.

# मंडळाविषयी बोलू काही

## छोटयांचा गोड 'किलबिलाट'

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी 'किलबिलाट' हा आपल्या MSBC च्या लहान सदस्यांकरता आखलेला विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम धडाक्यात पार पडला. कौतुकाचा विषय असा की अगदी वयवर्षे तीनपासून मुलांनी कार्यक्रमात भाग घेतला. मुलांनी गायन, वादन, नृत्य, नाटुकली असे विविध-रंगी, विविध-ढंगी कलाविष्कार सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. एवढेच नाही तर कार्यक्रमाच्या निवेदनाचा भारसुद्धा या लहानग्या मुलांनीच त्यांच्या इवल्याश्या खांद्यांवर उत्तमरित्या पेलला. याचे श्रेय या मुलांनाच नव्हे तर त्यांच्या पालकांनादेखील जाते. त्यामागची पालकांची मेहनत वाखाणण्याजोगी आहे. मुलांचा उत्साह, पालकांची मेहनत, आजी - आजोबांची कौतुकमिश्रित नजर, आणि प्रेक्षकांचे प्रोत्साहन यामुळेच या कार्यक्रमाचा दर्जा दरवर्षी वाढतो आहे. यापुढेही तुम्हा सगळ्यांचे सहकार्य असेच मिळत राहिल आणि आपल्या किलबिल शाळेची भरभराट होत राहील अशी खात्री आहे.

# मी आणि आजी 'सॉलिड टीम'

• जय अनिरुद्ध म्हैसकर •

शब्दांकन : संजय कुलकर्णी



माझ्या लहानपणापासूनच घरात सगळेजण आमची जोडगोळी वाखाणतात! मी आणि आजी सॉलिड टीम असं माझ्या लहानपणापासून आम्ही म्हणतो आणि ती टीम आजही तशीच सॉलिड आहे. अनिता आजी सोबतची काशी-अयोध्येची ट्रिप म्हणजे बाँडिंग, भक्ती आणि भरपूर धमाल अशी झाली.

माझ्या मागच्या भारत भेटीत, श्रावण बाळासारखा मी (आई- वडिलांना नाही पण) माझ्या प्रिय अनिता आजीला घेऊन चक्क तीर्थयात्रेला गेलो. तेही 'काशीस जावे नित्य वदावे' अशा काशीस आणि 'पराभवाच्या अपमानाच्या खुणा पुसून', पुन्हा एकदा अभिमानाने उभे असलेल्या अयोध्येतील राम मंदिराचे दर्शन घेण्यासाठी!

तसा मनापासून मी शिवभक्त आहे, त्यातही १२ ज्योतिर्लिंग अधिक जवळची वाटतात. काही विशेष साधना न करता, मला काशी विश्वेश्वरानेच जणू बोलावले आणि त्याच प्रवासात आयोध्येत रामलल्लाचेही दर्शन घडणार होते, हा तर 'दुग्ध शर्करा' योगच!

नुकतेच मी संपूर्ण वाल्मिकी रामायण ऐकले आणि त्या 'मर्यादा पुरुषोत्तमाचे' चरित्र ऐकून मी अत्यंत प्रभावीत झालो कारण सात हजार वर्षांनंतरही आमच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रात आजही प्रभू रामांच्या जीवनाचा प्रभाव आहे, त्यामुळे त्यांचे दर्शन घेऊन मस्तकावर डोके ठेवण्याची संधी या वयात मला मिळाली, हे माझे भाग्यच.

त्या तीर्थयात्रेची ही संक्षिप्त कथा.

चारच दिवसांची यात्रा कधी संपू नये असे वाटत होते. काशीतील पहिले दोन दिवस तर स्वप्नवतच होते. तेथील जनमानसाच्या कणाकणांत जणू महादेव वास करतात. काशीतील प्रत्येक घरात, प्रत्येक भिंतीवर, प्रत्येक कोठी आणि प्रत्येकाच्या ओठी, महादेवच असतात. मी आणि आजीने आधी गंगा मातेमध्ये बोटीने संचार केला आणि नंतर जसा दिवस कलला, तसे आम्ही गंगा मातेच्या तीरी गंगा मातेच्या आरतीसाठी पोहोचलो. तो तर अविस्मरणीय अनुभव होता.

सात ब्राह्मणांनी मोठी निरांजने आरतीसाठी हाती घेतली होती, प्रवाशांना घेऊन असंख्य बोटी आरतीसाठी तिथे आलेल्या होत्या. निरांजनांचा आणि त्या बोटींवरचा मंद प्रकाश सगळीकडे पसरला होता. लाऊड-स्पीकरमुळे त्यांचे मंत्र आसमंतात भरून

राहिले होते आणि आमची मने त्याने भारून गेली होती. ती प्रवाही गंगा माता सुद्धा जणू आपली स्तुती ऐकण्यासाठी तिथे थांबली होती.

कालभैरव हा काशी विश्वनाथाचा जणू रक्षकच. दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजता आम्ही कालभैरवाच्या मंदिरात दर्शनासाठी गेलो. मंदिर परिसरात प्रवेश करताच एक वेगळी एनर्जी जाणवते– जणू काही आपल्या भोवती अदृश्य शक्ती आहे. गाभाऱ्यातील चौथऱ्यावर मधोमध असलेली कालभैरवाची मूर्ती दृष्ट लागण्यासारखी होती. माझी नजर एकटक कालभैरवाच्या मूर्तीकडे लागलेली असताना, त्या मूर्तीभोवतीची ऑरा डोळ्याला सुखावत होती. तेवढ्यात मंदिराच्या पुजाऱ्यांनी कालभैरवाच्या गळ्यातील एक हार काढून माझ्या गळ्यात घातला. सर्वांग शहारले, जणू कालभैरवांनी मला काशीत प्रवेश करण्याची अनुमतीच दिली होती!

कालभैरवाचे दर्शन घेऊन आम्ही विश्वनाथ मंदिराकडे निघालो, सर्व रस्त्यावर काशी विश्वेश्वराचे दर्शन घेण्यासाठी जगभरातून आलेले भक्त दिसत होते. खूप मोठ्या रांगेतून गाभाऱ्यात पोहोचलो आणि तेथील पुजाऱ्यांच्या सतत पुढे जाण्याच्या विनंतीमुळे क्षणभराचे दर्शन घडले. परंतु त्या क्षणभराच्या दर्शनामध्येसुद्धा त्या शिवलिंगाचे तेज, त्यावर असलेले पवित्र भस्म आणि त्याला वेढलेला तो शेषनाग मला मंत्रमुग्ध करून गेला. त्या स्थितीचे वर्णन करणे, केवळ शब्दातीत आहे. काशी विश्वनाथाचे दर्शन म्हणजे केवळ एक धार्मिक कर्तव्य नव्हे, तर एक आत्मिक अनुभव आहे. हे ठिकाण प्रत्येक भक्ताच्या मनात एक वेगळी एनर्जी आणि श्रद्धा निर्माण करते.

काशी विश्वेश्वराच्या दर्शनानंतर मला बनारसी सिल्कची साडी घ्यायची होती, माझ्यासाठी तो खूपच आनंदाचा अनुभव होता कारण मी पहिल्यांदाच आईसाठी साडी घेणार होतो! आमच्या टॅक्सी चालकांनी सात पिढ्यांचे सिल्क साडीचे दुकान दाखवले. तेथे साडी विणण्याचे कामही सुरू होते, साडी हातात घेतल्यानंतर पिढ्यानपिढ्या सुरू असलेली ही परंपरा, त्यांच्या कामावर असलेली त्यांची निष्ठा आणि त्यांच्या हस्त कौशल्याची जाणीव झाली. आईसाठी एक बनारसी सिल्कची साडी घेऊन आम्ही पुढे निघालो.

काशीमध्ये असताना बनारस युनिव्हर्सिटी आणि सारनाथला भेट देण्याचा ही योग जुळून आला. बनारस युनिव्हर्सिटी प्रचंड मोठी आहे आणि त्याचे कारणही तसेच आगळे आहे. त्या वेळेच्या राजाला प्रभू नारायण सिंगजी ह्यांना, शिक्षण आणि ज्ञान महत्त्वाचे होते. त्याने बनारस युनिव्हर्सिटीच्या संस्थापकाला सांगितलं की जितकी जमीन तू सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत चालशील तेवढी मी तुला दान करीन. त्यामुळे युनिव्हर्सिटीचा परिसर अतिशय मोठा आहे तसाच अतिशय देखणाही आहे, प्रत्येक विभागासाठी एक इमारत आणि मोठे ग्राऊंड आहे.

तिथून पुढे आम्ही सारनाथला गेलो. गौतम बुद्धांनी याच ठिकाणी आपले पहिले प्रवचन दिले, जे 'धम्मचक्र प्रवर्तन' म्हणून ओळखले जाते. हे ठिकाण केवळ धार्मिकच नव्हे तर ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही अत्यंत समृद्ध आहे. तिथे असताना आम्हाला धमेक स्तूप, चौखंडी स्तूप, अशोक स्तंभ, सारनाथ पुरातत्त्व संग्रहालय पाहायला मिळाले.

तिथून आम्ही संध्याकाळपर्यंत अयोध्येला पोहोचलो. वास्तविक दुसऱ्या दिवशी रामलल्लाचे दर्शन घेण्यासाठी जाण्याचे नियोजन होते, परंतु संध्याकाळीच मंदिरात जावे असा विचार करून आम्ही एका रिक्षाने मंदिराकडे जायला निघालो. प्रचंड गर्दी असल्याने त्या रिक्षाचालकाने अनोळखी गल्लीबोळातून आम्हाला राम मंदिराच्या एका प्रवेशद्वारापाशी आणून सोडले. आनंदात खाली उतरलो तर ध्यानात आले की तो बाहेर जाण्याचा मार्ग आहे, तिथून आत प्रवेश मिळतच नाही. ज्या दारातून प्रवेश मिळणार होता तिथे जाण्यासाठी किमान अर्धा तास चालावे लागणार होते जे अनिता आजीला शक्य नव्हते, त्यामुळे तिच्यासाठी व्हीलचेयर आणावी म्हणून, तिला तिथेच थांबवून मी चालत प्रवेशद्वाराकडे निघालो. यात्रेकरूंच्या गर्दीत उलट्या दिशेने मार्ग काढत, अखेर मी तिथे पोहोचलो आणि परिस्थिती तेथील अधिकाऱ्यांना समजावून सांगितली परंतु, ''ज्यांच्यासाठी व्हीलचेयर पाहिजे ती व्यक्ती इथे उपस्थित असली पाहिजे'', असा त्यांनी मला नियम सांगितला. निराश होऊन मी परत आजी थांबली होती तिकडे जाण्यास निघालो, परंतु सोबत मोबाईल नव्हता त्यामुळे त्या गर्दीत मी हरवलो. बरेच चालल्यानंतर अखेर अनिता आजीजवळ पोहोचलो.

आमची एकंदर धावपळ पाहून प्रवेशद्वार दोन वरील एका रक्षकाने आम्हास दर्शनाचा एक अवैध मार्ग सुचवला, परंतु, त्या मर्यादा पुरुषोत्तमाचे दर्शन घेण्यासाठी चुकीच्या मार्गाने प्रवेश मिळवावा हे माझ्या मनाला पटले नाही. रामलल्लाच्या दर्शनाशिवायच त्या दिवशी परत यावे लागले, अर्थात, त्या रिक्षाचालकाने अनिता आजीच्या खूप शिव्या खाल्लया त्याही हिंदीत, हे वेगळे सांगायला नकोच!

दुसऱ्या दिवशी रात्री, आम्ही योग्य मार्गाने एक क्रमांकाच्या प्रवेशद्वारावर पोहोचलो आणि सर्व नियमांचे पालन करून आम्हास रामलल्लाचे दर्शन घडले, रत्नजडित अलंकारांनी मंडित, रेशमी वस्त्रे परिधान केलेल्या त्या प्रसन्नचित्त, कालातीत, तेजस्वी रामलल्लाचे

दर्शन! आम्ही रात्री बऱ्यापैकी उशिरा गेलेलो असल्यामुळे तुलनेने गर्दी कमी होती, त्यामुळे दर्शन घेण्यास मौल्यवान दोन मिनिटे अधिक मिळाली, परिणामतः माझ्या मनातील सर्व भावना ज्या कॅनडाहून अयोध्येपर्यंत सोबत नेल्या होत्या त्या व्यक्त करण्यास मला पुरेसा वेळ मिळाला, कृतार्थ मनाने आम्ही गाभाऱ्यातून बाहेर आलो.

मनात विचार आला, कदाचित काल त्या रामलल्लाने आमच्या दर्शनाच्या तीव्र इच्छेची परीक्षा घेतली, आणि आमची तीव्र इच्छा जाणवल्यामुळे, दुसऱ्या दिवशी आम्हाला काही मिनिटे जास्त दर्शन दिले.

आज हा लेख लिहिताना मनात विचार आहे, काशी आणि आयोध्या, विश्वनाथ आणि रामलल्ला, मी आणि अनिता आजी... 'सॉलिड टीम'!

त्या पवित्र क्षणांची आठवण, मनात रुजलेली ती भक्ती, आणि आजी सोबत केलेली धमाल ही मला कायम लक्षात राहील.

।। हर हर महादेव - जय श्रीराम ।।

# खाद्यजत्रा

## विड्याच्या / खाऊच्या पानांचे लाडू

**- दिप्ती मोकाशी**

हे लाडू जेवणानंतर मुखशुद्धीसाठी खाल्ले जातात तसेच याने पचनशक्ती वाढते. खाऊच्या पानांमध्ये अनेक पोषक घटक व आरोग्यदायी गुणधर्म असतात.

**साहित्य -**

- २० विड्याची पाने,
- आटवलेले दूध (condensed milk)- १ लहान डबा
- काजू- बदाम , टुटीफुटी (अंदाजे)
- गुलकंद - ३-४ चमचे
- बडीशेप -१ चमचा (भाजून घेणे)
- बारीक खिसलेले खोबरे (desiccated coconut) -१.५ कप

**सारण-**

गुलकंद, काजू -बदामाचे बारीक तुकडे , बडीशेप यांचे मिश्रण करून सारण तयार करावे.

**कृती -**

- प्रथम विड्याची पाने धुवून, पुसून घ्यावीत व नंतर मिक्सरमधून आटवलेल्या दुधासोबत बारीक चिकट पेस्ट करून घ्यावी. (दूध २-३ चमचे घ्यावे, पण वरून लागले तर अजून घ्यावे)
- कढईमध्ये अर्धा चमचा तुपावर बारीक खिसलेले खोबरे परतून घ्यावे, त्यात पानाची पेस्ट घालून मिश्रण गोळा होईपर्यंत पुन्हा परतून घ्यावे.
- मिश्रण गोळा होताच ताटात काढून थोडे गार होऊ दयावे.
- आता पानाच्या तयार गोळ्याचे छोटे भाग करून प्रत्येक भागाची पारी करून घ्यावी. प्रत्येक पारीमध्ये योग्य बसेल असे सारण भरून लाडू वळून घ्यावा.
- एका ताटलीत बारीक खिसलेल्या खोबऱ्यात लाडू घोळवून घ्यावा. या प्रमाणात अंदाजे ९-१० लाडू तयार होऊ शकतात.
- वरून सजावटीसाठी टुटीफुटी लावावी



# तायक्कोंडो

## (Taekwondo)

• श्लोक पाटील •

नमस्कार! माझं नाव श्लोक पाटील आहे. मी सध्या ११ वर्षांचा आहे आणि यावर्षी १२ वर्षांचा होणार आहे. मी सातवित आहे. मी पुण्यात, महाराष्ट्रात जन्मलो, पण जेव्हा मी फक्त दोन वर्षांचा होतो, तेव्हा फॅमिलीबरोबर रेडमंड (Redmond), अमेरिका (USA) येथे राहायला गेलो. तिथे दोन वर्ष राहिल्यानंतर, आम्ही परत भारतात आलो आणि मी प्रीस्कूल पूर्ण केलं. एका वर्षानंतर, माझ्या पप्पांना कामामुळे कॅनडात जावं लागलं, त्यामुळे माझं शाळेचं वर्ष संपल्यावर आम्हीही २०१९ मध्ये कॅनडाला आलो. तेव्हा कोविड-१९ लॉकडाउनची सुरुवात झाली होती. ते दिवस खूप वेगळे आणि कठीण होते. मला घरातच रहावं लागलं आणि फार काही करता आलं नाही. मला भारतातील माझे मित्र खूप आठवायचे आणि मी सतत पप्पांना विचारत होतो की आपण परत भारतात जाऊ शकतो का?

पण हळूहळू येथे काही नवीन मित्र मिळाले आणि मला आनंदी वाटू लागलं. तीन वर्षांपूर्वी माझ्या आयुष्यात एक नवीन छंद आला, तो म्हणजे तायक्कोंडो. जेव्हा आम्ही लॅन्गली, बीसीमध्ये गेलो, तेव्हा माझ्या आईने मला तायक्कोंडो (Taekwondo) शिकायला encourage केलं. मला आठवतं, जेव्हा मी पहिल्यांदा डोजांगमध्ये (प्रशिक्षण हॉल) पांढरा बेल्ट हातात घेऊन गेलो, तेव्हा खूप घाबरलो होतो. मी स्वतःला सतत विचारत होतो, ''मी हे का केले?'' पण नंतर मी स्वतःला सांगितलं की, हे सेल्फ डीफेन्ससाठी आहे, म्हणून मला प्रयत्न करायला हवा. मी मॅटवर पाऊल ठेवले, मास्टरला आदराने वाकून नमस्कार केला आणि त्यांना पट्टा बांधायला शिकवाल का असं विचारलं. त्यांनी मला पट्टा कसा बांधायचा ते शिकवलं. माझा पहिला वर्ग खूप मजेशीर होता. त्यांनी मला तायक्कोंडोच्या मूलभूत गोष्टी शिकवल्या आणि मला खूप छान वाटू लागलं.

तायक्कोंडो ही दक्षिण कोरियामधून आलेली लढाऊ कला आहे. या शब्दाचा अर्थ खूप खोल आहे: 'ते' म्हणजे पाय, 'क्कॉन' म्हणजे मूठ, आणि 'डो' म्हणजे मार्ग. म्हणून तायक्कोंडो म्हणजे ''पाय आणि मुठीचा मार्ग.'' ही कला जनरल चोई हाँग ही यांनी तयार केली होती, जे दक्षिण कोरियन सेनेत होते आणि एक महान मार्शल आर्टिस्टही होते. आज तायक्कोंडोच्या दोन मुख्य संघटना आहेत. वर्ल्ड तायक्कोंडो (WT) आणि इंटरनॅशनल तायक्कोंडो फेडरेशन (ITF). तायक्कोंडो शिकायला शिस्त आणि एकाग्रता लागते. यातील मुख्य तंत्र म्हणजे लाथ मारणं, पंच मारणं आणि ब्लॉक करणं. मला लाथांपैकी फ्रंट किक आणि राउंडहाउस किक फार आवडतात. ब्लॉक्समधून मला नेक स्ट्राईक आणि फ्रंट ब्लॉक आवडतात. तायक्कोंडो फक्त मारामारी करण्याची कला नाही, ती संयम, शिस्त आणि इतरांबद्दल आदर शिकवते. याशिवाय, आपल्याला कधी

आणि कशा परिस्थितीत तायक्वोंडो वापरायचं हे देखील शिकवलं जातं.

तायक्वोंडोमध्ये पहिल्यांदा पांढरा बेल्ट मिळतो, जो नवीन शिकणाऱ्यांसाठी आहे. त्यानंतर पिवळा- स्ट्राईप असतो, त्यात पांढऱ्या बेल्टवर पिवळ्या रंगाची बारीक पट्टी असते. त्यानंतर पूर्ण पिवळा बेल्ट येतो. बेल्टमध्ये अनेक रंग आहेत आणि प्रत्येक रंगाच्या मधोमध पट्टी असते. पिवळ्यानंतर केशरी, नंतर मी जो वापरतो तो हिरवा बेल्ट, त्यानंतर निळा, तपकिरी, आणि लाल बेल्ट येतो. काळ्या बेल्टपूर्वी बेल्टवर दोन काळ्या पट्ट्या असतात, ज्याला डबल ब्लॅक स्ट्राईप म्हणतात. काळ्या पट्ट्यांनाही डान लेवल असतात, डबल ब्लॅक स्ट्राईपनंतर डान १ म्हणजे काळा बेल्ट १, नंतर डान २, आणि असे डान १० पर्यंत बेल्ट जातात. यामुळे आपल्या प्रगतीचा अंदाज येतो.

तायक्वोंडोची पाच महत्त्वाची तत्त्वे आहेत. पहिले म्हणजे 'चांगली वागणूक' (Courtesy - Ye Ui), ज्याचा अर्थ नम्रता, आदर आणि इतरांबद्दल काळजी घेणं. तायक्वोंडो शिकणाऱ्यांनी शिक्षक, सहकारी आणि आजूबाजूच्या लोकांशी वागणे चांगले ठेवावे, ज्यामध्ये वाकून नमस्कार करणं, आदराने ऐकणं आणि लोकांशी प्रेमाने वागणं यांचा समावेश होतो. दुसरं तत्त्व म्हणजे 'प्रामाणिकपणा' (Integrity - Yom Chi), ज्याचा अर्थ योग्य गोष्ट जाणून, ती करणं, मग कोणी पाहत नसलं तरीही. प्रामाणिक विद्यार्थी चांगले वागतात, टेस्ट दरम्यान फसवणूक करत नाहीत, चूक मान्य करतात आणि sportsmanship दाखवतात. तिसरं तत्त्व म्हणजे 'धैर्य' (Perseverance - In Nae), म्हणजे कठीण वेळ आली तरी हार मानू नका. तायक्वोंडो शिकायला वेळ लागतो आणि मेहनत करावी लागते. तुम्ही पडाल किंवा फेल होणार, पण धैर्य म्हणजे प्रयत्न करत राहणं. चौथं तत्त्व म्हणजे 'स्वयं नियंत्रण' (Self Control - Guk Gi), ज्याचा अर्थ म्हणजे तुमच्या भावना, क्रिया आणि प्रतिक्रिया नियंत्रित करणं. तुम्ही स्पॅरिंग करत असाल किंवा जीवनातील कठीण परिस्थितीचा सामना करत असाल, Self Control तुम्हाला शांत ठेवतो. तायक्वोंडोच्या विद्यार्थ्यांनी कधीही आपले कौशल्य चुकीच्या प्रकारे किंवा रागात वापरू नये. शेवटचं तत्त्व म्हणजे indomitable Spirit (Baekjul Boolgool), म्हणजे धैर्य आणि इच्छाशक्ती! परिस्थिती कितीही कठीण का असेना. योग्य गोष्ट करण्यासाठी उभं राहणं, भिती वाटली तरीही हार न मानणं!. ही तत्त्व केवळ वर्गासाठी नाहीत, तर रोज सगळीकडे वापरवीत. हे करणारे विद्यार्थी शिस्तप्रिय आणि ताकदवान व्यक्ती होतात.

पहिल्यांदा मी माझ्या बेल्ट-टेस्टला गेलो तेव्हा मला खूप छान वाटलं. शेवटी मी पिवळा बेल्ट मिळवला याचा मला खूप आनंद झाला. (मला येलो स्ट्राईपची टेस्ट द्यावी लागली नाही कारण आम्ही आधी तसं विचारलं होतं) जेव्हा मी डोजांगमध्ये प्रवेश केला, तेव्हा अनेक मुलं मॅटवर उभी होती. मी त्यांच्यात सामील झालो, पण मी पास होईन की नाही याची चिंता होती. लवकरच मास्टर्स डोजांगमध्ये आले आणि आम्ही सगळ्यांनी त्यांना वाकून अभिवादन केलं. त्यांनी आम्हाला बसवून बोर्ड तोडण्याचं कारण समजावलं. त्यांनी बरीच कारणं सांगितली, पण मी दोन कारणे सांगतो. बोर्ड तोडणं म्हणजे तुमचं तंत्र बरोबर आहे हे दाखवणं. उदाहरणार्थ, जर तुम्ही योग्य पद्धतीने, योग्य फोकस आणि अँगलने लाथ मारली तर बोर्ड सहज तुटू शकतो, पण चुकीच्या तंत्राने बोर्ड तुटणार नाही. बोर्ड तोडणं हे प्रगती दाखवण्यासाठीही केलं जातं. आम्ही मास्टरसमोर आमचे तंत्र दाखवणार होतो. बोर्ड तोडण्यापूर्वी आम्हाला पूम्से (पॅटर्न) करावे लागले, प्रत्येक बेल्टसाठी वेगळा पूम्सा असतो. मग मी बोर्ड तोडला, जो थोडा जाड होता, पण तोडणं कठीण नव्हतं. मी मास्टरला वाकून नमस्कार केला आणि आम्हाला नवीन बेल्ट मिळाला. असंच प्रत्येक बेल्ट-टेस्टला होतं.

तायक्वोंडो शिकणाऱ्यांसाठी काही टिप्स आहेत. नियमित प्रॅक्टिस करा, कारण सातत्य महत्त्वाचं आहे. शक्यतो रोज १०-१५ मिनिटे तरी घरात तायक्वोंडोचा सराव करा. तंत्रावर लक्ष द्या- लाथा, पंच आणि ब्लॉक्स आधी चांगल्या प्रकारे शिका, कारण फाऊंडेशन नीट असल्याशिवाय पुढील गोष्टी शिकणं अवघड आहे. तुमच्या मास्टरच्या सूचना नीट ऐका आणि त्यांच्या सल्ल्याचं पालन करा, कारण त्यांना बऱ्याच वर्षांचा अनुभव आहे. धीर धरा, प्रगती होण्यासाठी वेळ लागतो, काही गोष्टी लगेच येत नाहीत. शांत रहा आणि लक्ष द्या, विशेषतः टेस्ट किंवा स्पॅरिंग दरम्यान. तुमच्या मास्टरना, सहकाऱ्यांना आणि opponents ना आदर द्या. तायक्वोंडोमध्ये आदर अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रशिक्षणापूर्वी आणि नंतर स्ट्रेच करा. शरीराची काळजी घ्या आणि दुखापत किंवा थकवा जाणवल्यास विश्रांती घ्या. सर्वात महत्त्वाचं म्हणजे या मार्शल आर्टचा आनंद घ्या.

माझ्या मते, प्रत्येकाने किमान एकदा तरी तायक्वोंडो करायला पाहिजे. तुम्हाला कदाचित आवडेल किंवा आवडणार नाहीही, पण प्रयत्न करून बघायलाच हवा. तायक्वोंडोने मला खूप काही शिकवलं, मला बलवान केलं आणि नवे मित्रही दिले. त्यामुळे तुम्हीही हे करून बघा.



# अपमान गर्देचा की

• अभिजीत देसाई •

त्या दिवशी स्टुडिओला जाताना बाईक नेली नाही, सर्विसिंगला दिल्यामुळे नेता आली नाही. स्टुडिओ म्हणजे माझे ऑफीस. मी मुंबईत एका ॲनिमेशन स्टुडिओमध्ये काम करायचो. मी ऑफीसला चाललो आहे' असे कधीच म्हणत नाही. तसे म्हणायला मला आवडतच नाही म्हंटले तरी चालेल. ऑफीस म्हटलं की माझ्या अंगावर शर्ट पॅन्ट चढते आणि गळ्याभोवती टाय आवळतो.

असो, तर बाइक नेता न आल्यामुळे बस, रिक्षाने प्रवास करावा लागला आणि हे रिक्षावाले तर तुम्हाला माहीतच आहेत, तुम्ही सांगितलेल्या जागी कधी येतील तर शपथ! संध्याकाळी घरी येताना तर मारामारच झाली. बसमधे ही तुडुंब गर्दी आणि रिक्षाने जावं तर त्यांची ती नाटकं. शेवटी चिडून एका रिक्षात रिक्षावाल्याला काही न विचारता सरळ घुसलोच, फार वैतागला तो रिक्षावाला... काय करणार मी तरी, माझा नाईलाज होता. त्याची आपली बराच वेळ बडबड चालूच राहिली.

रिक्षावाल्याची बडबड, रस्त्यावर फुलऑन रहदारी, आवाज... मनात विचार आला, संध्याकाळी बाईक मिळाली नाही तर उद्या पण हे सगळं सहन करावं लागेल.

बाकी काहीही असो, हा सर्व ताप एका बाजूला आणि मुंबईचा पाऊस एका बाजूला. मी तर मुंबईचा पाऊस खूप मिस करतो. बाहेर कोसळत असलेला पाऊस, रिक्षात असूनसुद्धा अर्धवट भिजलेले तुम्ही आणि ओठात एक सिगारेट, आहाहा...

काही वेळाने मालाडजवळ एका सिग्नलपाशी आमची रिक्षा थांबली. आमच्या बाजूला एक बाई (तिशीतली असावी ) बाईक घेऊन आली. तिच्या मागच्या सीटवर उलट्या दिशेने तोंड करून बसलेल्या तिच्या लहान मुलीने माझे लक्ष वेधले. दोघीही बाईकवर होत्या पण दोघींनीही रेनकोट वगैरे घातले नव्हते. बहुधा बाईक-राईड करत पावसात मनसोक्त भिजण्याच्या हेतूनेच त्या दोघी बाहेर पडल्या असाव्यात. मला पण त्या दोघींना पाहून मजा वाटली. पण रिक्षावाल्याच्या मनात काहीतरी भलतंच चालू होतं बहुदा, त्या दोघींकडे बघून रिक्षावाला हसला आणि म्हणाला का जमाना आ गवा हय्! त्या लहान मुलीची उलटं बसण्याची पद्धत बहुतेक त्याला नवी असावी....

(आम्हा दोघांमधे घडलेले पुढील संभाषण हिंदीमधे होते)

तो :- आज-काल पुरुषांची शानच उरली नाही कुठे.. आधी पुरुषांचा काय रुबाब होता, काय शान होती.

मी :- म्हणजे ? कशाबद्दल बोलतो आहेस तू?

तो :- मी सतरा अठरा वर्षांचा असताना आमच्या गावात कुस्तीच्या आखाड्यात जात असे. ( यु पी, बिहार मधील कोणत्या तरी गावाचे नाव त्याने घेतले, आठवत नाही आता). हे भलेभले

पहिलवान येत असे तालमीला. आम्ही पण जात असू तालमीला...आणि खास आकर्षण दरवर्षी होणाऱ्या स्पर्धेचे असे, गदा जिंकण्याची स्पर्धा!

मी :- कोणती गदा आणि काय स्पर्धा होत असे?

तो :- इथे मुंबईत कशा शरीरसौष्ठव स्पर्धा होतात त्याप्रमाणे आमच्या भागात गदा जिंकत असत. आजूबाजूची दहा-बारा गावे यात भाग घेत. तीन-चार वर्षे ती गदा आमच्या गावाकडून कोणी घेऊच शकला नाही (त्याची छाती गर्वाने फुलली होती).

मी :- असं काय होतं त्या गदेमध्ये ?

तो :- अहो साहेब, ती गदा मिळवणे म्हणजे खूप मोठा मान होता गावासाठी. इतकं सोपं नव्हतं ती गदा उचलणं. भल्या-भल्यांना पाणी पाजत असे ती गदा.

(ती गदा म्हणजे एक प्रकारचा वजनदार दगड होता)

मी :- बरं! मग ह्याचा आणि पुरुषांच्या मानाचा काय संबंध?

तो :- एकदा आमच्या गावातील तीन-चार बायकांमध्ये पैज लागली. त्यांच्यापैकी एक बाई ती गदा उचलू शकते असे तिचे म्हणणे होते. मूर्खं बायका..तशा आमच्या गावातील सर्व बायका अगदी समजूतदार .. चूल आणि मूल सांभाळून शेतीची कामे त्या करीत असत... त्यांचं आणखी काम ते काय...

(त्याच्या ह्या बोलण्यावर मला काही बोलावेसे वाटले नाही कारण आजही भारतातील कित्येक गावात स्त्रियांना मिळणारी वागणूक पाहून खंत वाटते, आणि त्याच्या म्हणण्याप्रमाणे ही गोष्ट तर जवळपास दहा वर्षांपूर्वीची असावी )

त्याचे बोलणे चालूच होते..

तो :- रात्री त्या सगळ्या आखाड्यामागे जमल्या, संधी साधून आत शिरल्या आणि ठरल्याप्रमाणे एकींने तीन-चार प्रयत्न करून शेवटी ती गदा उचललीच...

मी :- व्वा!.. फुलऑन! ( माझ्या तोंडून अगदी उत्स्फूर्तपणे हे शब्द निघाले )

तो :- अहो व्वा काय साबजी, दुसऱ्या दिवशी जेव्हा गावात ही गोष्ट पसरली तेव्हा त्या चौघींनाही पंचायतीत बोलावले आणि त्यांना जबर शिक्षा करण्यात आली.

(माझ्यासाठी हे जरा अतीच होतं )

मी :- काय ! कशासाठी ? फक्त ती गदा उचलली म्हणून?

तो :- अहो... त्या दिवसानंतर ती गदा कुणालाही जिंकता आली नाही... कारण त्याच दिवशी सर्वांनी एकमताने निर्णय घेऊन ती गदा विहिरीत टाकून दिली. जी गदा आखाड्यात तालमी करणाऱ्या पुरुषांसाठी आव्हान होती ती एका बाईने उचलल्यावर पुरुषजातीचा काय मान राहणार आणि एका बाईने उचललेली गदा उचलण्यात कसला आलाय पुरुषार्थ.

माझ्या लक्षात आले की तो मघाशी त्या बाईकवर बसलेल्या लहान मुलीकडे बघून हसला नव्हता. त्याची ती गोष्ट पुढे चालूच होती की त्या बाईने हे कृत्य करून गावाची कशी नाच्चकी केली वगैरे. माझ्याकडे त्याला विचारण्यासाठी खूप प्रश्न होते. त्याच्याशी ह्या विषयावर वाद घालावा असं खूप वाटत होतं. पण त्याच्या मते तो आणि त्याच्या गावातले लोक ह्यांनी कसा त्या घटनेचा अगदी योग्य शेवट केला हे सांगताना तो थकत नव्हता. हे सर्व ऐकून ह्या विषयावर त्याच्याशी पुढे काही बोलण्यापेक्षा मला दुसरी सिगारेट पेटवणे जास्त चांगले वाटले.

२०१४ साली माझ्याबरोबर घडलेली ही सत्यघटना आहे आणि दुर्दैव हे आहे की अशा घटना फक्त एका ठराविक क्षेत्रात आणि समाजात घडत नसून सबंध भारतातील गावांमध्ये थोड्याफार फरकाने अजूनही घडतात. एके ठिकाणी आपण 'मुलगी शिकली प्रगती झाली' अशा पाट्या गावागावात लावतो, सरकारही ह्या विषयावर खूप जाहिराती करून समाज प्रबोधन करतं आणि दुसरीकडे असे काही प्रसंग घडतात आणि ह्या सर्व प्रबोधनांवर पाणी फिरवल्यासारखं होतं. पुरुष पहिलवान उचलत असलेली ती मानाची गदा जेव्हा एक सक्षम बाई पेलून धरते तेव्हा तीच गदा अपमानास्पद कशी ठरते हे न सुटलेलं एक कोडंच आहे. ह्यात झालेला अपमान गदेचा, की ..... !



# उद्यानगाथा

**• पराग सहस्रबुद्धे •**

**वसंत ऋतू**

ह्या शहरात घर शोधायला सुरुवात केली तेव्हा पहिली अट होती ती म्हणजे किंमत! बाकी ढिगभर चांगल्या गोष्टी असूनही ते परवडलच नाही तर काय करणार?! त्यानंतर अजून एक महत्त्वाची अट होती ती म्हणजे पुढे मागे छोटसं का होईना, पण अंगण हवं. आम्हांला दोघांनाही झाडं लावायची, बागकामाची आवड आहे आणि ती जोपासण्यासाठी जागा हवी. गेल्या दहा वर्षात कोव्हिडची वर्षं सोडता एका घरी सलग दोन वर्षांपेक्षा जास्त रहाणच झालं नाही. शिवाय फक्त घरं आणि शहरंच नाही तर देशही बदलले! त्यामुळे उपलब्ध असलेल्या जागेत लावलेली थोडी फार झाडं प्रत्येकवेळी सोडून यावी लागली. पेरेनियल झाडांचं पुढे काय झालं माहीतही नाही.

हे घर बघायला आलो, तेव्हा सगळ्यांत आवडलेली गोष्ट म्हणजे पुढचं मागचं अंगण! पुढच्या बाजूला मुख्य दार आणि त्याला लागून असलेल्या गॅरेजपासून पुढे रस्त्यापर्यंत उतार. ह्या उतारावर ड्राईव्ह-वे. ड्राईव्ह-वे च्या एका बाजूला चिंचोळा हिरवा पट्टा तर दुसऱ्या बाजूला मोठी हिरवळ.. दोन्ही बाजूंना अर्ध्यापर्यंत कुंपण. हिरवळीवर उतरंड छेदणारा एक मोठा चौथरा आणि त्यावर लावलेली विविधरंगी पानांची झुडपं. हिरवळीवर घराच्या बाजूला बॉक्सवूडच्या झुडपांची मोठी रांग. सगळं कसं नीटनेटकं. मागच्या बाजूला तर सलग मोठं अंगण, त्यात हॉट टब, ट्रँपोलिन, कोबा घालून टेबल खुर्च्या ठेवायची सोय. मागे कुंपणाच्या बाहेर मोठी मोठी पाईन आणि सेडारची झाडं. ती इतकी जुनी आणि उंच की सूर्य डोक्यावर आल्याखेरीज जमिनीपर्यंत ऊन पोहोचतही नाही! घराच्या डाव्या बाजूला शेजारच्यांचं कुंपण आणि उजव्या बाजूचा एक त्रिकोणी पट्टाही कुंपणाच्या हद्दीत. तिथली झाडांची सावली इतकी गडद की भर उन्हातही थंड वाटावं. एकूण बागकामाची हौस भागवायला एकदम योग्य. हौस भागवता भागवता दमायलाही

होईल कदाचित, पण तेव्हाचं तेव्हा बघू!

**उन्हाळ्याची सुरुवात**

ह्या घरी रहायला यायचं ठरल्यावर आमच्या मनात बागेचे इमले सुरू झाले. ड्राईव्ह-वेच्या उतारावर डॅफोडील्स, ट्युलिप आणि हायासिंथचे बल्ब लावू. पुढे हिरवळीच्या भोवती छान फुलझाडांचं कुंपण करू. एका बाजूला झेंडूची रोपं, दुसरीकडे गुलाबाची झाडं. चौथऱ्यावर जागा मिळेल तशी शेवंती, ॲस्टर शिवाय जर्बेराचे कंद. म्हणजे कशी जवळजवळ फेब्रुवारी ते ऑक्टोबर फुलं फुलतील. उताराच्या दुसऱ्या बाजून लालभडक पानांचं लेसलिफ मेपल आणि अजून एखादं शोभेचं झाड चांगलं वाटेल. तिथे फार लहान झाडं नको, मोठी, स्पष्ट दिसणारी हवी. ड्राईव्ह-वे वरून गाडी मागे घेताना कोणी डगमगलं तर बिचाऱ्या झाडांचा जीव जायचा! मागच्या बाजूला फार काही नको करायला. मुलांना खेळायला मोकळी जागा हवी थोडी. डाव्या बाजूला स्वयंपाक घराच्या दारापाशी व्हेजी पॅच करू. मिरच्या, कोथिंबीर, भाज्या लावता येतील. म्हणजे अगदी फोडणीचं तेल तापायला ठेवलं की जाऊन मिरच्या तोडून आणायच्या! मागच्या कुंपणाच्या भोवती सावलीत फुलतील अशी फुलझाडं लावू. उजवीकडच्या त्रिकोणी तुकड्यावर सेडार, पाईनच्या फांद्यांची काटछाट करून फळबाग करावी. सफरचंद, अंजीर, द्राक्षांची वेल, इथल्या हवेत जगत असतील तर डाळींबाचं झाड, शिवाय पेअर. अजून थोडी जागा उरलीच तर एक गाय पण आणून ठेऊ म्हणजे तिचं दूध घालून फ्रुट सॅलडही करता येईल!

**उन्हाळा**

अखेर ह्या घरी रहायला आलो आणि आता मनात बांधलेले इमले प्रत्यक्ष उतरवायची वेळ आली आहे. सामान हलवण्यात आणि लावण्यात खूप वेळ गेला आणि दमायला झालं. बागेचे इमले हवेतच राहणार की काय असं वाटतय. सुरुवात करायची म्हणून दुकानातून मातीची दोन-तीन पोती आणली. ती आणली कुंड्यांच्या अंदाजाने. जमिनीवरच्या झाडांसाठी वापरली तर एका कोपऱ्यात घालून संपली पण. मग अजून फेऱ्या माराव्या लागल्या. इथल्या उन्हाळ्यात गवत इतकं भसाभसा वाढतं की ते वाढण्याचा वेग आणि कापण्याचा वेग ह्यात कधीच मेळ न बसल्याने ते कायम वाढलेलच दिसतं. अगदी लहान मुलांचे केस कापल्यावर कसे लगेचच दोन चार दिवसात पुन्हा वाढलेले दिसतात तसं.

**शरद ऋतू**

कंद, नवीन रोपं लावेपर्यंत उन्हाळा संपून थंडी, पाऊसच सुरू झाला आणि मग पानगळ, पाईन निडल्स ह्यांचा खच पडून बाग झाडायचं काम तेवढं वाढलं. झाडांचं काम नाही तर निदान कुंपणाची डागडुजी करून घेऊ असा विचार करून सरत्या उन्हाळ्यात कुंपणाचं काम करून घेतलं. देश कुठलाही असो, काम करायला येणारी माणसं वेळेवर येतील तर शपथ. दसऱ्याला छान तयार होईल असं वाटलेलं कुंपण कसंबसं थँक्सगिव्हिंगपर्यंत तयार झालं. स्वयंपाकघराच्या दाराजवळ सफरचंदाचं झाड आहे ह्याचा नुकताच शोध लागलाय. त्याला लगडलेली सफरचंद चांगली मोठी होऊन पानांमधून डोकी बाहेर काढायला लागली आहेत, पण ते झाड घराच्या फारच जवळ आहे. फळांचा बहर संपल्यावर कुंपणाचं काम करणारा माणूस म्हणाला, की ते थोडं दूर लावूया. त्याला विचारलं जगेल ना ते? तर म्हणे देवाची कृपा असेल तर जगेल. म्हंटल झाड उपटणार तू, मग ते जगवायची जबाबदारी देवावर का टाकतोस? तर तो नुसताच हसला. पण मग खरंच देवाचं नाव घेऊन ते अख्खं झाड काढून मागे लावलं. तिथेच दोन हॉडोडेंड्रॉनची (rhododendron) झाडं होती. ती मागच्या दारी कशाला? पुढे छान दिसतील म्हणून ती काढून पुढे लावली. एका कोपऱ्यात वेल चढवायला लाकडी जाळीही करून घेतली. आता थंडीत कसली वेल लावणार असा विचार करत असतानाच 'विंटर जॅस्मिन' ह्या वेलीची माहिती समजली आणि जवळच्या नर्सरीत ती मिळालीही! आणून ती जाळीजवळ लावून टाकली. कॉस्टकोतून (Costco) आणलेले ट्युलिप आणि डॅफोडिल्सचे बल्ब थंडीत कुडकुडत एकदाचे लावले. नर्सरीत भेटलेल्या आज्जींची आज्ञा शिरसावंद्य मानून पिवळी शेवंती जमिनीत लावली. जगेल म्हणे नक्की! लाल आणि गुलबट रंगाची मात्र कुंड्यांमध्येच ठेवली आहे.

**हिवाळा**

हिवाळ्यात परिसरातली फुलझाडं आणि फळझाडं निष्पर्ण झाली पण पाईन, सेडारनी हिरवा रंग मात्र टिकवून ठेवला आहे. अमेरिकेतल्या इतर भागांमध्ये जसे खराटे दिसतात, तेवढे खराटे काही ह्या भागात होत नाहीत आणि त्यामुळे भर थंडीतही निसर्गाच्या जिवंतपणाची लक्षणं दिसत रहातात. नवीन वर्षाचं स्वागत नुकत्यात लावलेल्या विंटर जॅस्मिनच्या कळ्यांनी केलं. पाना गणीक एक कळी. पुढे पानं झडून गेली आणि सुंदर नाजूक पिवळ्या फुलांनी

वेल बहरली! अश्यातच हिमवृष्टी झाली. गोठवणारी थंडी, साठलेला पांढरा शुभ्र बर्फ आणि त्या पार्श्वभूमीवर ती पिवळ्या फुलांची वेल! नेहमीच्या हिवाळ्यापेक्षा हे एकदम वेगळच दृष्य आहे!. ट्युलिप आणि डॅफोडील्सना सिझन बदलायची कॉस्टकोपेक्षाही जास्त घाई असते. त्यामुळे बर्फ सरता सरता ट्युलिप आणि डॅफोडील्सच्या कोंबांनी डोकं वर काढायला सुरूवात केली आहे. हायासिंथ त्यामानाने निवांत! तश्यातच दोन-तीन दिवस पावसाने उघडीप घेतली. बाहेर बघितलं तर शेजारच्या घरातले आज्जी-आजोबा पूर्णवेळ बाहेर! वाफ्यांची डागडूजी करणं, वाळक्या काटक्या काढून टाकणं, वाफ्यांमध्ये मल्च टाकणं, मोठ्या झाडांची छाटणी करणं, हिरवळीवर खत फवारणं, थोड्या बिया टाकणं वगैरे बरीच कामं करत आहेत. थंडी होती पण पूर्ण जामानिमा करून काम करत आहेत. त्यांना विचारलं की हे एवढया लवकर करायचं का? तर म्हणे हो, नंतर वेळ कसा जातो कळत नाही.

**वसंत ऋतू**

आज्जी आजोबांकडून धडे घेऊनही आम्हांला हलायला जरा वेळच लागला. पण दरम्यान बागेत काही सुखद धक्के बसायला लागले आहेत. आम्ही लावलेले ट्युलिप आणि डॅफोडील्स फुललेच होते, पण अजूनही काही ठिकाणी एक एक ट्युलिपची फुलं दिसायला लागली. पुढच्या दारी असलेल्या चौथर्यावर अगदी जमिनीलगत फुलाच्या आकारात मस्त पोपटी-हिरवी पानं फुटलेली दिसतायत. इंटरनेटवर शोधलं तर समजलं की ते 'होस्टा'. त्यांना मध्यभागी तुरा येतो. आधी इथे रहाणाऱ्यांनी कंद लावले असावे. हॉंडोडेंड्रॉनची पानं थंडीत गळलीच नव्हती आणि त्याच्या पानांच्या बेचक्यात छोट्या छोट्या कळ्या दिसायला लागल्या आहेत. हॉंडोडेंड्रॉन आधी एवढी दिसली नव्हती, पण आता मात्र बाहेर सगळीकडे तिच दिसत आहेत! पांढरी, गुलाबी, केशरी आणि लाल भडक. आमच्या बागेतला रंग कुठला येतोय बघूया. ह्यांचा फुलोरा सुंदर दिसतो. गेल्यावर्षी आणलेल्या स्ट्रॉबेरीची रोपटी वाढायला लागली आहेत. आणली तेव्हा अगदीच लहान होती. जीव आहे की नाही असं वाटलं तेव्हा! त्यांना नखाएवढी लहान पांढरी फुलं दिसत आहेत. सगळ्यात भारी म्हणजे सफरचंदालाही फुलं आली आहेत. सफरचंदाची फुलं आधी कधी पाहिलीच नव्हती! सुरेख पांढरी, गुलाबी फुलं आहेत. म्हणजे इकडून तिकडे हलवलेली सगळी झाडं रुजली तर! गेल्यावर्षी जमिनीत लावलेले एशियन लिलीजचे कंदही फुलायला लागलेले दिसत आहेत. बागेत अजून झाडं लावायला हवी. मागे ठरवलं होतं तशी झेंडूची रोप बॉर्डर म्हणून लावायची आहेत. फॉलमध्ये जमिनीत लावलेल्या पिवळ्या मम्सचं काय झालं काय माहीत? अजून तरी फुट दिसत नाहीये. मागच्या उन्हाळ्यात जे हरीण दिसायचं ते परवा खूप दिवसांनी दिसलं. खूप जाड वाटलं. नंतर समजलं की तिला लवकरच पाडस होणार आहे तर! आजूबाजूला डॉगवुडची झाडं छान फुलायला लागली आहेत. आपल्याहीकडे एक असावं म्हणून गुलाबी रंगाचं डॉगवुड आणून पुढच्या आंगणात उतारावर लावलं. ह्या परिसरात अतिशय उत्तम दर्जाच्या रेनियर चेरी मिळतात. म्हणून तेही लावलं. नंतर समजलं की त्याला 'सोबत' लागते. ते एकटं फुलत, फळत नाही. म्हणजे आता अजून एक चेरीचं झाड आणावं लागणार!

**उन्हाळ्याची सुरूवात**

बागेतले धक्के अजूनही सुरूच आहेत, पण ते तेवढेसे सुखद राहिलेले नाहीत आता. हॉडोडेंड्रॉनच्या पानांमधल्या बेचक्यांमध्ये जे काही होतं त्या कळ्या नव्हत्याच! ते कोंब उमलले आणि त्यातून नवीन पानच फुटली आणखी. ड्राईव्ह-वेच्या शेजारच्या हिरवळीवर अचानक मातीची ढेकळं दिसायला लागली. जरा इंटरनेटवर शोधाशोध केली तर.. हे देवा! ते तर मोल नाहीतर गोफर (Gopher) असतील असं समजलं. आता ह्यांचा बंदोबस्त करायचा ह्याची शोधाशोधी करा. इंटरनेटवर बघितलं तर नानाविध उपाय दिसले. त्यांच्या बिळांवर कुत्र्याला शी करायला लावा इथपासून ते ॲमेझॉनवर मिळणारं कोल्हामूत्र त्यावर शिंपडा इथपर्यंत! ह्या असल्या वासाळ उपायांनी त्या मोल-गोफरांपेक्षा आपल्यालाच त्रास व्हायचा. मग जरा शेजारीपाजारी विचारलं की अजून शी-सू नसलेले काही साधे उपाय नाहीत का? एकानी औषध सुचवलं. त्याच्या कांड्या मिळतात. त्या त्यांच्या बिळाच्या तोंडाशी खुपसून ठेवायच्या मग ते मरतात. दुसऱ्यांनी सांगितलं की गोफरांचा बंदोबस्त करणाऱ्या कंपनीला बोलवा त्या शिवाय गोफर जात नाहीत. गोफरांची अख्खी नगरी असते जमिनीखाली. मला रात्री स्वप्नातही ते न बघितलेले गोफर यायला लागले! दुसऱ्या एक काकू म्हणाल्या, चांगलं आहे की ते मोल्स आले ते, त्यावरून हे सिद्ध होतं की तुमची जमीन छान सुपिक आहे. म्हंटलं उपयोग काय, ती जाणार त्या मोल आणि गोफरांच्या बोडक्यावर (शब्दशः). आता होमडेपोमधून त्या कांड्या आणणं आलं. सकाळी सकाळी हरिण

आणि त्याचं नुकतच जन्मलेलं गोजिरवाणं पाडस दिसलं. अगदी रामायणात वर्णन असतं सोनेरी ठिपके असलेलं आहे. हे असं हरिण पाहून सीतेने ''मज आणून द्या हो हरिण आयोध्यानाथा!'' असं आर्जव केलं नसतं तरच नवल. आई-बापाच्या मागे मागे टणाटणा उड्या मारत फिरत असतं. आमच्या ज्योईला मात्र ते अजिबात आवडत नाही. आवाज बसेपर्यंत भुंकतो त्याच्यावर. स्ट्रॉबेऱ्या, सफरचंद ह्यांना छान फळं धरली आहेत. काकडीचा वेल, टोमॅटो, मिरच्यांची झाडं छान वाढत आहेत. होस्टाची पानंही छान मोठी झालीयेत, कधीही तुरा येईल आता. डॉगवूडची पानंही मस्त रंगली! पण माझी आवडती पिवळ्या रंगाची मम्स नाहीच उगवली. कुंडीतली दोन्ही छान फुटली आहेत.

**उन्हाळा**

औषधाच्या कांड्यांचा उपयोग झालेला दिसतो आहे. मोल, गोफरांची बिळं आणि त्यांनी उकरलेली माती इतक्यात दिसली नाही! गोजिरवाणं पाडस आता थोडं मोठं झालय. पण वाढत्या वयाबरोबर भयंकर खादाड झालय! सारखी येऊन बागेतली पानं फस्त करतं. होस्टाचं एकही पान शिल्लक ठेवलं नाही. इतकं सफाचट केलं की तिथे पूर्वी पानं होती हे ही कळू नये. चेरी, डॉगवूड, चौथर्यावरची शोभेची झाडं सगळ्यांची पानं खाऊन खराटे केले. भर उन्हाळ्यात फॉल आल्यासारखं वाटायला लागलं. गुलाबाची पानं आणि सूर्यफुलं पण खाल्ली. गुलाबाची पानं, फुलं खाताना त्याच्या तोंडाला काटे टोचून चांगली अद्दल घडायला हवी होती असा दुष्ट विचारही माझ्या मनात येऊन गेला. पुढे पाडसाचे उद्योग तर मागे खारी आणि गोगलगाई टपलेल्या. डांबरट खारींनी एकही स्ट्रॉबेरी आमच्या तोंडी लागू दिली नाही. अगदी आमच्या समोर स्ट्रॉबेऱ्या पळवून कुंपणावर बसून वाकुल्या दाखवत त्या खातात. गोगलगायी दिसतात गरीब बिचाऱ्या पण एकदा टोमॅटो त्यांच्या तावडीत सापडला की काही खैर नाही. कुरतडून कुरतडून भोकं पाडतात त्याला. सफरचंद नक्की कोणी पळवली ते कळायलाही मार्ग नाही. पक्ष्यांनी खाल्ली तर तुकडे खाली पडलेले असतात, पण इथे अख्खीच्या अख्खी सफरचंदं गायब झाली आणि आम्हांला त्याचा अंशही दिसला नाही! एकतर ते खादाड पाडस परसदारीही येऊन गेलं असावं किंवा मग एक-दोनदा अचानक उगवलेल्या ढोल्या रॅकुन (raccoon) परिवाराची वक्रदृष्टी आमच्या सफरचंदांवर पडली असावी! इथे पडलेल्या कडक उन्हाळ्याने हिरवळंही होरपळली आहे आणि काही काही ठिकाणी वाळलेल्या गवताचे पट्टेही दिसायला लागले आहेत.

**शरद ऋतू**

आता पुन्हा फॉल आला, एक चक्र पूर्ण झालं. मागे लावलेले कंद आता थंडीत बेगमी करून पुन्हा फुलायला तयार होतील. बाकीची झाडं आधी फॉलचे रंग दाखवून मग विरक्ती आल्यासारखी फुलोरा, पानं झटकून टाकतील. उन्हाळ्यात आम्हांला त्रास दिलेले प्राणी आता थंडीची चाहूल लागून आपापल्या बिळा-गुहांमध्ये गुडूप होतील. हिरवळीची वाढ होणं बंद होईल. सप्टेंबर अखेरी एकदा वर्षातलं शेवटचं गवत कापून झालं की ते ही गप पडून राहील. वर्षभरात बागेने भरपूर गंमती जमती दाखवल्या. हल्लीच्या तीस सेकंदाचा 'रिल'च्या जमान्यात बागकाम खूप संयम शिकवतं. सुरुवातीला दर दोन तासांनी बागेत काही फुललं आहे का? हे जाऊन बघणाऱ्या मला, सूर्यफुलाचं रोप थेट मोठं झाल्यावरच दिसलं!

स्वतः लावलेली, पाणी, खत घालून वाढवलेली झाडं वाढताना फुलताना फळताना बघण्यासारखं समधान नाही. मग भले फळं प्राणी पक्ष्यांनी खाऊन का टाकेना! शिवाय स्वत:चं अन्न स्वतः शोधणारी आणि तयार करणारी, स्वत:च्या प्रजननासाठी दुसऱ्यांना म्हणजे प्राणी, किटक, पक्षी एवढंच काय पण माणसांनाही कामाला लावणारी, आहेत त्या परिस्थितीत मार्ग काढणारी झाडं हीच सजीव सृष्टीतला सगळ्यात बलवान जीव आहे, हा माझा जरा विचित्र विचार आता अधिकाधिक दृढ होत चालला आहे. एका नर्सरीमधली कर्मचारी आम्हांला म्हणाली होती "Don't worry, they know what to do. They will take care of themselves" आणि हे आता अगदी १००% पटलं आहे. ही सगळी झाडं पुढच्यावर्षी आणखी मोठी होतील. नवीन झाडंही लावली जातील. यंदा आलेल्या झेंडू, झिनियाच्या फुलांच्या पाकळ्या वाळवून पुढच्यावर्षीचं बियाण तयार करायचं आहे. पुढच्या वर्षी सुवासिक फुलांची झाडं लावायची आहेत. थंडी संपता संपता भाज्यांच्या बिया कुंड्यांमध्ये पेरून त्यांची रोपं तयार करून ठेवायची आहेत. येणारी फळं खादाड प्राण्यांपासून वाचवायची आहेत! पुढच्या वर्षी बाग आपल्या पोतडीतून काय काढते आणि कुठले नवे अनुभव, धडे देते हे बघायची आता उत्सुकता आहे.



# तबल्याशी मैत्री

• श्रीमयी खाडीलकर •

मला लहानपणापासून संगीत आवडतं. मी कथ्थक, हार्मोनिअम वगैरे शिकायचा प्रयत्न केला. ते सगळे कलाप्रकार सुंदरच आहेत. पण मी त्यात खूप रमले नाही. त्यातून आईची कटकट असायचीच की, श्रीमयी, कोणतीही कला शिकलीस तरी चालेल पण ते शास्त्रोक्त पद्धतीने शिक. तुला पियानो, वेस्टर्न क्लासिकल म्युझिक, व्हायोलिन असं काही शिकायचं असेल तर तसं सांग आपण चांगले शिक्षक शोधू. पण मला कळतंच नव्हतं की मला काय आवडतंय.

शेवटी आईनेच पर्याय शोधला की, श्रीमयी तू तबला शिकतेस का? मी हो - नाही काही म्हणायच्या आत, आई म्हणाली, ''तबला तुला आवडेल गं!'' आणि पुन्हा एकदा तिने माझ्यासाठी आणखीन एक निर्णय घेऊन टाकला. ती हे बऱ्याचदा करते आणि खरं सांगू का तिचं बरोबर असतं (हे वाक्यसुद्धा मला तिनेच लिहायला लावलंय!)

तर, माझ्या तबल्याच्या फॉर्मल शिक्षणाची सुरुवात जुलै २०२४ मध्ये झाली. यावेळी आईने सांगितलं होतं की, 'एक वर्ष पूर्ण झाल्याशिवाय तबला सोडायचा नाही. आणि जर नाही आवडला, वर्षभराने सोडायचा ठरवलास तर मला कारण कळलं पाहिजे.' मला माहितीये, एखादी गोष्ट चुकीची केली किंवा पूर्ण नाही केली तर तुम्ही पण तुमच्या आईचा भरपूर ओरडा खात असाल.

त्यानंतर दोन आठवड्यात माझा तबल्याचा क्लास सुरू झाला. त्या क्लासमध्ये मी काय expect करायचं याची मला काहीही कल्पना नव्हती. मला मराठी आणि इंग्लिश छान कळतं पण हिंदी भाषेशी माझी फार दोस्ती नाही. पहिल्या दिवशी सरांनी तबल्याचा इतिहास सांगितला. खूप खूप वर्षांपूर्वी तबला मोठा होता, ढोल किंवा पखवाजासारखा. पण मग त्याच्या वेगवेगळ्या आवाजासाठी, प्रवासाच्या सोयीसाठी तबला दोन वेगळ्या पार्टमध्ये केला गेला. तबला शिकायला बसलेल्या खोलीत आजूबाजूला बघत होते तर तिथे भिंतीच्या पूर्ण उंचीच्या कपाटांमध्ये फळ्यांवर खूप तबले ओळीने मांडून ठेवले होते. आणि बाजूच्या भिंतीवर सरांच्या गुरूंचे फोटो दिसले. त्यामधला एक फोटो मी ओळखला. तो उस्ताद झाकीर हुसेन यांचा होता. उरलेल्या दोन फोटोमधले

चेहरे माझ्या अजिबात ओळखीचे नव्हते. सरांनी यांच्याबद्दलही सांगितलं- एक फोटो होता उस्ताद अल्लारखां आणि दुसरा फोटो होता दुसरे पंडित योगेश समसी यांचा. आईने उस्ताद झाकिर हुसेन यांचे काही व्हिडीओ मला क्लास सुरू व्हायच्या आधीही दाखवले होते. तिथलं एकूण वातावरण बघून मला खूपच मस्त वाटलं आणि मी खूप आश्चर्यचकितही झाले. आणि मला शंका होतीच की, हे मला आवडेल की नाही; पण मी काही बोलले नाही. शांतपणे ऐकून घेतलं. सरांनी तबल्याच्या भाषेशी माझी ओळख करून द्यायला सुरुवात केली. ते बोल ऐकून मला वाटलं ही अशी कशी भाषा आहे? अर्थ नाही, शब्द नाही. पण सरांनी सांगितलं की याचे पॅटर्न आहेत, त्यात गणितही आहे. एकपट, दुप्पट, वेगवेगळ्या मात्रा यांचं. ते बोल म्हणणं इतकं कठीण होतं, की टंग-ट्विस्टर (Tongue twisters) पण सोपे वाटतील.

मला मराठी वाचता यायचं, पण लिहिता येत नव्हतं. त्यामुळे मला सारखा प्रश्न पडत होता की 'हे मी कसं लिहिणार?' आई-बाबाने मला मदत केली लिहायला. इंग्लिश स्क्रिप्ट मध्ये Dha, Te-ta, kad-dhe, Dhin (धा, तीट, कडधे, धिं ) असं लिहिणं आणि वाचणं दोन्ही कठीण होतं. मग एका क्लासमध्ये मीच आईला म्हंटलं, लिहिते मी. हळू-हळू मला सवय झाली आणि मी स्वतः लिहू लागले. सरांकडून मी लिहिलेला कायदा किंवा पलटा तपासून घ्यायचा याचीही मी स्वतःला सवय लावली. चला, माझा गोंधळ जवळजवळ संपला म्हणून मला थोडासा आनंद झाला. तेवढ्यात सरांनी जास्त कठीण बोलांचे मोठे कायदे शिकवायला सुरुवात केली. झालं, मी पुन्हा गोंधळून गेले.

सॉरी, कायदा आणि पलटा म्हणजे काय हे सांगितलंच नाही तुम्हाला. कायदा म्हणजे काही बोलांचा ग्रुप आणि त्याला एक स्ट्रक्चर (structure) असतं. त्याचीच वेगवेगळी कॉम्बिनेशन म्हणजे पलटे. प्रत्येक कायद्यामधले सहा-सात पलटे आणि शेवटी त्या कायद्याची चक्रधर तिहाई असं शिकवलं जातं. तसं मीही शिकत आहे. मी पंजाब घराण्याचं तबला वादन शिकतीये.

तबला शिकताना रोज प्रॅक्टिस करावी लागेल असं आई-बाबा काहीतरी म्हणाले होते, पण त्याकडे आधी मी थोडं दुर्लक्ष केलं. आई बाबा सुरुवातीला प्रेमाने आठवण करायचे रोज संध्याकाळी, श्रीमयी रियाजाला बस. आमच्या घरी तेव्हा कोणी संध्याकाळी आलं असतं तर त्यांना दिसलं असतं की, मी किती हुशारीने टाळायचा प्रयत्न करायचे रियाजाला बसणं. सगळ्या युक्त्या असायच्या माझ्याकडे, कधी भूक लागायची, कधी अभ्यास असायचा, कधी काहीतरी दुखायचं. आठवड्यातून २-३ वेळा सुटका व्हायची माझी. पण आई-बाबा हुशार आहेत माझ्यापेक्षा त्यामुळे त्यांना माझी युक्ती कळली काही दिवसात. मग त्यांनी नवीन युक्ती काढली. हॅरी पॉटर मध्ये जसं व्हॉल्डेमॉर्टचा (Voldermort) जीव त्या हॉरक्रक्स्मध्ये (Horcruxes) होता ना तसा आम्हा मुलांचा जीव खेळण्यात, पुस्तकांमध्ये, T.V. आणि व्हिडीओ गेम्स मध्ये असतो, हे तुम्हाला माहितीच आहे! आई-बाबाने त्याच माझ्या सगळ्या लाडक्या गोष्टींवर जास्त कडक नियम लावायला सुरूवात केली.

आधी मला अभ्यास केल्यावर जी २० मिनिटे व्हिडिओ गेम्स किंवा T.V. बघायला मिळायचा तो आता रियाज केल्यावर मिळणार असा नवीन नियम आमच्या घरी लागू झाला. अरे देवा! म्हणजे आता मला काहीही करायच असेल अगदी पुस्तक वाचायचं असेल तरीसुद्धा ते रियाज केल्यावर मिळणार होतं. तेव्हा एवढा राग यायचा आई-बाबाचा! पण माझ्या लाडक्या गोष्टींसाठी मी रियाजाला बसायला लागले. बोलपढत करायची, म्हणजे पाठांतर करायचं आणि तबला वाजवायचा. जसे जसे कायदे आणि पलटे पाठ व्हायला लागले तशी तशी मजा यायला लागली आणि कॉन्फिडन्स वाढायला लागला. पाठांतराचा स्पीड पण वाढायला लागला. मध्ये आमच्या शाळेच्या टॅलेंट शो मध्ये मी दोन मिनिटांसाठी तबला वादन केले. माझ्या वर्गातल्या मुलांनी तबला हे वाद्य पहिल्यांदाच बघितले. त्यांनी खूप कौतुक केले माझे. आणि आमच्या शाळेतल्या मुझिक टीचरनी पण शाब्बासकी दिली मला. किती छान वाटलं मला!

आता मला या शिकण्याची मजा यायला लागलीये. आता बसल्या-बसल्या मांडीवर, जेवणाच्या टेबलावर, शाळेच्या डेस्कवर, अगदी मित्र मैत्रिणींशी बोलतानासुद्धा मी विना-आवाज तबला वाजवत असतेच. माझी प्रगती बघून आई-बाबाने मला नवीन तबला घ्यायचा ठरवलं आणि यावेळी भारतातून येताना खास माझ्यासाठी नवीन तबला करून आणलादेखील. मला माहितीये की, एवढ्यात मी खूष होणं पुरेसं नाहीये. चांगलं वादन करण्यासाठी खूप वर्षं लागतील, पण मी जास्त मेहनत करणार आहे. माझे खरेखुरे प्रयत्न करणार आहे. ही मैत्री नवीन आहे आणि मला खात्री आहे हे नातं आणखी घट्ट होईल कारण आता हा माझा नवा मित्र मला आवडायला लागलाय!



# माणसातला देव

• भक्ती वाघमारे •

लहानपणापासून, मी माझ्या वडिलांच्या खूप क्लोज आहे. मी मनातलं सगळं त्यांना सांगू शकते, चर्चा करू शकते. ते नेहमी शांतपणे ऐकून, समजून घेतात सगळं. त्यांच्याबरोबर असताना 'लाईफ इझी' असतं.

त्यांचा स्वभाव खूप समजूतदार, शांत आणि सहनशील आहे. दुसऱ्यांच्या आनंदात आनंद मानणारे असे ते आहेत. ते बऱ्यापैकी देवधर्मही करतात. त्यांच्याकडून मिळालेली सर्वात महत्वाची शिकवण म्हणजे, समोरच्या माणसात देव पहावा. देव केवळ मंदिरात नाही तर माणसातही शोधावा. प्रत्येक माणसामध्ये तो असतो. आपल्या समोरच्या माणसात नेहमी चांगलंच बघायचं असं त्यांनी शिकवलं. कळत-नकळत ही शिकवण त्यांच्याकडून माझ्यात आली असं मला वाटतं. लहानपणापासून प्रत्येक माणसात काही तरी चांगलं बघायचं ही सवय अंगवळणी पडून कदाचित आता तो स्वभावच होऊन गेला आहे . परिस्थिती असो किंवा व्यक्ती, त्यात काय चांगलं आहे हे शोधून काढायचं. अर्थात काही वेळेस माणसातला तो देव सहज भेटतो आणि काही वेळेला फार खोलात जाऊन शोधावं लागतं. काही लोकांच्या बाबतीत तर वैतागून प्रश्न पडतो की 'अरे बाबा.. कुठे आहे यांच्यातला देव, आणि त्याला कसं बाहेर आणावं!' शोधलं की सापडतं, हे काही केल्या लागू होत नाही तिथे... असो. पण बहुतांश लोकांमध्ये तो दिसतो. लहानपणी सोपं असतं पण मोठं झाल्यावर जेव्हा आपण स्वतःची बुद्धी जास्त वापरायला लागतो तेव्हा तो शोधणं अजून अवघड जातं.

आपण जर मन मोकळं ठेवलं आणि त्याला शोधण्याचे प्रयत्न केले तर तो आपल्याला दिसतो हे तर नक्कीच पण गरज पडल्यास तो आपल्यासाठी धावूनही येतो, हे मी या शिकवणीतून अनुभवलं.

आयुष्याच्या वाटचालीत काही लोक आपल्याला अनपेक्षितपणे काही तरी देऊन जातात किंवा आपल्यासाठी काही तरी करून जातात. अशा वेळी आपण त्या व्यक्तीचे मनापासून आभार मानतो, म्हणतो ना की 'बाबा देवा सारखे भेटलात'. असे प्रसंग कदाचित वेळेबरोबर आपण विसरूनही जातो पण त्या प्रसंगांमुळे आयुष्यात एक खोल अनुभव मिळतो आणि अर्थ येतो हे ही तितकेच खरे.

असे लोक रोजच्या आयुष्यात असायला कदाचित भाग्यच लागत असावं असं मला वाटतं. पण काही वेळेला रोजच्या आयुष्यातल्या व्यापांमुळे असेल कदाचित पण तसे लोक किंवा तशा कृती आपल्याकडून दुर्लक्षितही होत असाव्यात.

काही लोक आपल्याला रोज जपतात, आपण सांगण्याआधीच आपल्याला काय हवंय ते ओळखतात, आपलं

आयुष्य अगदी सोपं करतात, मनापासून आपल्या हिताचा विचार करतात. त्यांच्या या सगळ्या गोष्टी माणसातल्या त्याच दैवी गुणधर्माचा अनुभव करून देतात असं मला वाटतं. काही तरी जादू होत असते या लोकांच्या सहवासामुळे, आपल्यात किंवा परिस्थितीत! आणि ती जादू किंवा चमत्कार तुम्ही शब्दात सांगू शकत नाही फक्त त्याचा अनुभवू घेऊ शकता. तो अनुभव तुमच्या मनात कायमस्वरूपी राहतो. असा देव माझ्या वडीलांमध्ये मला सहज भेटतो.

आपल्या दैनंदिन आयुष्यात जसे की घरात, ऑफिसमध्ये, शाळा/कॉलेजमध्ये, मित्र-मैत्रिणींसोबत किंवा रोजच्या येण्या-जाण्यामध्ये कुठे ना कुठे असे अनुभव आपल्याला येत राहतात. ती जादू आपण अनुभवत असतो. कधी सगळ्या अडीअडचणींमध्ये ती एक आशाच असते आपल्यासाठी.

मी आभारी आहे त्या वरच्या देवाची ज्याने मला असे लोक आणि प्रसंग अनुभवू दिले ज्यांनी माझ्या मनात कायमचे घर केले आहे. असे काही अनुभव जे मी गेल्या काही वर्षांमध्ये घेतले आहेत ते इथे मांडण्याचा प्रयत्न करते.

काही वर्षांआधी एकदा अतिशय तणाव परिस्थिती अनुभवत होते. मन सुन्न झालं होतं आणि कोणाशी फार हसण्या-बोलण्याची इच्छा व्हायची नाही. त्यावेळी मला आयुष्यात अशा मित्र-मैत्रिणींची साथ मिळाली ज्यांच्यासोबत मी रोज खळखळून, डोळ्यात पाणी येईपर्यंत, पोटात दुखेपर्यंत हसायला लागले. असे मित्र-मैत्रिणी जे कुठल्याच गोष्टीचा ताण घेऊ नाही द्यायचे आणि ज्यांच्याकडून परिस्थितीकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन मिळायचा. जो काही तणाव होता त्याला हाताळण्याची ताकद मिळायची. खरंतर, मी कधी नव्हते एवढी खंबीर झाले त्या काळात. रोज असं मनापासून खळखळून हसवणारे, मनावरचा लोड हलके करणारे मित्र-मैत्रिणी भेटणं तेही कॉलेजच्या पलीकडच्या आयुष्यात ही मोठी गोष्ट होती माझ्यासाठी. सांगायला छोटा पण साधारण दिड-दोन वर्षांचा कालावधी होता असा. अनपेक्षितपणे त्यावेळी त्यांचं माझ्या आयुष्यात येणं ही फार मोठी जादू होती आणि मी आभारी आहे त्या अनुभवासाठी.

त्याच दरम्यान आलेला अजून एक छोटासा अनुभव असा की एकदा कंपनीच्या कामानिमित्ताने मुंबईत गेले होते दोन दिवसांसाठी. राहण्याची सोय कंपनीकडून होणार होती. तिथे गेल्यावर कळलं एचआरकडून (HR) बुकिंगमध्ये काही गडबड झाली. तेव्हा थोडाही उशीर न करता माझ्यासाठी माझी मॅनेजर देवासारखी धावून आली. इतर सोपे पर्यायही होते तेव्हा त्यांच्याकडे पण त्यांनी माझी राहण्याची सोय त्यांच्या स्वतःच्या घरी केली. घरच्यांना भेटवून, दोन दिवस माझी देखरेख आणि सर्व पाहुणचार केला आणि कसलाही त्रास होऊ दिला नाही. आता आपल्या मॅनेजरने स्वतःच्या हाताने नाश्ता, जेवण बनवून देऊन आपलं आदरातिथ्य आणि काळजी करणं म्हणजे भाग्यच. खरंतर, आपल्यापेक्षा वयाने आणि पदवीने सिनिअर अशा व्यक्तीने आपल्यासाठी इतकं सगळं करणं ही माझ्यासाठी खूप मोठी आणि बरंच काही शिकवून जाणारी गोष्ट होती. त्यांच्यातला तो दैवी गुणच होता ज्यामुळे मला हा अनुभव घेता आला. माझ्यादृष्टीने काहीतरी जादूच झाली ही .

असे छोटे मोठे जे अनुभव आहेत त्यांचा विचार केला की कमाल वाटते. आता दोन वर्षं झाली आम्हाला कॅनडात येऊन. माझी मुलगी आठ महिन्यांची असताना तिला घेऊन इकडे आलो. सुरुवातीला वाटायचे कुठे आलो आणि का आलो. बाळ लहान असताना घरच्यांना सोडून इतकं लांब राहायला आलो. पण हळू-हळू रुळत गेलो. आता ओळखी झाल्या आहेत. मित्र-मैत्रिणी बनले आहेत. त्यामुळे थोडा धीर आला. इथेही बरेच लोक पाहिले जे मनाने खूप छान आहेत आणि एकमेकांना आधार देऊन राहतात. खूप वर्ष इथे राहिलेले असोत किंवा नवीन आलेले असोत , लोकं मनाने प्रेमळ आणि उत्साही आहेत आणि इतरांच्या मदतीला धावून जाणारीही आहेत. माझ्या मनात घर करणारा असा अनुभव इथे काही दिवसांपूर्वीच मला आला, अनपेक्षित आणि मन भरवून टाकणारा.

काही दिवसांआधी अचानक इंडियातून फोन आला, माझ्या सासऱ्यांची तब्येत खराब झाली होती. त्यांना आय सी यू (ICU) मध्ये ॲडमिट केल्याचं कळलं. त्यांना प्रचंड वीकनेस आला होता. आम्हाला खूप टेन्शन आलं. काय करावं काही सुचत नव्हतं. झोप उडाली, खाण्या-पिण्याची इच्छा होत नव्हती. डोक्यात सतत विचार आणि भारतात सतत फोन चालू होते. डॉक्टरांशी बोलल्यावर म्हणाले, तब्येत हळूहळू सुधारेल आणि दोन-तीन दिवसांनी आयसीयूमधून सोडतील. बरं या सगळ्या टेन्शनमध्ये एक टेन्शन असं ही होतं की पुढच्या बारा दिवसात आमचा व्हिसा/वर्क परमिट एक्सपायर होणार होतं. त्यामुळे मग असं ठरलं की दहा दिवसात माझा नवरा एकटा भारतात जाऊन त्यांना भेटून येईल. त्यांची तब्येतही रिकव्हर होतंच होती.

आता या सगळ्या मनस्थितीत त्याचा एकट्याने प्रवास आणि मी इथे अडीच वर्षाच्या माझ्या मुलीला घेऊन एकटं राहणं या सगळ्याचं खूप दडपण आलं होतं.आमचे इथे एक मित्र आहेत. ते दोघे आणि त्यांच्या दोन गोंडस मुली असे इथे राहतात काही

वर्षांपासून. त्यांना ही परिस्थिती समजताच त्यांनी लगेच आम्हाला सांगितलं, काही काळजी करू नका, दहा दिवस आमच्या इथे येऊन राहा आणि कसलं टेन्शन घेऊ नका. तू जाऊन ये. त्यांच्याकडून हे ऐकताच आम्हाला थोडा धीर मिळाला.

आला की नाही बघा 'तो' धावून!

पुढचे दहा-बारा दिवस भारतात परिस्थिती खूप गंभीर होत गेली. माझ्या सासऱ्यांची तब्येत ठीक होता-होता अचानक खूप बिघडली. सगळं काही करून झालं पण शेवटी त्यांचा हात जो आम्ही घट्ट धरून ठेवण्याचा प्रयत्न करत होतो तो आमच्या हातातून सुटला, कायमचा. त्या दहा-बारा दिवसात जे झालं ते सगळं अजूनही मनात दाटतं पण या सगळ्यात इथे आम्हाला ज्या माणसांची साथ मिळाली, मदत मिळाली, ज्यांनी आम्हाला कसलाच त्रास न होऊ देता इथे एक-एक दिवस सोपा केला, त्यांचे आम्ही मनापासून आभारी आहोत. परदेशात घरच्यांपासून मी खूप लांब होते पण घरच्यांसारखीच त्यांनी माझी काळजी घेतली. त्यांच्या आधारामुळे कितीतरी गोष्टी खूप सोप्या झाल्या आमच्यासाठी.

या सगळ्यात अजून एका व्यक्तीचा मला खूप आधार होता त्यावेळी. म्हणायला मैत्रीण पण मी खरं तर त्यांचा खूप आदर करते, त्यांच्याकडून बरंच काही शिकते आणि खूप ॲडमायर करते त्यांना नेहमीच. हे सर्व होत असताना प्रत्येक दिवस त्या मला आधार देत होत्या, माझे मन खंबीर करत होत्या, एवढंच काय तर रोज आमच्यासाठी प्रार्थनाही करत होत्या. आणि त्यांच्या प्रार्थना आमच्यापर्यंत पोहोचत होत्या. प्रार्थनेची ताकद त्यांच्याकडून जास्त समजली मला.

असा या सगळ्यांकडून त्या-त्या वेळी मिळालेला आधार आणि सहयोग माझ्यासाठी खूप मोलाचा आणि शब्दांच्या पलीकडचा आहे. या अनुभवातून माणसातल्या त्या देवाशी माझी परत एकदा भेट झाली आणि मन भरून आले. तुमच्या माझ्यातला तो देव सतत असाच जागृत राहावा आणि एकमेकांना सतत भेटत राहावा अशी मी मनापासून प्रार्थना करते.

# मंडळाविषयी बोलू काही

## अंताक्षरी: हवाहवासा नॉस्टॅल्जिया

अंताक्षरी हा खेळ आपल्या सर्वांचाच अत्यंत जिव्हाळ्याचा खेळ आहे आणि अंताक्षरी खेळली नाही अशी व्यक्ती विरळीच. हाच विचार करून हा कार्यक्रम घेण्याचे ठरवले. कार्यक्रमाला मिळालेला सगळ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद वाखाणण्याजोगा होता. दोन वाजता सुरू झालेल्या कार्यक्रमाची सांगता होताना रात्रीचे नऊ केव्हा वाजले कुणाला कळलेच नाही. शेवटपर्यंत प्रेक्षकांकडून मिळालेला प्रतिसाद आणि प्रोत्साहन तर खासच होते. इतक्या प्रचंड उत्साहात आणि जल्लोषात पार पडलेल्या अंताक्षरीचा विजेता जरी एकच असला, तरी तिथे हजर असणारी प्रत्येक व्यक्ती आपल्यासोबत एक अनमोल वस्तु घेऊन घरी गेली - नव्या मित्र-मैत्रिणींसोबत जोडलेल्या असंख्य गोड आठवणींची शिदोरी.'

## MSBC चा सक्रिय क्रीडा-विभाग

कुठलाही खेळ हा सदैव उत्साह आणि प्रेरणा देणारा असतो. यावर्षी MSBC च्या क्रीडा विभागाने आयोजित केलेल्या खेळांमध्ये सर्व सभासदांनी उत्साहाने व आनंदाने सहभाग घेऊन खेळाची रंगत अजूनच वाढवली. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे यावर्षी प्रथमच महिला संघ स्वतंत्रपणे क्रिकेटच्या मैदानात उतरला. त्यांच्या खेळातील कौशल्य, जिद्द आणि एकतेमुळे आपल्या कम्युनिटीसाठी एक नवीन बेंचमार्क निर्माण झाला आहे. त्यांचा हा प्रेरणादायी खेळ खरोखरच अभिमानास्पद आहे. यावर्षी बॅडमिंटन, टेबल-टेनिस आणि व्हॉलीबॉल यांच्या स्पर्धा MSBC ने यशस्वीरीत्या पार पाडल्या, हे बघून येणाऱ्या वेळेत अजून काही इन-डोअर स्पर्धा नक्की आयोजित करता येतील याची खात्री आहे. त्यासाठी MSBC च्या स्पोर्ट्स वर लक्ष असू द्या.



# पसायदान

• वैशाली भिडे •

पसायदान माहित नाही असा मराठी माणूस विरळाच. अगदी शाळेत असल्यापासून आपण पसायदान ऐकतो, तोंडपाठ करतो. मलाही पसायदान शाळेत असल्यापासून पाठ होते, पुढे व्हॅन्कुव्हरला आल्यावर आम्ही इथे दर महिन्याला होणाऱ्या भजनास जाऊ लागलो. भजनाचा शेवट पसायदान म्हणून होत असे. पसायदान अशा रीतीने परत माझ्या ओठांवर रूळले. पसायदानाचा सखोल अर्थ समजून घेण्याचा फारसा प्रयत्न मी कधी केला नाही. मराठी शाळा चालवत असतांना, पाचवीच्या अभ्यासक्रमात, मुलांना पाठांतरासाठी पसायदान होते. तेव्हा मला जाणवले की मुलांना पसायदान म्हणायला शिकवण्याआधी मला स्वत:ला पसायदानाचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. अशा रीतीने माझा पसायदान समजून घेण्याचा प्रवास सुरू झाला. फक्त नऊ ओव्या असलेले पसायदान हे एखाद्या अथांग सागरासारखे आहे याची जाणीव झाली. मला पसायदानाचा जो थोडाफार अर्थ समजला आहे, तो सांगण्याचा हा एक प्रयत्न आहे.

ज्ञानेश्वरांनी गीतेवर मराठीत जे भाष्य केलं, त्यालाच आपण ज्ञानेश्वरी म्हणतो. ज्ञानेश्वरांचे गुरू त्यांचे थोरले बंधु श्री निवृत्तीनाथ होते. त्यांच्या कृपेने ज्ञानेश्वरी संपूर्ण झाली असं मानून, ज्ञानेश्वर निवृत्तीनाथांकडे पसायदान मागतात. ज्ञानेश्वरीतील ९,००० ओव्यांचे सार म्हणजे हे ९ ओव्यांचे पसायदान, असे मला वाटते.

**आतां विश्वात्मके देवें । येणे वाग्यज्ञे तोषावे ।**
**तोषोनिं मज द्यावे । पसायदान हे ।। १ ।।**

पहिल्या ओवीतील आता हा शब्द लक्ष वेधून घेतो. ज्ञानेश्वरी ग्रंथ पूर्ण झाला आहे, आता मला प्रसादाचे (पसाय) दान द्या अशी मागणी ज्ञानेश्वर त्या विश्वात्मक देवाकडे करत आहेत. हा विश्वात्मक देव कोण? ज्ञानेश्वर हे निर्गुण आणि निराकाराचे उपासक होते. जगाच्या कणाकणात वसलेल्या आत्मतत्त्वाला मानत होते. ते आत्मतत्त्व म्हणजेच विश्वात्मक देव. ज्ञानेश्वरीच्या सुरुवातीला, ॐ नमोजी आद्या, वेद प्रतिपाद्या, जय जय स्वसंवेद्या, आत्मरूपा।। असं म्हणत ज्ञानेश्वरांनी त्या आत्मतत्त्वाला नमन केले आहे. ज्ञानेश्वरीच्या १५व्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी ''आता विश्वात्मकु हा माझा स्वामी निवृत्तीराजा'' असे म्हटले आहे. आत्मज्ञानाने परिपूर्ण असे निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वरांचे गुरू आहेत आणि त्यांनाच ते विश्वात्मक देव स्वरूप मानतात. या विश्वात्मक देवाने आत्तापर्यंत केलेल्या ज्ञानेश्वरीरूपी वाग्यज्ञाने संतुष्ट व्हावे आणि संतुष्ट मनाने त्यांना पसायदान द्यावे अशी प्रार्थना ज्ञानेश्वरांनी पहिल्या ओवीत केली आहे. येथे हट्ट नाही, तर अत्यंत विनम्र भावनेने केलेली ही मागणी स्वत:साठी नसून अखिल विश्वासाठी आहे, हे आपल्याला पुढील ओव्यांत दिसून येईल.

**जे खळांचि व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।**
**भूतां परस्परे जडो । मैत्र जीवांचे ।। २ ।।**

या दुसऱ्या ओवीपासून ज्ञानेश्वर माऊली आपले मागणे मागत आहेत. सर्वप्रथम त्यांना आठवण झाली आहे ती खळांची किंवा दुष्टांची. आईला आपली सर्व मुले सारखीच पण तिला आपल्या वांड मुलांची अधिक काळजी असते. ज्ञानेश्वर माऊलींना

अशीच काळजी दुष्ट लोकांची आहे. दुष्ट लोकांची, वाईट लोकांची दुष्ट आणि वाईट प्रवृत्ती नष्ट होवो अशी मागणी ते करत आहेत. दुष्ट लोकांना नष्ट करा अशी मागणी ते करत नाहीत कारण मनुष्य हा जन्मजात वाईट नसतो, यावर त्यांचा पूर्ण विश्वास दिसून येतो. दुष्ट माणसं नष्ट होऊन प्रश्न सुटत नाहीत तर ते वाढतात यांची जाणीव ज्ञानेश्वरांना होती. नुसतं दुष्टपणा संपून चालेल का? नाही त्या जागी सत्कर्म, सज्जनपणा वाढीला लागला पाहिजे. दुष्ट लोकांचा दुष्टपणा जाऊन त्यांची सज्जनपणा, चांगुलपणाची आवड (रती) वाढीस लागो अशी आशा माऊली व्यक्त करतात. येथे माणूस पूर्णपणे वाईट नसतो, त्यांच्यात जात्याच चांगुलपणा असतोच, तो वाढीला लागला पाहिजे असं त्यांना वाटतं. भौतिक शास्त्राचा विचार केला तर अंधार म्हणजे प्रकाशाची कमतरता आणि थंडी म्हणजे उष्णतेची कमतरता. ह्याच नियमाने वाईटपणा म्हणजे चांगुलपणाची कमतरता. जर समाजातील वाईटपणा कमी होऊन चांगुलपणाची, सज्जनपणाची वाढ झाली तरच सर्वत्र सुखशांती निर्माण होईल, समस्त लोकांत मैत्रभाव निर्माण होईल. भूतां म्हणजे सर्व जीव, प्राणी, निसर्ग यात बंधुत्व, मैत्र निर्माण होईल अशी आशा ज्ञानेश्वर व्यक्त करतात.

**दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।**
**जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।। ३ ।।**

दुरित म्हणजे पाप. अज्ञान, दुराचार यातूनच दुष्कर्म निर्माण होते. तिमिर म्हणजे अंधार. या दुष्कर्माच्या अंधाराने सर्व जग व्यापून गेले आहे. रात्रीचा अंधार सूर्य उगवताच नाहीसा होतो. पापरूपी अंधार नष्ट होण्यासाठी स्वधर्माच्या सूर्याचा उदय झाला पाहिजे असे ज्ञानेश्वर माऊली म्हणतात. इथे धर्म म्हणजे एखादा संप्रदाय, उपासना पंथ ज्ञानेश्वरांना अपेक्षित नाही. धर्म म्हणजे मनुष्य जन्मासोबत आलेला धर्म, आलेले कर्तव्य, स्त्री आई झाली की तिचा आईपणाचा धर्म सुरू होतो. प्रत्येक स्त्री हा धर्म जाणते आणि पाळते. मनुष्याने एखादा व्यवसाय स्वीकारला की त्याबरोबर आलेल्या धर्माचे पालन केले पाहिजे. शिक्षक, वैद्य, वकील इत्यादी व्यवसायातील धर्माचे अर्थात कर्तव्याचे पालन केले पाहिजे. यालाच ज्ञानेश्वर माऊली स्वधर्म म्हणत आहेत. ज्या क्षणी आपल्याला स्वधर्माचा विसर पडेल त्या क्षणापासून पापांचा अंध:कार वाढीला लागेल असे ते म्हणतात. स्वधर्माचा सूर्योदय झाला की पापांचा अंधार नाहीसा होतो. असं झालं की मग ज्याची जी जी इच्छा आहे, ती ती त्यास मिळो असे ज्ञानेश्वर म्हणतात. असं खरंच होतं का? दु:ख, वेदना, संकटं तर न मागताही असणारच आहेत. मग यामुळे न खचता काय करावं हे ज्ञानेश्वरांनी वरील ओव्यांमध्ये सांगितलं आहेच. दुष्टांचा दुष्टपणा गेला, त्यांची सत्कर्माची आवड वाढली, त्यांचा स्वधर्म पाळण्याचा निश्चय झाला की अशा माणसांना जे जे हवं ते ते मिळणारच. अशी माणसं नश्वर गोष्टी कधी मागणारच नाहीत, त्यांच्या मनात नेहमी विश्वकल्याणाची ओढ असणार, जगाच्या आनंदात आपला आनंद आहे याची खात्री झाल्याने अशी माणसे नेहमी जगाचा आनंद वाढेल अशाच गोष्टी मागणार याची खात्री माऊलींना आहे.

अशा आदर्श परिस्थितीचे निर्माते आणि प्रसारक असे जे संतसज्जन असतात त्यांचे वर्णन माऊलींनी पुढील ओव्यांमध्ये केले आहे.

**वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।**
**अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।**

जगातून आणि मनातून दुष्टपणा नाहीसा झाला, सत्कर्म करण्याची आवड वाढीस लागली, स्वधर्माचे पालन करण्याचे भान आले आणि त्यांचे आचरण करण्याची प्रेरणा मिळाली की अशा सज्जनांच्या मनात एकमेकांबद्दल प्रेम ओथंबून येईल. अशी संतसज्जन माणसे सगळीकडे मांगल्याचा वर्षाव करतात आणि जगातील अमंगल नाहीसं होतं. मांगल्याचा वर्षाव करणारे संतसज्जन लोक जगात मोठ्या प्रमाणात निर्माण व्हावेत, ईश्वरनिष्ठांचे समूह (मांदियाळी) निर्माण होऊन ते अखंडपणे लोकांना भेटत रहावेत आणि त्यांनी आर्त लोकांचे कल्याण करावे अशी इच्छा ज्ञानेश्वर व्यक्त करतात. ईश्वरी तत्त्व स्थिर, उदात्त, आणि शाश्वत आहे. अशा ईश्वरी तत्त्वावर निष्ठा असलेले ईश्वरनिष्ठ लोक सर्व भूतमात्रांना, समाजातील सर्व स्तरातील लोकांना सतत भेटत राहोत. हे ईश्वरनिष्ठ लोकं किती अलौकिक आहेत यांचे वर्णन माऊलींनी पुढील दोन ओव्यांमध्ये केले आहे.

**चला कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणींचे गाव ।**
**बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।**

ज्ञानेश्वरांनी ईश्वरनिष्ठांना कल्पतरू, चिंतामणी, अमृताचे सागर यांची उपमा दिली आहे. चला म्हणजे चालणारे, ईश्वरनिष्ठ हे चालणाऱ्या कल्पवृक्षांसारखे आहेत. कल्पवृक्ष हा एके ठिकाणी स्थिर असतो, आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्याला या कल्पवृक्षाकडे जावे लागते या उलट ईश्वरनिष्ठ मात्र चालत्या बोलत्या कल्पवृक्षांचे जणू बगीचे (आरव) आहेत. ते लोकांपर्यंत जाऊन, लोकांच्या योग्य इच्छा सदैव पूर्ण करतात.

ईश्वरनिष्ठ हे चिंतामणीसारखे आहेत. चिंतामणी हे रत्न मनातील इच्छा पूर्ण करते. रत्न झाले तरी चिंतामणी हा दगडच,

तो अचेतन निर्जीव आहे. ईश्वरनिष्ठ लोकं चैतन्यपूर्ण, सचेतन चिंतमणींची जणू गावेच आहेत. संतसज्जन तुमचे हित जाणून तुमच्या योग्य इच्छा कल्पवृक्ष आणि चिंतामणीप्रमाणे पूर्ण करतात.

ईश्वरनिष्ठ लोकं अमृताच्या (पीयूष) विशाल सागरांसारखे (अर्णव) असतात. सागर विशाल, खोल असतो. त्याच्या पोटात अनेक रत्ने असतात, पण सागर माणसाची तहान भागवू शकत नाही कारण त्याचे पाणी खारट असते. ईश्वरनिष्ठ लोकांची अंत:करणे अमृताने भरलेली आहेत. ईश्वरनिष्ठ लोकं हे अमृताचे चालते बोलते जणू विशाल सागर आहेत. त्याच्या तोंडून निघालेला प्रत्येक शब्द हा अमृतासारखा संजीवक असतो.

**चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।**
**ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।**

ईश्वरनिष्ठांची महती वर्णन करतांना ज्ञानेश्वर म्हणतात, हे संतसज्जन चंद्र आणि सूर्यासारखे आहेत. चंद्र आणि सूर्य दोघेही आपल्याला प्रकाश देतात. चंद्र हा शीतल, सुखद, आणि प्रेम निर्माण करणारा आहे. पण या चंद्रावर डाग आहेत, लांछन आहे. तो सूर्याचा प्रकाश घेऊन प्रकाशवान होतो. संतसज्जन हे निरंतर, शुद्ध, निर्मळ, आत्मनिर्भर, निष्कलंक, ज्ञानाच्या प्रकाशाने उजळून गेले आहेत. ते चंद्रासारखे पण निष्कलंक, सर्वांना सुखद ठरणारे चंद्रमे आहेत. हे संतसज्जन प्रखर सूर्यासारखे (मार्तंड) तेजोमय आहेत. प्रखर सूर्याचा ताप माणसांना सहन होत नाही. सूर्य अखिल प्राणिमात्रांचा जीवनदाता आहे तरी त्याचा ताप सहन करण्याची क्षमता माणसांत नाही. संतसज्जन सूर्यासारखे तेजस्वी, ज्ञानाच्या प्रकाशाने मानवी जीवन उजळून टाकणारे आहेत. पण त्यांचात सूर्यासारखी दाहकता नाही. ते तापहीन सूर्य आहेत. हे निष्कलंक चंद्रमे आणि तापहीन सूर्य यांचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ते सर्वकाळ सर्वांशी सज्जनतेने वागतात. सज्जन माणसं नेहमीच सज्जनपणे वागत नाहीत. या उलट संत हे सदैव सर्वांशी ममतेने, सज्जनतेने वागतात आणि त्यामुळेच सामान्य लोकांना ते आप्तस्वकीयांसारखे, नातलगांसारखे वाटतात.

**किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होवोनि तिहीं लोकी ।**
**भजि जो आदिपुरुखी । अखंडित ।। ७ ।।**

इतकं सर्व वर्णन झाल्यावर माऊली म्हणतात अधिक काय मागायचं? त्यापेक्षा (किंबहुना) सर्व मागण्यांचे जे सार आहे ते तुम्ही मला द्या. जगातील सर्व प्रकारची सुखे, नुसती या जगातील नाही तर त्रिलोकांतील सर्व सुखे लोकांना मिळावीत. आणि या सर्व सुखांचा लाभ झाल्यावर, ज्याच्यामुळे ही सुखे मिळाली त्या परमात्म्याच्या, परमेश्वराच्या, त्या आदिपुरुषाच्या ठिकाणी त्यांनी सतत भक्तिभावाने रममाण व्हावे, असे मागणे ज्ञानेश्वर माऊली मागत आहेत. हे मागण्याचे कारण म्हणजे, ईश्वराची प्रार्थना आपण सुख मिळावे म्हणून करतो आणि सुख मिळाल्यावर सर्वात आधी त्या ईश्वरालाच आपण विसरतो. ज्याच्यामुळे आपल्याला सर्व सुखं मिळाली आहेत, त्याचे कृतज्ञापूर्वक नित्य स्मरण करून, पूजा करण्याची प्रवृत्ती माणसांत उत्पन्न व्हावी अशी ज्ञानेश्वरांची सारभूत मागणी आहे.

**आणि ग्रंथोपजिवीये । विशेषी लोकी इये ।**
**दृष्टादृष्ट विजये । होआवे जी ।। ८ ।।**

ग्रंथोपजिवी हा शब्द पोथी वाचन करून उदरनिर्वाह करणाऱ्यांसाठी ज्ञानेश्वरांनी वापरलेला नाही. ग्रंथ म्हणजे गीता आणि ज्ञानेश्वरी हे त्यांना अपेक्षित आहेत. या ग्रंथातील ज्ञानामुळे आपले जीवन समृद्ध झाले आहे. ग्रंथोपजिवी म्हणजे गीता किंवा ज्ञानेश्वरीचे ज्ञान आपल्या जीवनात आणणे. यातील एक एक ओवी अनुभवणे. या ग्रंथातील जो आशय आहे तो जगून दाखवण्याचं ध्येय ज्याने घेतलं आहे, त्याला या जगातील म्हणजेच लौकिक / ऐहिक (दृष्ट) आणि परलोकांतील (अदृष्ट) म्हणजेच पारलौकिक अशा सर्व गोष्टींवर विजय प्राप्त होईल. ज्ञानेश्वरांनी ही शुभकामना व्यक्त केली आणि त्यांच्या गुरुंनी त्यांना आशीर्वाद दिला.

**येथ म्हणे श्री विश्वेश्वरावो । हा होईल दान पसावो ।**
**येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया झाला ।। ९ ।।**

ज्ञानेश्वरांनी विश्वेश्वर रावो असं संबोधन केलं आहे. संपूर्ण विश्वाचा राजा, नाथ असे जे त्यांचे गुरू श्री निवृत्तीनाथ यांच्याकडून त्यांनी हा आशीर्वाद प्राप्त केला आहे. निवृत्तीनाथ म्हणत आहेत, तू जे पसायदान मागितलं आहेस ना, ते तुला मिळेल. दान पसावो म्हणजे दान प्रसाद, ज्ञानेश्वरांनी प्रसाद दान मागितलं, निवृत्तीनाथ यांनी दानाचा प्रसाद ज्ञानेश्वरांच्या पदरात टाकला. आपल्या गुरूच्या मुखातून ईश्वराने दिलेल्या दान प्रसादामुळे ज्ञानेश्वर प्रसन्न झाले.

श्री ज्ञानेश्वरांनी रचलेले हे पसायदान ही सर्वार्थाने वैश्विक प्रार्थना आहे. सर्वसामावेशक, सकारात्मक आणि सर्वांच्या कल्याणासाठी केलेली ही प्रार्थना देश, धर्म, काल या सर्वांच्या अतीत आहे. ज्यांना आपले जीवन समृद्ध करायचे आहे, आदर्श समाज निर्माण करायचा आहे त्यांच्यासाठी पसायदान म्हणजे एखाद्या मार्गदर्शक दिपस्तंभासारखेच आहे. आपण मराठी भाषिकांनी या सर्वांग परिपूर्ण अशा रचनेसाठी श्री ज्ञानेश्वर माऊलींचे सदैव ऋणी असले पाहिजे.



# माझी सिॲटल ते पोर्टलँड सायकल राईड

• रिया सहस्रबुद्धे •

हॅलो! मी ह्या उन्हाळ्यात STP सायकल राईड केली. ती मला कशी वाटली हे मी आज तुम्हाला सांगणार आहे. सुरुवात करायच्या आधी STP नक्की काय असते हे सांगते. STP म्हणजे म्हणजे सिॲटल ते पोर्टलँड सायकल राईड. ही राईड दरवर्षी जुलै महिन्यात असते. एकूण अंतर २०६ मैल असतं आणि ही राईड एका दिवसात किंवा दोन दिवसात मिळून करता येते. ह्या राईडमध्ये दरवर्षी दहा हजार लोक भाग घेतात. आम्ही ही राईड दोन दिवसात करायचं ठरवलं होतं. पहिल्या दिवशी एकशे-पन्नास मैल आणि दुसऱ्या दिवशी उरलेले छप्पन्न मैल करायचे होते.

आता एक राईडर म्हणून ती मला कशी वाटली हे सांगते. मी आणि माझ्या बाबाने सकाळी तीन वाजता उठून आवरलं आणि साडेचार वाजता सायकल चालवायला सुरूवात केली. सात वाजायच्या थोडं आधी ऊन आलं आणि गरम व्हायला लागलं. मला वाटलं नव्हतं की एवढ्या लवकर गरम व्हायला लागेल. पण मी तशीच सायकल चालवत राहिले. साडेनऊ वाजता आम्ही पुयालप नावाच्या गावाला पोहोचलो. पुयालपला एक मोठा डोंगर आणि अवघड चढ आहे. चढायला फार वेळ नाही लागला, पण खूप दम लागला. हा चढ आम्ही प्रॅक्टीस करताना पण केला होता आणि तेव्हा पण खूप दम लागला होता. तो चढ चढून झाल्यावर मला वाटलं की सगळे चढ चढून संपले, पण नाही! त्याच्या नंतर पुढच्या रेस्ट स्टॉपपर्यंत परत चढ उतार होते. रेस्ट स्टॉपवर थोडं खाल्लं आणि पुढे निघालो. पुढे दहा पंधरा मिनिटांनी मला खूप झोप यायला लागली. मला डोळे उघडे ठेवणं खूप अवघड जात होतं. म्हणून मग आम्ही जरा थांबून थोडं पाणी प्यायलो आणि पुढे निघालो.

बारा वाजता आम्ही जॉइंट बेस लुई मकॉर्ड (Joint Base Lewis-McChord/ JBLM) ह्या जागी आलो. हा अमेरिकेचा आर्मी बेस आहे. STP करणाऱ्यांना ते JBLM च्या आतून जायची परवानगी देतात. आत सगळीकडे असलेल्या पाट्यांवर "Bomb

may go off at any time" आणि "Danger" अशा पाट्या लिहिल्या होत्या. थोड्या पाट्यांमध्ये तर बुलेट होल्स पण होते! तिकडून जेव्हा आम्ही बाहेर पडलो तेव्हा मला जरा बरं वाटलं. आम्ही बाहेर आलो तेव्हा आमचे साठ मैल झाले होते. ते एवढे पट्कन झाले ह्याच्यामुळे मला आनंद झाला. मला तेव्हा पटलं की आमची राईड एकदम पट्कन संपेल. पण माझं ते वाटणं खूप चुकीचं होतं. आम्ही पुढे जात राहिलो तसं ऊन खूपच वाढलं. सावली फार नव्हती. अजून दहा-बारा मैलांनी आम्ही ट्रेलला लागलो. तिथे जरातरी सावली होती, पण त्या ट्रेलवर डास, माश्या आणि टोचणारी झाडे होती. त्या ट्रेलमधून बाहेर पडल्यानंतर एक मैदान होते. त्या मैदानात आम्हांला माझी आई आणि आज्जी भेटल्या. त्या आमच्या मागून गाडीने येत होत्या. तिथे बसून आम्ही थोडं खाल्लं आणि भरपूर पाणी प्यायलं. ऊन्हाचा चटका बसू नये म्हणून आम्ही आमचं हेलमेट आणि गळ्यात बांधायचा रूमाल असे दोन्ही ओले करून घेतले आणि मग पुढे निघालो. आमचे तोपर्यंत ऐंशी मैल झाले होते. पहिल्या दिवशी आम्हांला एकशे पन्नास मैल पूर्ण करायचे होते. आता आमच्या दोन्ही बाजूला शेतीच शेती होती. सगळीकडे हिरवीगार झाडं, फुलं आणि भाज्या होत्या. सायकल चालवत ती शेतं बघायला खूप छान वाटत होतं. त्यामुळे तो भाग भरभर पार झाला. थोड्या वेळाने आम्ही हाफवे पॉईंटला आलो म्हणजे आमचे शंभरपेक्षा थोडे जास्त मैल पूर्ण झाले होते.

मग आम्ही पुढे एका लहान रस्त्यावर आलो. तिथे एक मोठाच्या मोठा चढ लागला. तो चढ खूप घाणेरडा होता. रस्त्याच्या बाजूला सायकल चालवायला खूप कमी जागा होती आणि गाड्या पण प्रचंड जोरात जात होत्या. तो चढ चढून झाल्यावर माझी आई आणि आज्जी आम्हांला परत भेटल्या. तिथे त्यांनी आमच्यासाठी जेवण आणलेलं होतं. खाऊन झाल्यावर मला तिथेच बसून रहायचं होतं. पण बाबा म्हणाला की आता निघूया, सहाच्या आत आपल्याला हॉटेलला पोहोचायचं आहे. त्यावेळी साडेतीन वाजले होते आणि आमचे तीस मैल राहिले होते. सहाच्या आत पोहोचायचं म्हणजे आता पटपट जावे लागेल. आमचा पुढच्या रेस्ट स्टॉप मोठा होता. तिथे खूप तंबू होते आणि खाण्याच्या गोष्टी होत्या. तिथे आत आल्या आल्या एक मुलगी सगळ्यांना आईस्क्रीम देत होती. पण सायकल थांबवून न ते जेव्हा उघडलं तेव्हा सगळं आईस्क्रीम वितळलेलं निघालं. थोडं आईस्क्रीम माझ्या हातमोजे आणि पँटला पण लागलं. राईड करताना हँडलला इतकं चिकट झालं की मला गियरच बदलता येईना. मग बाजूला थांबून पाण्याने सगळं स्वच्छ केलं. हॉटेलच्या आधी शेवटच्या स्टॉपला आम्ही उकडलेले बटाटे खाल्ले. बटाट्यात कार्बोहायड्रेट असतात आणि त्यावर मीठ घातलेलं होतं म्हणून ते राईड करताना खाल्ल्यावर छान वाटलं. आमचे आता दहा मैल राहिले होते आणि हा पुढचा भाग त्रासाचा होता. खूप चढ उतार होते आणि ते ही उन्हात! एके ठिकाणी रस्ता बंद होता आणि दुसऱ्या रस्त्याने जायचं होतं, पण तिथे नीट पाटीही नव्हती. आम्ही एक मैल पुढे गेलो आणि मग लक्षात आलं की आम्ही चुकलो आहोत. मग पुन्हा मागे येऊन बरोबर रस्ता पकडला.

आम्ही शेवटी एकशे पन्नास मैल पूर्ण करून जवळ जवळ सात वाजता हॉटेलला पोहोचलो. मला छान वाटत होतं पण खूप राग पण येत होता. ''किती जास्त वेळ लागला! आणि एवढे चढ कोण ठेवतं?'' असं माझं काय-काय सुरू होतं. मग जरा शांत झाल्यावर मी अंघोळ केली, कपडे बदलले आणि आम्ही जेवलो. मला लगेच झोप लागली. पहाटे साडेचार ते संध्याकाळी सात एवढा वेळ मी आणि बाबा सायकलवर होतो. दुसऱ्या दिवशी मला सकाळी सहा वाजता गजर वाजायच्या आधीच जाग आली. आता फिनीश लाईल फक्त पन्नास मैलांवर होती. आम्ही पटापटा आवरून आणि खाऊन सायकल चालवायला लागलो. सायकलवर बसल्यावर पाय, गुढघे, हात सगळच दुखत होतं पण तसंच चालवत राहिलो. थोड्यावेळाने माझ्या पायात क्रँप आला. इलेक्ट्रोलाईट प्यायल्यावर जरा बरं वाटलं पण क्रँप पूर्ण गेलाच नाही. त्यामुळे माझा मूड गेला. (बाबा म्हणाला डोकं फिरलं होतं!).

आज आम्हांला तीन रेस्ट स्टॉप असणार होते. आम्ही पहिल्या स्टॉपला पोहोचलो तेव्हा साडेआठ वाजले होते आणि खूप गरम झालं होतं. पुढे आम्ही ओरेगन-३० नावाच्या हायवेला लागलो. तो राईडमधला माझा सगळ्यात नावडता हायवे. जवळ जवळ तीस मैल खूप मोठे नसले तरी सारखे चढ-उतार आणि काहीच सावली नाही असा रस्ता होता. थोड्यावेळाने Welcome to Portland अशी पाटी आली. अजून पाच पाच मैलांनंतर एक मोठाच्या मोठा ब्रीज आला! आणि तो ओलांडल्यावर पाच मैलांनंतर फिनीश लाईन होती. फिनीश-लाईनवर पोर्टलँड डाऊनटाऊनच्या आत होती. फिनीश-लाईन ओलांडल्यावर 'STP finisher' असं लिहिलेला टीशर्ट आणि मेडल मिळालं. तिथे गाणी लावली होती आणि पार्टी सुरू होती. आई, आज्जी आणि सगळ्यांनी आमचं खूप कौतूक केलं. मला STPचा अनुभव खूप आवडला. आम्ही जवळजवळ मार्च महिन्यापासून तयारी करत होतो. त्याचा खूप फायदा झाला! सगळ्यांबरोबर खूप मजा आली पण पुढच्यावर्षी परत करेन का ते अजून माहीत नाही.

माझा लेख वाचल्याबद्दल धन्यवाद!



# दुधावरची साय

• अनिता दाणी •

माझी गोड परी दीक्षा,

खूप खूप गोड पापे घे गं. तुझ्या आठवणींचा पटच आज उलगडून ठेवते आहे. आज तुला समजणार नाही, पण कदाचित अजून नऊ-दहा वर्षांनी मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबियाच्या (MSBC) किलबिल शाळेतून मराठी वाचायला शिकल्यानंतर, तुला हे पत्र वाचून मजा येईल.

लहानपणी चतुर शिष्याची गोष्ट ऐकली होती. त्याच्या गुरूने त्याच्या चतुरपणाची परीक्षा घ्यायची म्हणून सांगितले की 'गुरुदक्षिणा देणारच आहेस तर अशी गोष्ट मला गुरुदक्षिणा म्हणून दे ज्यामुळे संपूर्ण घर भरून जाईल.' चतुरच तो, त्याने इतर काही वस्तू न आणता काय आणले तर एक सुगंधी धूपकांडी. धुपाच्या सुवासाने घर भरून गेले आणि गुरूंना योग्य गुरुदक्षिणा मिळाली, कृतकृत्य झाले ते गुरु. त्या छोट्या धूपकांडीची जादू ती किती? त्यापेक्षा जास्त जादुई किमया तर तू केलीस गं. तू ज्या क्षणी सोनपावलांनी आमच्या घरी आलीस त्याक्षणी आमचे घरच नाही तर सगळे आयुष्यच भरून गेले आहे, तुझ्या हसण्याने, घरभर रांगणाऱ्या आणि आता दुडूदुडू धावणाऱ्या पावलांनी.

तुझे आई आणि बाबा, तुझ्या शब्दात 'बा', लौकिकार्थाने आहेत तर नंद-यशोदा, पण तुमच्या तिघांचे ऋणानुबंध भक्कम आहेत. काही गोष्टी तू मोठी झाल्यावर तुला समजतीलच. आम्ही दोघे आजी-आजोबा तर मुलीच्या बाळलीला अनुभवायला खूपच आसुसलो होतो आणि आई-बाबांना पण हवीच होती एक गोडशी परी आणि ज्यासाठी त्यांनी 'कारा' या संस्थकडे अर्ज करून सर्व कागदपत्रांची पूर्तता केली. एक दीड वर्ष सगळ्यांनीच वाट पाहिली, उत्सुकतेने आणि क्वचित साशंकतेने. साशंकता होती खूप विलंब तर नाही होणार. पण तू यायची होतीस ना आमच्याकडे, आणि तो क्षण यायला वाट तर पाहावीच लागणार होती.

अखेरीस सगळ्यांच्या प्रतिक्षेचे फळ मिळाले, कारा संस्थेकडून तुझा फोटो मिळाला. त्याक्षणीच भावनिक बंध निर्माण झाले, जे रक्ताच्या नात्यापेक्षा जास्त सशक्त आहेत. पुढच्या सगळ्या औपचारिकतेची पूर्तता होईपर्यंत तुला आमच्यापासून दूर राहावे लागले, पंढरपूरच्या बालिकाश्रमात. विठुरायाच्या सान्निध्यात, आश्रमातल्या मावशींच्या सहवासात तू एक वर्षाची होऊन गेलीस. सगळेच थोडेसे निराश झालो, तुझा पहिला वाढदिवस घरी नाही ना साजरा करता आला. पण म्हणतात ना, ज्याचा शेवट गोड ते सगळेच गोड. जराशी मोठी होशील आणि मग आई-बाबांनी तुला पहिल्यांदा कडेवर घेतले तेंव्हाचा तुमच्या तिघांचा फोटो बघशील तेंव्हा तुलाही कळेल कृतार्थ होणे कसे असते.

'मेरे घर आयी एक नन्हीं परी' या गाण्याला वेगळेच परिमाण मिळाले. तू घरी आलीस ते ह्याच गाण्याच्या पार्श्वभूमीवर. तू घरात आलीस आणि एका क्षणात सगळ्यांशी भावबंध जुळले. आम्ही तुझी पहिल्या वर्षातली वाढ आणि प्रगती प्रत्यक्ष नाही तर फक्त फोटोमधूनच बघू शकलो, पण तू पहिले पाऊल आमच्यासमोरच टाकलेस. आमचेच हात आभाळाला टेकले.

पुण्यातल्या घरात थोडेच दिवस रांगलीस, खेळलीस आणि बेबी-स्टेप्स् घेतल्यास, पण घराच्या कोपऱ्या-कोपऱ्यात आठवणी

विखरून ठेवल्यास. तुझे खिडकीत बसून चिऊ-काऊला बोलावणे, बागेत गेल्यावर दोन्ही चिमुकल्या हातात दोन फुले धरून ठेवणे, सोफ्यावर चढून स्वतःच टाळ्या वाजवणे, एक एक क्षण मोबाईलवर टिपून ठेवलाय. मोठी झालीस की ते पाहून तुलाच हसू येईल बघ. आता सध्या तरी ते फोटो, व्हिडिओ पाहणे हा माझा आणि आजोबांचा सर्वात आवडता विरंगुळा आहे.

तुझे रांगता-रांगता हात उंचावून ''मला कडेवर घे'' सांगणे जास्त लोभस का इटुकले बोट नाचवून मला गाणे म्हणायला सांगणे जास्त मोहक, हे सांगणं कठीण आहे. आईला गळा-मिठी घालणारी तू जास्त लाघवी का खिडकीत बसून बाबाची वाट पाहणारी तू जास्त जिवलग - दोन्ही तितकंच हृदयस्पर्शी. तुझ्या प्रत्येक बाळलीलेतून तू अधिकाधिक मोहक आणि लोभस वाटते आहेस, आणि हे फक्त मीच नाही तर तुझ्या सगळ्या आत्या, तुझे सगळे काका, काकू आणि आजी आजोबा सांगतात ना. सगळे कसे तुला भेटायला आतुर होते, किती खाऊ, किती कपडे, खेळणी. घर कसे माणसांनी, हसण्या-खेळण्याच्या आवाजाने भरून गेले.

कधी कधी मला वाटतं, तू किती पटकन सगळ्यांना आपलंसं करून घेतलं आहेस. एकीकडे तुझं निरागस हसू, आणि दुसरीकडे तुझं जिज्ञासू असणं - या दोन्हींचा मिलाफ ही अगदी जादूच आहे. तुला पाहून आमच्या मनातलं तुझ्या बाबाचं लहानपणही जागं होतं. त्याच्या छोट्या छोट्या खोड्या, आवडीनिवडी, आठवणी,सगळं पुन्हा जिवंत होतं, तुझ्यामध्ये.

पुण्याहून कॅनडाला जाण्याचा लांबचा प्रवास, त्यात तुला काही त्रास तर नाही ना होणार. तिथे गेल्यावर कशी रुळशील असा प्रश्न मनात उत्पन्न होता-होताच विरूनही गेला. सुदैवाने कॅनडातली थंडी अजून सुरू नव्हती झाली. तिकडे पोहोचल्यानंतरचा तुझा व्हिडिओ पाहून जीव भांड्यात पडला. बाल -सुलभ कुतूहलाने नवीन जागा तपासून पाहत होतीस. ते घर तर तुला आवडलंच पण नवीन खाद्यपदार्थ पण आता आवडायला लागले आहेत. पुण्याला असताना तूप गूळ पोळी आवडीने खाणारी आणि आजीच्या खिरीला छान-छान सांगणारी तू आता ब्रेड आणि ओटमील मिटक्या मारत खाऊ लागली आहेस. ''केळ नको ब्लूबेरी दे'' असे हट्टाने आईला सांगायला लागली आहेस. ते नुसते पाहूनच माझे पोट भरते गं.

तू केलेल्या गाण्याची फर्माईश पुरी करायला सगळ्यांची चढाओढच असते, मग ते आजीचे 'टप-टप टाकीत टापा' गाणे असो किंवा आजोबांचे 'काला चष्मा', नाही तर आई-बाबांचे "five little monkeys", तुझ्या हास्यासाठी आणि मान डोलावून केलेल्या नाचासाठी सगळेच तत्पर. आमची राजकुमारीच आहे, तिचा शब्द कसा खाली पडू देणार? गाणे ऐकणे, चित्रांची पुस्तके आई-बाबाला वाचून दाखवायला सांगणे, छोटा गॉगल लावून ऐटीत स्कुटीवर बाहुलीला घेऊन फिरणे,.. किती बाई कामे तुला, एक क्षण रिकामा नाही जात.

तुझ्या ओढीने ब्रॅम्प्टनहून (Brampton) आजी-आजोबा आणि मावशी-काका आले आणि ते पण तुझ्यावर लुब्ध झाले. त्या आजी आजोबांबरोबर केलेल्या गरब्याच्या स्टेप्स लक्षात ठेवून कोणत्याही संगीतावर तू गरबा सुरू करतेस आणि लर्निंग सेंटरच्या शिक्षकांना पण इम्प्रेस करतेस. तिथे खेळताना खेळणी स्वतः बॉक्समध्ये भरून ठेवतेस, जसे घरी करतेस. हे तुझे वैशिष्ट्य उपजतच आहे आणि खरंच वाखाणण्यासारखे आहे. आई जसे काम झाल्यावर तिचे बेकिंगचे मोजे कपाटात ठेवते, अगदी तस्सेच तू जेंव्हा तेच मोजे खेळून परत कपाटात ठेवलेस, ते पाहून मी आणि आई तर थक्कच झालो.

पण खरी मजा केव्हा आली माहिती आहे? सकाळी फिरायला बागेत गेल्या-गेल्या तू आधी पिवळे फुल मागितलेस, पण नंतर तुला लाल फुल हवे होते, तर हातातले पिवळे फुल तुला पुन्हा झाडावर ठेवून द्यायचे होते. इतक्या निरागसपणे केलेली ही कृती आम्हाला आयुष्यभर लक्षात राहील.

बरोबरीच्या मुलांशी आणि पार्कमध्ये, मॉलमध्ये भेटलेल्या अनोळखी मुलांना 'हाय' करताना जो धीटपणा दाखवतेस त्यावरून असे वाटते की शाळेमध्ये पण अशीच पटकन रुळशील. तुझा हा धीटपणा, मोहक व्यक्तिमत्त्व असेच बहरू दे. तुझी नवीन नवीन गोष्टी शिकण्याची गती तर खरंच कौतुकास्पद आहे. पण त्याहूनही गोड आहे तुझ्या आई-बाबांचं बदललेलं रूप. तू त्यांना रोज नव्यानं घडवतेस, आणि आम्हाला नव्यानं जगायला शिकवतेस.

कधी कधी मला असंही वाटतं - तू फक्त आमचं आयुष्य बदललं नाहीस, तर आम्हाला नवं आयुष्य दिलं आहेस. तुझ्यामुळं आमचे धकाधकीचे दिवस रंगीबेरंगी झाले, साध्या क्षणांनाही अर्थ मिळाला. आई-बाबा आधी फक्त जबाबदार पालक होते, पण तू त्यांना प्रेम, संयम आणि आनंद यांचं नवं परिमाण शिकवलं आहेस. आम्हीही आजी-आजोबा म्हणून नव्याने जन्मलो आहोत.

अगं, तू आमचं गाणं, आमचं चांदणं. तुझ्या हास्यात आमचं संपूर्ण आयुष्य उजळून निघालं आहे. इरावती कर्वे ह्यांनी लिहिल्याप्रमाणे 'आजी' (तुझ्या शब्दात ''जीऽऽ'') ऐकून माझी परिपूर्ती झाली आहे. माझी दुधावरची साय ती.

खूप खूप प्रेम आणि आशीर्वाद.

- तुझी आजी (जीऽऽ)



# ‘बहावा’

• विदुला नायगांवकर-कुलकर्णी •

फुलांच्या देशात
नद्या नारिंगी
तुझा उमटे बोल अन्
वाऱ्यात सारंगी

फुलांच्या शहरात
मऊ फुलांच्या राशी
तुझी एक साद, मी
ओलांडी साठ वेशी

फुलांच्या गावात
माती रंगीत
तू लपली मनात, माझा
भवताल गंधीत

फुलांच्या घरात
तुझा बहावा-बहर
मना-उन्हात उतरे
तुझा सोनेरी वावर

# कलादालन




अमाइरा म्हसवडे (वय ५)




ध्रुवी शुक्ल (वय ६)



मायरा शिरोडकर (वय ७)




शायना कामत (वय ९)



रिशील भागवत (वय १०)



अनय जोसाळकर (वय १२)



सारा वाकणकर (वय ११)



अरुण स्टेगर (वय १०)



# कॅनडा डायरी

कॅनडा म्हंटलं की आठवतो बर्फ, थंडी, टीम हॉर्टन्सची कॉफी, समुद्र, रॉकीज, निळे तलाव आणि नजर जाईल तिथपर्यंत पसरलेले पाईन वृक्ष! कॅनडात पहिल्यांदा आल्यानंतरचे आपल्या सर्वांचे काही खास अनुभव असतात. अशा खास आठवणी जागवणारा विभाग 'कॅनडा डायरी'

प्रतिमा पराडकर

सोनाली मयूर पिंपरीकर

प्रांजल भोसेकर

सारा सावंत

स्वाती हेमंत

मेघना मेडीथी

डॉ. राम कुंभारे

सीमा फाटक




# माझा कॅनडामधील सुरवातीचा प्रवास

**• प्रतिमा पराडकर •**

मी, माझे पती आणि आमची तीन लहान मुले यांच्यासोबत १९७० साली कॅनडाला आले. तो काळ आजच्या इतका सोयीचा नव्हता. परदेशात जाणं म्हणजे मोठं साहस असायचं. आम्ही मनात अनेक स्वप्नं घेऊन आणि थोडीशी भीती व अनिश्चितता ठेवून या नव्या देशात पाऊल टाकलं. कॅनडामध्ये वाट पाहत होत्या नव्या संधी, वेगळं समाजजीवन, आणि थंडी.

आम्ही प्रथम आलो तेव्हा आमचे मित्र कामत कुटुंबीयांनी आम्हाला खूप मदत केली. एक महिना आम्ही त्यांच्याकडे राहिलो. त्यानंतर आम्ही व्हॅन्कुव्हरला आलो. माझे मिस्टर फिजिओथेरपिस्ट होते. त्यांनी १२ वर्षे दिल्लीमध्ये एका हॉस्पिटलमध्ये काम केले होते. त्या अनुभवामुळे त्यांना इथे नोकरी सहज मिळाली. पण तरीही त्यांना इथली परीक्षा त्यांच्या नियमांप्रमाणे द्यावी लागली.

नंतर आम्ही भाड्याचे घर शोधले आणि एका घरात स्थायिक झालो. तिथे आम्ही जवळजवळ एक वर्ष राहिलो. व्हॅन्कुव्हरला राहायला आल्यावर इथे आम्हाला दीपक आणि कमल देशपांडे हे आमचे जुने मित्र मिळाले, आमच्याकडे तेव्हा कार नव्हती, पण ते आपल्या गाडीतून आम्हाला खरेदीला नेत असत. सहलीला गेलो तर टेन्ट कसा लावायचा हे आम्ही त्यांच्याकडून शिकलो!

त्यांच्याकडे आम्ही जात असू आणि पत्ते खेळत असू. तेही आमच्याकडे येत असत. मला एक मॅप मिळाला होता, त्यात बसचे क्रमांक आणि कोणती बस कुठे जाते याची माहिती होती. त्यामुळे मुलं शाळेत गेली की मी बस पकडून एखाद्या मॉलमध्ये जात असे. तिथून मी घरासाठी लागणारं सामान घेत असे. तिथून ते फ्री डिलिव्हरीही देत असत. मग पुढे जाऊन, मला माहीत असलेल्या आर्मी-नेव्हीच्या दुकानातून मुलांसाठी कपडे आणत असे. नंतर परत बसने घरी येत असे. अशा प्रकारे मी कटलरी

आणि जेवणासाठी छान प्लेट्स खरेदी केल्या!

सुरुवातीची वर्षे सोपी नव्हती. भाषा, रितीरिवाज, खाणेपिणे आणि कपडे-सगळं काही नवीन होतं. हिवाळा कठीण होता, आणि अपरिचित ठिकाणी मुलांना वाढवणे त्याहूनही कठीण. तरीही प्रत्येक टप्प्यावर आम्ही हळूहळू जुळवून घेतलं. माझ्या पतीच्या नोकरीमुळे आमचं जीवन स्थिर व्हायला लागलं आणि हळूहळू कॅनडा आमचं घर वाटू लागलं.

त्या दिवसांत परदेशात फारसे मराठी लोक नव्हते. बोटावर मोजता येतील एवढेच लोक आसपास दिसायचे. सुरुवातीला थोडं एकटेपण जाणवायचं, पण जसजसा वेळ गेला, तसतसे नवीन लोक भेटत गेले आणि आपुलकीच्या ओळखी वाढत गेल्या.

पटेल यांनी उघडलेलं एक दुकान होतं. तिकडे आम्ही डाळ, तांदूळ आणि भारतीय वस्तू घ्यायला जायचो. स्थानिक दुकानांत फळं मात्र विपुल मिळायची, खूप रेसिपी मिळत असत, त्या आणून मी मफिन, केक व इतर कॅनडातील पदार्थ करायला शिकले.

काळ पुढे सरकत गेला आणि आम्हाला कळलं की मेन स्ट्रीटवर पंजाबी दुकानं उघडली आहेत. मग हळूहळू तिथूनही सामान मिळू लागलं. जे आधी दुर्मीळ वाटायचं, ते सहज उपलब्ध होऊ लागलं.

त्या काळातील एक आठवण आजही माझ्या मनात कोरली गेली आहे. ब्रॉडवेवर मी चालत असताना एक फलक माझ्या नजरेस पडला. त्यावर लिहिले होते - ''जर तुम्हाला कॅनडाचे नागरिक व्हायचे असेल तर आत या आणि अपॉइंटमेंट घ्या.''

हे वाचून मी आत गेले आणि अधिक माहिती विचारली. त्यांनी आम्हाला पासपोर्टसह ठरलेल्या वेळेला येण्यास सांगितले आम्ही तसेच केलं. आमचे आधीच इमिग्रेशन झाले होते, त्यामुळे पुढचे पाऊल नागरिकत्वाकडे होते. जेव्हा आम्ही आत गेलो तेव्हा त्यांनी आम्हा दोघांना एक परिच्छेद वाचायला दिला. त्यातून आम्ही शपथ घेतली - ''आम्ही या देशातील सर्व कायद्यांचे पालन करू'' इत्यादी. त्या क्षणाने मनात एक वेगळीच भावना दाटून आली. महिन्याच्या आत आम्हाला सर्व कागदपत्रे मिळाली आणि आम्ही अधिकृतपणे कॅनडाचे नागरिक झालो. त्या दिवशी आमच्या मनात एक वेगळाच अभिमान आणि समाधान दाटून आले.

नागरिकत्व मिळाल्यावर आम्हाला स्वतःचे घर हवे होते. एके दिवशी पेपरमध्ये जाहिरात पाहिली - सरे (Surrey) मधील नवीन टाउनहाऊस प्रोजेक्ट. आमच्याकडे कार नव्हती, म्हणून एका मित्राने आम्हाला तिथे नेऊन घर दाखवले.

ती जागा गिल्डफोर्डजवळ (Guildford) होती आणि समोरच मोठा गिल्डफोर्डचा मॉल होता. साधारण २०० घरे होती. घर पाहायला गेलो तर ते अत्यंत सुंदर होतं-खाली स्वयंपाकघर, स्टोव्ह, फ्रिज, लहान बाथरूम; वर दोन बेडरूम व शॉवर; आणि बेसमेंटमध्ये मोठी जागा, पाण्याची टाकी व हीटर. घर आमच्या मनाला ताबडतोब भावलं. त्याची किंमत $ १९००० होती आणि दोन वर्षे मेंटेनन्स नव्हता. सुरुवातीला $ २००० द्यावे लागणार होते. काटकसर करून ते आम्ही कसोशीने जमवले होते. मुंबईकरांना काटकसर करून पैसे साठवता येतात हे खरं!

शेवटी आम्ही निर्णय घेऊन हे घर खरेदी केले. बेसमेंटमध्ये आम्ही मुलासाठी स्वतः एक बेडरूम तयार केली आणि त्यात कपडे ठेवण्यासाठी क्लोझेटही (closet) बनवले.

सुरुवातीला भारतात वारंवार जाणं शक्य नव्हतं. आमची पहिली भारताची ट्रिप सात वर्षांनी झाली. तेव्हा भारतात वारंवार फोन करणं शक्य नव्हतं. एकतर घराघरात फोन नव्हते आणि इथून एक फोन करायलाही खूप पैसे लागत. पोस्टाने घरी पत्रव्यवहार करायचो, ती पत्रं तिकडे तीन आठवड्यांनी मिळायची.

मुलं शाळेत स्थिरावली. आता मी स्वतःसाठी काहीतरी करावं म्हणून नोकरी शोधू लागले. काही कोर्सेस केले, थोडं प्रशिक्षण घेतलं आणि नोकरी मिळवली.

एकदा दारात टाकलेल्या पेपरमध्ये एक जाहिरात वाचली-

''जर तुम्हाला सरकारी नोकरी हवी असेल तर अर्ज करा.''

मी अर्ज केला. मुलाखत झाली आणि मला सरकारी नोकरी मिळाली! तो माझ्या आयुष्यातला मोठा क्षण होता. सरकारी नोकरी मिळाल्यानंतर एक नवा आत्मविश्वास मिळाला. सुरुवातीला परदेशात आलेली एक गृहिणी म्हणून मी घर आणि मुलांमध्ये व्यस्त होते, पण नोकरीमुळे माझ्या आयुष्याला वेगळं वळण मिळालं. आता मी केवळ आई आणि गृहिणी नव्हते, तर एक स्वतंत्र व्यक्ती होते. प्रत्येक सकाळी घराबाहेर पडताना मला जाणवत असे की मी कुटुंबासाठीच नव्हे तर स्वतःसाठीही काहीतरी करत आहे.

सरकारी कामकाजात शिस्त, वेळेचं महत्त्व, आणि जबाबदारी असते. हे सगळं करताना मला माझ्या भारतातील शिस्तप्रिय संस्कारांची आठवण होत असे. कार्यालयीन कामकाजात कधी कधी अडचणी आल्या, पण मी संयम, प्रामाणिकपणा आणि चिकाटीने सगळं निभावलं. सहकाऱ्यांनी मला आपले मानले, आणि हळूहळू मी त्या वातावरणात पूर्णपणे मिसळले.

दरम्यान, माझ्या मिस्टरांनी नॉर्थ व्हॅन्कुव्हरला स्वतःचं क्लिनिक सुरू केलं. खरं तर व्हॅन्कुव्हरला एखाद्या मराठी माणसाने उघडलेलं हे पहिलंच क्लिनिक होतं. त्यांच्या मेहनतीने आणि

रुग्णसेवेने ते लवकरच प्रसिद्ध झालं. नॉर्थ व्हॅन्कुव्हरला त्यांनी क्लिनिक घेतलं तेव्हा त्यांना थोडं कर्ज घ्यावं लागलं. तिथे पाच वर्षे झाल्यावर त्यांनी ते क्लिनिक विकून फ्रेझर स्ट्रीटवर दुसरे क्लिनिक घेतले. त्या ठिकाणी त्यांना खूप यश मिळाले, कारण तिथे अनेक पंजाबी आणि इतर समुदायातील लोक राहत असत. त्यामुळं त्यांचा व्यवसाय अतिशय चांगला चालू लागला.

आमच्या घराचं कर्ज मी पाच वर्षांत फेडलं. त्यानंतर घर पूर्णपणे आमचं झालं.

त्या दिवशी आम्ही खूप सुटकेचा नि अभिमानाचा श्वास घेतला. त्या दिवशी झालेला आनंद शब्दात मावणार नाही.काटकसर, मेहनत आणि नियोजन केल्यावर स्वप्नं खरी होतात हे आम्ही स्वतः अनुभवलं.

आज मी जेव्हा माझ्या नातवंडांना हा प्रवास सांगते, तेव्हा त्यांच्या डोळ्यात आश्चर्य आणि अभिमान दिसतो. त्यांना सांगताना मी स्वतःही ते पुन्हा नव्यानं जगते. कारण हा प्रवास केवळ माझा नव्हता, तर आमच्या संपूर्ण कुटुंबाचा होता.

कॅनडाने आम्हाला केवळ निवारा दिला नाही, तर जीवनाला दिशा दिली. आमच्या मेहनतीला संधी दिली. आज मी मनापासून म्हणू शकते –

''आम्ही इथे आलो, संघर्ष केला, पण शेवटी इथलेच झालो. आणि या देशानं आम्हाला जे दिलं त्याबद्दल आम्ही सदैव कृतज्ञ राहू.''

# हास्य कट्टा

मुंबई युनिवर्सिटीमधून बाहेर पडलेले इंजीनियर:
शब्दाने शब्द वाढतात म्हणून.
आम्ही तोंडी परीक्षेत शांत बसायचो...
पुणे, नागपूर, सांगली आणि व्हॅन्कुव्हरवाल्यांनो, जास्त हसू नका... तुमचा नंबरही येणार आहे!

☺☺☺

सातवीच्या वर्गात इंग्रजीचा तास नुकताच संपला होता. गुरुजींनी Knowledge मध्ये K चा उच्चार होत नाही, Wrong मध्ये W चा तसेच Psychology मध्ये झ चा उच्चार होत नाही, ते सायलेंट असतात असं शिकवलं.
नंतर इतिहासाच्या तासात सरांनी पुण्याची माहिती/महती सांगितली. शेवटी गुरुजींनी एका विद्यार्थ्याला प्रश्न केला, ''सांग बरे, पुणे तिथे काय उणे असे का म्हणतात?''
एक चुणचुणीत मुलगा म्हणाला...कारण PUNE मधला P सायलेंट आहे... !

☺☺☺

बघा हे नागपूरकर !
नागपूरकर : काका, पावशेर रताळे द्या.
दुकानदार : पिशवीत देऊ?
नागपूरकर : नाही नाही पेन ड्राईव्ह आणलाय. त्यात 'रताळे' नावाचा फोल्डर बनवा आणि टाका त्यात!

☺☺☺

सांगलीकरांचा नाद करायचा नाय!
मित्र : भावा, तू आता कुठे आहेस ?????
सांगलीकर : भाऊ me USA madhe ahe.
मित्र : भावा कधी गेलास? मला सांगितले नाही!
सांगलीकर : भाऊ मी ऊसामध्ये आहे, पाणी सोडतोय.
त्यासाठी म्हणतात ना, मराठीत टायपिंग करा!

☺☺☺

आणि आता खास व्हॅन्कुव्हरवाल्यांसाठी : यंदा आपण फक्त उटणं लावून अंगणात बसायचं.. बाकीचं नियोजन पाऊस लावतोय.

# लॉक-डाऊनच्या दारात आयुष्याची चाहूल : कॅनडातील बाळंतपणाची गोष्ट

• सोनाली मयूर पिंपरकर •



बघता बघता ग्रेस, माझी मुलगी चार वर्षांची झाली. अजूनही मला प्रत्येक क्षण अन् प्रत्येक दिवस जसाच्या तसा आठवतो कारण प्रेग्नंसी (pregnancy) ते डिलिव्हरीचा काळ आणि पुढचे ७ महिने खूप कठीण आणि खूप शिकवणारे होते. मला आणि मयुरला (माझा नवरा) जेव्हा आम्हाला बाळ होणार आहे असं कळलं तेव्हा आनंद गगनात मावेनासा झाला होता. डोळ्यातील आनंदाश्रू आणि मयूरने माझी अजून जास्त काळजी घेणं हे सगळं नजर लागण्यासारखं होतं. आम्ही आई-बाबांच्या कॅनडा व्हिसासाठी अर्ज करून त्यांची वाट पाहत होतो, पण डिलिव्हरी तोंडावर आली तरीही व्हिसा होण्याचा काही थांगपत्ता लागेना. कोरोनाने जगभरात घातलेले थैमान आणि त्याचा सर्व क्षेत्रात होणारा परिणाम आम्ही चांगलाच अनुभवत होतो. पहिलीच प्रेग्नंसी आणि त्यातून स्वदेशात नसून कॅनडामध्ये असल्याने मी मनोमन प्रार्थना करत होते की डिलिव्हरीच्या वेळी आई बाबा येऊ शकले तर खूप आधार आणि मदत मिळेल. पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळं होता. मयुर आणि माझी पुरेपूर परीक्षा घ्यायचा नियतीचा डाव मला फार नंतर कळून आला.

४ ऑगस्ट २०२१ रोजी संध्याकाळी आम्ही हॉस्पिटलमध्ये दोघेच गेलो आणि ५ ऑगस्टच्या मध्यरात्री दोन वाजून पाच मिनिटांनी ग्रेस, माझ्या गोजिरीने जन्म घेतला. ग्रेसला पाहता क्षणी तोंडून फक्त 'आय लव्ह यू, ग्रेस' हे शब्द निघाले. आधीपासून बाळाचे लिंग माहित असल्याने आम्ही बाळाचं नाव ठरवलं होतं

आणि गर्भसंस्कार वर्गात सांगितल्याप्रमाणे या नावाने तिच्याशी बोलायचोही ती पोटात असताना.

७ ऑगस्ट २०२१ रोजी हॉस्पिटलमधून घरी आलो तेव्हा आम्ही तिघेच होतो, मयूर, मी आणि ग्रेस. स्वागताला घरात कुणीही नाही. काही महिन्यांपूर्वीच अमेरिकेतून कॅनडाला आलो असल्याने जास्त मित्र मैत्रिणी किंवा ओळखी नव्हत्या. कोविड चालू असल्याने सगळे जास्त दक्षता घ्यायचे आणि आम्हीही बाळाला कुठल्या रोगांचा संसर्ग होऊ नये म्हणून जास्त काळजी घेत होतो. मयूर घरात जाऊन औक्षणाचं ताट घेऊन आला आणि त्याने ग्रेस आणि माझं औक्षण केलं आणि माझ्या डोळ्यातून पाणी येऊ लागलं. आजही हे लिहिताना तो क्षण आठवतो आणि डोळ्यातून पाणी येतं.

ग्रेसला पाहून खूप मस्त वाटायचं, सकाळी तिला पाहताना देवाचं रूप हेच काय ते असणार असं रोज वाटायचं, तिच्या बाल-लीला, कोमल मंजुळ आवाज, सगळं काही देवाची कृपा आहे हे सतत वाटत असे. आम्ही देवाचे खूप आभारी होतो. ग्रेस या नावाचा अर्थच कृपा आहे आणि आम्ही ती कृपा अनुभवत होतो.

ग्रेसला जन्मतः पोटशूळ/शिशुकोश (colic) चा त्रास होता ज्यामुळे ती खूप रडत असे. शिशुकोश ही एक अवस्था आहे ज्यामध्ये बाळ ओटीपोटात खूप दुखत असल्याने, अस्वस्थ होऊन तासन् तास खूप रडते. हा त्रास संध्याकाळी आणि रात्री खूप जास्त व्हायचा तिला. कॅनडातील डॉक्टर, भारतातील डॉक्टर, आयुर्वेदिक उपाय, आई-मावशी-मैत्रिणी सांगतील ते उपाय, इंटरनेटवरील उपाय सर्व काही करून झाले, पण तिचा त्रास काही केल्या कमी होत नव्हता आणि तिच्या रात्रभर रडण्याने आम्हा दोघांची झोप गायब झाली होती.

अमेरिकेचे व्हिजीटर व्हिसा बंद करण्यात आले होते. अमेरिकेहून कॅनडाला येताना मनात ही आशा होती की आई-बाबांना व्हिजीटर व्हिसा नक्की मिळेल.

त्यांचा व्हिसा 'प्रीमियम'मध्ये, अधिक शुल्क भरून, व्हिसा ऑफिसला भेट देऊनही पुढे सरकत नव्हता. ग्रेसला होणारा त्रास, मला शस्त्रक्रियेनंतर होणार त्रास, रोजच न होणारी झोप, डॉक्टरकडे होणाऱ्या फेऱ्या, आलेला प्रचंड थकवा, कोणत्याही मदतीशिवाय सगळं काही दोघांनाच करावं लागणं यामुळे प्रचंड रडकुंडीला आले होते मी.

कधीही फोनवर न रडणारी, खूप धीराची असणारी किंवा धीराची असल्याचा आव आणणारी मी आईला फोन करून रडत असे. आईचीही तिकडे परीक्षा चालू होती. तिला बाहेरचे देश फिरण्यात इतका रस नाही, पण माझ्या डिलिव्हरीसाठी म्हणून यायची फार इच्छा होती. पण सगळं काही व्हिसामुळे अडकलं होतं.

प्रेग्नंसीमध्ये विमानाने प्रवास करणं शक्य नव्हतं आणि ग्रेसच्या जन्मानंतर तिला भारतात घेऊन जायचा प्रयत्न केला तर तिचा व्हिसा व्हायलाही काही ना काही अडचणी येत होत्या त्यामुळे आम्ही पुरते अडकलो होतो. ग्रेसचं बर्थ सर्टिफिकेट, पासपोर्ट, मग Overseas Citizenship of India (OCI) व्हिसासाठी अप्लाय केलं होतं पण सर्वच ठिकाणी कोवीडमुळे विलंब होत होता. इ-व्हिसा देणं थांबवण्यात आल्याने तो पर्यायही उरला नव्हता. डिलिव्हरीनंतर घरी आल्यावर पहिल्या दिवसापासून मी सर्व कामं करत होते, ते भागच होतं. काही नव्याने झालेले मित्र-मैत्रिणी जमेल त्या परीने मदत, माहिती देत होते. बाहेरून कुणाची स्वयंपाकासाठी, बाळाला सांभाळण्यासाठी मदत घ्यायची तर कोवीडदरम्यान संसर्गाची फार भीती होती. आहे त्या परिस्थितीत अजून अडचणीची भर नको म्हणून आम्ही आलेला दिवस आमच्या परीने सर्वतोपरी प्रयत्न करून निभावत होतो. एकदा डॉक्टर आम्हाला म्हणाले, ''तुमच्या बाळासोबत तुम्हा दोघांची काळजी घ्यायची गरज वाटत आहे.'' आमचा चेहरा सर्व काही बोलत होता.

मयुर शक्य तितकं सर्व करत होता. दिवसभर ऑफिसचं काम, संध्याकाळी, रात्री ग्रेसला सांभाळायला मदत करत होता, पण मनुष्यबळ कमी पडत होतं कारण म्हणतात ना It takes a village to raise a baby आणि इथे तर आम्ही जेमतेम दोघे होतो.

आम्ही दोघेही प्रचंड थकलो होतो. ते दिवस आठवले की आजही अंगावर काटा येतो. मी घरी फोन करून आई, पप्पा, भाऊ, वाहिनी सर्वांसमोर रडत होते, मनातून मोकळी व्हायचा प्रयत्न करत होते. बघता बघता चार महिने सरले पण ग्रेसचा त्रास, रडणं कमी झालं नाही. डॉक्टर म्हणाले, ''काही बाळांना सहा-आठ महिनेही लागू शकतात हा त्रास कमी व्हायला.''

ग्रेसला होणार प्रचंड त्रास, तिचा जोरजोऱ्यात रडणं पाहून भीती वाटायची. तिला अनेक वेळा फॅमिली डॉक्टर, इमर्जन्सी (emergency) हॉस्पिटल मध्ये घेऊन गेलो. तिथे अनेक तास थांबून डॉक्टरचे सल्ले घेतले, त्यांनी सांगितलेले उपाय करून पहिले, माझ्या आहारात बदल करून पाहिले, पण नेहमी हेच सांगितलं जायचं की कॉलिकसाठी कन्फर्म असं काही औषध नाही, ते हळूहळू कमी होईल.

आम्हाला बालरोगतज्ञ मिळायलाही खूप वेळ लागत होता, एकंदरीत आजच्या भाषेत बोलायचं तर, 'आमची वाट लागली होती.'

ग्रेस रात्री रडून इतकी थकत असे की ती दिवसा झोपत असे आणि दूधही पीत नसे. तिच्या दिवस आणि रात्रीची अदलाबदल झाली होती. ते पलटण्याकरता आम्ही फार प्रयत्न करत होतो. तिला सतत घराबाहेर, जवळच्या गार्डनमध्ये नेऊन पक्षी, लहान मुले, लोकं दाखवून, तिचे लक्ष वेधून बाटलीने दूध पाजायचा प्रयत्न करत असू. डिसेंबर, जानेवारी मध्ये तर कहर झाला. बाहेर स्नो झालेला असतानाही ग्रेसला जॅकेट, स्नो सूट (Snow suit), कान-टोपी, हातमोजे, पायमोजे, बूट, स्ट्रोलर-कव्हर असं सर्व घालून बाहेर नेऊन बाटलीने दूध प्यावे म्हणून प्रयत्न करत असू कारण ती घरात, लॉबीमध्ये दूध अजिबात पीत नसे, आणि सतत रडत असे.

अजिबात न होणारी झोप, थकव्याने मी पोस्टपार्टम डिप्रेशनची शिकार झाले. गोळ्या घेऊन थोडा फरक पडतो का पाहत होते.

ग्रेस ७ महिन्याची झाली आणि आई-पप्पांचा व्हिसा अखेर आला. दहा दिवसात सर्व सामान बांधून ते लगेच कॅनडाला आले आणि आम्हाला हायसे वाटले. दिवसभर आई-पप्पा ग्रेसची काळजी घ्यायचे त्यामुळे मला दिवसा आराम मिळू लागला. मात्र ग्रेसचं रात्री रडायचं कमी झालं नव्हतं. रात्रीचं तिचं रडणं ऐकून आई-पप्पांनाही रात्रीची धास्ती बसली होती. तिचा त्रास पूर्णतः जायला दहा महीने लागले.

बघता बघता ग्रेस चार वर्षांची झाली. या प्रवासात खूप अनुभव आले. ग्रेसचा उच्चारलेला पहिला शब्द, पहिले पाऊल, पहिला दात, आतापर्यंतचे सगळे वाढदिवस, वाढीचे वेगवेगळे टप्पे सगळं काही मनात सुंदर घर करून आहे. ग्रेस आमच्या जीवनाचा एक सुंदर अविभाज्य भाग झाली. आजही नवनवीन अडचणी येतात आणि ते आम्ही 'grace'fully स्वीकारलं आहे. रोलर-कोस्टर राईड चालू आहे. आपल्याला मोठं करताना आई-बाबांनी काय-काय केलं असेल याची अनुभूती मिळाली. सगळेच आई-बाबा किती परिश्रम घेऊन, रात्रीचा दिवस करून बाळाला कसं सांभाळतात हे कळलं. आईपण आणि बाईपण कळलं. आईला देवाची उपमा देतात ते उगीच नाही. आई-वडिलांवरील प्रत्येक सुविचार, कविता, म्हणी मला नव्या अर्थानं कळत होत्या कारण आम्ही दोघे ते अनुभवत होतो.

या सर्व प्रवासात मयूरने दिलेली साथ आणि पाठिंबा मी जन्मभर विसरू शकणार नाही. आम्ही दोघे चांगले मित्र, पार्टनर, प्रेमी, नवरा-बायको तर होतोच नि आता सोलमेट (soulmates) आणि जन्मजन्माचे साथीदारही झालो. हा काळ खूप काही शिकवून गेला ते जन्मभरासाठी. मयूर आणि माझ्या नात्याची पुरेपूर परीक्षा झाली होती आणि या परीक्षेत आम्ही पास झालो. लग्नपत्रिकेत सांगितलेल्या वाईट गोष्टी न ऐकता मी माझ्या अंतर्मनाने सांगितल्याप्रमाणे मयूरशी लग्न करायचा घेतलेला निर्णय एकदम योग्य होता. असा साथीदार मिळण्यासाठी पूर्वजन्मी काहीतरी पुण्य-कर्म नक्कीच केलं असणार मी, हाहा!

# मंडळाविषयी बोलू काही

## सिनिअर्सचे गेट-टुगेदर

MSBC चा सिनिअर मंडळींसाठी एक व्हॉटस् ॲप ग्रुप आहे. सिनिअर्सचे गेट-टुगेदर दरवर्षी आयोजित केले जाते. या कार्यक्रमामुळे त्यांना त्यांच्या वयाच्या लोकांसोबत वेळ घालवता येतो. मंडळी या गेट-टुगेदरची आतुरतेने वाट बघतात आणि सर्व उपक्रमांमध्ये मनापासून आणि उत्साहाने सहभागी होतात. त्यामुळे कार्यक्रम अधिक रंगतात आणि नवनवीन उपक्रम राबवण्यासाठी हुरूप येतो.

ह्या वर्षी 'संगीत खुर्ची', 'पिक्शनरी' खेळायला सर्वांना खूप मजा आाली. कार्यक्रमाचा शेवट 'चेअर-योगा' सत्राने झाला. हा दिवस सर्व सहभागी सदस्यांच्या आठवणीत राहील.

# नवा देश, नवी आशा, स्वतःला घडवण्याची नवी संधी

• प्रांजल भोसेकर •



१९ सप्टेंबर २०२४. हैद्राबाद आंतरराष्ट्रीय विमानतळ. आपला देश सोडून साता समुद्रापार व्हॅन्कुव्हर, कॅनडाला निघालेलो. विद्यार्थी- व्हिसा मिळवून कम्फर्ट झोनच्या बाहेर पडून आयुष्याची नवीन सुरुवात करणार होतो. मनात किती सारे विचार येत होते. एवढं सगळं शिक्षणासाठी कर्ज घेतले आहे, ते मी योग्य रित्या फेडू शकेन ना? घरी सोलापूरला आई एकटी असणार आहे, तिला एकाकी वाटणार नाही ना? घरातून निघताना तिला मारलेली मिठी आणि नकळत दोघांच्या डोळ्यांत आलेले अश्रू. तो क्षण पूर्ण विमान प्रवासात डोळ्यापुढे येत राहिला. अर्थात, ते अश्रू आनंदाचे होते आणि थोडे दुःखाचेही. आईसाठी आनंदाचे का तर मुलगा स्वतःचे आयुष्य घडवायला चालला आहे, आणि माझ्यासाठी का तर मला एक संधी मिळालेली आहे स्वतःला सिद्ध करून दाखवण्यासाठी. थोडेसे अश्रू दुःखाचे का तर, दोघे आता एकमेकांसोबत राहणार नव्हतो. आम्हा दोघांना एकमेकांचा सहवास मिळणार नव्हता. त्यात आईने बनवलेला नाश्ता, गरम गरम जेवण मला कॅनडामध्ये सहजासहजी मिळणार नव्हतं. अशा संमिश्र भावना मनात घेऊन विमान प्रवास सुरू झाला.

कधी संपणार नाही असं वाटणारा विमान प्रवास शेवटी एकदाचा संपला आणि विमान व्हॅन्कुव्हर आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरलं. खूप दमायला झालं होतं. सर्व प्रक्रिया करून बॅग कलेक्शनच्या ठिकाणी आलो तर लक्षात आलं, एक बॅग आलेली नाही. चौकशी केली तर ती बाजूला काढून ठेवली होती. कारण काय, तर जे अन्नपदार्थ घोषित करायला पाहिजे होते ते करायचे राहून गेले होते. ताणामुळे घामाघूम झालो होतो. वाटलं, इथूनच परत मायदेशी पाठवतात की काय? धन्य तो ऑफिसर ज्याने ताकीद देऊन सोडून दिलं. स्टडी-परमिट (Study Permit) मिळालं आणि मी मोकळा श्वास घेतला. सुरुवातीचे थोडे दिवस ठरलेली अशी दिनचर्या नव्हती. दिवस आहे की रात्र, काहीच समजत

नव्हते. शरीर, मन, मेंदू - सगळ्यांनी इंडियन स्टँडर्ड टाइमवरून पैसिफिक स्टँडर्ड टाइमवर यायला चांगले १०-१५ दिवस घेतले.

सुरुवातीच्या दिवसांत अनेक वेळा वाटायचं, का आलो आहे मी इथे? पटकन तिकीट काढून परत जावं. पण हेच क्षण, हळूहळू माझा आत्मविश्वास वाढवत होते. मी पाहिलं की मी अशक्य वाटणाऱ्या गोष्टी पार पाडू लागलो होतो आणि त्यातूनच एक नवीन 'मी' जन्म घेऊ लागला होता. कधीकधी, मनात भीती असली तरी चेहऱ्यावर हसू ठेवणं आणि पुढे जाणं, हीच इथली खरी शौर्यगाथा आहे असं वाटू लागलं.

हळूहळू इथे आल्यावर करायची कामं करायला सुरुवात केली. नवीन ओळखी होऊ लागल्या. त्यात काही मराठी बंधू-भगिनींची ओळख झाली. त्यांच्यातील एकाने मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया (Marathi Society of British Columbia/ MSBC) बद्दल माहिती दिली. २०२४ चे फक्त ३ महिने राहिले होते. तरी पुढचा मागचा जास्त विचार न करता MSBC चे विद्यार्थ्यांसाठीचे सदस्यत्व घेतले, जे वर्षाअखेरीपर्यंत वैध होते. सर्वात पहिली ओळख आकांक्षा म्हैसकर ह्यांची झाली. त्यांनी मला MSBC च्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर अॅड केलं. मग काय झाला ना प्रवास सुरू! २०२४ च्या दिवाळी कार्यक्रमात धमाल केली, त्याचसोबत मनापासून जमेल तसं सेवाभावी कामही केलं. माझा स्वभाव बऱ्याच लोकांना आवडला आणि त्यांनी माझं चारचौघांत कौतुक देखील केलं. मन भरून आलं.

भारतात असताना अगदी जवळ जरी जायचं असलं तरी लगेच दुचाकी काढली जायची. मग ते अर्धा किलोमीटरवर दूधाचं पाकीट आणायचं असो की ब्रेड. ह्यामुळे व्यायाम मुद्दाम केला तरच व्हायचा. इथे येऊन ह्या सवयी चांगल्या अर्थी बदलल्या. जसा जेटलॅग संपला, तसा मेट्रो व्हॅनकुवर फिरत सुटलो. ट्रान्झिटचा (transit) ३ झोन फुल पास घेतला आणि सुचेल तशी व जमेल तशी भटकंती केली. आल्या-आल्या सप्टेंबरमध्ये एवढी थंडी नव्हती, जी हळूहळू वाढत गेली. पण मनाशी ठरवलं होतं, थंडी कितीही वाढली, तापमान अतिशय कमी जरी झालं, तरी घरात बसून राहायचं नाही. ह्यात शरीराला थंडी सोसायची सवय व्हाही म्हणून जॅकेटदेखील न घालायचं असं ठरवलं होतं. डॉक्टरांची परवानगी मिळवली आणि २४-२५ चा पूर्ण हिवाळा जॅकेट विना काढला. तर २०२४ चा हिवाळा हे नक्कीच शिकवून गेला की कितीही थंडी पडली आणि कोणताही बॉडी वॉर्मर लगेच उपलब्ध नसेल, तरी पुढील सर्व हिवाळे पार पडतील याची खात्री आहे.

अजून एक आवर्जून सांगावंसं वाटतं इथल्या ऋतूंबद्दल. भारतात कसं उन्हाळा संपला की पावसाळा, मग हिवाळा, असे तीनच ऋतू माहीत. इथे तसं नाही. मी जेव्हा सप्टेंबर संपताना इथे आलो, तेव्हा पानगळ सुरू झालेली. बघता बघता झाडांची सर्व पानं झडून गेली, ज्याला परत एप्रिलच्या सुमारास वसंतात पालवी यायला लागली. संपूर्ण हिवाळा वाटत राहिलं झाड जिवंत तरी आहे ना? पण हा अनुभव शिकवून गेला की आपण माणसानेदेखील स्वतःला ताजेतवाने करण्यासाठी आठवड्यातून एक दिवस आणि वर्षातून एकदा मोठी सुट्टी घेतलीच पाहिजे.

दिवस उलटत गेले. हळूहळू पदव्युत्तर शिक्षणाचा अभ्यास, त्याचसोबत जमेल तशी पार्ट-टाइम नोकरी, आणि इतर उपक्रम सुरू केले. माझ्या युनिव्हर्सिटीच्या बऱ्याच क्लब्सपैकी एक हायकिंग आणि ट्रॅवल क्लब मध्ये नाव नोंदवून इथला पहिला हाइक ग्राऊस माउंटन फत्ते केला. अगदी शब्दांत न सांगता येणारा अनुभव होता.

व्हॅन्कुव्हर सन रनमध्ये (Sun Run) भाग घेतलेला दिवसदेखील विसरू शकणार नाही. नुकताच सरीला (Surrey) राहायला गेलो होतो. सकाळी लवकर उठून व्हॅन्कुव्हर डाऊनटाउनला पोहोचलो. तिथे स्वानंद दादा आणि MSBC ची धावणारी मंडळी ह्यांच्यासोबत फोटो काढून धावायला सुरुवात केली. सर्वात शेवटी आणि हळू का होईना सन रन पूर्ण केला ह्यासाठी स्वतःला शाबासकी दिली. त्या रात्री अगदी गाढ लागलेली झोप आणि दुसऱ्या दिवशीची तरतरीत सकाळ आजही लक्षात आहे.

MSBC ने व्हिक्टोरियामध्येदेखील एक कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रम उत्तम झालाच, पण त्यानिमित्ताने समुद्रफेरी आणि बीसीची (British Columbia/BC) राजधानी बघण्याची संधी मिळाली. सर्व काही डोळ्यांत, मनात आणि मोबाईलमध्ये साठवून घेतले.

MSBCच्या ढोलताशा पथकाबद्दल समजलं. अजिबात वेळ न दवडता फॉर्म भरला, नाव नोंदवलं आणि प्रॅक्टिससाठी दर रविवारी सकाळी लॅङ्ग्ली (Langley) ला जायला लागलो. जोमाने सराव सुरू केला खरा, पण तिसऱ्या रविवारीच वाजवणं सोडून दिलं. चिकाटीने ते पूर्ण केलं नाही याची खंत आहे! असो ही संधी पुढच्या वर्षी लवकरच परत येईल आणि पुन्हा जोमाने सराव करायचा प्रयत्न करीन.

आज जेव्हा मागे वळून पाहतो, तेव्हा वाटतं की हा संपूर्ण प्रवास म्हणजे केवळ एका नवख्या देशात येणं नव्हतं, तर स्वतःचा शोध घेण्याची एक सखोल प्रक्रिया होती. एकटं राहणं, स्वयंपाक करणं, अभ्यास करत असतानाच पार्टटाईम नोकरी सांभाळणं, आणि नव्या लोकांमध्ये आपली ओळख निर्माण करणं हे सगळं

खूप काही शिकवून गेलं. प्रत्येक दिवशी काही ना काही नवीन शिकायला मिळालं, एखाद्या प्रसंगातून धीर मिळाला, तर एखाद्या अनुभवातून संयम कसा राखायचा हे कळलं.

आता कॅनडाला येऊन एक वर्ष लवकरच पूर्ण होईल. ह्या एका वर्षात झालेले मित्र-मैत्रिणी, नव्या ओळखी, आलेले गोड-आंबट अनुभव नक्कीच काही ना काही शिकवून गेले. व्हॅन्कुव्हर, कॅनडा आणि इथली आपली माणसं ह्यांनी माझ्या ह्या पहिल्या वर्षात मला कळत-नकळत जे काही दिलं, त्यासाठी मी त्या सर्वांचा खूप आभारी आणि ऋणी आहे. एवढं लिहून मी माझं छोटंसं, मनापासून केलेलं लिखाण थांबवतो.

# खाद्यजत्रा

## सुपर सीड्स चोको बाईट्स

**- शाल्मली सिवराजन्**



**साहित्य:**

- डार्क चॉकलेट - 2 1/4 कप (सुमारे ३५० ग्रॅम)
- भोपळ्याच्या बिया (Pumpkin Seeds) - 1/2 कप (६० ग्रॅम)
- सूर्यफूलाच्या बिया (Sunflower Seeds) - 1/2 कप (७० ग्रॅम)
- बदामाचे काप (Roasted Almond Flakes) - 1/2 कप (६० ग्रॅम)
- अळशी (Flax Seeds) - 1/2 कप (८० ग्रॅम)

**ऐच्छिक :** बदामाऐवजी तुम्ही मनुका किंवा भाजलेले शेंगदाणे घालू शकता.

**कृती :**

१. डार्क चॉकलेट बारीक तुकडे करून डबल बॉयलर पद्धतीने किंवा मायक्रोवेव्हमध्ये वितळवा.
२. वितळलेल्या चॉकलेटमध्ये सर्व बिया व बदामाचे काप टाका.
३. नीट मिक्स करून बेकिंग ट्रेवर (बटर पेपर/पार्चमेंट पेपरवर) पसरवा.
४. थोडं थंड झाल्यावर फ्रीजमध्ये ३०-४० मिनिटं सेट होऊ द्या.
५. पूर्णपणे घट्ट झाल्यावर चौकोनी तुकडे कापा आणि हवाबंद डब्यात साठवा.

**फायदे:**

- डार्क चॉकलेट - अँटिऑक्सिडंट्सने भरलेले, ताण कमी करण्यात मदत करते.
- भोपळ्याच्या बिया - मॅग्नेशियम, झिंक व प्रोटीनचा उत्तम स्रोत, झोप सुधारते.
- सूर्यफूल बिया - व्हिटॅमिन ए ने भरपूर, त्वचेसाठी फायदेशीर.
- बदाम - हृदयासाठी चांगले, चांगले फॅट्स पुरवतात.
- अळशी - ओमेगा-३ फॅटी ॲसिड्सने युक्त, पचन सुधारते व कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवते.
- मनुका/शेंगदाणे (जर वापरले तर) - एनर्जी वाढवतात, लोह (खीप) आणि प्रोटीनचा चांगला स्रोत आहेत.
- ही सुपर सीड्स चोको बाईट्स तुमच्या चहा/कॉफीसोबत किंवा स्नॅक म्हणून उत्तम लागतात.



# कॅनडामधील माझे पहिले अनुभव

• सारा सावंत •

डिसेंबर २०२० मध्ये, कोविड-१९ च्या काळात, मी आणि माझी आई कॅनडाला आलो. तेव्हा प्रवासाचे नियम खूपच कडक होते. मास्क व फेस शिल्ड सतत घालावे लागत असल्यामुळे हा प्रवास थोडा घाबरवणारा होता. पण, कॅनडाच्या विमानतळावर उतरल्यावर बाहेरची थंडी आणि शांतता पाहून मला एका वेगळ्याच जगात आल्यासारखं वाटतं होते.

भारतातील गोंगाट आणि गर्दीच्या वातावरणाची मला सवय असल्यामुळे, कॅनडामधील शांतता सुरुवातीला खूपच वेगळी वाटली. त्यातही, लॉकडाऊनमुळे ही शांतता अधिकच जाणवत होती. रस्त्यांवर कमी गर्दी असल्यामुळे कॅनडाची शांतता आणि निसर्गाचं सौंदर्य अनुभवायला मिळालं.

### कॅनडामधील मोठे आणि छोटे बदल

कॅनडामध्ये आल्यावर अनेक गोष्टींमध्ये बदल जाणवले. इथली शिस्त आणि लोकांचा खुलेपणा माझ्यासाठी नवीन होता. प्रत्येक कामासाठी रांगेत उभे राहणे, रस्त्यावर कमी गर्दी असणे आणि नियम पाळणे या गोष्टी सुरुवातीला वेगळ्या वाटल्या, पण लवकरच त्यांची सवय झाली.

इथली घरेही खूप वेगळी आहेत. भारतात सिमेंटच्या घरांची सवय असताना, इथे लाकडाची दोन-तीन मजली घरे पाहून मला आश्चर्य वाटले. घरात पूर्णपणे तयार केलेले बेसमेंट असते आणि कडाक्याच्या थंडीतही घर गरम ठेवण्यासाठी हीटिंग सिस्टीम असते. घरासमोर सुंदर लॉन आणि झाडे असल्यामुळे वातावरण खूप प्रसन्न वाटते. काही ठिकाणी उंच बिल्डिंगासुद्धा मोठ्या प्रमाणात दिसतात.

### पहिला ख्रिसमस

कॅनडातला माझा पहिला ख्रिसमस छान होता. सगळीकडे बर्फ पडलेला होता आणि घरांच्या खिडक्यांवर दिव्यांची सजावट केलेली होती. संपूर्ण शहर दिव्यांनी चमकत होते. मॉल्स, रस्ते, पार्क्स आणि घरं सगळीकडे दिव्यांची सजावट होती. शहरात लाइट शो, ख्रिसमस मार्केट आणि सांताक्लॉजच्या परेड पाहायला मिळाल्या.

ख्रिसमसमध्ये मी सरी (Surrey) फेस्टिवल ऑफ लाईट आणि लँगली ग्लो लाईट फेस्टिवल पाहिले. लँगलीमधील ग्लो-गार्डनमध्ये एक 'जादुई जंगल' या कल्पनेवर लाइट शो होता. तो पाहणं खूप छान होतं. झाडं, मशरूमची घरं आणि बोलणारे प्राणी यांसारखे प्रकाशाचे देखावे खूपच सुंदर होते. मुलांसाठी खेळ आणि इतर वस्तूंचे स्टॉल्सही होते. तिथे मला सांताक्लॉज भेटला आणि त्याच्या गाडीजवळ मी फोटो काढला. कॅनडातला हा पहिला ख्रिसमसचा अनुभव वेगळा होता.

### शाळेची रचना, वातावरण आणि फील्ड ट्रिप

कोविडची परिस्थिती सुधारल्यावर मी नियमितपणे शाळेत जायला सुरुवात केली आणि लवकरच माझ्या अनेक मैत्रिणी झाल्या. भारतातील शाळेच्या तुलनेत इथली बॅग हलकी असल्यामुळे आणि होमवर्क कमी असल्यामुळे मला खेळायला आणि इतर गोष्टींसाठी

वेळ मिळाला. शाळेचा युनिफॉर्म नसल्यामुळे मला शाळेत जायला आवडलं.

कॅनडातील शाळा स्वच्छ, सुरक्षित आणि आधुनिक असतात. वर्गात स्मार्ट बोर्ड, कम्प्युटर आणि प्रोजेक्टरचा वापर होतो. शिक्षक विद्यार्थ्यांशी मित्रांसारखे वागतात. इथे प्रोजेक्ट, ग्रुपवर्क आणि चर्चेमधून शिकता येतं. विद्यार्थ्यांना स्वतः विचार करून शिकायला मदत होते. इथली शाळा सप्टेंबर ते जून पर्यंत असते. उन्हाळी सुट्टी जूनच्या शेवटी सुरू होते आणि जुलै आणि ऑगस्ट हे संपूर्ण दोन महिने सुट्टी असते.

शाळेच्या अभ्यासाचा भाग म्हणून आम्ही निक्के (Nikkei) नॅशनल म्युझियम आणि व्हॅन्कुव्हर क्वेरियमला भेट दिली. ही सहल फक्त मजा करायला नव्हती, तर त्यातून मला खूप काही शिकायला मिळालं. फील्ड ट्रिपच्या दिवशी मुलांमध्ये उत्साह होता. शिक्षक आणि वॉलंटियरनी सगळ्यांची काळजी घेतली. प्रत्येक विद्यार्थ्याला पॅम्पलेट, आय-कार्ड आणि आवश्यक वस्तू दिल्या गेल्या. अशा फील्ड ट्रिपमुळे मुलांमध्ये आवड, मदत करण्याची भावना आणि आत्मविश्वास निर्माण होतो. म्युझियमला भेट दिल्यावर मला जपानी-कॅनेडियन इतिहासाविषयी अधिक माहिती मिळाली.

### कॅनडामधील बागा

कॅनडामध्ये अनेक सुंदर बागा आहेत, ज्या खास डिझाइन केलेल्या आहेत. ब्रिटिश कोलंबियामध्ये व्हिक्टोरियाजवळ असलेले बुचार्ट (Butchart) गार्डन जगप्रसिद्ध आहे. या गार्डनमध्ये वर्षभर विविध प्रकारची फुले फुललेली असतात. उन्हाळ्याच्या संध्याकाळी इथे शानदार फायरवर्क्सचे प्रदर्शन होते. अनेक ठिकाणी दिवे लावून रात्रीच्या वेळी गार्डनला खूप सुंदर रूप दिले जाते.

### कम्युनिटी सेंटर्स लायब्ररी

कॅनडामधील कम्युनिटी सेंटर केंद्रांमध्ये स्विमिंग पूल, जिम, लायब्ररी, आर्ट स्टुडिओ आणि मीटिंग रूम असतात. इथे मुलांसाठी आणि वृद्धांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात.

कॅनडातल्या लायब्ऱ्या नागरिकांसाठी मोफत असतात. तुम्ही लायब्ररी कार्ड सहज मिळवू शकता आणि त्याचा उपयोग पुस्तके, मासिके, आणि इतर अनेक गोष्टींसाठी करू शकता.

### कॅनडामधील खाद्यपदार्थ

पुटीन आणि बीव्हर-टेल पेस्ट्री (BeaverTails) हे कॅनडामधील अतिशय प्रसिद्ध आणि आवडते खाद्यपदार्थ आहेत. मी जेव्हा कॅनडात आले, तेव्हा हे दोन्ही पदार्थ पहिल्यांदा खाल्ले आणि तो अनुभव खूपच खास होता. पुटीन म्हणजे गरम फ्रेंच फ्राइजवर चीजचे ताजे तुकडे आणि गरम ग्रेवी घालून तयार केलेला एक चविष्ट पदार्थ. त्याची चव खूप वेगळी आणि चवदार वाटली. बीव्हरटेल हा एक गोड पदार्थ आहे जो तळलेल्या पीठातून बनवला जातो आणि त्यावर साखर, चॉकलेट, किंवा फळं घातली जातात.

### स्ट्रॉबेऱ्या गोळा करण्याचा अनुभव

कॅनडामध्ये स्ट्रॉबेऱ्या तोडण्याचा अनुभव वेगळा आणि मजेदार होता. मी एका शेतावर गेले होते. तिथे मोठ्या जागेत स्ट्रॉबेरीची झाडं रांगेत लावलेली होती. हवामान थोडं थंड आणि छान होतं.

मी स्वतः झाडांवरून ताज्या, लाल स्ट्रॉबेऱ्या तोडल्या. त्या फळांचा वास आणि चव खूप गोड होती. स्ट्रॉबेऱ्या तोडताना हाताला थोडी माती लागली, पण त्यातच मजा होती. काही स्ट्रॉबेऱ्या झाडांमध्ये लपलेल्या होत्या, त्या शोधताना मजा आली.

### भारतीय सण

कॅनडामध्ये भारतीय सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. टोरोंटो, व्हॅन्कुव्हर यांसारख्या शहरांमध्ये अनेक भारतीय लोक राहतात त्यामुळे तिथे गणेश चतुर्थी, नवरात्री, दुर्गा पूजा आणि दिवाळीसारखे सण मोठ्या प्रमाणावर साजरे होतात.

ब्रिटिश कोलंबियामधील लक्ष्मी नारायण मंदिर हे भारतीय सण आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे एक महत्त्वाचे ठिकाण आहे. इथे केवळ धार्मिक पूजाच नाही, तर गरबा-दांडियासारखे कार्यक्रमही साजरे केले जातात. मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया (एमएसबीसी/MSBC) ग्रुपही कॅनडातील मराठी भाषिकांसाठी गणेशोत्सव, दिवाळी आणि संक्रांतीसारख्या सणांच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित करतो.

### महाराष्ट्र दिनाचे महत्त्व

१ मे रोजी साजरा होणारा महाराष्ट्र दिन हा महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा दिवस आहे. कॅनडामध्येही हा दिवस अभिमानाने साजरा केला जातो. MSBC सारख्या संस्थांमार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. पोवाडा, नाटक, आणि मराठी गाणी सादर केली जातात. पुरणपोळी, वडापाव, मिसळपाव यांसारखे पारंपारिक पदार्थांचे स्टॉल लागलेले असतात आणि लोक ते खातात.

### अविस्मरणीय प्रवास

कॅनडात राहताना मी अनेक सुंदर ठिकाणांना भेट दिली.

टोरोंटोमधील सीएन टॉवर, नायगरा फॉल्स, बॅन्फ नॅशनल पार्क, व्हॅन्कुव्हरमधील स्टॅनले पार्क आणि व्हिसलर (Whistler) ही काही खास ठिकाणे पाहिली.

व्हिसलरच्या गोंडोलाचा अनुभव खूपच मजेदार होता. केबल कारमधून खाली पाहताना पर्वत, झाडं आणि तलाव दिसत होते. ते दृश्य खूपच सुंदर होते.

बॅन्फ नॅशनल पार्क अल्बर्टा राज्यात आहे. तिथे मी लेक लुईस आणि मोरेन लेक पाहिले. ते तलाव खूपच स्वच्छ आणि निळ्या रंगाचे होते. आजूबाजूला बर्फाचे डोंगर होते, त्यामुळे ते दृश्य खूप सुंदर दिसत होते. बॅन्फ पार्कला भेट देणं हा माझ्या आयुष्यातील एक खास अनुभव होता.

मी भेट दिलेलं दुसरं खास ठिकाण म्हणजे नायगरा फॉल्स! नायगराच्या पाण्याचा जोरदार प्रवाह आणि त्यावर तयार होणारे इंद्रधनुष्य पाहून मला खूप आश्चर्य वाटले. नायगरा फॉल्सचा खरा अनुभव घेण्यासाठी जेव्हा आम्ही 'मेड ऑफ द मिस्ट' बोटीत बसलो, तेव्हा आम्हाला लाल रंगाचे रेनकोट दिले होते कारण फॉल्सच्या जवळ गेल्यावर पाण्याचे थेंब खूप उडतात. बोट हळूहळू फॉल्सच्या दिशेने गेली. जसे आम्ही जवळ गेलो, तसा पाण्याचा आवाज खूप वाढला. बोटीच्या भोवती पाण्याचे छोटे थेंब जमा झाले आणि धुक्यासारखं वातावरण तयार झालं, त्यामुळे काही वेळ काहीच दिसत नव्हतं. पाण्याचे थेंब अंगावर उडत असताना मला खूप मजा आली.

कॅनडामधला माझा आत्तापर्यंतचा अनुभव जबरदस्त आणि आनंदी होता. माझा कॅनडामधला प्रवास अजून पूर्ण झालेला नाही – अजून बरीच सुंदर ठिकाणं पाहायची बाकी आहेत.

## MSBC च्या कार्यक्रमांवर आधारित कोडे सोडवा (उत्तरे इतरत्र):



**आडवे शब्द**

१. श्रद्धा, आरोग्य आणि भक्ती जपत आपण केली -----
२. अनेक क्रीडा स्पर्धांमध्ये ही एक होती
३. बाप्पांच्या आगमनासाठी बाळ गोपाळ सज्ज होऊन ह्या कार्यक्रमात सहभागी झाले
४. महिला दिनानिमित्त हा कार्यक्रम आपण प्रथमच २०२५ मध्ये केला
५. लायन्स पार्कमध्ये आपण ह्याही वर्षी ----- ला गेलो
६. सुधीर फडके आणि अजय-अतुलच्या गाण्यांचा आनंद आपण ह्या कार्यक्रमात लुटला
७. नवरात्रीमध्ये ह्या कार्यक्रमात टिपऱ्यांच्या तालावर फेर धरला
८. इंटीमेट थिएटरचा अनुभव आपल्याला मिळाला

**उभे शब्द**

१. MSBC ची मराठी शाळा
२. ह्या वर्षी गाण्यांचा हा कार्यक्रम प्रथमच आयोजित केला गेला
३. आवर्तन हे आपल्या -------- पथकाचे नाव आहे
४. MSBC चे संगीत नाटक ज्याचे कॅनडामध्येच नाही तर अमेरिकेतही प्रयोग झाले
५. झिम्मा-फुगडीचा यथेच्छ आनंद आपण ह्या कार्यक्रमात लुटला
६. मराठी भाषा दिनाला आपण कवितांचा आस्वाद घेतला
७. गुळाची पोळी, सुरेख वाण आपल्याला ह्या कार्यक्रमात मिळाले
८. MSBC च्या २०२५ च्या डान्स वर्कशॉपचे नाव
९. विविध खाद्यपदार्थांची रेलचेल येथे होती (मराठी शब्द)




# कॅनडा डायरी २०२४-२०२५

• स्वाती हेमंत •

**२० ऑक्टोबर २०२४**

प्रतिक्षा....

देव आपल्याला सर्व गोष्टींची प्रतीक्षा करायला लावतो. कानात सतत सांगत असतो की "Just wait and watch" संपली बाई एकदाची प्रतिक्षा, आला बाई कॅनडा व्हिसा आणि निघाले की मी लेकीकडे...वैदेहीकडे.

**२४ ऑक्टोबर २४**

तब्बल सहा वर्षांनी आम्ही एकत्र दिवाळी साजरी करणार आहोत!

म्हणतात ना, लेकीकडे जाईन, लठ्ठ मुठ्ठ होईन...याचा अनुभव घ्यायला जातेय.

एक सांगू का,आनंद पोटात माईना, अशी गत झालीय माझी...कारण खूप खूप आनंदात आहे आज मी. देव देतो भरभरून, याचा अनुभव घेतेय मी सध्या. त्यामुळे त्याचे सर्वप्रथम आभार! माझा हा कष्टमय प्रवास सुखकर होण्यासाठी हातभार लावलेल्या सर्वांच्या ऋणात राहायला मला आवडेल.

**२६ ऑक्टोबर २०२४**

आनंद कोणत्या गोष्टींवर अवलंबून असतो याचे प्रत्येक माणसाचे मापदंड खूप वेगवेगळे असतात.

पण आज मी खूप खूप आनंदी आहे.. कारण माझ्या बकेट लिस्ट मधील एक महत्त्वाची गोष्ट पूर्ण झाली. जीवा-शिवाची भेट अनुभवली. लेक जावई घ्यायला आले होते विमानतळावर आणि तिच्या घरी त्यांनी केलेले स्वागत बघून तर खूप भरून आले आणि आनंदाने सतत डोळे वाहत होते. अशा रीतीने आनंद सोहळा साजरा केला आम्ही.

**१० नोव्हेंबर २०२४**

पानगळ : किमया निसर्गाची

फुला पानांची विविधरंगी पखरण, उत्फुल्ल तजेलदार रंगांची उधळण

त्यातून डोकावे आभाळातला चांदवा, रंगुनी रंगात साऱ्या गुणगुणतो मारवा!

अधेमधे सूर्य करतो सोनेरी किरणांची उधळण, तर कधी वरुण राजा आणि हिम वर्षावाची पखरण,

...सोबत असते रंगीबेरंगी पानांची पानगळ!

धुक्याची चादर पांघरोनी,रवीराज गेले निजूनी,

झाली मंगल प्रभात,परि दिनकर दिसेना नभांगणी!

याचा प्रत्यय आला आज..अप्रतिम निसर्गाचा आविष्कार म्हणजे कॅनडातील पानगळीचा ऋतु.. काय वर्णावे ते निसर्ग सौंदर्य,

कॅनव्हासवर मस्तपैकी विविध रंगांचे फटकारे मारावेत, अशी रंगबिरंगी दुतर्फा झाडे, जोडीला कमालीचे थंड वारे आणि अधून मधून पडणाऱ्या सरी अशा या ऋतुचा मी सध्या आनंद घेते आहे. आता नोव्हेंबर मधील पहिल्या हिमवर्षावाची इकडे सर्व आतुरतेने वाट बघताहेत. या ऋतूचे वैशिष्ट्य म्हणजे हिरव्या पानांचा रंग लाल, केशरी, सोनसळी पिवळा आणि तपकिरी होत जातो कारण या दिवसात सूर्य बाप्पाची बहुतेक हक्काची सुट्टी असते. त्यामुळे कॅनडामध्ये या दिवसात सुंदर नजारा बघायला, पानगळ बघायला, हॅलोविन, पम्पकिन आणि वाइन फेस्टिवलचा आनंद लुटायला भरपूर पर्यटक येतात, त्यापैकी अस्मादिक पण एक आहोत. आणि खरं सांगू का हे सर्व आनंदोत्सव साजरा करण्यासारखच आहे. मी हे सांगू शकते कारण मी तो निसर्गाचा आनंद अनुभवलाय, डोळ्यात साठवलाय, कॅमेऱ्यात बंदिस्त करता येईल तेवढा केलाय. विमानतळावरून लेकीच्या घरी जाताना, तिच्या घराच्या गच्चीत अनुभवलेले आणि बाहेर जाता-येता टिपलेले काही क्षण हीच अनुभूती देऊन गेले.

**१६ नोव्हेंबर, २०२४**

लगेचच पुढल्या शनिवार-रविवारी अस्मदिक निघाले कॅनडाची निसर्गरम्य ठिकाणं बघण्यासाठी.

दोन दिवसात वैदेही मानस ने सहलीचे सुंदर नियोजन करून खूप ठिकाणी नेऊन आणले.. त्यातली अतिशय सुंदर आणि मला आवडलेली ठिकाणे म्हणजे फ्लाय ओव्हर कॅनडा (Fly Over Canada), स्टॅनले पार्क, गॅस टाउनचे वाफेवर चालणारे घडयाळ, ख्रिसमसचा बाजार, नॉर्दन लाईट शो (Northern Light Show), डाउन-टाऊन आणि व्हाईट रॉक.

फ्लाय ओव्हर कॅनडा : निसर्गाचा अद्भुत साक्षात्कार

व्हॅन्कुव्हरमधील फ्लाय ओव्हर कॅनडा हा एक अप्रतिम 4D अनुभव आहे. मोठ्या पडद्यावर जणू आपण आकाशातून उडण्याचा अनुभव घेतो. वाऱ्याची झुळूक, पावसाचे थेंब, सुगंध - प्रत्यक्ष अनुभवत आहोत असे वाटते आणि या सर्वांमुळे आपला खराच प्रवास सुरू आह याचा भास होतो. रॉकी पर्वत, नायगारा धबधबा, हिरवीगार अरण्ये आणि नयनरम्य शहरांचे हवाई दृश्य पाहताना मनात एकच विचार येतो - कॅनडामध्ये कायम निसर्गाची रंगपंचमी बघायला मिळते इतका कॅनडा सुंदर आहे. ताजी सुगंधी फुलं, सर्वदूर पसरलेली हिरवाईची शाल, सरोवरांमध्ये हिरव्या-निळ्या-मोरपीशी पाण्यावर चमचमणारी सूर्यकिरणे, कधी-कधी त्यांनी पांघरलेली बर्फाची दुलई तर कधी केशरी, गुलाबी, लाल, पिवळ्या पानांचे गालिचे बघताना मन तृप्त होऊन गेले.

**२३ नोव्हेंबेर २०२४**

आजचा माझा आनंद कसा आणि किती वर्णावा ते कळत नाही. शनिवारी आम्ही व्हीसलरमध्ये (Whistler) आलो. येताना प्रचंड थंडी आणि पाऊस होता. पण म्हणतात ना आंधळा मागतो एक देव देतो दोन याचा प्रत्यय आला. येताना हिमवर्षाव अनुभवता आला. पोहोचेपर्यंत रस्ते चक्क बर्फाने आच्छादून गेले होते, स्वच्छ पांढरे शुभ्र डोंगर, थंडगार वारा यांच्याशी दोस्ती करत लिस्टेल हॉटेल मुक्कामी पोहोचलो. रात्री दुसरीकडे जेवायला जाताना मात्र तारांबळ उडाली, वेदाचा हात धरून बर्फमय रस्त्यावर नवीन चालायला लागलेल्या मुलाप्रमाणे चालले. प्रसन्न सकाळ झाली आणि वरुणराजाने कृपा केली. पाऊस आणि वारे यांना विश्रांती मिळाली होती. मग काय आनंदी आनंद! छान पैकी फिरून नाश्ता करून आलो. आता मस्तपैकी स्पाचा आनंद घेऊन परतीच्या वाटेवर निघालो आहोत. कोणाला सांगू नका, पण घरी एक अतिशय आनंदाची बातमी मिळणार आहे याचा त्या दोघांच्या बोलण्यावरून मला अंदाज आला!

बरं का मंडळी, याआधी ऐन थंडीत (ऑक्टोबर २४ ते डिसेंबर २४ ) कॅनडा वारी झाली होती आणि थंडीतील सुंदर पानगळ, त्यानंतर येणारी नवीन पालवी, मित्र मैत्रिणींच्या घरी मुलांसोबत कॅनडातील दिवाळी असे सर्व साजरे करत कॅनडा अनुभवला होता. त्याचे वर्णन मी लिहिले आहेच.

तेव्हापासूनच लेकीने आणि जावयाने ठरवून टाकले होते की आता उन्हाळ्यातल्या सहलीचे नियोजन करू! बघता बघता केले की त्यांनी नियोजन, तिकीटे काढली... आणि एक सुंदर बातमी आमचे दार ठोठावणार होती. परमेश्वराने कौल दिला होता आणि पोहोचली की स्वारी जून २५ ला परत कॅनडामध्ये.

**२० जुलै २०२५**

मनातला पाऊस :

इतके दिवस आपण चातकासारखी वाट पाहत होतो तो वरुण राजा इकडे पण बरसायला लागलाय.

सध्या कॅनडा येथे मुक्कामी असल्यामुळे,इकडचा पाऊस अनुभवायला मिळतोय. इकडे पावसात भिजणे अशक्य आहे,कारण खूप गार वारे आणि थंडी! आपल्याकडे मात्र पावसात भिजणे म्हणजे एकदम लहानपण अनुभवणे. लहानपणी जसे गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या करत, ये ग ये ग सरी म्हणत पाऊस अनुभवता येत असे,

तसे हा आनंद निर्भेळपणें लुटण्यासाठी तरी निदान परत लहानपण पाहिजे.अवचित असा तो अचानक एखाद्या संध्याकाळी येतो आणि घरातल्या झुंबरातून भले प्रकाश ठिपकत असेल, पण निसर्गाच्या झुंबरातून मात्र माणिक-मोती ओघळणार. तसे आपले काही क्षण जागवून मनस्वी आठवांचा झुला झुलवत राहतो. हा पाऊस कधी लडिवाळ तर कधी रागावलेला जरी असला तरी आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे नाही का? एवढे भिजणे सोडून इतर सर्व काही म्हणजे कांदा-भजी, वाफाळलेला चहा वगैरे करत इथला पाऊस मी करते आहे!

**०२ ऑगस्ट २०२५ ते १० ऑगस्ट २०२५**

वैदेही मानसने बँफ (Banff) आणि जास्पर (Jasper) ची सहल ठरवली आणि निघाली की स्वारी या छोट्या-स्वित्झरलँडसाठी!

बँफ आणि जास्पर निसर्गाचा चमत्कार :

बँफ पर्वतरांगांच्या कुशीत वसलेले,अल्बर्टा राज्यातील कॅनडाच्या रॉकी पर्वतरांगांच्या कुशीत वसलेले एक स्वर्गीय ठिकाण आहे.

लेक लुईस म्हणजे आकाशाच्या निळाईसारखा रंग असलेले निळसर पाण्याचे सरोवर आणि त्यामागे उभे असलेले बर्फाच्छादित डोंगर.

बँफ येथील गरम पाण्याचे झरे (Hot Springs) - थंडीत शरीराला सुखावणारे गरम पाण्याचे झरे.

गोंडोलाची सफर - सल्फर पर्वतावरून दिसणारा संपूर्ण बँफ शहराचा अनोखा नजारा.अहाहा....

जास्पर - एकदम शांत ठिकाण

बँफपासून पुढे असलेला जास्पर राष्ट्रीय उद्यान हे जगातील सर्वात मोठ्या राष्ट्रीय उद्यानांपैकी एक आहे. उन्हाळा असूनही खूप थंडीत शेकोटी पेटवून छोट्याशा बंगलीत अनुभवलेला आनंद काही वेगळाच होता.

मालिग्ने लेक (Maligne Lake) - हिरव्या-निळ्या रंगाचे स्वच्छ पाणी आणि शिवाय ‘स्पिरिट आयलंड’ नावाचे छोटे बेट पण खूप सुंदर आहे.

कोलंबिया आईसफिल्ड - इकडे जुनी हिमनदी बघितली आणि खास बर्फावर धावू शकणाऱ्या बसने (ice explorer bus) बर्फावर चालण्याचा रोमांचक अनुभव पण घेतला.

काय काय आणि किती वर्णन केले तरी अपुरेच आह. मरीन लेक, सॅलमन आर्म पार्क, टकाक्कॉ फॉल्स (Takakkaw Falls), लेक लुईस, गोंडोला, मोरेन लेक (Moraine Lake), पेतो लेक (Peyto Lake), एमेराल्ड लेक, अथाबास्का फॉल्स (Athabasca Falls) असे सर्व निसर्गसौन्दर्य बघून मन कसे तृप्त झाले. खरोखर एमेराल्ड लेकचं पाणी अगदी पाचू सारखं हिरवं आह, त्यावर पडणारी सोनेरी किरणं, अगदी मोरपीशी रंग, अहाहा... एकदम सुंदर! येताना वाटेत खूप जोरात पाऊस पडला आणि मग काय हळूच ढगातून डोकावले की इंद्रधनुष्य. रस्त्यात थांबून फोटो काढण्याचा मोह काही आवरता आला नाही.

खरं सांगू का सुंदर, नागमोडी/सरळ रस्ते, भोवती गर्द हिरवं जंगल, वाहतुकीचे नियम कटाक्षाने पाळण्याची लोकांची सवय, आणि आपल्या देशाप्रती असणारं आदरयुक्त प्रेम हें खूप खूप आवडलं. किंबहुना भावलं! महत्त्वाचे म्हणजे, ब्रिटिश कोलंबिया राज्यातील गाड्यांच्या नंबर-प्लेटवरची ही ओळ मला मला खूप आवडली.

"Beautiful British Colombia.!"

सरतेशेवटी एकच सांगते, की कॅनडा म्हणजे निसर्गाची किमयाच! जगप्रसिद्ध नायगरा, जास्परचे घनदाट जंगल, बर्फाच्छादित रॉकी पर्वत आणि त्याचे पांढऱ्या शुभ्र मोत्यांच्या माळेसारखे पाण्यात पडलेले प्रतिबिंब, पाचूसारखे हिरवे-निळे तलाव, आणि पानगळीच्या मौसमतील रंगीबेरंगी पानांची रंगपंचमी! कॅनडातील प्रत्येक ऋतू नवीन अनुभव देऊन जातो हे मात्र नक्की. अतिशय थंडप्रदेश असूनही अतिशय सुंदर असा हा कॅनडा!

**टीप :** बरं का मंडळी, हा फक्त मी बघितलेला, अनुभवलेला आणि मला भावलेला कॅनडा माझ्या लेखणीतून तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा छोटासा प्रयत्न.





# आमचं कॅम्पिंग

• मेघना मेडीथी •

परवाच आम्ही पाच-सहा कुटुंबं मिळून कॅम्पिंगला जायचे ठरवले. कॅनडामधील कॅम्पिंग तसे सोपे मात्र आजिबात नाही, कारण अगदी खाण्यापासून ते मुक्कामाची सगळीच तयारी आपल्याला स्वतःलाच करावी लागते. तरी सुद्धा आम्हा सर्वांना प्रचंड उत्साह होता.

त्याप्रमाणे आम्ही लँगली (Langley) येथील गोल्डन ईयरस् (Golden Ears) ह्या भागाची निवड केली. मग काय मोठी, छोटी सगळीच कंपनी कामाला लागली. टेंट, खाण्याचे सामान, गॅस स्टोव्ह अशा सगळ्याच वस्तू गोळा करून आम्ही सर्वजण निघालो. रस्त्याने जाताना छान ऊन पडलेले असल्याने वातावरण खूपच आल्हादायक होते. बच्चे कंपनी मस्त मजा करीत होती. आम्ही साधारण दुपारी दोनच्या सुमारास आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचलो. ही जागा म्हणजे घनदाट जंगलाने चहू बाजूंनी वेढलेली, अतिशय शांत, निसर्गरम्य अशी होती. सगळेच जण तो परिसर पाहून अतिशय खूष झाले. मुले तर लागलीच खेळायला पळाली. पुरुष मंडळी टेंट बांधायला लागली आणि बायकांनी खाण्याच्या पदार्थांची तयारी सुरू केली. दुपारी घरून आणलेले डबे असल्याने सर्वांनी वनभोजनाचा आनंद लुटला. हळू हळू जसजशी रात्र वाढू लागली तसतशी मनात भीती, उत्कंठा वाढू लागली. कारण जंगलात रात्र काढण्याचा अनुभव अजूनपर्यंत कोणालाच नव्हता, त्यामुळे तो अनुभव सर्वांना हवाहवासा वाटत होता.

साधारण रात्री आठ वाजेपर्यंत आमचे सर्वांचे जेवण आटोपले. रात्र हळू हळू पुढे सरकू लागली. रात्रीच्या जंगलाचे भयावह पण तेवढेच उत्सुकता वाढवणारे रूप आम्हाला पाहायचे होतेच. मग आम्ही आजुबाजूला फिरून झाडांच्या काही काटक्या गोळा करून कॅम्प फायर केला. त्यामुळे आजूबाजूचा बराच परिसर उजळून निघाला. मग काय आम्ही सर्वांनीच गाण्याच्या भेंड्या खेळायला सुरुवात केली. आमच्या कंपूत सर्व भाषिक लोक असल्याने तेलगू, हिंदी, मराठी अशा सर्वच भाषेतील गाणी आम्हाला ऐकायला मिळाली. लहान मुले फायर भोवती फेर धरून नाचू लागली. इतर सगळे गाणी म्हणण्यात गुंग होऊन गेले. प्रत्येकालाच काकडणाऱ्या थंडीत आगीच्या ज्वाला सुखावह वाटत होत्या. ह्या सगळ्या मजेत

रात्रीचे दहा वाजून गेले. हळू हळू बहुतेक जंगली श्वापदांची हालचाल आम्हाला जाणवायला लागली तशी आम्हा सर्वांची घाबरगुंडी उडाली आणि आम्ही सर्वजण तंबूत शिरलो.

कॅम्प फायर ची मजा लुटून आम्ही तंबूत तर शिरलो, पण ह्या दाटलेल्या अंधारात जंगली प्राण्यांचे आयुष्य कसे असते हे मात्र सर्वांना जाणून घ्यायची उत्सुकता होती. जसजशी रात्र वाढू लागली तसतसे निशाचर पक्ष्यांचे आवाज आमच्या कानावर पडू लागले. बच्चेकंपनी तर पार घाबरून गेली. रातकिड्यांचा किर्र... आवाज त्या शांततेत अगदी कर्कश वाटत होता. मधूनच घुबडाचे ओरडणे वातावरण भयभीत करीत होते. येथे अस्वलाचा वावर अगदी सहज होत असतो. त्यामुळे आम्हाला तर सावधच राहावे लागत होते. कोठेही वाळलेल्या पानांवरून चालण्याचा आवाज आला तरी आम्ही तंबूच्या बारीकशा फटीतून बाहेर पाहत असू. रात्री जंगली श्वापदांची झोप खूपच सावध असते कारण कोण कोणाची केव्हा शिकार करेल याचा नेम नसतो. त्यामुळेही आम्हा सर्वांना सुद्धा रात्री गाढ अशी झोप लागलीच नाही. जसजशी पहाट होऊ लागली तसतसा पक्ष्यांचा मधुर किलबिलाट कानांवर पडू लागला. हळू हळू सूर्यनारायण आपली सोनेरी छटा पृथ्वीवर उधळू लागला. सारे वातावरण चैतन्याने भरून गेले. फुले हळुवार उमलू लागली होती. त्यांचा सुगंध आसमंतात भरून जात होता. निरनिराळ्या रंगाची फुलपाखरे फुलांवर भिरभिरायला लागली. सारी सृष्टी जणू चैतन्याने, आनंदाने न्हाऊन निघाली होती. पशु-पक्षी आपापल्या पिलांसाठी नाश्ता आणण्यासाठी सर्वदूर भटकू लागले. पक्ष्यांचे आई-बाबा परस्पर सहकार्याने कामे करीत होते. एकजण अन्न आणण्यासाठी बाहेर पडायचा तेव्हा दुसरा जोडीदार त्यांच्या लहान सानूल्यांच्या सोबतीला घरट्यात थांबायचा. त्यावेळी आम्हा बायकांना जाणवले की पशु-पक्ष्यांमध्ये सुद्धा नर-मादींमध्ये किती सहकार्य, प्रेमभाव असतो. माणसाने यापासून खरोखर खूप काही शिकण्यासारखे आहे.

पशु-पक्ष्यांना जसे त्यांचे अन्न आयते मिळते, फक्त त्यांना ते शोधावे लागते, तसे काही माणसांना आयते मिळत नाही त्यामुळे आपल्याला ते शिजवूनच खावे लागते म्हणून आम्ही सर्व बायका नाश्त्याच्या तयारीला लागलो. मस्तपैकी मॅगी शिजवून तयार झाल्यावर सर्वांनी त्यावर ताव मारला. पुरुष कंपनी इकडे तिकडे भटकून आली आणि त्यांना एक सुंदर बीच दिसला. मग काय आम्ही सर्वांनीच तिकडे आमचा मोर्चा वळवला. अतिशय स्वच्छ, सुंदर पाणी खळखळ आवाज करत वाहत होते. आम्ही सर्वजण त्या पाण्यात पाय सोडून आनंद उपभोगत होतो. लहान मुले पाण्यात उतरून खेळू लागली. दुसऱ्या दिवशी सकाळचा चहा आपण ह्या बीचवरच घ्यायचा असे ठरवून आम्ही मुक्कामाच्या ठिकाणी परतलो.बराच वेळ खेळल्याने मुले दमली होती. आम्ही पुन्हा आमच्या टेन्टकडे परतलो. सँडविच बनवून सर्वांनी पोटभर खाल्ले. दिवसभर जंगलात मस्तपैकी भटकंती केली. अनेक नव-नवे वृक्ष दृष्टीस पडले, निरनिराळे कीटक मुलांना पाहायला मिळाले वन्य जीवन किती विविध रंगी पण तितकेच रहस्याने, भीतीने, भरलेले असते हे सगळ्यांना जाणवले. जीवों जिवस्य जीवनम् हे सृष्टीचे तत्त्व बघतांना अंगावर शहारे यायचे पण जंगलाचा नियमच तो आहे की एक जीव दुसऱ्या जीवाचे भक्ष्य असतो.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे आम्ही चांगला मोठा थर्मासभर चहा घेऊन पुन्हा त्या सुंदर, मनमोहक बीचकडे आलो. साधारण अजून पहाट असल्याने सारी सृष्टी एका अदभुत, पण आल्हादायक वातावरणात जणू न्हाऊन निघाली होती. रात्रीचे काळे पांघरूण निशेने बाजूला फेकून ती सूर्य नारायणाच्या स्वागताला तयार झाली होती. सर्वदूर धुक्याची जणू चादर पसरलेली होती. पक्षीगण जिकडे तिकडे विहार करीत होते. काही बदके तळ्यात विहार करीत होती तर काही पक्षी पाण्यात आपली अंघोळ उरकून घेत होते. मी माझ्या मुलींना म्हंटले बघा पक्षी सुद्धा किती पहाटे उठून आपापली तयारी स्वतःच करून तयार होत असतात. जसजसा दिवस उजाडू लागला तसतशी धुक्याची चादर हळू हळू दूर होऊ लागली आणि वसुंधरेचे रूप मनमोहक दिसू लागले. सर्वदूर हिरवी गर्द झाडी आणि त्या दाट वनराईवर सूर्याचे सोनेरी किरण जणू सुवर्ण वर्षाव करीत आहे असे वाटत होते. गवताच्या पात्यांवर पडलेले दवबिंदू उन्हात असे चमकत होते जणू मोत्यांचा वर्षाव झालेला आहे. आम्ही हे सारे दृश्य तल्लीन होऊन पाहत होतो.

आम्ही त्या गोल्डन ईयरस् परिसरात दोन दिवस अगदी आनंदात घालवले. ते दोन दिवस शहरी वातावरणापासून खूप लांब, निसर्गाच्या कुशीत घालवतांना आम्हाला असेच जाणवले की आम्ही आपल्या आईच्या कुशीतच पहुडलो आहोत. खरोखर हा सुंदर निसर्ग माणसाला देहभान विसरायला लावतो. फळा-फुलांची बरसात करून आपले जीवन समृद्ध करून टाकतो. मात्र मानवाचे हे कर्तव्य आहे की त्याने हा निसर्गाचा ठेवा जपून ठेवला पाहिजे. वृक्षतोड थांबवली पाहिजे. अशा रीतीने शहरी प्रदूषणापासून, मोबाईलपासून, दैनंदिन चिंतेपासून दूर शांत, निर्जन पण तितकेच हवेहवेसे वाटणारे ते जंगलातले क्षण आम्ही कधीही विसरू शकणार नाही. खरोखर प्रत्येकाने रोजच्या धकाधकीच्या आयुष्यातून काही क्षण अशा निसर्गाच्या सान्निध्यात घालवले तर खूपच फ्रेश वाटते.

परतीच्या प्रवासाची खरे तर कोणालाच उत्सुकता नव्हती कारण हे अनमोल क्षण! तो निसर्गातला निर्मळ आनंद सोडून पुन्हा त्या चिंता, प्रदूषण यांनी भरलेल्या धावत्या शहरी जीवनाकडे जावेसे वाटत नाही. काही वेळेस असे वाटते माणसांचे जीवन पशुपक्ष्यांसारखे स्वच्छंदी, मनमौजी,आनंदी असते तर किती छान वाटले असते नाही! पण असा विचार करून चालत नाही. जड अंतःकरणाने आम्ही परतीच्या तयारीला लागलो. मुले तर सारखी म्हणायला लागली आपण अशी जंगल सफर मधून-मधून करत जाऊ. ह्या जंगल सफरीने आम्हाला आनंद तर दिलाच पण आम्हा सर्वांना दोन दिवस मोबाईल, टीव्ही अगदी विसरायला लावले. एरवी क्षणभरही मोबाईल बाजूला न करणारी बच्चे कंपनी काय किंवा मोठी माणसे काय मोबाईल पूर्णपणे विसरून गेलेली होती. विज्ञान युगात आपण सर्वच जण भौतिक सुखाच्या किती अधीन होऊन गेलेलो आहोत, पैशाच्या, करिअरच्या मागे धावता धावता किती दमछाक होत असते ते जाणवले. मनाला आणि शरीराला ह्या निसर्ग-सहवासाने किती मानसिक आनंद दिला हे जाणवले. निसर्गाच्या प्रेमात आम्ही अगदी वेडे होऊन गेलो होतो. शेवटी त्या निरागस पक्ष्यांच्या पिल्लांना, फळे-फुलांनी समृद्ध निसर्गाला बाय-बाय करत पाणावलेल्या डोळ्यांनी पण जीवनात भरपूर आनंद भरून आम्ही सर्वजण घरी परतलो.





# निसर्ग भ्रमणाचा धाडसी प्रसंग

• डॉ. राम कुंभारे •

जीवनात आपण बऱ्याचशा प्रसंगांना सामोरे जातो. काही सुखद, काही दुःखद, तर काही आश्चर्यचकीत करणारे! त्यातील बहुतेक प्रसंग काळाच्या ओघात विसरतो, पण काही नेहमी लक्षात राहतात, अगदी न विसरता येण्यासारखे असतात ते! उदाहरणच द्यायचं झालं तर घनदाट जंगलात भ्रमण करीत असताना अकस्मातपणे एखाद्या हिंस्त्र पशूशी सामना झाल्यास निर्माण होणारा चित्तथरारक प्रसंग, महापूरात अडकलेल्या व्यक्तीची त्या संकटातून सुटका करण्यासाठी केलेले शर्थीचे प्रयत्न, गिर्यारोहण करीत असताना बिकट स्थिती उद्भवल्यास त्या दुर्धर परिस्थितीत दिलेली झुंज, एखाद्या खेळाच्या महत्त्वपूर्ण स्पर्धेत ती जिंकण्यासाठी जीवाची पर्वा न करता केलेली धडपड यांसारख्या प्रसंगांचे देता येईल. तसेच विविध क्षेत्रात मिळविलेले यश, विवाहवेदीवर चढल्याच्या पहिल्यावहिल्या मधुर स्मृती, जीवनातील अतिशय प्रिय असलेल्या व्यक्ती अनपेक्षितपणे दुरावणे इत्यादी घटना, प्रसंग नेहमीसाठी स्मृतीपटलावर कायमचे कोरले जातात, अविस्मरणीय असतात ते!

नुकताच असा प्रसंग माझ्या वाट्याला आला. आता-आताची गोष्ट! त्याचं असं झालं... मागील पंधरवड्यात दि. १ऑगस्ट ते ४ ऑगस्ट या कालावधीत आम्ही म्हणजे मुलगी, जावई, नात व मी क्लिअरवॉटर (Clearwater) व सनपिक्स् (Sun Peaks) या पर्यटन स्थळांच्या सहलीला गेलो होतो.पहिल्या दोन दिवसांत क्लिअरवॉटर शहराच्या परिसरात पर्यटन केलं. तिथे खूप सारी प्रेक्षणीय स्थळे आहेत.ब-याच स्थळांचे अवलोकन केले.यात प्रामुख्याने वेल्स ग्रे प्रॉव्हिंशियल पार्क,रेन फॉरेस्ट, हिरवीगार घनदाट वनश्री; थॉमसन, क्लियरवाटर व मर्टल नद्या अन् त्यावरील हेमकेन (Helmcken), डॉसन (Dawson), मोल, स्पाहटस (Spahat) मनोवेधक धबधबे; क्लिअरवॉटर व मर्टल या दोन नद्यांचे संगमस्थळ इत्यादींचा समावेश होतो.

या संपूर्ण परिसरातील निसर्ग सौंदर्य वाखाणण्याजोगे आहे. येथील घनदाट वनश्री वैविध्याने नटलेली आहे.

वनस्पतींच्या विविध प्रजाती,फुलझाडांचे अनेकविध प्रकार नयनाला सुखावतात. देवदार,पाईन, स्पृस,हेमलॉक, पॉपलर,आर्डर इत्यादी मोठमोठ्या व आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या उंच उंच वृक्षांनी समृद्ध असलेली रानं वनं मनाला भुरळ घालतात.सृष्टी जणू हिरवागार शालू परिधान केल्यागत भासते. या सृष्टीसौंदर्याचं रसपान करतच राहावं असं आम्हाला वाटत होतं.

या परिसरातील नद्यांतील स्वच्छ पाणी लक्ष वेधून घेतं. खळखळ असा मधूर नाद करीत प्रवाहित होणाऱ्या या नद्यांमध्ये प्रदूषण मुळीही नाही. कितीतरी खोल असणाऱ्या या नद्यांचा तळ अगदी उंचावरून सुद्धा स्पष्ट दिसतो.येथील नद्यांवर असलेले काही धबधबे ज्वालामुखीच्या उद्रेकानंतर तयार झालेले असून कालांतराने

ते खोल होत गेलेले आहेत. मोल धबधबा तर खूप वैशिष्ट्यपूर्ण वाटला.या धबधब्याच्या धारांच्या प्रभावाने त्यामागे गुहेसारखा भाग तयार झाला असल्याने प्रवाहाच्या मागून पलिकडल्या तीरावर जाता येतं. धारेमागून जाताना अंगावर अगणित तुषार उडतात. त्यामुळे चिंब-चिंब भिजायला होतं अन् त्यामुळेच आमचं मन कसं प्रफुल्लित झालं. एक वेगळीच आल्हाददायक संवेदना प्राप्त झाली.

क्लिअरवॉटर परिसरातील प्रेक्षणीय पर्यटक स्थळातून मिळालेल्या सुखद अनुभूती मनात साठवीत आम्ही तिसऱ्या दिवशी सनपिक्स् या पर्यटन स्थळी आलो. अंदाजे १५०० लोकसंख्या असलेलं सनपिक्स् हे स्थळ कॅमलूप शहरापासून पंचावन्न किमी अंतरावर आहे.हे विलोभनीय ठिकाण कॅनेडियन रॉकी पर्वतीय श्रृंखलेच्या थॉमसन पठारी प्रदेशात वसलेले असून सभोवताली टॉड, सनडान्स, मॉरिस पर्वत आहेत. सनपिक्स् हे अतिशय लोकप्रिय पर्यटन स्थळ असून मोठे स्की रिसॉर्ट आहे. इथे वर्षभर विविध प्रकारचे उपक्रम सुरू असतात. हिवाळ्यात स्कीईंग व स्नो बोर्डिंगची उत्तम व्यवस्था आहे तर उन्हाळ्यात हायकिंग, माऊंटेन बाईकिंग आणि गोल्फ या सारख्या क्रिडा सुरू असतात.

नयनमनोहर दृष्य व शांत वातावरणाचा या ठिकाणी आनंद घेता येतो. सनपिकला आम्ही पोहोचलो अन् लगेचच पर्यटनाला निघालो. सर्वप्रथम पर्वतावर जायचं ठरलं. त्यासाठी सोय असलेल्या चेअर लिफ्टने आम्ही पर्वताच्या एका टप्प्यावर गेलो.तिथून विविध ट्रेल्स जात होते. ट्रेल म्हणजे पर्वतावर चालण्यासाठी म्हणजे हायकिंग करण्यासाठी असलेली पायवाट. त्यासाठी गिल्स ट्रेल, व्हॅली ट्रेल,आटीट्यूड ट्रेल, टॉडपिक ट्रेल, वेस्ट बोल ट्रेल, विस्टा ट्रेल, माऊंट टॉड व्हाया ऑटिट्यूड ट्रेल इत्यादी ट्रेल्स होते. प्रथम आम्ही व्हॅली ट्रेल या छोट्याशा व सोप्या ट्रेलवर हायकिंग केले. तिथून परतल्यावर टॉड पर्वतावर जाण्याचा विचार झाला. सायंकाळची वेळ होत आल्याने दुसऱ्या दिवशी सकाळी हायकिंग करण्याचं ठरलं.पर्वत शिखराच्या उंचीचा तसेच चढण्या-ऊतरण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा मुळीही विचार न करता होकार दिला. हायकिंगचा तसाही मला पूर्वानुभव नव्हताच!

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही हायकिंगला सुरूवात केली. टॉड पर्वतावर जाण्यासाठी साडेपाच किमी लांबीच्या वेस्ट बाऊल ट्रेलची निवड करण्यात आली. ईतर ट्रेल्सच्या तुलनेत हा जास्त अंतराचा असला तरी कमी अडीअडचणींचा आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली होती. आम्ही हायकिंगला मोठ्या उत्साहात प्रारंभ केला. सुरूवातीला पाऊलवाट तीन-चार फूट रुंद होती.मात्र पुढे ती निमुळती होत गेली. कुठे-कुठे तर एकच फूटाची होती. डोंगरावरील वाटेच्या एका कडेला खूप उतार होता. तिथून तोल सांभाळून जावं लागायचं. कधी-कधी तर भोवळ यायला होई, म्हणून एकाग्र चित्ताने चालावं लागायचं. अन्यथा दरीत कलंडून कपाळमोक्ष व्हायचा प्रसंग! काही ठिकाणी दुतर्फा विविध प्रकारची झाडे आढळली. मोकळ्या भागात गवत वाढलेलं होतं. सोबतच विपुल प्रमाणात रानफुलांच्या बहुविध लता, वेली आढळायच्या. कुठे-कुठे या रंगीबेरंगी रानफुलांची कुरणेच कुरणे होती. जणू सृष्टीने बहुरंगी फुलांचा शालू पांघरला असावा. निसर्गाचं ते नयनरम्य मनोहारी रूप बघून मन प्रसन्न झालं. या फुलांवर घोंगावणाऱ्या व त्यातून रसपान करणाऱ्या मधमाशा, या फुलांवरून त्या फुलांवर उडणारी विविधरंगी फुलपाखरे बघून मनाला कशी सुखद अनुभूती झाली! मधून मधून जाड झुपकेदार शेपूट असणारे शेकरू हुंदडतांना दिसायचे. नाही म्हणायला हमिंगबर्ड व ब्लू हेरॉन या पक्षांनी हजेरी लावली. निसर्गाचं हे लोभस रूप सुखद वाटत होतं...हवंहवंसं वाटत होतं. हायकिंगची वाट मात्र पुढे पुढे बिकट व्हायला लागली. चढण कठीण होत गेली. वाट खडतर वाटायला लागली. कधी दाट रानातून, कधी उंचसखल खडकांमधून अगदी चिंचोळ्या मार्गावरून आमचं भ्रमण सुरू झालं. मध्येच मार्ग अजून कठीण व्हायचा. वाटे पुढे जाणं अशक्य आहे! अशा वेळी आधाराची गरज भासायची. तेव्हा मुलगी, जावई मदतीसाठी पुढे यायचे. हातात हात घेऊन तेवढा कठीण मार्ग सुकर करायचे. त्यांचा हात त्यावेळी निव्वळ आधार म्हणून नव्हता तर मायेचा ओलावा होता त्यात! वात्सल्याची भावना प्रतीत व्हायची. पुढल्या प्रवासासाठी हिंमत द्यायचे. मी प्रभूचा मनोमन धावा करीत होतो.आतापर्यंतचा टप्पा सुखरूप पार पडला,पुढला देखील कुशलपणे पूर्ण होऊ दे, अशी प्रार्थना जगन्नियंत्याशी करीत पुढला पल्ला गाठत होतो. मधे-मधे खूप थकायला होई. पुढे जाणं अशक्यप्राय वाटायचं.त्यावेळी मनाशी अजून निर्धार करायचो, 'मी हायकिंग पूर्ण करणारच!' या मनोनिश्चयाने पुढील वाटचाल सुरू ठेवायचो.पुढे जाणं आव्हानात्मक असले तरी हिंमत न हारता, पदयात्रा सुरू ठेवली.अजून थोडे अंतर चालून गेल्यावर सरोवर दृष्टीपथात आले; अन् जीव भांड्यात पडला. आम्ही लकक्ष्य गाठलं होतं! हेच ते टॉड लेक! समुद्रसपाटीपासून हे मनोहारी स्थळ ६५४५फूट उंचीवर आहे. त्यातलं पाणी स्वच्छ, निर्मळ दिसलं. सभोवतालचा सुंदर देखावा बघून मन सुखावलं. लक्ष्यप्राप्ती झाल्याने शरीर थकलं असूनही तसं जाणवत नव्हतं. उलट उत्साहित होतो. तिथे नाश्ता करून थोडं विसावलो, व तिथूनच परतीच्या मार्गाला लागलो...परतीसाठी आम्ही गिल्स

ट्रेलची निवड केली. चढण्या-उतरण्यासाठी हा ट्रेल जास्त कठीण होता.

चालतांना दमछाक व्हायची, पण लक्ष्य साध्य झाल्याच्या आनंदात नव्या हुरूपाने पुढील वाट चोखाळणे सुरूच ठेवले, अन् थोड्या अवधीत तळावर सुखरूप पोहोचलो. हायकिंग यशस्वी झाल्याचं अपूर्व समाधान मुखकमलावर विलसत होतं.

जीवितयात्रेची आठ दशके पार केलेलं शरीर, स्नायूंच्या बळकटीला ओहोटी लागण्याचा काळ, सांध्यांची चपळता गतिशीलता कमी झाल्याने चढण्याउतरण्यात येत असलेल्या मर्यादा, जीवनात घडलेल्या दुर्दैवी प्रसंगामुळे नैराश्याच्या धुक्यात आयुष्याची वाट हरविल्यासारखी स्थिती व त्याद्वारे मनोधैर्यावर येऊ घातलेल्या मर्यादा, इत्यादी विपरीत परिस्थितीत पर्वतभ्रमण करण्याचा प्रसंग म्हणजे एकप्रकारचं धाडसच गणलं जावं. दुर्दम्य इच्छाशक्ती, मुलगी, जावई, नात यांची हिंमत व नैतिक बळ अन् सर्वात महत्त्वाचं म्हणजे परमात्मा परमेश्वराची कृपादृष्टी या साऱ्यांच्या पाठबळावर हे साहस यशस्वी होऊ शकले. त्यायोगे प्रस्तुत निसर्गभ्रमणाच्या या धाडसी अवसराचा आणि अविस्मरणीय प्रसंगाचा मनमुराद आनंद लुटता आला.



# खाद्यजत्रा

## चीया-सीड्स (Chia) पन्हं

**- प्राची नरवणे**

कैरीचे पन्हे हा आपला चैत्रातला खास आवडता पदार्थ. मागच्या वर्षी मी हे पन्हे करून पाहिले, यात चीयामुळे आपली फायबरची गरज भागते आणि थंडगार पेयाचा आस्वादही घेता येतो.

**साहित्य :**

- तीन कैऱ्या
- एक चमचा चीया सीड्स
- थोडे पाणी
- साखर किंवा अगेव (agave)
- मीठ

**कृती:**

तीन कैऱ्या सालं मऊ होतील अशा उकडून घ्या. एक चमचा चीया सीड्स साधारण २० मिनीटे पाण्यात भिजवत ठेवा.

साल काढताना काळजी घ्या, फार गरम असते. उकडलेल्या कैरीचा गर काढा. त्यात तुम्हाला किती गोड हवे त्या हिशोबाने साखर किंवा अगेव (agave) घाला, मी एका ग्लासला एक-ते दोन छोटे चमचे अगेव घालते, पण हे प्रमाण कैऱ्यांच्या आंबटपणानुसार बदलू शकते. चवीनुसार मीठ घाला आणि हाताने एकसारखे करून घ्या. तुम्ही गर फूड-प्रोसेसरमध्येही एकसारखा करू शकता.

हे मिश्रण फ्रीजमध्ये दोन-एक तास गार करत ठेवा. पन्हे देताना एक टेबल-स्पून वरील मिश्रणात ग्लासभर थंडगार पाणी आणि भिजवलेले चीया सीड्स टाका. हे पन्हे नेहमीच्या पन्ह्यापेक्षा वेगळे लागते.



# आमची पहिली कॅनडा भेट

• सीमा सुनील फाटक •

खरं तर आम्ही (आम्ही म्हणजे मी सौ. सीमा सुनील फाटक, स्नेहाची आई आणि माझे पती श्री. सुनील प्रभाकर फाटक, स्नेहाचे बाबा) मुंबईचे. मुंबईत आम्ही पवईला राहतो. आमची कन्या स्नेहा हिचा विवाह सांगलीच्या चि. पुष्कर चंद्रशेखर पुरोहित ह्याच्याबरोबर झाला. त्यांचं लग्न झालं तेंव्हा पुष्कर अमेरिकेत राहत होता आणि लवकरच कॅनडाला जाणार होता, त्यामुळे आम्हाला माहिती होतं की आपली मुलगी लग्न झाल्यावर भारताबाहेरच राहणार आहे. त्यामुळे आम्ही अमेरिका आणि कॅनडा दोन्ही देशांचा व्हिसा २०१७ सालीच करून घेतला होता. परंतु आम्हा दोघांच्या नोकऱ्या, दोघांच्या सुट्ट्यांचं समीकरण जुळून येत नव्हतं, त्यामुळे जोपर्यंत पुष्कर-स्नेहा अमेरिकेत होते तोपर्यंत आम्हाला अमेरिकेत जाता आलं नाही.

त्यानंतर पुष्कर कॅनडामध्ये गेला, त्यांनी तिथे घरंही घेतलं. आता मात्र नक्की स्नेहाकडे जायचं असं ठरलं. फेब्रुवारी २०२१ मध्ये आम्ही दोघही सेवानिवृत्त झालो आणि एक वर्षाचा निवृत्त जीवनाचा आनंद घेऊन झाल्यावर मार्च २०२२ मध्ये आम्ही प्रथम कॅनडाला आलो. आम्ही ब्रिटिश एअरवेजने प्रवास करणार होतो, आमचा प्रवास मुंबई-लंडन-सियाटल असा ठरला होता. मी खरं तर ह्याआधी कधीही विमान प्रवास केला नव्हता, पहिलाच प्रवास आणि तो पण इतक्या दूर त्यात आणखीन भर म्हणजे प्रवासाला सुरुवात करण्याआधी मला फूड पॉयझनिंग झालं होतं म्हणून मला हॉस्पिटलमधे ॲडमिट केलं होतं. म्हणजे पाच तारखेचं आमचं तिकीट आणि मला दोन तारखेला डिस्चार्ज दिला होता, त्यामुळे मनात खूप शंका होत्या की कसा प्रवास होणार? आम्ही मुंबईहून निघालो तेंव्हाही माझी प्रकृती पूर्णपणे ठीक नव्हती, त्यामुळे मला विमानात मिळणारे अन्नपदार्थ खाणं शक्य नव्हतं. पण विमानात इतका छान अनुभव आला, त्या विमानातल्या सहाय्यकाने मला जेवण नको तर त्याऐवजी जास्तीची बिस्किटं आणि फळांचा रस उपलब्ध करून दिला. परदेशी जाताना एखाद्या प्रवाश्याचा एवढा विचार करून त्याची इतकी छान व्यवस्था होईल असं खरंच वाटलं नव्हतं, अशा तऱ्हेने प्रवास सुरू झाला.

त्यानंतर लंडन आणि लंडननंतर आमचं विमान सुरक्षितपणे अमेरिकेच्या सियाटल विमानतळावर उतरलं आणि जरी आम्हाला अमेरिकेत राहता आलं नाही तरीही योगायोगाने आमचं परदेशातलं पहिलं पाऊल अमेरिकेच्या भूमीवर पडलं. सियाटल विमानतळाबाहेर पडल्या-पडल्या तिथल्या थंडीचा प्रसाद मिळाला. खरं तर आम्ही भर दुपारी तिथे पोचलो होतो आणि पुष्कर-स्नेहाने आधीच दिलेल्या माहितीनुसार आम्ही स्वेटर इत्यादी परिधान केलेलं होतं तरी इतकी थंडी होती की माझे दात थड-थड वाजत होते. त्यावरून आम्हाला भारतातल्या सतना ह्या मध्य प्रदेशातल्या गावाच्या भेटीची आठवण जागी झाली. तिथे भर दुपारी स्वेटर इत्यादी परिधान करून अंगणात बसलेले असतानासुद्धा खूप थंडी वाजत होती. आमची ही स्थिती

बघुन पुष्करने लगेच आमच्यासाठी स्टार-बक्स मधली गरमागरम कॉफी हजर केली आणि आमच्या शरीरात ऊर्जा निर्माण केली.

त्यानंतर पुष्कर आम्हाला त्यांच्या कॅनडातील सरी (Surrey) इथल्या ब्रिटिश कोलंबियातल्या घरी घेऊन गेला. सियाटल विमानतळ ते कॅनडातील सरी हा तीन तासांचा प्रवास होता. एका देशातून दुसऱ्या देशात केवळ तीन तासात पोहोचण्याचा अनुभव थरारक होता. ह्या तीन तासांच्या रस्त्याने केलेल्या प्रवासात थोडीफार अमेरिकेची सफर करता आली. दोहो बाजुंना असणाऱ्या गर्द हिरव्या झाडांच्या मधून जाणाऱ्या सुंदर रस्त्यांच्या सोबतीने सुंदर निसर्ग, शिस्त, टापटीप, स्वच्छता इत्यादी गोष्टींचं निरीक्षण करत हा प्रवास चालू होता. हे सगळं निरीक्षण करत प्रवास करत असताना तीन तास केंव्हा संपले हे लक्षातही आलं नाही.

स्नेहा तिच्या मैत्रिणींसह आमच्या स्वागताला तयारच होती. तिने आमच्या पायांवर दूध-पाणी घालून आणि ओवाळून आम्हाला घरात घेतलं. खरंच सांगते आईनंतर अशा तऱ्हेने असं स्वागत इतर कुणीही केलं नव्हतं त्यामुळे मला खूप गहिवरुन आलं आणि अशा पद्धतीनं आम्ही जामातांच्या गृहात प्रवेश केला. त्यांचं घर बघून आणि त्यांनी ज्या प्रकारे ते सजवलं आणि राखलं होतं ते बघून इतकं हरखून जायला झालं की काही विचारू नका. जवळ-जवळ एक आठवड्यानंतर जेटलॅग, कॅनडातली थंडी, तिथलं वातावरण इत्यादी गोष्टींची सवय झाल्यानंतर पुष्कर-स्नेहानी आमच्या पर्यटनाची आखणी करायला सुरवात केली. आमच्या पहिल्या कॅनडा भेटीत आम्ही सहा मार्च ते दहा मे असे जवळ-जवळ दोन महिने राहिलो होतो. पुष्कर-स्नेहा दोघेही नोकरी करत असल्यामुळे प्रत्येक शनिवार-रविवार कुठेतरी फिरायला जायचं असं ठरलं. सोमवार ते शुक्रवार आम्हालाही प्रत्यक्ष सरीमध्ये राहण्याचा, घराच्या जवळ फेरफटका मारणं ह्या सगळ्याचा अनुभव घेता आला.

कॅनडातील त्या दोन महिन्यांच्या वास्तव्यात ज्या गोष्टी विशेषत्वाने लक्षात राहिल्या त्या म्हणजे तिथे पाहिलेली अनेक अविस्मरणीय आणि प्रेक्षणीय स्थळं तसंच विविध प्रकारचे प्रवासी अनुभव. आज हे सगळे अनुभव वर्णन करताना आश्चर्य, रोमांचकारी, विलक्षण, आनंददायी, खूपच विलक्षण इत्यादी शब्द पुन्हा-पुन्हा येतील कारण ते अनुभवच तसे आहेत.

सर्वात प्रथम आम्हाला कॅपिलॅनो सस्पेन्शन ब्रिज पार्कमधे नेलं होतं. त्या ब्रिजचं जे प्रचलित नाव आहे ते आहेच पण मी मात्र त्याचं नवीन नामकरण केलं (झुल्यावरची जंगल सफारी) कारण माझ्या मते तो एक झुलत्या पुलावर बसून केलेला जंगलाचा प्रवास असा अनुभव होता. ह्याबद्दल सगळ्यात महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे पुष्कर जिथे कुठे फिरायला न्यायचा त्या स्थळाबद्दल आम्हाला पूर्ण माहिती देत होता, त्यामुळे ज्या-ज्या ठिकाणी आम्ही गेलो तिथे नुसतंच एक प्रेक्षणीय स्थळ बघितलं असं न होता त्या स्थळाशी आपलं एक वेगळंच नातं निर्माण झालं आणि ती भेट अविस्मरणीय झाली.

एका शनिवार-रविवारी आम्ही व्हिसलरला (Whistler) गेलो होतो. स्नेहाच्या घरापासून व्हिसलरला पोहोचेपर्यंतचा रस्त्याचा प्रवास खूपच सुखकारक होता, हा कोकणातल्या नागमोडी रस्त्यांची आठवण करून देत होता. प्रत्यक्ष व्हिसलरला गेल्यावरचा जो नजारा होता तो तर विस्मयचकित करणारा होता. तिथे आम्ही रोपवेमध्ये बसून पर्वतशिखरावर गेलो आणि त्यानंतर केबल-कारमधून दोन पर्वतशिखरांवरुन खालचे बर्फाच्छादित पर्वत पाहणं, स्कीईंग करणाऱ्या लोकांना पाहणं हा एक विलक्षण अनुभव होता.

एका साप्ताहिक सुट्टीच्या वेळी आम्ही क्रूझमधे बसून व्हिक्टोरियाला गेलो होतो, गाडीसकट क्रूझमधुन जाताना क्रूझच्या भव्यतेचं खूपच आश्चर्य वाटलं. ह्याआधी कोकणात दाभोळला चंडिका देवीच्या मंदिरात जाताना असा अनुभव घेतला होता, पण तो प्रवास अगदी छोटा (अंदाजे पाच-सात मिनिटांचा) होता. पण ह्या प्रवासाचा अनुभव हा विशेष आनंददायी होता. अथांग समुद्र, पण त्यावेळी प्रवास करताना इतका शांतपणा जाणवत होता की जणू काही आपण सहज तरंगत जात आहोत. जगन्नियंत्याच्या सृष्टी निर्मितीचं वेगळेपण आणि व्याप्ती ह्या दोन्हींची अनुभूती येत होती आणि विधात्याच्या मानवाला दिलेल्या बुद्धीच्या वरदानातून मानवाने केलेल्या त्या निर्मितीपुढे आपोआपच नतमस्तक झालो.

एका सुट्टीच्या दिवशी ह्युआन दे फुका (Juan de Fuca) ह्या बीचजवळ छोटंसं ट्रेकिंग-कम-सागर दर्शन करायला गेलो होतो. खरं तर आम्ही मुंबईचे त्यामुळे समुद्र काही आम्हाला नवीन नाही, मुंबईच्या समुद्राकाठी वाळू असते पण फरक असा होता की ह्या बीचजवळ जाण्यासाठी छोटंसं ट्रेकिंग करून जावं लागलं होतं आणि बीचच्या काठावर वाळूऐवजी छोटे-मोठे खडक होते त्यामुळे पाण्यात जाताना पायाखालून वाळू सरकली नाही, मजा आली - एक वेगळा अनुभव.

एका रविवारी व्हॅन्कुव्हर ॲक्वेरियम (aquarium) बघायला गेलो होतो. मुंबईत आम्ही तारापोरवाला ॲक्वेरियम पाहिलं होतं, पण कॅनडातल्या ॲक्वेरियमची भव्यता पाहून थक्क झालो. फ्लाय ओव्हर कॅनडा पाहणं हा तर केवळ शब्दातीत अनुभव होता. काही

काळ आपण कुठल्या दुनियेत आहोत हेच समजत नव्हतं आणि अवघ्या अर्ध्या तासात अखंड कॅनडाचा फेरफटका करून आल्याची अनुभूती खूपच रोमांचकारी आणि विलक्षण होती.

एका साप्ताहिक सुट्टीच्या वेळी बुचार्ट (Butchart) गार्डनला भेट द्यायचं ठरलं, पण आम्ही जेव्हा गेलो होतो तेव्हा तिथल्या फुलांच्या फुलण्याचा ऋतू नव्हता त्यामुळे फुलांच्या कळ्याच फक्त पाहायला मिळाल्या तरीही उद्यानाची व्याप्ती आणि भव्यता लक्षात आली. त्या इतक्या मोठ्या उद्यानाची उत्तम देखरेख ही एक दखलपात्र बाब होती. एका शनिवारी एक उद्यान बघायला गेलो होतो, त्याचं नाव आठवत नाही आत्ता, पण तिथे अगदी जवळून हात लावता येईल इतक्या अंतरावरून पाहिलेले मोर अजूनही कधीतरी स्वप्नात येतात. तिथली प्रचंड मोठमोठी उद्यानं, त्यांची स्वछता, शिस्त, टापटीप बघून खूप प्रसन्न वाटत होतं. एका उद्यानात अनेक प्रकारची वेगवेगळ्या रंगांची फुलं त्यावरचे विविध प्रकारचे पक्षी हे सगळं पाहणं हा एक सुखद अनुभव होता.

पुष्कर-स्नेहाच्या घराजवळची मन प्रसन्न करणारी मंदिरंही पाहिली. परदेशात आपल्या लोकांनी रुजवलेली श्रद्धास्थानं पाहून अतिशय आनंद झाला. स्नेहाचे बाबा रोज फिरायला जायचे, मी मात्र पायी चालत जाण्याच्या फेरफटक्यात कधी-कधी घराच्या जवळचं वॉलनट गार्डन, स्नेहाच्या घराजवळचं पुस्तकालय, फ्रुटीकाना दुकान, त्याच्या बाजूचं स्टारबक्स अशी सर्व ठिकाणं पाहिली. स्टारबक्समधे कॉफी प्यायला जाणं (कारण पुष्करने आम्हाला परदेशात उतरल्याबरोबर लावलेली त्या कॉफीची गोडी) हाही एक छान अनुभव होता. लक्षात राहण्यासारख्या बाबी म्हणजे जर आपण रास्ता क्रॉस करत असू तर वाहन चालवणाऱ्यांची जाण, त्याशिवाय बटण दाबून रस्ता क्रॉस करण्याची व्यवस्था. दोन-तीन वेळा तिथल्या कॉस्टको (Costco) ह्या होलसेल मार्केटला भेट देण्याचा योग्य आला. किती मोठं मार्केट ते! अगदी सुईपासून ते धान्य, फळं, भाज्या, विद्युत उपकरणं तसंच सजावटीच्या सामानापासून ते फुलझाडांची रोपं हे सगळं एका छताखाली उपलब्ध. अगदी आज कॅनडात राहायला आलो आणि घर उभं करायचं म्हटलं तरी एक-दोन कॉस्टकोच्या भेटींमधे अगदी सुंदर प्रकारे घर सजवून आनंदाने राहता येईल असं हे होलसेल मार्केट, त्याच्या उल्लेखाशिवाय कॅनडा भेट पूर्ण होणार नाही.

आमची स्नेहा उत्तम स्वयंपाक करतेच पण ह्या सर्व स्थळांना भेट देताना हॉटेलमधे राहण्याचा, वेगवेळ्या देशातल्या शाकाहारी पाककृतींचा आस्वाद घेता आला, हाही एक खूप छान अनुभव होता. आतापर्यंत लेक-जावयाबद्दल लिहून झालं - आता जरा पुष्कर-स्नेहाच्या मित्रमंडळींबद्दल.

आपली मुलगी परदेशात राहायला जाते आहे, तिथे त्यांना जर काही अडचण अली तर कशी मदत मिळेल ह्याची कुठेतरी मनात शंका होतीच पण मुलांनी त्यांच्या आवडीने स्वीकारलेली ती जीवनशैली होती त्यामुळे त्यांनी स्वतःच्या कर्तृत्वाने घेतलेल्या निर्णयावर विश्वासही होता. त्यांच्या मित्रमंडळींचं आपापसातलं नातं पाहिल्यानंतर ही शंका दूर झाली.

ही मंडळी एकमेकांच्या मदतीला अशी उभी राहतात की खरोखरच थक्क व्हायला होतं. कुणाच्याही घरचा एखादा कार्यक्रम किंवा सामूहिकरीत्या साजरे करण्याचे सणवार असोत, त्यासाठी स्थापन केलेलं ढोल पथक असो, त्याचा नियमितपणे केला जाणारा सराव असो, कार्यक्रमांचं सादरीकरण असो ह्या सर्व गोष्टी इतक्या एकजुटीने केल्या जातात की एखाद्या कार्यक्रमाला आम्ही हजर असलो तर अनोळखी व्यक्तीसुद्धा आपले कोणीतरी नातेवाईक आहेत इतक्या आपुलकीने ते ह्या नव्या पाहुण्यांशी वागतात. हे सगळं पाहून अगदी स्तिमित व्हायला होतं.

शेवटी ह्या सगळ्यांना जे जे हवं ते सगळं त्यांना प्राप्त होवो आणि त्यांच्या मनातल्या सर्व सदिच्छा पूर्ण होवोत अशी श्री स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना करुन अनुभव कथनाला विराम देते.

## मंडळाविषयी बोलू काही - मंगळागौर: पिंगा गं पोरी पिंगा

ह्याही वर्षी आपण मंगळागौरीचा कार्यक्रम उत्साहाने साजरा केला. मंगळागौरीला महिला एकत्र जमून नवविवाहितेचं कोड-कौतुक करण्यासाठी विविध खेळ, गाणी, फुगडी घालून आनंद साजरा करतात. त्यामुळे महिलांनाही रोजच्या कामांमधून थोडासा विरंगुळा मिळतो. ह्या निमित्ताने सर्व मैत्रिणी नऊवारी साडी नेसून, नटून-थटून एकत्र आल्या आणि झिम्मा फुगडी आणि मंगळागौरीच्या पारंपरिक खेळात रमून गेल्या. मंगळागौरीची आरती, शंकराची पिंड आणि भोवतीची आरास, धम्माल खेळ, उखाणे आणि अल्पोपहार ह्यामध्ये वेळ कसा गेला हे कळले सुद्धा नाही. मंगळगौर साजरी करून आपण आपली संस्कृती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न करत आहोत.



# हे सत्य की ते सत्य

• भूषण पाटील •

संध्याकाळचं सत्य सूर्यासोबत मावळलं,
रात्रीचा रोमांच पहाटेच्या बांगेपर्यंत ओसरला.
आता हा दिवस उभा आहे माझ्यासमोर,
कठीण प्रश्नांची मालिका घेऊन,
मला जाब विचारत, उत्तरांची अपेक्षा करत, पाहतोय माझ्याकडे निरखून...

आणि हे काय?
माझी धडपड सुरू असताना आता पुन्हा ही संध्याकाळ तिचे रंग हातात घेऊन,
मी चाचपडत शोधलेल्या दिवसातल्या उत्तरांना निरर्थक ठरवू पाहतेय,
तिच्या रंगात रंगण्याचं आवाहन करतेय

या संध्येतल्या आभासापलीकडे, रात्रीच्या धुंदीपलीकडे, आणि पहाटेच्या कोमल स्पर्शापलीकडे
पहाट दिवसात बदलण्याच्या क्रमात,
दिवस संध्येत विलीन होण्याच्या क्षणांत,
संध्येतून रात्रीत दाटत जाणाऱ्या काळोखात
या सगळ्यांच्या मधोमध कुठेतरी...
म्हणजे त्यांच्या भूमितीच्या नाही तर त्यांच्या असण्याच्या मधोमध कुठेतरी एक खिडकी आहे

त्या खिडकीतून कुणीतरी मला खुणावतं... जे या बाजूच्या 'मी' पेक्षा अधिक 'मी' असल्याची जाणीव करून देतं.

त्या खिडकीवर एक प्रश्न सारखा तरळत राहतो, हा 'मी' की तो 'मी'? हे सत्य की ते सत्य?...की सगळंच सत्य?
..की काहीच नाही?

# उंदीर मामा की जय!

• दीपिका विद्याधर रानडे •



नुकताच गणेशोत्सव होऊन गेला, म्हणून त्या निमित्ताने माझ्या आयुष्यातले उंदीर मामाचे काही किस्से सांगणार आहे.

लहानपणी पुण्यात असताना आम्ही दुसऱ्या मजल्यावर राहायचो. घरात हापूस आंबे आणले, की कसे कुणास ठाऊक पण उंदीर मामांना त्याची बित्तंबातमी लागायची. म्हणजे पुण्यातले लोक तर खवय्ये असतातच, भरीस भर म्हणजे उंदीर सुद्धा चोखंदळ निघाले. आजी कोकणात वाढलेली आणि मी पुण्यात. प्रत्येक पिढीगणिक प्राणी मारायची क्षमता कमी होत गेलेली. आई पाली मारू शकायची, पण आम्हा मुलांची मजल फक्त डास आणि झुरळ मारायची. त्यामुळे फक्त आजी विरुद्ध उंदीर अशी खडाजंगी असायची. एकदा रात्री आजी आवाजाने उठली, आणि अंधारातच दिवे न लावता हाताशी जे आले ते आवाजाच्या दिशेनी भिरकावून लावलं आणि कसा तो तिचा नेम अगदी अचूक बसला. पुढचे काही दिवस मात्र आम्ही मुले आमच्यावर काही बरसू नये यासाठी एकदम काटेकोर होतो. पुढे रक्त न गोठणारं उंदीर मारायचं औषध आलं आणि मग आपसूकच उंदीर मामांची वार्षिक वारी बंद झाली आणि आजीला अजून एखादं शौर्य पदक मिळायची संधी हुकली.

अभियांत्रिकी पूर्ण करून मी अमेरिकेत स्थायी झाले. फ्लोरिडातील मेलबॉर्न शहरात नोकरीनिमित्त वास्तव्याला असताना आमच्या खालच्या मजल्यावर एक मराठी मुलगा रहायचा. तिथल्या विद्यापीठातील भारतीय विद्यार्थीगटाचा तो तत्कालीन अध्यक्ष होता, आणि अत्यंत गोष्टीवेल्हाळ होता म्हणून जवळपास प्रत्येकाशी त्याची ओळख होती. जिन्यावरून येता जाता आमची ओळख झाली आणि काही दिवसांनी त्याने मला घरी बोलावले. त्याच्याकडे काचपेटीत असलेला छोटा पाळीव बॉल पायथन अजगर मोठ्या कौतुकाने तो मला दाखवत होता. त्या अजगराला खायला द्यायला त्याच्याकडे बरेच गोठवलेले इटुकले पिटुकले उंदीर होते. नवजात बाळाचा बाबा असल्याच्या थाटात त्याने साप पूर्वी किती उंदीर खायचा, आता किती खातो याचा लेखाजोखा दिला. त्याने मोठ्या उत्साहाने मला सापाला हात लावण्याचा किंवा त्याला एखादा उंदीर भरवण्याचा आग्रह केला, पण मी मात्र त्याला न दुखावता

तिथून पळता पाय कसा काढू या विवंचनेत होते. पुढील अनेक दिवस मी तो साप किंवा त्याचे उंदीर त्याच्या घरातून पलायन करून वातानुकूलनाच्या वाहिन्यांद्वारे माझ्या डोक्यावर येऊन तर पडणार नाहीत ना या चिंतेत होते.

कॅलिफोर्नियातली माझी एक जिवलग मैत्रीण लग्नानंतर न्यूयॉर्क ला गेली. कॅलिफोर्नियात असताना ती कॅलट्रेनने बराच प्रवास करायची त्यामुळे न्यूयॉर्कला सबवेतून दाटीवाटीने प्रवास करायला ती लगेच सरावली. पण सबवे म्हणजे आपलीच जहागिरी आहे या थाटात भटकणाऱ्या उंदरांची कोणाला कशी सवय होणार? एकेकाळी ''ब्रिटिश साम्राज्यावर कधीही सूर्यास्त होत नाही'' या ताठ्यात असलेल्या लंडनवासीयांना उंदरांनी अगदी हैराण करून सोडले होते, आणि आजच्या मितीलाही न्यूयॉर्क सारख्या जगाच्या आर्थिक राजधानीला उंदरांपासून मुक्ती नाही!

कॅलिफोर्नियाच्या वासात उंदीर दिसले नाहीत म्हणून मी जरा गाफील झाले खरी, पण उंदीर मामा माझ्या प्रवासाच्या कुठल्याच टप्प्यावर मुक्काम सोडायला तयार नव्हते. काही वर्षांपूर्वी ग्रँड कॅन्यन ला गेलो होतो. तिथे नॅशनल पार्कची बंगली मिळणं महा कठीण, पण आम्ही जास्त वर्दळ नसलेल्या 'नॉर्थ रिम'ला जायचं ठरवलं आणि नशिबाने तिथे त्यांच्या मुख्यालयाच्या अगदी शेजारची बंगली आम्हाला मिळाली. आमच्यासोबत माझी एक मैत्रीण होती आणि ती नुकतीच PhD संपवून एका कर्करोग संशोधनाच्या कंपनीत रुजू झाली होती. गळाभेट झाल्यावर पहिल्या कामाचा अनुभव कसा आहे असं विचारताच तिने सांगितले – पहिल्याच दिवशी कार्यालयात पाऊल टाकले न टाकले तोच तिच्या बॉसने ताटभर उंदीर तिच्या पदरी घातले! आता तिचे उंदीर तिच्याशिवाय ३ दिवस कसे जगणार अशी आम्ही तिची फिरकी घेत होतो. पण ती मात्र थोडी उदास झाली आणि म्हणाली ह्युस्टनला (Houston, Texas) आलेल्या पुरात तिच्या PhD संशोधनाचे उंदीर वाहून गेले आणि तिला ते संशोधन पुन्हा पहिल्यापासून करावे लागले, आणि तिची PhD त्यामुळे अजून लांबली.

वास्तव्याच्या पहिल्या दिवशी आम्ही ग्रँड कॅन्यन पासून थोड्या दूर असलेल्या पेज (Page, Arizona) या ठिकाणी पर्यटन करून रात्री वाटेत असलेल्या एका गावी थांबलो. दुसरा दिवस ग्रँड कॅन्यन फिरण्यात घालवला, आणि रात्री ग्रँड कॅन्यन लॉजच्या खानावळीत जेवलो. आता विशेष म्हणजे तिथे 'गव्याचे मांस' अशा सारखे कधीही न ऐकलेले पदार्थही होते, पण शाकाहारी लोकांसाठी चार भाज्या बनवायला मात्र त्यांना जड! अर्थात, आम्हाला सुद्धा याचा अंदाज होताच म्हणून आम्ही पेज मधून बरीच फळं आणि फराळ सोबत आणला होता. दिवसभर उन्हात फिरून आलेला शीण आणि रात्री आकाशगंगेचं दर्शन घेण्यात झालेला उशीर, यामुळे झोप लगेच लागली. रात्री काहीतरी खुडबुड ऐकू आली पण त्याकडे विशेष लक्ष दिले नाही. तिसऱ्या दिवशी आमचं परतीचं विमान होतं. लाल रंगाच्या दगडांवर सूर्योदयाची स्वर्णिमा बघायची संधी मला घालवायची नव्हती, म्हणून माझ्या निद्राप्रिय नवऱ्याला सोडून मी एकटीच भल्या पहाटे उठून सूर्योदय बघायला गेले. दिवा न लावता हाताला लागतील ती फळं सोबत घेऊन निघाले. तिथे संपूर्ण कॅन्यन समोर दिसेल अश्या एका दगडावर चढून मी सोबत घेतलेले केळे खाऊ लागले. एखादा घास खाऊन झाला तोच मला केळ्यावर चावल्याचे निशाण दिसले, आणि रात्री ऐकू आलेल्या खुडबुडीचे कोडे सुटले! नेमकं त्या दिवशी आभाळ ढगाळ होतं आणि सूर्योदय सुद्धा विशेष काही दिसला नाही म्हणून अगदी हिरमोड झाला. तिथे असताना मजेत ''उंदरांना तुझी फार आठवण येत असणार म्हणून तुला शोधत ते ग्रँड कॅन्यन पर्यंत पोचले'' असे मैत्रिणीची गंमत केली खरी पण... कॅलिफोर्नियात परतल्यावर दोन दिवसांनी मला ताप भरला आणि त्याचसोबत उंदरामुळे तर काही झालं नसेल ना या विचाराने चांगलीच धडकी पण भरली. नॅशनल पार्कच्या मुख्यालयात फोन आणि ई-मेल केला, पण त्यांच्याकडून काही उत्तर आले नाही. डॉक्टरकडे जाऊन म्हणाले की प्लेग नाही, पण मला हंटा व्हायरसची भीती आहे. त्या डॉक्टर नी CDC च्या बातम्यांमध्ये नॉर्थ रिमजवळ हंटा व्हायरसचा सध्या प्रसार आहे का, असं शोधून काढले आणि अशी काही बातमी नाही असं बघून एकदाचा जीव भांड्यात पडला.

त्यानंतर काही वर्षांनी मिनियापोलीसला (Minneapolis, Minnesota) कांचन नावाच्या मैत्रिणीची PhD लॅब बघायला गेलो होतो. मैत्रीण आमच्यासारखी अभियंता, आणि नंतर तिने हृदयविकार संशोधनात PhD केली. तिच्या संशोधनात ती पेसमेकर सारख्या उपकरणांसाठी MATLAB प्रणाली लिहिते, आणि तिची प्रणाली कशी चालते ते बघण्यासाठी ती ते उपकरण उंदरांच्या हृदयात बसवते. ती उंदरांना कसे पकडते आणि त्यांना काचेच्या नळीत कोंडून त्यांचं हृदय काढून त्यात उपकरण कसे बसवते याचं रोमांचकारक वर्णन तिने दिले. आमच्यासोबत असलेल्या दुसऱ्या मैत्रिणीने खूप निरागसपणे पुढे त्या उंदरांचे काय होते असं विचारले, आणि ते जैविक कचरा म्हणून टाकले जातात हे ऐकून तिला थोडा धक्काच बसला. कांचनने सांगितले की पहिले पहिले उंदीर हाताला चावतात, मारताना मानसिक त्रास होतो, पण हळू हळू सवय होते.

तिची PhD लॅब बघणं खरंच आमच्यासाठी एक आगळा वेगळा अनुभव होता.

काही वर्षांनी नवऱ्याने कामानिमित्ताने कॅनडाला मुक्काम हलवला, आणि काही दिवसांनी मी त्याला भेटायला गेले. वॅनकूवर विमानतळातून बाहेर पडून गाडी भाड्याने घ्यायला गेलो, आणि नेमका त्यांच्या दुकानासमोर मला उंदीर दिसला. कॅनडाची पहिलीच वारी आणि प्रथम ग्रासे मक्षिका पात:! नशिबाने निसर्ग सौंदर्याने नटलेल्या या देशाने "First impression is the last impression" ही म्हण खोटी ठरवली. अशी ही उंदीर पुराणाची कहाणी पुण्याहून सुरू होऊन कॅनडाच्या साठा उत्तरी समाप्त. आता पुढची गाठ कुठे पडते, ते उंदीर मामांच्याच मर्जीवर! तोवर, ‘‘उंदीर मामा की जय!’’

# खाद्यजत्रा

# मोदकाची झणझणीत आमटी

**– दिप्ती मोकाशी**

मोदकाची आमटी ही एकदम झणझणीत आणि चविष्ट असते. घरात भाजीला काही नसेल, काहीतरी झणझणीत खायचे असेल तर मोदकाची आमटी मस्त पर्याय आहे. जिभेला चव नसेल, काहीतरी मस्त खायची इच्छा असेल तर ही भाजी नक्की करून बघा.

**साहित्य :**

**तिखट सारण –** सुक्या खोबऱ्याचा कीस १ कप ( भाजून घेणे), तीळ 2 tsp ( भाजून घेणे), खसखस 1 tsp ( भाजून घेणे), हिरवी मिरची ३-४, लसूण पाकळ्या ७-८, आले १ इंच, शेंगदाणे 1 tbsp (भाजून घेणे), लाल तिखट १ tsp, कांदे-लसूण मसाला 1/2 tsp, गोडा मसाला 2 tsp, मीठ चवीनुसार, भरपूर कोथिंबीर

**मोदक आवरण –** बेसन दीड कप, गव्हाचे पीठ 1/2 कप, मीठ चवीनुसार, ओवा 1/2 tsp, तेल 2 tsp, हळद 1/4 tsp, लाल तिखट 1/2 tsp

**आमटी बनवण्यासाठी –** आले १ इंच, गोडा मसाला / कांदा लसूण मसाला, धणे पूड व जिरे पूड- १/२ चमचा, लसूण ७-८ पाकळ्या, कोथिंबीर, खोबरे २ इंच, तेल 4-5 tbsp, मोहरी, जिरे, हिंग, कढीपत्ता, मिरची पावडर 1 tsp, मीठ चवीनुसार, कोथिंबीर, चवीनुसार थोडा गूळ घालावा (ऐच्छिक)

पद्धत - सारण तयार करण्यासाठी खोबरं, तीळ आणि खसखस वेगवेगळं कोरडं भाजून घ्या. भाजलेली खसखस, शेंगदाणे आणि तीळ थोडे जाडसर वाटून घ्या. हिरव्या मिरच्या, आलं आणि लसूण मिक्सरमध्ये कुटून पेस्ट बनवा. किसलेलं आणि भाजलेलं सुकं खोबरं घ्या, त्यात तयार शेंगदाणा-तीळ-खसखस पावडर आणि मिरची-आलं-लसूण पेस्ट मिसळा. त्याच मिश्रणात, हळद, मीठ, तिखट,गोडा मसाला, कांदे-लसूण मसाला , थोडं तेल आणि चिरलेली कोथिंबीर टाका आणि सगळं नीट एकत्र करा. पीठ बनवण्यासाठी एका भांड्यात बेसन, गव्हाचं पीठ, मीठ, तिखट, हळद, ओवा, थोडं तेलाचे मोहन घालून घट्ट पीठ मळून घ्या.

आमटीसाठी सुकं खोबरं कोरडं भाजून थंड होऊ द्या. भाजलेलं खोबरं, आलं, लसूण आणि कोथिंबीर मिक्सरमध्ये वाटून पेस्ट तयार करा. कढईत तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे आणि तयार मसाला घालून परतून घ्या. त्यात गोडा मसाला, कांदे-लसूण मसाला,तिखट घालून मिक्स करा. त्यात पाणी घालून ४-५ मिनिटं उकळा. (आमटी थोडी पातळ ठेवा, मोदक शिजायला लागले की मिश्रण घट्ट होईल)

मोदक तयार करण्यासाठी पातळ लहान पुरीसारखं लाटून घ्या. त्यावर तयार तिखट सारण घालून पाकळ्या करून मोदक तयार करा. तयार गरम उकळत्या भाजीमध्ये सर्व मोदक घाला. हलकं हलवा आणि १०-१२ मिनीटं मंद आचेवर शिजवा. पोळी/भाकरीबरोबर आस्वाद घ्या.



# जीवन आणि पंढरपूरची वारी

• श्रद्धा इंगळे •

संत ज्ञानेश्वर महाराज व संत नामदेवांच्या काळात वारकरी संप्रदायामुळे वारी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व अध्यात्मिक जीवनात खोलवर रुजली. पुढे संत तुकाराम महाराजांनीही या परंपरेला बळ दिले. संतांच्या पालख्यांच्या रूपाने पंढरपूरची वारी एक शाश्वत परंपरा बनली. दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीला लाखो वारकरी टाळ-मृदंगाच्या गजरात, अभंग-गायन करत पंढरीच्या विठोबाला भेटायला जातात.

माझे आजोबा वारीला जायचे, मग काका आणि माझे पप्पा जवळपास १५ वर्षांपासून आमच्या गावातून वारीला जातात. मी माझ्या पप्पांचे अनुभव सांगणार आहे. बरीच मंडळी असतात वारीला! मला अजूनही आठवतं लहान असताना गावकरी आणि काकांसोबत आम्ही सुरुवातीच्या दोन मुक्कामापर्यंत जायचो, खूप धम्माल करायचो. पप्पांनी त्यांची पहिली वारी निवृत्तीनंतर केली. ते फॉरेस्ट ऑफिसर असल्यामुळे त्यांना निसर्गात वेळ घालवायला, चालायला खूप आवडायचं. पहिल्यांदा ते वारीला गेले तेव्हा काळजी वाटत होती. विदर्भामध्ये खूप उष्णता होती तरीही त्यांचा निश्चय पक्का होता,मग फक्त परतीची वाट आम्ही पाहत बसायचो. पण त्यांनी श्रद्धेने प्रवास पूर्ण केला. पहिल्या वारीतला त्यांचा एक अनुभव गोष्ट म्हणून मला सांगायला आवडेल.

**वारीतील आजी – श्रद्धेचं सामर्थ्य**

वारी म्हणजे फक्त चालणं नाही, तर ती भक्तीची, श्रद्धेची आणि सामूहिक भावनेची अनोखी वाटचाल असते. प्रत्येक पाऊल विठ्ठलाच्या नावाने पडतं आणि प्रत्येक श्वासात नामस्मरण घोळतं. अशाच वारीत एकदा आम्हाला भेटली एक वयस्कर आजी.

वय जवळजवळ ऐंशीच्या आसपास, पाय कमजोर, अंग दुर्बल, पण मन मात्र खंबीर! तिने ठरवलं होतं यंदाची वारी काहीही झालं तरी सोडायची नाही. अंतर होतं तब्बल ५६० किलोमीटरचं. एवढा प्रवास करण्याची ताकद तिच्या अंगात दिसत नव्हती, पण श्रद्धा ही ताकदीपेक्षा अधिक सामर्थ्यवान असते, हे तिच्या प्रत्येक पावलात जाणवत होतं.

आजीचं घर फार मोठं नव्हतं. दोन एकर शेती, त्यावर कर्जाचा प्रचंड डोंगर. घरात धान्य नाही, गुरांसाठी चाराही नाही. गेल्या काही वर्षात पावसाने दगा दिला होता. आभाळ काळं दाटून आलं तरी पाऊसच नाही. उन्हाने पिकं जळून गेली. अनेक अल्पभूधारकांनी आपली शेती विकली. गावात हळहळ होती ‘आता

कसं जगायचं?'

आजीच्या मनातही भीती होती 'शेती गेली तर जगायचं कसं?' पण त्या भीतीवर श्रद्धेचा हात ठेवून ती म्हणायची,

''विठ्ठला, पिक होऊ दे पाऊस असू दे एवढंच माझं मागणं आहे.''

मुलं तिला थांबवायची. म्हणायची, ''आई, एवढा प्रवास कसा होईल तुझ्याकडून? राहा घरी.''

पण आजी ठाम होती. ''विठ्ठलाची वारी मी सोडायची नाही. जिवाला जरासं समाधान हवं असेल तर ही वारी करायलाच हवी.''

खांद्यावर छोटंसं गाठोडं, डोक्यावर तुळशीचं रोप आणि मनात नामस्मरण घेऊन ती दिंडीत सामील झाली. चालता चालता ती अभंग म्हणायची, हरिनाम घ्यायची. तिच्या थकलेल्या चेहऱ्यावरही एक अद्भुत तेज होतं.

वारीत फक्त चालणं नसतं. प्रत्येक ठिकाणी थांबलं की सामूहिक स्वयंपाक, भजन, कीर्तन, दिंडीतील एकमेकांची सेवा असते. आजी स्वतः वयस्कर असूनही, तिथे येऊन स्वयंपाकात हातभार लावायची, पाणी आणायची, इतर वाऱ्यांच्या थकलेल्या पायांवर हात फिरवायची. जणू ती स्वतःच्या दुःखाला विसरून इतरांच्या सेवेत रमली होती.

आमचे पप्पा म्हणाले, ''जीवनात अशा लोकांना पाहायचं आणि त्यातून शिकायचं. खऱ्या आनंदाचं रहस्य समाधानात आहे. जेव्हा माणूस मनाने समाधानी होतो, तेव्हा त्याला जीवनाचा खराखुरा आनंद मिळतो.''

चालताना आजीचे कधी पाय दुखायचे, कधी दम लागायचा. पण ती थांबली नाही. तिच्या ओठांवर एकच गाणं असायचं

''राम कृष्ण हरी... विठ्ठल विठ्ठल...''

वारीच्या शेवटी जेव्हा पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या दाराशी ती पोहोचली, तेव्हा तिच्या डोळ्यात पाणी आलं. थकवा जणू नाहीसा झाला. विठ्ठलाच्या पायांवर माथा टेकवताना तिला एकाच गोष्टीचं समाधान होतं, 'माझी वारी पूर्ण झाली.'

त्या वर्षी एक आश्चर्य घडलं. वारी संपून गावाला परतल्यानंतर, पावसाने जणू करुणा केली. मुसळधार पाऊस झाला, पिकं बहरली, शेतात हिरवं सोनं दाटलं. आजीच्या दोन एकर जमिनीतही चांगलं पीक आलं. जे गाव अनेक वर्षं ओसाड दिसायचं, तिथं त्या वर्षी पिकांची लहर होती.

गावकरी म्हणू लागले ''आजीची श्रद्धा विठ्ठलाने फेडली.''

आजी मात्र हसून म्हणायची, ''ही सगळी विठ्ठलाची लीलाच आहे. आपण फक्त मनापासून नामस्मरण करत राहायचं.''

पुढची अनेक वर्षं ती वारी करत राहिली. वय वाढलं, अंग आणखीन थकलं, पण मन मात्र कधीच थकलं नाही. तिच्या श्रद्धेने केवळ तिचं नव्हे तर संपूर्ण गावाचं आयुष्य उजळलं.

हा अनुभव ऐकून मला पप्पाचं म्हणणं पटलं. असा विचार आला की ही आजी आपल्याला एक मोठा धडा देतेय,जीवनात परिस्थिती कितीही बिकट असली तरी जर मनात समाधान आणि सेवाभाव असेल, तर कोणतंही ओझं हलकं होतं. पैसा, सुखसोयी नसतानाही माणूस आनंदात राहू शकतो. कारण खरा आनंद बाहेर नसतो, तो आपल्या मनात असतो. आजीची वारी म्हणजे विश्वासाचं आणि समाधानाचं जिवंत उदाहरण आहे!

**भाव आणि भक्तीची कथा**

यवतमाळ जिल्ह्यातील अर्णी नावाचं एक साधं, पण भक्तिभावानं न्हालेलं गाव. गावातलं एक कुटुंब पिढ्यान् पिढ्या एक मोठी परंपरा जपून होतं, वारीला आलेल्या वारकऱ्यांसाठी पंगतीची व्यवस्था करणं.

हे कुटुंब फार श्रीमंत नव्हतं. त्यांची शेतीसुद्धा फार मोठी नव्हती, बैलांच्या जोरावर ते कसाबसा संसार चालवत. पण एक गोष्ट मात्र कधीच कमी नव्हती वारकऱ्यांवरील प्रेम.

दरवर्षी वारीच्या दिवसांत हजारो वारकरी गावात येत. त्यावेळी गावात गजर व्हायचा 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' सगळीकडे दिंड्या, टाळ-मृदुंगाचा नाद, आणि भक्तिरसाचं वातावरण पसरलेलं असायचं.

या कुटुंबासाठी तो क्षण म्हणजे पर्वणीच असायचा. पण एका वर्षी त्यांच्या आर्थिक स्थितीवर इतका ताण आला की घरातल्या लोकांनी विचारलं

''यंदा पंगतीचा खर्च आपण कसा करणार? धान्य नाही, पैसे नाहीत. कर्जाचं ओझं वाढलंय.''

तेव्हा घरातील वडील मोकळेपणाने म्हणाले,

''वारकरी म्हणजे आपले स्वतःचे मानकरी. त्यांना सेवा देणं थांबवणं म्हणजे वारीचं मोल नाकारणं. पैशांची चिंता करू नका. देवाची इच्छा असेल तर सगळं निभावून नेईल.'' आणि त्यांनी एक मोठा निर्णय घेतला. घरातील बैल विकले. गावातल्या सगळ्यांना हा धाडसी निर्णय धक्का देणारा होता. पण त्यांच्या डोळ्यात एक वेगळंच तेज होतं, सेवा करण्याचा आनंद.

त्या वर्षीही पंगती भरली. वारकऱ्यांनी प्रेमानं भोजन केलं. कोणी जाणलंही नाही की त्यामागे एवढा मोठा त्याग आहे. पंगतीनंतर

ते काका शांतपणे म्हणाले ''ही सेवा ही नशिबात लागते. हा मान प्रत्येकाला मिळत नाही.''

काळ सरकत गेला. काही वर्षांत त्यांच्या आयुष्यात बदल घडू लागले. शेतीत चांगलं पीक येऊ लागलं, कर्ज उतरलं, आणि घरात आनंद परतला. गावकरी म्हणायचे ''त्यांच्या सेवेला देवाने उत्तर दिलंय.''

आजही त्या घराची परंपरा तशीच सुरू आहे. वारकरी आणि वारकऱ्यांची सेवा करणारी मंडळी दोघेही सारखीच थोर आहेत, कारण खरी भक्ती ही केवळ भजनात नसून, ती त्याग, सेवा आणि प्रेमात असते.

जीवन म्हणजे सततचा प्रवास. या प्रवासात कधी वळणं येतात, कधी आव्हानं तर कधी सुखाचे क्षण. अशाच अनुभवांनी भरलेला माझा परदेश प्रवास सुरू झाला आणि मी कॅनडात पोहोचले. पण तरीही समाधानाची गोष्ट म्हणजे माझा वारीशी संबंध सुटला नाही. पारंपरिक वारीच्या आठवणी माझ्या मनात खोलवर घर करून आहेत. त्या वारीत अनुभवलेलं भक्तीचं, आणि श्रद्धेचं वातावरण नेहमी मनात दाटून येतं. परदेशात राहूनही जेव्हा इथल्या महाराष्ट्र मंडळात 'मेपलची वारी' करायची संधी मिळते तेव्हा मला पंढरपूरच्या वारीची आठवण येते. पारंपरिक वारीपेक्षा थोडी वेगळी, पण तरीही छान अनुभव देणारी ही वारी मी दरवर्षी करते आहे.

सुरुवातीला आम्ही मॉन्ट्रियलमध्ये राहत होतो. तिथलं हवामान माझ्यासाठी अगदीच वेगळं होतं. हिवाळ्यातील कडाक्याची थंडी, रस्त्यांवर पांढऱ्या शुभ्र बर्फाची चादर आणि सतत गोठवणारा वारा सगळं जरी सुंदर दिसत असलं तरी नव्याने तिथं पोहोचलेल्या माझ्यासाठी ते मोठं आव्हान होतं. त्यातच फ्रेंच भाषेची अडचण, ओळखीची माणसं नसणं, नवीन मित्र बनवण्याची हुरहूर, असं सगळंच अनोळखी होतं. पण मुलगा लहान असल्याने त्याच्या गोड खट्याळपणामुळे एकटेपणा फार जाणवला नाही. कधी कधी मात्र मन भरून आलं की गाणी ऐकत मी स्वतःला सावरत असे. संगीत हा माझा नेहमीच साथीदार राहिला आहे.

नंतर आम्ही व्हॅन्कुव्हरला स्थलांतरित झालो. व्हॅन्कुव्हरचं सौंदर्य पाहून माझं मन भारावून गेलं. एका बाजूला उंच डोंगर, दुसऱ्या बाजूला अथांग समुद्र, आणि त्यामधून दिसणारा हिरवाईने नटलेला निसर्ग! खरंच निसर्गाने भरभरून दिलेलं शहर. तिथलं हवामानही मॉन्ट्रियलपेक्षा सौम्य होतं. घरापासून दूर असूनही या निसर्गामुळे मनाला उभारी मिळाली.

पण फक्त निसर्ग पुरेसा नव्हता. मनाला आपल्या मातीचा गंध, संस्कृतीची ऊब हवीच होती. त्यासाठी मी व्हॅन्कुव्हरच्या मराठी मंडळाशी (मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया/ MSBC) जोडले गेले. तिथे गेल्यावर खरंच असं वाटलं की आपण आपल्या माणसांत आलोय. माझा मुलगा सोहम मराठी शाळेत शिकू लागला आणि नीरजचा व्हिडिओग्राफीचा छंद मंडळाच्या कार्यक्रमांत उपयोगी पडला. अशा रीतीनं आम्ही या परिवाराचा भाग झालो.

परदेशात राहूनही जेव्हा मंडळात 'मेपलची वारी' करायची संधी मिळते तेव्हा मला पंढरपूरच्या वारीची आठवण येते. मेपलची वारी हा व्हॅन्कुव्हरमध्ये MSBC तर्फे चालवलेला एक सुंदर उपक्रम आहे. मित्र मंडळी रोज एकत्र येऊन चालतात, विठ्ठलनाम गातात, मित्र-परिवारासोबत वेळ घालवतात. चालण्यातून आरोग्य तर टिकतेच आणि गोड आठवणीही निर्माण होतात. मेपलची वारी म्हणजे परदेशात राहूनही पंढरपूरची ओढ मनात जिवंत ठेवणारा एक आनंददायी अनुभव आहे.

जरी आपण हजारो किलोमीटर दूर असलो तरी मनानं आपण आपल्या मातीतच असतो. इथे मराठी सण-सोहळे, गणपती उत्सव, दिवाळी, गुढीपाडवा आम्ही सगळे मित्रमैत्रिणी मिळून साजरे करतो तेव्हा खरंच असं वाटतं की आपण परदेशात असूनही आपल्या संस्कृतीशी घट्ट जोडलेलो आहोत.

जीवन हा एक अखंड प्रवास आहे! भारतातून कॅनडात, एका शहरातून दुसऱ्या शहरात.. माणसं बदलतात, ठिकाणं बदलतात पण अनुभव मात्र शिदोरीसारखे साठत जातात. आणि हीच शिदोरी आपल्याला पुढचं जीवन जगण्यासाठी बळ देते. म्हणूनच मला वाटतं, जीवन हीच एक वारी आहे. या वारीत आपण चालत राहतो, शिकत राहतो, आणि अनुभवांची संपत्ती साठवत राहतो.

मी लिहिलेल्या कवितेच्या ओळी मला इथे सांगाव्याशा वाटत आहेत,

*विठ्ठल विठ्ठल नामस्मरणाचा विसर ना पडे संसारी*
*विठ्ठल विठ्ठल नामस्मरणाचा विसर ना पडे संसारी*
*ओझं संसारचं असून खांद्यावरी*
*तन मनाने भिजतो तो भक्तीरूप वारकरी*
*तल्लीन वारकरी करी हरी नामाचा गजर दिशा दाही*
*अनुभवांची मिळेल शिदोरी म्हणून जावे पंढरीच्या वारी*
*हरिनामाची लागेल गोडी वाटेल अंतरी भारी*
*विठ्ठल विठ्ठल नामस्मरणाचा विसर ना पडे संसारी*
*विठ्ठल विठ्ठल नामस्मरणाचा विसर ना पडे संसारी*
*तोच खरा वारकरी तोच खरा वारकरी*
*धन्य धन्य तो वारकरी धन्य धन्य ती पंढरी*



# सासर-माहेरची सावली

• मैत्रेय •

माझं माहेर, जिथे मी जन्मले आणि फुलपाखरासारखी बागडत मोठी झाले! त्या घरात माझ्या पायांचे ठसे आणि हसण्याचे आवाज अजूनही उमटत असतात. एकुलती एक लाडकी मुलगी, जिचं प्रत्येक पाऊल नीट पडते ना ह्याची काळजी माझ्या आई-बाबांनी घेतली. जिथे मी सुरक्षित होते. माझं घर म्हणजे, एक घर नव्हे- ते एक लहानसं विश्व होतं. जिथे प्रेम आनंद आणि विश्वास या सगळ्या गोष्टी एकत्र होत्या. एक स्वप्नवत आयुष्य होतं माझं माहेर. जेव्हा मी सासरी आले, तेव्हा माहेरातल्या कितीतरी सुखद सुंदर गोष्टींची साठवण सोबत घेऊन आले.

आता, माझं घर बदललं आहे. माझं हसणारं, खेळणारं, नाना गोष्टीत गुंतलेलं घर सोडून मी एका विश्वात, नव्या कुटुंबात आल्याची जाणीव झाली आहे. या विचाराने सुरुवातीला थोडा धक्का बसला. सासरचं घर म्हणजे एक नवीन जग! नवीन लोकं, नवीन विचार, नवीन संस्कृती. सर्व काही बदललेलं आणि मी, एक अपरिचित व्यक्ती म्हणून त्यांच्यात मिसळून आपलं अस्तित्व निर्माण करणार होते. सासरच्या व्यक्तींना भेटताना मन जरा साशंक होऊ लागलं. मी काय करू? कसं करू?? एकदम आपल्याला ह्या कुटुंबात समाविष्ट होणं कसं शक्य होईल?

सासरच्या घरात पाऊल टाकताना, त्या अनोळखी आणि परक्या गोष्टींबद्दल कुतूहल आणि चिंताही होती. तिथे मी आपली स्वतःची ठाम अशी ओळख निर्माण करू शकेन की नाही? हे सगळं इतकं सोपं नव्हतं. मनात सतत विचार येत होते, 'कसं जुळवू?' 'आता कुठे सुरू करावं?'

कधी कधी ताण येई. घरातले नियम, कुटुंबाच्या अपेक्षा, काही वेळा मनाविरुद्ध भावना-अशा सर्व गोष्टींमुळे वाटायचं की, मी हे करू शकत नाही. मी मनाशी ठरवलं होतं की, थोडा वेळ लागेल, पण सासरचं घरच आपलं माहेर समजून एकरूप होणं आहे. सासर असो किंवा माहेर आपुलकी आणि जिव्हाळ्यानं ते आपलं होऊ शकतं.

त्यामुळे हळूहळू समजून घ्यायला शिकले, मन-मोकळेपणाने बोलायला शिकले, माझी मतं मांडू लागले. कालांतरानं कळलं की जास्त विचार न करता, प्रेमाने आणि समजूतदारीने घेत, एका दमात नाही तर हळूहळू एकमेकांच्या स्वभावांची ओळख करून नाती उलगडायला हवीत. 'जरा वेळ द्या, जरा समजून घ्या' ही आई-बाबांची शिकवण होतीच.जरी मी या कुटुंबाचा एक भाग झाले असले तरी, मनाने, व्यक्तिमत्त्वाने, प्रत्येक गोष्टीत जरा जुळवून घेणं आणि एकमेकांना सांभाळून घेणं हीच खरी कसोटी होती.

सर्वात मोठा प्रश्न होता, सासू-सासऱ्यांना कसं समजून घ्यायचं? त्यांना माझ्या गोष्टी पचनी पडणार का? मलाही त्यांचं वागणं आवडणार का? किती वेळ लागेल एकमेकांशी जुळवून

घेण्यासाठी?

एक-दुसऱ्याला समजून घ्यायला, त्यांच्या विचारांशी जुळवून घ्यायला खूप वेळ लागला, पण एक गोष्ट शिकले : आवश्यक ते दिलं की, आपसूकच सर्व काही शक्य होतं. एकमेकांमध्ये आपुलकीने जिव्हाळ्याचे नाते विणले की, घर हे कुटुंब होतं. एका स्त्रीसाठी घर म्हणजे तिथं असलेला जिव्हाळा, आणि तिथल्या माणसांनी एकमेकांवर दाखवलेला विश्वास! सुरुवातीला, मला वाटत होतं की सासरला आपलसं करण्यासाठी मला माझं माहेर विसरावं लागेल, पण नंतर लक्षात आलं की, तसं काही नाहीये.

सुरुवातीला सासरी आल्यावर, मी नेहमी तणावात असायचे, विचारांच्या जाळ्यात अडकले असायचे. तेव्हा मी खूपच संशयी आणि चिंताग्रस्त होऊन घरातील वातावरणाची उकल करायचा प्रयत्न करत असे. सासू-सासऱ्यांसोबत बोलताना, त्यांच्या वागणुकीविषयी आणि दृष्टिकोनाविषयी मी खूप विचार करायचे, कधी कधी त्यांच्या शब्दांचे अर्थ वेगळे घ्यायचे. ते मला समजावून सांगत असत, पण तरी माझ्या मनाचा गोंधळ व्हायचा. माझ्या मनातील संशय आणि असमाधान यामुळे, सासू-सासऱ्यांना कधीकधी त्रास होत असे. कधीकधी माझ्याकडून त्यांच्यावर अन्याय व्हायचा, त्यांचा वारंवार अपमान होतोय, याकडे माझं नकळत दुर्लक्ष होत असे. पण त्यांच्या संयमाचा आणि चांगुलपणाचा मला प्रत्यय येऊ लागला.

सासू आणि सासरे मला समजून घेण्याचा प्रयत्न करत होते. 'सगळं ठीक होईल', असं त्यांचं शांत शब्दात सांगणं खूप विश्वास देऊन जायचं. तो विश्वास हळूहळू विकसीत होत गेला. माझ्या गोंधळलेल्या विचारांचे ते त्यांच्या चांगुलपणाने निराकरण करत होते. गोंधळलेल्या मला ते अतिशय शांततेने, प्रेमाने हाताळत होते.

हळूहळू मला घरकुल म्हणजे प्रेम, जिव्हाळा, विश्वास आणि सामंजस्य ह्याची प्रचिती येऊ लागली आणि कळलं, कोणतीही गोष्ट तडकाफडकी नाही जमत. प्रत्येक गोष्टीला वेळ लागतो. सासू आणि सासरे माझ्याशी प्रेमाने बोलत, छोट्या छोट्या गोष्टींतून मला समजून घेत. कधी आपुलकीच्या शब्दांनी, कधी हसऱ्या नजरेनं. त्यामुळे माझं मन मोकळं होत गेलं. त्यांचा दृष्टिकोन थोडा वेगळा होता. त्यांच्या संस्कृतीत, वागण्यात वेगळेपण होतं. हळूहळू, त्यांच्या छोट्या छोट्या सवयींशी, त्यांच्या विचारांशी मी सांगड घालत गेले. त्यांच्या प्रत्येक कृतीत एक गोड प्रेम होतं, फक्त मला ते ओळखायला हवं होतं. त्यांच्या प्रत्येक गोष्टींमधून जाणवलं की ते कोणत्याही रूपात मला नाकारत नाहीत. त्यांना माझा अभिमान आहे. नवा जोडीदार, त्याची कुटुंबीयं, त्यांची माया, आपुलकी आणि सहकार्य यांनी मला अलगदच आपलसं केलं. ते प्रेमाने समजावून सांगत, वेळोवेळी प्रोत्साहन देत, आणि काही वावगं होईल असं वाटलं की शांतपणे मार्गदर्शन करीत.

नवरा, जो आता माझा सर्वात जवळचा मित्र बनला आहे, तोही माझं मार्गदर्शन करायचा. ''काळजी करू नकोस, मी आहे ना,'' म्हणणारा, ''आशा ठेव'' असं सांगणारा तो हळूहळू माझा आधार बनला. आज, त्या चांगुलपणाच्या आधाराने, घरातला प्रत्येक क्षण सुखद होऊ लागला आहे. सासू-सासरे आता माझ्या नजरेत मला समजून घेणारे मित्र, मार्गदर्शक बनले आहेत. त्यांच्या प्रेम आणि आधारामुळे घराच्या नात्यांमध्ये नवीन ओलावा आला आहे. आता, या घरातली प्रत्येक गोष्ट बदलली आहे. कुटुंबातील गैरसमज दूर होऊन विश्वास आणि प्रेमाचं वातावरण तयार झालं आहे. घरात हसणं, बोलणं, विचार मांडणं,सर्व काही प्रगल्भ आणि गोड झालं आहे.

आता वाटतं सासरी काही गोष्टी वेगळ्या होत्या, त्यांचा विचार, वागणं, संस्कृती-हे ही वेगळं होतं. पण त्या वेगळेपणाचं मला आकर्षण वाटायला लागलं होतं. घराच्या प्रत्येक सदस्याच्या कृत्यांमध्ये मला हळूहळू चांगुलपणा दिसू लागला होता. सासूच्या गप्पा, सासऱ्यांच सहकार्य ह्यात आपलेपण जाणवायला लागलं होतं.

सुरुवातीला, माहेराचीच ओढ वाटत होती. पण सासरच्या कुटुंबात काहीतरी आपलेपण होतं. कधी चूक झाली, तर ते प्रेमाने समजून सांगत, एखाद्या लहान गोष्टीतूनही आनंद मिळवायचा प्रयत्न करीत. त्यांना शिकवायला, त्यांच्याशी संवाद साधायला, त्यांच्यासोबत हसत-खेळत वेळ घालवायला खूप छान वाटू लागलं. माझं सासरच माझं माहेर झालं, जिथे मी एक स्त्री, एक पत्नी, एक मुलगी म्हणून कुटुंबात नांदू लागले.

आता वयाच्या ज्या वळणावर मी उभी आहे, तिथे माझं सासर,माझं घर आणि घरातील प्रत्येक जण हे माझे कुटुंबीय झाले आहेत. जिथे प्रेम आहे, तिथे गैरसमजांचा पगडाही दूर होतो. आज हे घर, हे कुटुंब बनलं आहे, एक आनंदी घरकुल! त्यातल्या छोट्या छोट्या गोष्टी मला आपल्याशा करीत आहेत. सासू-सासऱ्यांना कुटुंबातील प्रत्येक गोष्टीमध्ये सामावून घेणं, सासूच्या गप्पांमध्ये सहभागी होणं मला आनंद देऊन जातं. आता मला समजलं आहे की, सासर माझं माहेर होऊ शकतं आणि सासर मला ते सगळं देऊ शकतं, जे मला माहेरानं दिलं होतं. सासरच्या घरातील प्रत्येक सण, गोड बोलणं, छोट्या गोष्टींचं आनंद घेणंऱ्यातून

हळूहळू सासरचं घर माझं दुसरं घर झालं आहे. सासरच्या कुटुंबाशी बांधलेल्या नात्यामुळे आज मी माझ्या माहेराची आणि सासरच्या घरातली, अशा दोन्ही जागा प्रेमाने व्यापुन आहे. मी आता दोन घरांच्या सुंदर नात्यात वावरणारी मुलगी म्हणून उभी आहे.एक गोष्ट सांगू इच्छिते-सासरचं घर फक्त बाह्य रूपाने नाही, तर सासू-सासऱ्यांच्या चांगुलपणामुळे खरोखरंच एक सुंदर घर बनलं आहे. आणि या घरात, प्रत्येक गोष्टीत विश्वास, प्रेम, आणि सामंजस्य नांदतं आहे.

ही कथा एका अनामिक नायिकेची आहे. कथा वाचताना कदाचित तुम्हाला तुमच्या आयुष्यात डोकावल्याचा भास झाला असेल. तुम्हाला कदाचित तुमचं माहेर दुरावल्याची रुखरुख वाटत नसेलही कारण तुम्ही तुमच्या प्रेमानं आणि आपुलकीनं सासरलाच माहेर करून टाकलं असेल. काहींना ते जमलही नसेल पण अजून प्रयत्न करायला काय हरकत आहे. नाती जोडायला प्रचंड कष्ट लागतात. नाती तुटायला वेळ लागत नाही आणि तुटलेली नाती पुन्हा जोडणं त्याही पेक्षा कठीण.

*माहेरचं घर ओलावा देणारं,*
*सासरचं घर प्रेमाने जोडणारं,*
*माहेरी आठवणींचं चंद्रप्रकाश,*
*सासरी विश्वासाचं आकाश.*

## अहो, ऐकलंत का?

## व्हॅन्कुव्हरविषयी थोडे जाणून घेऊ !

- व्हॅन्कुव्हरचं मूळ नाव ग्रॅनव्हिल होतं. १८८६ साली त्याला 'व्हॅन्कुव्हर' हे नाव देण्यात आलं, पण त्याच वर्षी मोठ्या आगीत जवळजवळ संपूर्ण शहर जळून गेलं होतं .
- व्हॅन्कुव्हर शहराच्या आतून एकही महामार्ग जात नाही.
- व्हॅन्कुव्हरमधील स्काय ट्रेन (SkyTrain) ही जगातील सर्वात मोठी चालकविरहित मेट्रो आहे.
- स्टॅन्ली (Stanley) पार्कभोवतीचा सी-वॉलचा (Seawall) मार्ग हा जगातील सर्वात लांब सलग असा पाण्याजवळचा मानवनिर्मित रस्ता आहे.
- व्हॅन्कुव्हरमधील गॅस-टाऊन भागाचे नाव 'जॉन डाइटन' नावाच्या एका बार-मालकावरून ठेवण्यात आले आहे, त्याचे टोपणनाव होते 'गॅसी जॅक'.
- गॅस-टाऊन स्टीम क्लॉक दिसायला जरी वाफेवर चालणारे वाटत असले , तरी त्याची यंत्रणा मुख्यतः इलेक्ट्रिक मोटरवर अवलंबून आहे. वाफेचा वापर केवळ प्रात्यक्षिकांसाठी आणि दर पंधरा मिनिटांनी वाजणाऱ्या शिट्ट्यांसाठी केला जातो.
- व्हॅन्कुव्हर-सनच्या (Vancouver Sun) इमारतीत कॅनडातील पहिली आधुनिक प्रिंटिंग प्रेस वापरण्यात आली होती.
- ग्रॅनव्हिल आयलंड पूर्वी औद्योगिक क्षेत्र होते; आता ते सांस्कृतिक केंद्र व बाजारपेठ आहे.
- व्हॅन्कुव्हर आर्ट गॅलेरी असलेल्या इमारतीत पूर्वी ब्रिटिश कोलंबियाचं कोर्ट होतं.
- ग्राउस माऊंटनचे 'ग्राउस' असे नामकरण १८९४ मध्ये गिर्यारोहकांनी केले कारण त्यांनी तेथे 'ब्ल्यू ग्राउस' नावाच्या स्थानिक पक्ष्याची शिकार केली होती. जगातील पहिली डबल-चेयरलिफ्ट १९४९ मध्ये ग्राउस माऊंटनला बांधण्यात आली.
- स्टॅन्ली पार्कमधील 9 O'Clock Gun (तोफ) १८९८ पासून दररोज रात्री ९ वाजता फायर केली जाते.
- मागील वीस वर्षांपासून कॅनडा प्लेस येथे 'हेरिटेज हॉर्न्स'वर दररोज दुपारी बारा वाजता 'ओ कॅनडा' या राष्ट्रगीताचे पहिले चार सूर वाजतात.
- कॅनडातील सर्वात उंच झुलता पूल (suspension bridge) ब्रिटिश कोलंबिया प्रांतातील गोल्डन शहरामध्ये आहे.




# मी आणि किलबिल मराठी शाळा

**• आयुष फडके •**

तुम्ही कधी असं बघितलं आहे का की कोणीतरी दुसऱ्याची कॉपी करत करत, स्वत:च ती गोष्ट शिकायला लागतो? मी लहान असताना जेव्हा माझे आजी –आजोबा मराठीत बोलायचे, तेव्हा मी त्यांना कॉपी करायचो. तेव्हा ते सगळं करताना मला मजा वाटायची. पण आई बाबांना वाटलं की मला मराठी शिकण्यात इंटरेस्ट आहे आणि त्यांनी मला मराठी शाळेत घातलं. आजही मला हे कळत नाही की मला मराठी बोलता येत नव्हतं आणि मी मराठी शाळेची पाच वर्षं कशी पूर्ण केली?

सगळ्या चांगल्या गोष्टींसारखी माझी गोष्टसुद्धा सुरुवातीपासून सुरू झाली – म्हणजे बालवाडीपासून. शाळेच्या पहिल्या दिवशी मी थोडा घाबरलो होतो की मला एकट्यालाच मराठी येत नाही. पण तिथे माझ्यासारखी अनेक मुलं होती. त्यांना पाहून मला बरं वाटलं. मला तेव्हा माहीतही नव्हतं की तीच मुलं माझे चांगले मित्र होतील. जसा वेळ गेला तशी मला शाळेची सवय झाली. मला मराठी शिकताना मजा यायला लागली. तेव्हा मराठी शाळा म्हणजे फक्त मजा आणि खेळ व्हायचे. मराठी बालगीतं गाणं, टोप्या विकणाऱ्याची गोष्ट ऐकणं – हे सगळं खूप मजेशीर वाटायचं. घरी येताना मी खूप खूष असायचो. ते पाहून माझी आजी म्हणायची, एका मुलाची मजा आहे!

बालवाडीनंतर पहिली म्हणजे एकदम वेगळीच होती. खरंतर माझे सगळे मित्र माझ्याच वर्गात होते, त्यामुळे तसा काही प्रॉब्लेम नव्हता. पण अभ्यास जरा अवघड होता. पाच अक्षरांपेक्षा मोठा शब्द लिहायचा हा विचार करूनच मी घाबरलो होतो. हे बालवाडीसारखं गाणी गोष्ट ऐकण्यासारखं नव्हतं. आता होमवर्कपण होतं. शाळेत जे शिकलो, तेच घरी परत करून आणायचं आणि दर आठवड्याला मावशीला दाखवायचं. हे तर माझ्या नेहमीच्या शाळेतसुद्धा अजून झालं नव्हतं! पहिलीमध्ये महाराष्ट्र व भारताच्या इतिहासाची सुरूवात झाली. मला शिवाजी महाराजांबद्दल शिकायला मिळालं. तसेच दिवाळी, होळी, गुढीपाडवा यासारख्या भारतीय सणांबद्दल शिकायला मिळालं. हे सगळं नवीन आणि खूप कठीण होतं. पण पुढे काय येणार आहे हे माहीत असतं तर मला पहिलीमध्ये खूपच सोप वाटल असत.

दुसरी आणि तिसरीचे वर्ष एकसारखे वाटले. दोन्ही वर्षात तीच मावशी शिकवायला होती, अभ्यासाची लेवलपण सारखीच होती, आणि माझे सगळे मित्रसुद्धा माझ्याबरोबर होते. त्या वर्षी आम्ही भारताचा इतिहास अजून जास्त शिकलो. शिवाजी

महाराजांच्या युद्धांबद्दल आणि त्यांच्या विजयांबद्दल माहिती मिळाली. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक यांच्यासारख्या स्वातंत्र्यसैनिकांबद्दलसुद्धा शिकलो. व्यक्तिपरिचयमध्ये त्यांच्यावर बोलावं लागलं. याचबरोबर समाजसुधारकांविषयी आणि त्यांनी समाजासाठीच्या केलेल्या कामाबद्दल शिकायला मिळालं. होमवर्क कठीण झाला होता. छोट्या वाक्यांपासून एक पूर्ण पानभर निबंध लिहायला लागायचा. याचवर्षी मराठी, गणितसुद्धा सुरू झालं - इंग्लिश गणितासारखंच, पण मराठी आकडे आणि मराठी भाषेत! पण अभ्याससाबरोबर आमची मजा आणि फ्रेंडशीपसुद्धा वाढली. कोविड लॉकडाऊनच्या वेळी मराठी शाळा ऑनलाईन झाली. तरीही आमचं काही बदललं नाही, आम्ही दर आठवड्याला शाळेची वाट पाहायचो.

मला चौथी ही तिसरीपेक्षा फार वेगळी वाटली, पण अभ्यास एकदम वेगळा होता. त्या वर्षी आम्ही समाजसुधारक जोतिबा फुले आणि महाराष्ट्रातील थोर संत जसे की रामदास स्वामी यांच्याबद्दल शिकलो. इतिहासाबरोबरच कविताही होत्या. त्या खूपच मजेदार वाटल्या कारण त्यामुळे ग्रेसफुली कसे लिहावे ते शिकायला मिळालं. माझी आवडती कविता होती 'अग्गो बाई ढग्गो बाई'. पुढे माझे आधीसारखच खेळ, मजा आणि शिकणं सुरू होतं. त्यामुळे त्या वर्षीच्या आठवणी खूप खास आहेत. त्या आठवणींपैकी एक म्हणजे आम्ही मराठी बोलताना केलेले गोंधळ.

आपल्याला माहिती आहे ना, कधी कधी भाषा नीट येत नसते आणि आपण ती दुसऱ्या भाषेतून भाषांतर करून बोलायचा प्रयत्न करतो आणि तिथेच खरी गंमत होते!

मी पण काही वेगळा नाही आणि म्हणून मी पण गंमती केल्या.

I was playing music असं म्हणायचं असताना मी सहज म्हणायचो, मी म्युझिक खेळत होतो.

आता बघा ना, म्युझिक खेळायचं असतं का? पण मला तेव्हा ते अगदी बरोबर वाटायचं!

पुढे एकदा वर्गात मावशीने प्रश्न विचारला. मला सर्वात आधी उत्तर द्यायचं होतं. तर मी उभा राहून मोठ्या आवाजात म्हणालो मी पहिला जाऊ?? सगळे एकदमच हसायला लागले.

आणि अजून एक भारी किस्सा. बसमध्ये चढलोय असं सांगायचं होतं, तर मी म्हणालो मी बसवर चढलो. म्हणजे, जणू मी बसच्या टॉपवर चढलो आहे असं वाटेल ना!

तर अशी ही माझ्या भाषेची मजेदार सफर होती. पण हीच मजा-मस्ती पुढच्या वर्षाला कठीण बनवून गेली.

पाचवीसाठी सर्वात जास्त मेहनत लागली. मागच्या वर्षीपेक्षा गृहपाठ तीन पट झाला होता आणि तो कठीणसुद्धा होता. महाराष्ट्राचा इतिहास नीट जमत नव्हता, त्यात भारतीय कला आणि खेळपण आले. निबंध लेखन, पत्र लेखन, बातमी लेखन यासाठी क्रीएटिविटी वाढवावी लागली. या वर्षासाठी खूपच मेहनत लागली कारण काम एवढं होतं की फक्त पाहिलं तरी थकल्यासारखं व्हायचं.

मराठी संस्कृती, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांच्याबद्दल खूप माहिती मिळाली. त्यांनी समाजासाठी केलेल्या कार्यामुळे मी प्रेरित झालो. पण पसायदान पाठ करताना मात्र मला घाम फुटला होता. वेग-वेगळ्या सणांवर रिसर्च करताना रामायण, महाभारत यातील खूप छान गोष्टी कळल्या.  या सणांचे महत्त्व कळल्यामुळे मला खूप फायदा झाला. आधी मी फक्त पूजेसाठी उभा राहायचो आणि बाबा पूजा करताना टाळ्या वाजवायचो. पण आता, मी स्वतः पूजा करतो. माझे रायटिंग स्किल (writing skill) आणि क्रीएटिविटि वाढवण्याची खूप गरज होती. त्यासाठी ती गोष्ट होत असताना मी तिथेच होतो असा विचार करून लिहायला शिकलो. माझ्या आईने मला हे सगळं शिकवण्यासाठी खूप मेहनत घेतली. काळजी करू नका, शेवटी मी पास झालो! फक्त पास नाही, मला किलबिल शाळेच्या किलबिलाट ह्या कार्यक्रमात निवेदन करायला मिळालं. ती माझ्यासाठी खूप मोठी संधी होती.

मी नक्की सांगू शकतो की मराठी शाळा नसती, तर मी आयुष्यात इतका पुढे आलोच नसतो. मला सेम कल्चर आणि सेम भाषा बोलणारे मित्र मिळाले नसते. मी ज्या भाषेत बोलू शकत नव्हतो, त्या भाषेत आता इतका चांगला बोलू शकतो ते फक्त मराठी शाळेमुळेच!. यामुळे मला असं कळलं आहे की मेहनत आणि चिकाटीने काहीही करू शकतो. मराठी शाळेत गेल्यामुळे मी हायस्कूलसाठी आणि जीवनासाठी तयार झालो आहे - कोणतीही गोष्ट न घाबरता शिकायला तयार आहे. मराठी शाळेचा अभ्यास पूर्ण केल्याचा मला अभिमान आहे.

# १९४७

• केतकी पाटील पारखी •




साल १९४७. जून चा महिना. पावसाने हजेरी लावली. सगळीकडे चिकचिक. सुधाकर चिंब भिजला होता. दवाखान्यातली बॅग बाजूला ठेवली आणि 'जरा बोलायचंय पण आधी चहा टाक कडक!' असं सुनंदाला सांगून सुधाकर आवरायला गेला. सुनंदाने लगबगीने चहा केला. चवीला थोडे शेंगदाणे आणि फुटाणे. आज स्वारी लौकर कशी काय आली याचं तिला आश्चर्यच वाटलं.

'आज दवाखान्यात जास्तं गर्दी नव्हती वाटतं.' सुनंदा म्हणाली. चहाचा पहिला घोट घेतला आणि सुधाकर म्हणाला –

'बदलीची ऑर्डर आलीये.' सुनंदाला वाटलं गावातल्या गावात नुसता दवाखाना बदल झाला असेल. जास्तीत जास्त सातारा, सांगली, मिरज, कोल्हापूर. 'एकदम अमृतसर – पंजाबात, 'हेड ऑफ रेसिडेंट्स' म्हणून पदोन्नती झाली आहे. ही घे ऑर्डर. देवापुढे ठेव.'

सुधाकरचे वडील – पुण्यातील निष्णात वैद्य. त्वरित म्हणाले 'अरे वाह, नाव काढलास लेका. कधी रुजू व्हायचं आहे?' सुधाकरनी सगळा तपशील सांगितला. पुण्याच्या नामवंत 'बी जे मेडिकल' कॉलेज मधून सुधाकर ने वैद्यकीय पदवी घेतली. वडिलांच्या पठडीत तयार झालेला सुधाकर, सहजतेने वैद्यकीय जीवनात पुढे सरसावला. चार वर्षांपूर्वी सुनंदाशी विवाह झाला आणि लेकरू – विनय आता २ वर्षांचं झालं. विनयचा पायगुणच म्हणा, सुधाकरची चांगली प्रगती होऊ लागली. घरातलं पहिलं नातवंडं त्यामुळे विनय सगळ्यांचाच लाडका. सुधाकरची आई देखील मुलाची प्रगती बघून खुश झाली. पाणावलेल्या डोळ्यांनी सुधाकरला जवळ घेऊन ती म्हणाली, 'अभिमान वाटतो तुझा. तुम्ही' तिघे तयारीला लागा. सुखानी संसार करा. लेकराची काळजी घ्या. बघता बघता प्रवासाचा दिवस आला. आईनी ज्ञानेश्वरी सोबत दिली. हातावर दही ठेवलं आणि शुभाशीर्वाद दिले. मजल दरमजल करत सुधाकर, सुनंदा आणि लहान विनय पंजाबात पोचले. त्यांची राहण्याची सोय सरकारी निवासस्थानात झाली. अगदी रुग्णालयाला लागूनच. म्हणजे वेळेला डॉक्टर हजर आणि बाकी निवासी डॉक्टरांवरपण लक्षं ठेवता येईल या अंदाजाने एवढ्या जवळ सोय केली असावी. सुनंदाने देव बसवले, चूल मांडली आणि नव्याने संसाराला सुरुवात झाली. हळूहळू शेजारीपाजारी ओळखी झाल्या. येणं जाणं सुरू झालं. अनोखी भाषा, अनोखा पेहेराव आणि नवीन पदार्थ, सगळ्याची हळूहळू ओळख झाली. सुनंदा व विनय नवीन मित्र परिवारात रमू लागले, सुधाकरचं काम वाढू लागलं आणि एकीकडे भारताच्या स्वातंत्र्याची चळवळ जोर धरू लागली.

बघता बघता ऑगस्ट उजाडला. एकीकडे भारताच्या स्वातंत्र्याची चाहूल लागली तर एकीकडे विभाजनाच्या गोष्टी तीव्र होऊ लागल्या. हिंदू- मुस्लीम, शीख- इसाई यांच्या ऐक्याची जणू रोजच्या रोज परीक्षा सुरू झाली. सुधाकर नेटाने काम करत होता. त्याच्या हाताला खूप गुण होता. धर्मांध माथेफिरुंच्या नादी न लागता सत्याच्या आणि नीतीच्या मार्गानी, ज्ञानेश्वरीतले बोल स्मरत जनहितासाठी झटत होता. शेजारीपाजारी आता जरा येणं जाणं कमी झालं. जो तो स्वतःच्या कुटुंबाच्या सुरक्षेसाठी दक्ष झाला. पण घात झालाच.

१४ ऑगस्ट १९४७ ची रात्र. अमृतसरात आणि बाकी

जवळील गावांमध्ये जीवघेणा वणवा पेटला. विभाजनाचा वणवा. भारताचे दोन तुकडे करून एक नवीन राष्ट्र निर्माण झालं - मुस्लिम धर्मीय - पाकिस्तान आणि १५ ऑगस्टच्या मध्यरात्री हिंदुस्थान! भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा झाली. पण स्वातंत्र्याची एवढी किंमत मोजावी लागेल असे कोणालाच वाटले नव्हते. जो तो जीव मुठीत घेऊन दक्षिणेला धावू लागला- हिंदुस्थानच्या दिशेने. सगळीकडे एकच गोंधळ उडाला आणि यातच दंगलींनी पेट घेतला, जाळपोळ, लुटालूट आणि बरच काही सुरू झालं.

सुधाकरने सुनंदा आणि विनयला घेऊन तडक रेल्वे स्टेशन गाठलं. असेल नसेल ती ट्रेन पकडली आणि निघाला, तोच ट्रेनवर हल्ला झाला. काही कळायच्या आत सुनंदावर हल्ला झाला आणि होत्याचं नव्हतं झालं. सुधाकरच्या कडेवर बसलेला विनय ओक्साबोक्शी रडू लागला. टाहो फोडून रडणाऱ्या विनयचा कर्कश आवाज सहन न झाल्याने एका माणसानी विनयला ओढून घेतलं आणि तोंड दाबून... सुधाकर हतबल होऊन मेल्यासारखा पडून राहिला. ह्या दुर्दैवी घटनेने तो पुरता कोलमडला. थोड्या वेळानी ट्रेन सुटली आणि दिल्लीला पोचली. कसंबसं स्वतःला सावरून सुधाकर शासकीय निवासस्थानात पोचला. त्याच्यासारखे लाखो लोक अन्न, वस्त्रं आणि निवाऱ्याचा शोधात शासकीय कॅम्पसमध्ये दाखल झाले. कोणाची आई-वाहील, बहीण-भाऊ तर कोणाची मुलं, घरं, शेती, रातोरात खाक झाले. सर्वजण एकमेकांच्या दुःखात सहभागी होऊन ते पचवायची ताकद देत होते.

अशाच एका संध्याकाळी कॅम्पमधला दवाखाना बंद करून सुधाकर थोडी सामानाची जमवाजमव करत होता. तोच त्याची नजर ज्ञानेश्वरीकडे गेली आणि आता घरी कळवायला हवं हे त्याच्या लक्षात आलं. लगेच त्याने पत्र लिहून सगळी हकीकत सांगितली. माझी चिंता नसावी असं लिहून मला थोडं एकटं राहू दे अशी विनंती केली.

मग ज्ञानेश्वरी हाती घेतली. आणि पहिल्या शब्दापासून जणू काही आयुष्याचा नव्याने अर्थ कळू लागला. ''श्रीकृष्ण कोपोनि ज्यासी मारी । तो पावे परब्रह्मसाक्षात्कारीं ।'' ही ओळ वाचून तर तो धाय मोकलून रडायला लागला. सुनंदा आणि विनयला गमावल्याच्या दुःखापेक्षा त्यांना परब्राम्हाची प्राप्ती झाली या विचाराने तो सुखावला.. ज्ञानेश्वरीने सुधाकरला उमेद मिळाली. जगण्यासाठी एक ध्येय मिळालं. लोकांसाठी जगण्याचा ध्यासच लागला. एकही दिवस सुधाकर दवाखाना बंद ठेवत नसे. पुढे तर त्यानी दवाखान्यातच ज्ञानेश्वरी ठेवली. आता ज्ञानेश्वरी त्याच्या जगण्याचा भाग झाली आणि त्याच्या आचरणात देखील आली.

७-८ वर्षे उलटली आणि एकेदिवशी एक फकीर एका मुलाला घेऊन दवाखान्यात आला. त्या मुलाच्या डोक्यात खोक पडली होती. तो रक्तबंबाळ मुलगा वेदनेने रडत होता. ते सगळं दृश्य बघून, सुधाकरला छोट्या विनयची आठवण आली. आज विनय ह्याच वयाचा असता. अचानक त्या मुलाच्या वेदनेपुढे सुधाकरला त्याचे दुःख मोठे वाटू लागले. त्या फकीराबद्दल द्वेष, तिरस्कार आणि सूडाच्या भावना मनामध्ये येऊ लागल्या. सुधाकरला वाटलं हीच संधी आहे, जसा विनय माझ्यापासून ह्यांनी हिरावून घेतला तसाच मी आज... आणि डॉक्टर सुधाकरने एक अविचारी पाउल उचललं. एक इंजेक्शन भरलं ज्याने त्या मुलाला कायमची विश्रांती मिळेल. इंजेक्शनची सुई टोचणारी, तोवर सुधाकरची नजर टेबलवर ठेवलेल्या ज्ञानेश्वरीकडे गेली. क्षणात त्याच्या हातून ते इंजेक्शन खाली पडलं आणि तो घोर अपराधापासून मागे वळला. तो मनातल्या मनात पसायदानाच्या ओळी पुटपुटू लागला-

*''जें खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।*
*भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचें ।।*
*दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।*
*जो जे वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात ।।''*

दुष्ट लोकांना सुबुद्धी व्हावी, त्यांच्या हातून चांगले कार्य घडावे आणि परस्परांमध्ये मित्रत्व वाढावे हेच ज्ञानेश्वरी शिकवते. दुष्ट लोकांच्या आयुष्यातील अंधार दूर होऊन त्यांचे आयुष्य स्वधर्माने प्रकाशित होऊ दे. यापुढे जाऊन, सर्वांच्या इच्छा पूर्ण होवोत, कायम सर्वांचं चांगलच होऊ दे, हीच भावना ज्ञानेश्वरी रुजवते. त्याला तडा जाणारं वागणं हे अधर्मी, अविचारी आणि स्वार्थी आहे.

स्वतःला सावरून सुधाकरने त्या मुलाची सुश्रुषा केली. दिवस रात्र त्याच्या उशाशी बसून होता. २ दिवसात तो मुलगा बरा झाला. घरी जायचा हट्ट करू लागला. मग फकिराने डॉक्टरांचे आभार मानले आणि म्हणाला - 'धन्यावाद डॉक्टर. ज्याचा ह्या जगात कोणी नाही त्याचा परमेश्वरच पाठीराखा. तुम्ही अगदी देवासारखे धावून आलात. १९४७ च्या फाळणीमध्ये मुलाचे आई वडील गेले, तेंव्हापासून मीच वाढवत आहे त्याला. जसं जमेल तसं.' सुधाकर फाळणी हा शब्द ऐकून निःशब्द झाला. मित्रांबरोबर लौकर खेळायला जायचं म्हणून तो मुलगा स्त्याने भराभरा चालू लागला. तेवढयात त्या फकिराने मुलाला हाक मारली 'विनय, थांब जरा, सावकाश, विनय, पळू नकोस रस्त्याने.'

(ही कथा श्री. रोहन उपळेकर यांच्या वारीच्या अनुभववार आधारित आहे.)



# लॅपलँड – सांताक्लॉजच्या गावाची सफर

• अनिरुद्ध म्हैसकर •

लोक म्हणतात की प्रवास केल्याने आपली दृष्टी विस्तृत होते, विचार करण्याची पद्धत बदलते आणि आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो. मागे वळून पाहिल्यावर मी नक्की सांगू शकतो की हे अगदी खरं आहे. गेल्या वीस वर्षांत आम्हाला पाच देशांत राहण्याची आणि जवळपास १९ देशांमध्ये प्रवास करण्याची संधी मिळाली. मी स्वतःच्या परंपरेशी जोडलेलो असतानाही येथील विविध संस्कृती, जीवनशैली, आणि भाषा अनुभवताना मला खूप काही शिकायला मिळालं.

ज्या देशांना आम्ही आपलं घर म्हणू शकलो त्यापैकी एक होता फिनलंड, विशेषतः त्याची राजधानी हेलसिंकी, ज्याचा अर्थ आहे 'जिथे सूर्य मावळतो.' फिनलंडला जगातील सर्वात आनंदी आणि सुरक्षित देशांमध्ये गणलं जातं आणि तिथली उत्कृष्ट शिक्षणपद्धती संपूर्ण जगभरात आदराने पाहिली जाते.

फिनलंडच्या समाजातील प्रामाणिकपणा आणि सचोटी दर्शवणाऱ्या असंख्य कथा आहेत. मित्र आणि सहकारी नेहमी अशा गोष्टी सांगायचे. उदाहरण द्यायचे झाले तर, एका टॅक्सीत विसरलेली €४,००० असलेली पर्स तशीच परत मिळाली आणि ड्रायव्हरने बक्षीस (टीप) घेण्यास नकार दिला. किंवा एका नोकिया कर्मचाऱ्याचा मजेशीर प्रसंग सांगतो, त्याला अमेरिकन विमानतळावर थोडा वेळ ताब्यात घेतलेलं कारण त्याच्या पासपोर्टवर राहण्याच्या ठिकाणी नोकीया लिहिलेलं होतं. जेव्हा त्यांना समजलं की नोकिया हे खरं तर फिनलंडमधलं शहर आहे, तेव्हा अधिकाऱ्यांना आश्चर्य वाटलं. नोकियानविर्ता नदीच्या काठावर आयकॉनिक नोकिया कंपनीची सुरुवात झाली.

फिनलंडमध्ये साडेतीन वर्षांच्या वास्तव्यात आम्ही कधीही बस, ट्राम, सिटी ट्रेन किंवा फ्लाइट हवामानामुळे रद्द झालेली पाहिली नाही. हे त्या देशाच्या तयारीचं, कार्यक्षमतेचं आणि लवचीकतेचं जिवंत उदाहरण आहे.

आम्ही ज्या देशात राहतो त्या प्रत्येक देशाचा सखोल अभ्यास करण्याची सवय लावून घेतली आहे. जेव्हा आम्ही फिनलंडला गेलो, तेव्हा आमचा मुलगा लौकिक (ज्याला आम्ही प्रेमाने जय म्हणतो) साधारण ११ वर्षांचा होता. आकांक्षा आणि मी दोघंही

आय टी (IT) क्षेत्रात काम करतो, आणि आमच्या बकेट लिस्टमध्ये एक विशेष ठिकाण होतं, लॅपलँड, अधिकृत सांताक्लॉजचं घर! आणि तिथे भेट देण्यासाठी ख्रिसमसपेक्षा चांगला काळ कोणता असू शकतो?

लॅपलँड आर्क्टिक सर्कलवर आहे, जिथे हिवाळ्यात तापमान अविश्वसनीय -५४°C पर्यंत खाली जातं. लौकिक प्रचंड उत्साही होता. विमानं असूनही स्थानिकांनी आम्हाला हेलसिंकीहून रोव्हानिएमीला (Rovaniemi)जाणारी रात्रीची ट्रेन घेण्याचा सल्ला दिला. आम्ही बेड आणि खासगी बाथरूम असलेली फॅमिली केबिन बुक केली.

मी लॅपलँडचा उल्लेख केल्यापासून लौकिक मला जवळजवळ रोज विचारायचा, ''बाबा, तिकीट बुक केलं का?'' शेवटी तो प्रवासाचा दिवस आला. ट्रेन प्रवास हा दहा तासांचा होता! जेव्हा आम्ही ट्रेनमध्ये चढलो तेव्हा हेलसिंकीमध्ये सुमारे -२५° सेल्सिअस तापमान होते आणि बाहेरचे तापमान -२५° सेल्सिअस ते -५४° सेल्सिअस दरम्यान चढ-उतार करीत होते. ट्रेनमधून दिसलेले पहाटेचे दृश्य जादुई होते - बर्फाच्छादित लँडस्केप आमच्या जवळून धावत होते, जणू कोणीतरी पांढरा कॅनव्हास रंगवला आहे आणि ट्रेन ट्रॅक जणू कोणीतरी त्यावरून रेषा काढल्यासारखे दिसत होते.

रोव्हानिएमीला पोहोचलो तेव्हा तापमान तुलनेने कमी म्हणजे -३५°C होते! आर्क्टिक सर्कलवर उभं राहणं रोमांचकारी होतं, कॅमेरे सतत क्लिक करत होते. आम्ही सांताचं अधिकृत पोस्ट ऑफिस पाहिलं, जिथे दर डिसेंबरला जगभरातील मुलं लाखो पत्रं पाठवतात. लौकिकने पुण्यातील आजी-आजोबांना शुभेच्छापत्र पाठवलं आणि आम्हाला आश्चर्य वाटलं की ते फक्त २-३ आठवड्यांत पोहोचलं!

आम्ही हस्की कुत्र्यांनी ओढलेल्या स्लेजमध्ये बसलो, ज्यावर हरणाच्या कातड्याचं आच्छादन होतं. रिसॉर्टमध्ये स्वागत करण्यासाठी असलेल्या १५ फूट उंचीचा हिममानव पाहून प्रत्येक मूल आनंदित झालं, लौकिक याला अपवाद नव्हता. पूर्ण बर्फातून बनवलेली हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स पाहण्याचा अनुभव स्वप्नवत होता. आतल्या बाजूला बर्फावर कोरलेली शिल्पं पाहून खरंच जाणवलं की कलाकाराला फक्त योग्य माध्यमाची गरज असते. हा एक नवीन अनुभव होता.

जिथे चारही ऋतू अनुभवता येतात अशा उष्णकटिबंधीय देशातून आम्ही आलो असल्याने हे जग पूर्णपणे वेगळे वाटले. पण या प्रवासाचे खरे ठळक वैशिष्ट्य होते स्नोबाईकवर बसून पाहिलेले नॉर्दर्न लाइट (Northern Lights), म्हणजेच ऑरोरा बोरेलिस (aurora borealis).

रात्री ९ वाजता, कपड्यांचे ४-५ थरांवर थर घालून आकांक्षा आणि मी स्नोबाईकवर बसलो, आणि लौकिक आमच्या मागे हरणाच्या कातड्यांनी मढवलेल्या स्लेजमध्ये बसला. मार्गदर्शकाने काय करावे आणि काय करू नये याबद्दल अगदी स्पष्ट सूचना दिल्या.१०-१२ कुटुंबांमध्ये आम्ही एकमेव भारतीय होतो. जवळपास दीड तास बर्फाच्छादित जंगलातून प्रवास केल्यानंतर आम्ही शेकोटीजवळ थांबलो आणि स्थानिक बेरीपासून बनवलेलं पारंपरिक फिनिश पेय उबदार ग्लोगी (Glögi) प्यायलो.

त्या नीरव जंगलातून स्नोबाईकवर प्रवास करणं जणू एखाद्या चित्रपटात असल्यासारखं वाटत होतं. आणि मग तो क्षण आला, आकाशभर हिरवे आणि जांभळे प्रकाशाचे तरंग नाचू लागले. तो निसर्गाचा भव्य रंगमंच होता. त्या क्षणी थंडीचं भानच राहिलं नाही. रात्री १२.३० ला परत आलो तेव्हा -३२°C होतं, पाय बधिर झाले होते, पण अनुभव अविस्मरणीय होता. जर कोणी मला पाच वर्षांपूर्वी सांगितले असते की मी हे करेन, तर मी हसून त्यांना वेडे म्हटले असते.

या भागातील स्थानिक लोकांसाठी रेनडिअर शिकार हा सर्वात लोकप्रिय खेळांपैकी एक खेळ आहे. स्थानिक कुटुंबांमध्ये ही एक प्रकारची प्रथा होती.

दुसऱ्या दिवशी नवीन उत्साहाने आम्ही आर्क्टिक प्राणीसंग्रहालय बघायला गेलो. गुडघ्यापर्यंत बर्फ असलेली थंडगार सकाळ होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, बसने त्या दुर्गम भागातील रहिवाशांना वर्तमानपत्रे आणि पत्रे देखील पोहोचवली. विस्तीर्ण क्षेत्रात पसरलेले आर्क्टिक प्राणी संग्रहालय पाहण्यासाठी एक पूर्ण दिवस लागू शकतो. प्रत्येक झाड, छोटे असले तरीही, बर्फात अगदी स्पष्ट दिसत होते जणू निसर्गाने प्रत्येक फांदीची बारकाईने नोंद केली आहे. या प्राणीसंग्रहालया मधील मुख्य आकर्षण होते ध्रुवीय अस्वल, भव्य, विशाल आणि भारावून टाकणारे! त्याच्या समोर उभे राहून मला निसर्गाच्या सामर्थ्य आणि सौंदर्याचा आदर वाटला. असे वाटत होते की पांढऱ्या जगात निसर्गाची सिम्फनी (symphony) आपल्यासमोर उलगडत आहे.

हे खरोखर आश्चर्यकारक आहे की प्राणी अशा कठीण वातावरणाशी कसे जुळवून घेतात. हे आपल्याला मिळालेल्या सोयी-सुविधा किती महत्त्वाच्या आहेत याची पुन्हा आठवण करून देतात. त्यांना पाहून मला अनेक प्रश्न पडले. त्यांना आपल्याप्रमाणे थंडी वाजते का? त्यांना फ्लू होतो का, किंवा आपल्याप्रमाणे थंडी पासून बचाव करण्यासाठी ते शेकोटी आणि गरम पेयांची मदत

घेतात का? या ठिकाणच्या नीरव शांततेत वाऱ्याचा आवाजही एखाद्या संगीता सारखा वाटतो.

बर्फाच्छादित झाडांच्या फांद्यांवर रेंगाळणाऱ्या लहान प्राण्यांपासून ते ध्रुवीय अस्वलापर्यंत निसर्गचक्र शांततेत पूर्णपणे संतुलित पद्धतीने चालते. बर्फात आणि इतक्या तीव्र हवामानातही निसर्गाचे मोहक सौंदर्य असते याची कल्पनाही केली नव्हती. निसर्गाकडून शिकण्यासारखे खूप काही आहे.

लॅपलँडमधला निसर्ग, तिथली शांतता, तिथले प्राणी हे सगळं जीवनभर स्मरणात राहील असं आहे.

मोबाईलचा गजर वाजला. बस पकडण्यासाठी परतण्याची वेळ आली होती. प्राणीसंग्रहालयातून संध्याकाळी ५ वाजता परतण्यासाठी फक्त एकच बस होती. ती चुकली असती तर प्राण्यांसोबत रात्र घालवावी लागली असती.

हेलसिंकीला परतण्याची वेळ आली होती, परंतु आठवणी आमच्या हृदयात कायमच्या कोरल्या गेल्या. लौकिक आपल्या आजी-आजोबा, चुलत भाऊ-बहिणी आणि मित्रांना लॅपलँडबद्दल आठवडाभर सांगत राहिला. खरं तर, आम्ही आमच्या वास्तव्यादरम्यान तीन वेळा लॅपलँडला भेट दिली. आर्क्टिक सर्कल ऑफिसमध्ये, त्यांनी सीमा ओलांडल्याचा पुरावा म्हणून आमच्या पासपोर्टवर शिक्का मारला.

लॅपलँड फक्त एक पर्यटनस्थळ नव्हतं, तो एक अनुभव होता, परीकथेतून उतरलेला. आणि हो, ते खरंच सांताक्लॉजचं गाव आहे!

# खाद्यजत्रा

## मसाला मॅजिक भडंग चिवडा



**- शाल्मली सिवराजन्**

**साहित्य :** लाह्या - २०० ग्रॅम, डाळे - ३० ग्रॅम, लसूण - ५० ग्रॅम, खोबरं (सुकं) - 1/2 कप / ३० ग्रॅम, शेंगदाणे - ५० ग्रॅम, कढीपत्ता - १५-२० पाने, बडीशेप/सौंफ (भाजून पावडर) - १ चमचा, धणे (संपूर्ण, भाजून पावडर) - १ चमचा, जिरे (भाजून पावडर) - १ चमचा, हिंग (अस्सल) - २ चमचे, चिवड्यासाठी तेल - २ कप, मीठ - चवीनुसार, लाल तिखट - १ चमचा, हळद - १ चमचा

**कृती:**

१. मोठ्या कढईत तेल गरम करा.
२. त्यात शेंगदाणे सोनेरी होईपर्यंत परता व बाजूला काढा.
३. त्याच तेलात खोबरे व डाळे कुरकुरीत होईपर्यंत परता.
४. कढीपत्ता टाकून खमंग कुरकुरीत होईपर्यंत परता.
५. लसूण पाकळ्या सोलून, ठेचून मंद आचेवर खरपूस होईपर्यंत परता.
६. वेगळ्या पॅनवर बडीशेप, धणे व जिरे भाजून बारीक पूड करा.
७. आता गरम तेलात हळद, लाल तिखट, हिंग टाका.
८. लगेच लाह्या टाकून नीट ढवळा.
९. परतलेले शेंगदाणे, खोबरे, डाळे, लसूण व कढीपत्ता घालून मिक्स करा.
१०. शेवटी मीठ आणि भाजलेल्या मसाल्याची पावडर घालून नीट मिसळा.
११. पूर्ण थंड झाल्यावर हवाबंद डब्यात साठवा.

या रेसिपीतला भाजलेला मसाला व कढीपत्ता यामुळे चिवड्याला अप्रतिम सुगंध व चव येते.



# माझा एअर कॅडेट्स कार्यक्रमाचा अनुभव

• क्षितिश गद्रे •

लहानपणापासूनच मला विमानं आणि आकाशात उडणं खूप आवडत होतं. मी छोटा असल्यापासून विमानांकडे पाहून माझ्या मनात पायलट होण्याचं स्वप्न होतं. एक दिवस मी माझ्या कुटुंबासोबत सरेला (Surrey) जात होतो, तेव्हा रस्त्यावर मला एअर कॅडेट्समध्ये सामील व्हा असं एक मोठं पोस्टर दिसलं. मला ते खूप आवडलं आणि मी आई-बाबांना सांगितलं. त्यांनी शोध घेऊन मला ७६७ डिअरमेर्न रॉयल कॅनेडियन एअर कॅडेट स्क्वॉड्रन मध्ये प्रवेश मिळवून दिला.

या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी वय किमान १२ वर्षं असावं लागतं, आणि २१ वर्षांनंतर कॅडेटमधून बाहेर पडावं लागतं. यात आम्हाला सर्वात प्रथम शिस्त शिकवली जाते. वेळेवर येणे, योग्य पोशाख घालणे आणि सीनीयर्सचा आदर करणे हे सगळं शिकवलं जातं. यात एव्हिएशनविषयी खूप माहिती मिळते. विमानं कशी उडतात, त्यांचे वेगवेगळे प्रकार, तसेच एअर ट्रॅफिक कंट्रोल कसं चालतं हे शिकायला मिळतं.

या कार्यक्रमाच्या इतर शाखाही आहेत - सी कॅडेट्स (sea cadets) ज्यात नौदल आणि समुद्राविषयी माहिती मिळते, आणि आर्मी कॅडेट्स ज्यात भूदलाची माहिती मिळते. त्यामुळे मुलांना वेगवेगळ्या क्षेत्रांचा अनुभव घेता येतो.

एअर कॅडेट्स पूर्ण केल्यानंतर पायलट लायसन्स किंवा ग्लायडर लायसन्स लवकर मिळू शकते. लहान वयात हे मिळणे ही मोठी गोष्ट आहे. जरी कोणाला पायलट व्हायचं नसेल तरी या अनुभवामुळे कॉलेजमध्ये ॲडिशनल क्रेडिट्स मिळतात. त्यामुळे करिअरच्या संधी वाढतात.

कॅडेट्समध्ये वेगवेगळे गट/ टीम असतात. त्यात बँड हा एक विशेष गट आहे. बँडमध्ये वाद्य वाजवता वाजवता मार्च (march) करावा लागतो. यात संगीत आणि शिस्त असं दोन्ही असतं. आणखी एक गट म्हणजे ड्रिल टीम. यात प्रगत पद्धतीचं मार्चिंग केलं जातं. त्यासाठी अचूक हालचाली, योग्य ताल आणि कोऑर्डिनेशन आवश्यक असते. यामुळे कॅडेट्समध्ये टीमवर्क आणि एकाग्रता वाढते. सुरुवातीला कार्यक्रम थोडा कठीण वाटतो. नवीन गोष्टी, नियम आणि शिस्त यामुळे सुरुवातीला घाबरायला होतं. पण जसजसं आपण पुढे जातो, तसा आत्मविश्वासही खूप वाढतो.

आज मला जाणवतं की हा कार्यक्रम केवळ प्रशिक्षण नाही, तर एक लाईफ-स्कील आहे. यातून शिस्त, मेहनत, टीमवर्क आणि आत्मविश्वास हे चार महत्वाचे गुण शिकायला मिळतात. एअर कॅडेट्समध्ये प्रत्येक मुलगा-मुलगी सुरुवातीला साधा एअर कॅडेट म्हणून येतो. हे सर्वात पहिलं पाऊल असतं. यात कॅडेट्सना युनिफॉर्म कसा घालायचा, शिस्त कशी पाळायची आणि मार्चिंग कसं करायचं हे शिकवलं जातं.

यानंतर पुढचं पद मिळतं - लीडिंग एअर कॅडेट. हे म्हणजे सुरुवातीच्या शिस्तीचा आणि प्रगतीचा पुरावा आहे. मी आत्ता या लेव्हलला आहे. यानंतर कॉर्पोरल हे पद मिळतं. त्यात कॅडेट्सना लहान टीमला लीड करण्याची जबाबदारी असते. यामुळे ते चांगले

लीडर बनतात. कॉर्पोरलनंतर फ्लाइट कॉर्पोरल बनतात . यात कॅडेट्सना मोठ्या गटाला लीड करायला शिकवलं जातं. ते नवीन कॅडेट्सना मार्चिंग, प्रॅक्टिस आणि शिस्त शिकवतात. त्यानंतर सार्जंट पद. सार्जंटवर कॅडेट्सना मार्गदर्शन करणे आणि त्यांना नियम पाळायला शिकवणे अशा जबाबदाऱ्या असतात. मग फ्लाइट सार्जंट पद. फ्लाइट सार्जंट हा स्क्वॉड्रनचा महत्त्वाचा नेता असतो. त्यानंतर कॅडेट्स वॉरंट ऑफिसर सेकंड क्लास बनतात. यात ते संपूर्ण युनिटसाठी महत्त्वाचे निर्णय घ्यायला मदत करतात. सर्वात शेवटी वॉरंट ऑफिसर फर्स्ट क्लास या पदावर पोहोचणं म्हणजे आपण मेहनत, शिस्त, जबाबदारी आणि नेतृत्व सिद्ध केलं आहे याची पावती. तो संपूर्ण स्क्वॉड्रनचा आदर्श मानला जातो.

या रँक्सच्या प्रवासात प्रत्येक वेळी जबाबदारी वाढते. त्याचबरोबर आत्मविश्वास, लीडरशिप, टीमवर्क आणि शिस्त यांची शिकवण आयुष्यभरासाठी मिळते.

एअर कॅडेट्समध्ये विविध क्लब्स असतात. त्यात कॅडेट्सना बँड, ड्रिल टीम, प्रभावी वक्तृत्व, नेमबाजी, विमानचालन, शारीरिक तंदुरुस्ती आणि फर्स्ट एड असे आवडीचे विषय शोधता येतात. यामुळे स्कील वाढते, शिस्त लागते आणि छान मित्रही मिळतात. शिवाय कॅडेट्सना अनेक अनुभव मिळतात. हे अनुभव त्यांचा एयर कडेट्सचा प्रवास सोपा करतात आणि फ्यूचरसाठी त्यांना तयार करतात.

एअर कॅडेट्सचा वर्षाच्या शेवटी ॲवार्ड्स गाला (Awards Gala) असतो. यात कॅडेट्स, तिथे काम करणारे लोक आणि कुटुंबीय एकत्र येऊन वर्षभरातील कामाचा गौरव करतात., नेहमीच्या कामातून थोडी विश्रांती घेण्याची संधी मिळते. या कार्यक्रमामध्ये साधारणपणे भाषणे, बक्षिसे आणि काही छान उपक्रमांचा समावेश असतो. यामुळे कॅडेट्सना छान आठवणी मिळतात.

Annual Ceremonial Review (ACR) हा एअर कॅडेट्सच्या प्रशिक्षण वर्षातील एक महत्त्वपूर्ण क्षण असतो. यात कॅडेट्स आपले कौशल्य, शिस्त आणि वर्षभरात शिकलेल्या गोष्टी सादर करतात. या कार्यक्रमाला कुटुंबीय, समाजातील मान्यवर आणि परीक्षण अधिकारी उपस्थित राहतात. यात साधारणपणे संचलन (परेड), बक्षिस देणे आणि प्रात्यक्षिक दाखवणे अशा गोष्टी असतात.

एअर कॅडेट्स कार्यक्रमामुळे माझं आयुष्य खरंच बदललं आहे. आधी मी लाजाळू, थोडा घाबरणारा मुलगा होतो. पण आज माझ्यातला आत्मविश्वास खूप वाढला आहे. आता मी इतरांसमोर बोलू शकतो, मोठ्या गटात काम करू शकतो आणि नेहमी पुढे जाण्याची हिंमत ठेवतो.

या प्रवासाने मला शिस्त शिकवली. वेळेचं महत्त्व, योग्य पोशाख करणं, आदर ठेवणं आणि जबाबदारी या सगळ्या गोष्टी आता माझ्या रोजच्या आयुष्याचा भाग झाल्या आहेत. या गुणांशिवाय खरा कॅडेट होणं शक्यच नाही. माझ्यातलं धैर्य देखील या कार्यक्रमामुळे वाढलं आहे. आव्हानं कितीही कठीण असली तरी मागे न हटता त्यांना सामोरं जाण्याची ताकद मी शिकलेलो आहे. आज मी स्वतःला आधीपेक्षा अधिक जबाबदार समजतो. माझं प्रत्येक काम माझ्या टीमवर आणि माझ्या भविष्यावर परिणाम करतं हे मला जाणवतं. त्यामुळे आता मी अधिक विचारपूर्वक निर्णय घेतो.लहानपणापासून माझं एक स्वप्न होतं – पायलट होण्याचं. विमानं आकाशात झेपावताना पाहिलं की माझ्या मनात नेहमी एकच विचार यायचा – ''कधी मी असं उडणार?'' आता मला वाटतं की एअर कॅडेट्स हा माझ्या त्या स्वप्नाकडे नेणारा खरा मार्ग आहे.

हो, सुरुवातीला थोडं कठीण वाटलं. नवीन नियम, शिस्त, सततची प्रॅक्टिस यामुळे कधी कधी थकलोही. पण आता मला कळतंय, या प्रत्येक गोष्टीने मला घडवलं आहे. आज मला खात्री आहे की एअर कॅडेट्स हा केवळ एक कार्यक्रम नाही, तर माझ्या आयुष्यातील एक मोलाचा अनुभव आहे. इथं शिकलेली शिस्त, आत्मविश्वास आणि धैर्य मला पायलट होण्यासाठी मदत करतीलच, पण आयुष्यभरासाठी माझा आधार ठरतील.

# सफरनामा – आईसलँड प्रवास – एक स्वप्नवत आठवडा

• अनघा सुरा •



कधी कधी आयुष्यात असा क्षण येतो की आपल्याकडे थोडा वेळ मोकळा असतो आणि मन कुठेतरी दूरवर निघून जायला आतुर असतं. मुलं शाळेच्या सहलीला गेल्यामुळे आमच्याकडे बरोबर एक आठवडा होता. थेट विमानप्रवास असेल व थोड्या दिवसांत खूप अनुभव घेता येतील असं ठिकाण हवं होतं, आणि आमची नजर पडली आईसलँडवर!

लहानपणी जेव्हा आईसलँड या देशाबद्दल ऐकलं होतं, तेव्हा डोळ्यासमोर सतत दिसणारा फक्त बर्फाच्छादित प्रदेश उभा राहत असे, जणू सगळं काही शुभ्र हिमाने झाकलेलं! पण जेव्हा प्रत्यक्ष आईसलँडची माहिती शोधायला सुरुवात केली, तेव्हा जाणवलं की हा देश आपल्या नावापेक्षा कितीतरी वेगळा आहे. आणि जेव्हा तिथे प्रत्यक्ष पाऊल ठेवलं, तेव्हा उमगलं की या देशाला लँड ऑफ फायर अँड आईस (आग आणि बर्फाची भूमी) असं का म्हणतात ते. एकीकडे ज्वालामुखी, उष्ण झरे आणि गरम पाण्याचे झरे तर दुसरीकडे हिमनद्या, बर्फाचे तुकडे आणि महाकाय ग्लेशियर्स. हा विरोधाभासच आईसलँडचं खरं सौंदर्य आहे.

आईसलँड जिथे प्रत्येक वळणावर निसर्ग नवा चेहरा दाखवतो. इथे भव्य धबधबे आहेत, बर्फाचे निळसर खडक आहेत, काळ्या वाळूचे किनारे आहेत, उष्ण पाण्याचे झरे आहेत आणि अर्थातच ऑरोरा बोरेलिस आहे!

इकडे जायचं म्हणून मी आधी फेसबुकवर आईसलँड प्रवासी ग्रुप जॉइन केला. त्यावर मला भरपूर चांगली आणि उपयुक्त माहिती मिळाली. आईसलँड हा कॅनडाच्या तुलनेत फार मोठा देश नाही, त्यामुळे सुरुवातीला आम्ही फारच महत्त्वाकांक्षी प्लॅन केला होता– ९ दिवसांत संपूर्ण रिंग रोड फिरायचा! पण जेव्हा हा प्लॅन त्या ग्रुपवर शेअर केला, तेव्हा अनेक अनुभवी प्रवाशांनी सांगितलं की

आईसलँडचे हवामान खूप अनिश्चित आहे. त्यामुळे आम्ही शेवटी फक्त रेक्जाविक (Reykjavik) आणि दक्षिण आईसलँड फिरायचा निर्णय घेतला. हा निर्णय नंतर खूपच योग्य ठरला. आम्हाला फेसबुक ग्रुपवरून हे ही कळालं होतं की आईसलँडमध्ये रेस्टॉरंटचे जेवण खूप महाग आहे. त्यामुळे आमचा प्रवास बजेट-फ्रेंडली ठेवण्यासाठी आम्ही स्थानिक ग्रोसरी स्टोर्समधून सँडविचेस, स्नॅक्स वगैरे घेऊन जेवलो, आणि अगदी कमी वेळा रेस्टॉरंटमध्ये गेलो. यामुळे खर्च नियंत्रणात राहिला आणि वेळेचा फायदाही मिळाला.

### दिवस १ – रेक्जाविक (Reykjavik) मधील पहिली पावलं

विमानतळावरून थेट गाडी घेतली आणि पेरलन संग्रहालय (Perlan Museum) गाठलं. जेटलॅग असताना हा उत्तम पर्याय ठरतो. दुपारभरात आईसलँडचा निसर्ग, बर्फ, ज्वालामुखी आणि ऑरोराचा अनुभव इथे घेता येतो.

जर रेक्जाविकमध्ये तुमच्याकडे वेळ कमी असेल, तरी या संग्रहालयाला भेट देणे उत्तम! अगदी थोड्या वेळात शहर अनुभवायचे असेल, किंवा जर रेक्जाविकमध्ये सुमारे ८-१० तासांचा स्टॉपओव्हर असेल, तर हे संग्रहालय नक्कीच भेट देण्यासारखे आहे. या संग्रहालयात चांगले शाकाहारी पदार्थ असलेले रेस्टॉरंट आहे. आम्ही येथे दुपारचे जेवण केले.

त्या नंतर हॉटेलमध्ये (डाउनटाउन रेक्जाविक अपार्टमेंट्स) चेक-इन करून आम्ही शहरात फिरायला निघालो. हॉलग्रिमस्किर्कजा चर्च (Hallgrimskirkja Church), रेनबो स्ट्रीट, हार्पा कॉन्सर्ट हॉल आणि समुद्रकिनारी उभं असलेलं सन व्हॉयेजर शिल्प - रेक्जाविकचं सौंदर्य आमच्या डोळ्यांत साठू लागलं.

### दिवस २ – उशिरा सुरू झालेला तरीही अविस्मरणीय दिवस

आम्ही दिवस थोडा उशिरा सुरू केला कारण जेटलॅग होता. शहरात छोटा फेरफटका मारून आम्ही गेलो फ्लायओव्हर आईसलँडला. त्यात आम्ही आईसलँडच्या सुंदर दृश्यांचा अनुभव घेऊ शकलो. ती अशी ठिकाणं होती जिथे तुम्ही गिर्यारोहक नसाल तर जाणं खूप कठीण आहे. आम्हाला शो खूप आवडला.

जगातील एकमेव प्रसिद्ध लावा शो देखील इथेच शेजारी आहे. दुर्दैवाने वेळ कमी असल्यामुळे आम्ही लावा शो पाहू शकलो नाही. त्या दिवशी खूप वारा होता, ज्यामुळे चालणे खूप कठीण होत होते. सुदैवाने आम्हाला रोस्ट नावाचे एक चांगले कॉफी शॉप सापडले. थंडीत गरमगरम कॉफी घेत चालण्याची मजा काही औरच आहे.

पुढचे ठिकाण स्काय लगून होते. आइसलँडमधील सर्वात प्रसिद्ध सरोवर म्हणजे ब्लू लगून, पण आम्ही स्काय लगून निवडले कारण त्यातले पाणी जास्त स्फटिकासारखे स्वच्छ आहे. आम्ही ब्लू लगून पुढच्या ट्रिपसाठी ठेवले आहे. स्काय लगूनला जाऊन आम्ही सूर्यास्तापर्यंत आराम केला. फोन विसरल्यामुळे येथे फोटो काढता आले नाहीत.

स्काय लगून समुद्राजवळ असल्यामुळे त्याला इन्फिनिटी पूलचा अनुभव येतो. बसून फक्त बघत राहावं, असं वाटत होतं सूर्यास्ताचा रंग, समुद्राचा आवाज आणि उबदार पाण्यात डुंबणे - एकदम अविस्मरणीय अनुभव!

**दिवस ३ – प्रवासाची खरी सुरुवात,** विक (Vik) गावाकडे आजपासून आमची रोडट्रीप सुरू झाली. वाटेत ह्वेराडालर भूऔष्णिक क्षेत्र (Hveradalir Geothermal -rea), केरिड क्रेटर (Kerid Crater), गुल्फॉस (Gulfoss), स्ट्रोक्कुर गिझर (Strokkur Geyser), सेल्जालान्डफॉस (Seljalandfoss), आणि काळ्या वाळूचा रेनिस्फ्यारा बीच (Reynisfjara Beach) बघत विकला पोहोचलो.

ह्वेराडालर भूऔष्णिक क्षेत्र येथे एका लाकडी चालण्याच्या मार्गावर तुम्ही भूऔष्णिक उद्रेक पाहू शकता.

केरिड क्रेटर हे एक निष्क्रिय ज्वालामुखी विवर आहे. तिथे आता तळाशी एक तलाव आहे आणि तुम्ही विवराच्या परिघाभोवती फिरू शकता.

गुल्फॉस हा धबधबा खूपच निसर्गरम्य आहे, पण इथे इतका वारा होता की मला 'असा बेभान हा वारा' या गाण्याची आठवण झाली. इथे चालणे खूप कठीण होते. स्ट्रोक्कुर गिझर हा एक सक्रिय गीझर आहे आणि तो दर १०-१२ मिनिटांनी फूटतो. सर्वजण धीराने तो फुटण्याची वाट पाहत होते. हे पाहणे हा एक छान अनुभव होता.

सेल्जालान्डफॉस हा आणखी एक धबधबा आहे. तुम्ही त्याच्या मागे जाऊ शकता. हाच तो गेरुआ गाण्यातील धबधबा!

रेनिस्फ्यारा बीच हा समुद्रकिनारा स्नीकर लाटांमुळे खूप धोकादायक आहे. स्थानिक लोक भरतीच्या वेळी पाण्यात जाऊ नये असा सल्ला देतात. हा समुद्रकिनाराही गेरुआ गाण्यात होता.

निसर्गाचे वैविध्य आणि भव्य दृश्ये पाहून मन भारावून गेले. विकला मुक्काम होता द बार्न हॉस्टेलमध्ये. जर तुम्हाला हॉस्टेलमध्ये राहायचं नसेल, तर येथे स्वीटदेखील बुक करता येतात. आम्ही फक्त थांबायचं आणि विश्रांती घ्यायची असं ठरवून, बजेटचा विचार करून हॉस्टेलमध्ये राहण्याचा निर्णय घेतला. रात्री दोन

वाजता खिडकीतून पाहिलं तर – आकाशात नॉर्दर्न लाईट्स! अनपेक्षित भेट.

### दिवस ४ – हॉफ्नकडे (Hofn) प्रवास

आज आम्ही हॉफ्नकडे निघालो. मार्गात शेवाळयुक्त लावा क्षेत्र (green mossy lava fields), प्राचीन दरी फ्याद्रारग्ल्यूफूर (Fjadrargljufur) आणि स्काफ्टाफेल (Skaftafell) पाहिले.

शेवाळयुक्त लावा क्षेत्र (green mossy lava fields) – ही लावा शेते आहेत ज्यांवर शेवाळ उगवले आहे. गाडी चालवण्यातून विश्रांती घेण्यासाठी हा एक चांगला थांबा आहे.

फ्याद्रारग्ल्यूफूर (Fjadrargljufur) – ही सुमारे २ दशलक्ष वर्षे जुनी खोल दरी आहे. तिची भव्यता पाहण्यासाठी तुम्हाला एक छोटीशी हायक करावी लागेल. But the view is totally worth it.

स्काफ्टाफेल (Skaftafell) – ही एक हिमनदी आहे जिथे तुम्ही त्यावर हायकिंग टूर करू शकता. पण त्यासाठी अर्धा दिवस लागणार होता आणि आम्हाला आमच्या पुढच्या ठिकाणी पोहोचायचे होते. आम्ही ते फक्त दुरून पाहिले. स्काफ्टाफेल कॅफे मध्ये थोडा कॉफी ब्रेक घेतला, आणि नंतर पोहोचलो डायमंड बीचला.

डायमंड बीच हे मोठ्या बर्फाच्या खडकांसाठी प्रसिद्ध आहे जे लगतच्या जोकुल्सारलॉन ग्लेशियर लगून मधून येऊन समुद्रात पडतात आणि येणाऱ्या भरती-ओहोटीमुळे मागे राहतात. भरतीमुळे फारसे बर्फाचे तुकडे नव्हते, पण जवळचं जोकुल्सारलॉन ग्लेशियर लगून मात्र अद्भुत होतं – तरंगणारे बर्फाचे डोंगर नजरेतून जातच नव्हते. येथे Glacier Bay बोट टूर देखील करता येते जी अत्यंत लोकप्रिय आहे, पण ती खूप लवकर बुक होते. दुर्दैवाने, आमच्या वेळेत आम्ही बुकिंग मिळवू शकलो नाही, त्यामुळे हाही अनुभव आम्ही आमच्या पुढच्या उत्तर आईसलँड ट्रीपसाठी ठेवला आहे.

यानंतर आम्ही हॉटेल लिल्जामध्ये चेक-इन केले. तिथे इतका जोरदार वारा होता की मला वाटलं होतं की मी उडून जाईन.! रात्री पुन्हा नॉर्दर्न लाईट्स दिसले, पण वाऱ्यामुळे छान फोटो काढता आले नाहीत.

रात्री लिल्जामध्ये जेवण केले, अत्यंत स्वादिष्ट होते!

### दिवस ५ – हॉफ्नची सफर व परतीचा प्रवास

सकाळी हॉफ्न गाव फिरून निघालो वायकिंग व्हिलेजकडे. चित्रपटातील गावासारखं वाटणारं हे ठिकाण अप्रतिम आहे. इथल्या कॅफेत घेतलेलं हॉट चॉकलेट आजही आठवतं.

संध्याकाळी परतलो डायमंड बीचवर – यावेळी ओहोटीमुळे किनाऱ्यावर भरपूर हिऱ्यांसारखे बर्फाचे खडे चमकत होते. पुढे ड्रायहोलाए आणि विक चर्च पाहून दिवस संपवला. रात्री लावा शो पाहिला – जगातला एकमेव खरा वितळलेल्या लाव्याचा अनुभव!

लिल्जा हे होफ्नच्या आधीच थोडेसे होते, म्हणून दुसऱ्या दिवशी आम्ही थेट होफ्नमध्ये गेलो. तिथे प्रथम ओसलँड पॉइंट(Osland point), बुग्डुलेइरा (Bugduleira) वॉक केले आणि नंतर हँड्राडिन (Handradin) या दुकानात थांबलो. तिथे आम्ही हाताने बनवलेली कलाकुसर पाहिली आणि मग वायकिंग व्हिलेजकडे प्रस्थान केले.

रस्त्यात सी व्ह्यू पॉइंटवर थोडा वेळ थांबलो आणि मग वायकिंग व्हिलेज (Viking Village) व वेस्ट्राहोर्न व्ह्यूपॉइंटला (Vestrahorn viewpoint) गेलो. वायकिंग व्हिलेजमध्ये प्रवेशासाठी तिकिटे वायकिंग व्हिलेज कॅफेमधून घ्यावी लागतात. इथे सहजपणे दिवस घालवता येईल, पण आम्ही साधारण ३ तासच थांबलो. इथे पाणी आरशासारखे आहे आणि एका विशिष्ट कोनातून पाहिले तर तुम्ही पाण्यावर चालत आहात असे वाटते. पुन्हा एकदा खूपच सुंदर आणि देखणे ठिकाण.

परत येताना वायकिंग व्हिलेज कॅफे मध्ये हॉट चॉकलेट घेतले आणि परतीचा प्रवास सुरू केला.

आम्ही पुन्हा डायमंड बीचवर पोहोचलो पण यावेळी विशेषतः लो टाईड झाल्यानंतर पोहोचलो, जेणेकरून अधिक डायमंड्स (बर्फाचे तुकडे) दिसतील. आणि खरंच, लो टाईडमुळे किनाऱ्यावर अधिक 'डायमंड्स' (बर्फाचे तुकडे) होते.

त्यानंतर आम्ही ड्रायहोलाएयकडे (Dryholaey - southern most tip of Iceland) निघालो – आइसलँडचे दक्षिणेकडील टोक, जे एक छोटंसं द्वीपकल्प आहे. इथे मोहक दृश्ये, दीपगृह आणि समुद्रात पसरलेल्या मोठया ज्वालामुखी खडकाची कमान आहे. एप्रिल-मे पासून ऑगस्टपर्यंत स्थलांतरित पफिन पक्षी इथे पाहायला मिळतात. पफिन पक्षी पाहण्याची उत्सुकता होती, पण दुर्दैवाने ते अजून आलेले नव्हते.

मग आम्ही विक गावातील प्रसिद्ध चर्चला पोहोचलो आणि गोल्डन लाईटमध्ये छान फोटो काढू शकलो.

रात्रीच्या मुक्कामासाठी आम्ही गेस्टहाऊस करीना येथे चेक-इन केले. गेस्टहाऊस करीना एक छोटंसं सुंदर ठिकाण आहे, जिथे खाजगी किंवा शेअर्ड बाथरूमसह खोल्या भाड्याने मिळतात. तिथे जेवण गरम करण्यासाठी आणि खाण्यासाठी एक छोटसं किचन व डायनिंग स्पेस आहे.

जेवणानंतर आम्ही लावा शो पाहायला गेलो – दुर्लभ असा

हा अनुभव जगात फक्त दोनच ठिकाणी पाहायला मिळतो. रेक्याविकमध्ये आणि इथे, पण विक मधला हा मूळ शो आहे. आम्हाला हा कार्यक्रम खूप आवडला.

शो संपल्यानंतर आम्ही विश्रांतीसाठी परतलो. आणि पुन्हा सलग तिसऱ्या रात्री आमच्या खोलीतून आम्हाला नॉर्दर्न लाइट्स दिसले. मात्र खूप ढगाळ वातावरण असल्याने या ही वेळी छायाचित्रे चांगली मिळाली नाहीत.

### दिवस ६ – बोरगनेसकडे (Borganes)

सकाळी आम्ही बोरगनेसकडे निघालो. बोरगनेसकडे जाताना आम्ही स्कोगाफॉस (Skogafoss)पाहिला. स्कोगाफॉस हा आणखी एक सुंदर धबधबा. तुम्ही धबधब्याच्या बाजूने चढू शकता आणि एकदा तुम्ही वर आलात की पुढे आणखी एक धबधबा आहे. हा एक मोठा ट्रेक आहे आणि वरती अनेक धबधबे आहेत, पण आम्ही फक्त पहिल्या धबधब्यापर्यंत गेलो आणि परतलो.

पुढे आम्ही थिंगव्हेलिर राष्ट्रीय उद्यानाकडे (Thingevellir National Park) निघालो. जवळपास संपूर्ण दिवस आम्ही इथे होतो. कॉन्टिनेंटल प्लेट्सची आश्चर्यकारक संरचना ज्यात प्लेट्स हळूहळू एकमेकांपासून दूर जात आहेत हे आपण पाहू शकतो.

येथे तुम्हाला सिल्फ्रा फिशर(Silfra fissure) दिसेल जिथे लोक खोल पाण्यात डायव्हिंग करू शकतात. लोक म्हणतात की हे डायव्हिंगसाठी सर्वात स्फटिकासारखे स्वच्छ पाणी आहे.

इथे पुढे पोरुफॉसचा (Porufoss ) अप्रतिम धबधबा पाहून मन भारावून गेलं.

थिंगव्हेलिरमधला अनुभव खरंच न विसरता येण्यासारखा होता. जिथे पृथ्वीच्या दोन महाद्वीपांच्यामध्ये आपण आहोत – आणि दोन खंड एकमेकांपासून दूर जाताना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहता येतात, वेगळाच अनुभव, जस्ट वॉव!

रात्रीसाठी आम्ही हॉटेल हाफनारफ्जाल (Hotel Hafnarfjall) मधील आमच्या कॅबिन मध्ये चेक-इन केले. ही कॅबिन्स ग्लॅम्पिंगसाठी आहेत- दुहेरी बेड, खाजगी बाथरूम, छोटं किचन आणि आरामदायी बसण्याची सोय होती. निसर्गाच्या कुशीत, पण तरिही घरासारखं वाटत होतं. खूप छान अनुभव होता.

### दिवस ७ – स्नाएफेल्सनेस द्वीपकल्प (Snaefellsnes peninsula)

सकाळी आम्ही स्नाएफेल्सनेस द्वीपकल्पाकडे प्रवास सुरू केला. रस्त्यातच गर्डुबर्गच्या (Gerduberg Cliffs) उंच चट्टानांचा थरारक नजारा पाहिला आणि त्यानंतर बुडीर ब्लॅक चर्चला (Budir Black Church) भेट दिली. काळ्या चर्चची साधी, पण सुंदर रचना पाहून मन भारावून गेलं.

स्नाएफेल्सनेसभोवतीच्या सुंदर समुद्र मार्गाने जाताना लाटा वाऱ्यासोबतच्या संगीतासारख्या वाटत होत्या. राऊडफेल्ड्सग्या खोऱ्यात (Raudfeldsgja Gorge) थांबून फोटो काढले, लोंड्रांगर वॉक (Londrangar walk) करत निसर्गाच्या अविश्वसनीय शिल्पांचे दर्शन घेतले. मालारिफ लाइटहाऊस (Malariff lighthouse) आणि सॅक्सहोल क्रेटरच्या (Saxholl Crater) परिसरात छोटंसं हायकिंग केलं. निसर्गाच्या विविध रूपांनी मन भारावून गेलं.

मध्याह्नाला मातारलिस्ट(Matarlist) रेस्टॉरंटमध्ये हॉट चॉकलेट घेतले आणि थोडासा विश्रांतीचा आनंद घेतला. नंतर बुलँडशॉफ्दी व्ह्यूपॉइंट (Bulandshofdi Viewpoint) आणि किर्कजुफेल्स व्ह्यूपॉइंटला (Kirkjufells Viewpoint)भेट दिली, इथे खरंच अप्रतिम फोटो काढायची संधी मिळाली.

दिवसाचा शेवट करत आम्ही परतीसाठी रेक्याविककडे निघालो आणि रात्रीसाठी आरामदायी हेडमॉर्क हॉटेलमध्ये चेक-इन करून दिवसाची सांगता केली.

### दिवस ८ – निरोप

आमची फ्लाइट दुपारी होती आणि त्याआधी आमच्याकडे काही वेळ होता, त्यामुळे आम्ही व्हेल म्युझियमला भेट देण्याचा निर्णय घेतला. तिथे लाइफ-साइजच्या व्हेलच्या आकृत्या होत्या आणि त्यांच्याभोवती फेरफटका मारताना खरोखरच आश्चर्य वाटत होतं.

यानंतर आम्ही रोस्ट रेस्टॉरंटमध्ये जाऊन कॉफी घेतली आणि ब्रिज बिटविन कॉन्टिनेंट्स पाहायला निघालो. इथे रिफ्ट खूप छोटा आहे, पण पुल बांधून दोन्ही बाजू जोडल्या आहेत, त्यामुळे फक्त दोन मिनिटांत तुम्ही युरेशियन आणि नॉर्थ अमेरिकन प्लेट ओलांडू शकता, खरोखरच अद्भुत अनुभव!

यानंतर आम्ही आमची कार परत केली, विमानतळावर गेलो आणि बोर्डिंग केले.

आईसलँड हा देश वेगळाच आहे. दररोज नवा, अविस्मरणीय अनुभव! एप्रिलमध्येही आम्हाला तीनदा नॉर्दर्न लाईट्स पाहायला मिळाले, हे आमचं भाग्य. पुढच्या प्रवासात उत्तर आईसलँड, ब्लू लगून आणि पफिन पक्षी पाहायचं आमचं स्वप्न आहे.

जाता जाता मनात फक्त एकच भावना उमटली – फिर मिलेंगे आईसलँड, परंतु त्या अविस्मरणीय क्षणांची आठवण नेहमी सोबत राहील.

# जगी सर्व सुखी असा कोण आहे?

• शैलेश भाटे •



२१ ऑगस्ट २०१७, सकाळी १०:२२, टोटॅलिटी (totality / खग्रास स्थिती) नुकतीच संपली - राहुल आणि मी आनंदत अक्षरश: नाचलो! ''This is the best thing I have ever seen in my entire life! राहुल - कुणी येवो न येवो, २०२४ ला आपण दोघं तरी टेक्ससला जातोय. मी अमेरिकेत नसेन तर टुरिस्ट व्हिसा काढीन एवढ्या एका कारणासाठी. पण आपण जातोय.'' आणि अशा प्रकारे, आमच्या २०२४ च्या खग्रास सूर्यग्रहणाची तयारी २०१७ मध्येच सुरू झाली!

**९ एप्रिल २०२३**

''हॅलो पराग? उठ. टेक्ससला बरनेटचं हॉटेल बुक कर. चार रूम नाहीयेत, पण जेवढ्या मिळतील तेवढ्या कर पटकन. ठेवतो फोन.''

''हॅलो राहुल? उठ. टेक्ससमधलं सेडर पार्कचं हॉटेल बुक कर, चार रूम, वर्स्ट केसमध्ये परागला काहीच मिळालं नाही तर!''

''डालसचं आत्ताच केलंय मी, we are set for Dallas. Don't worry. ऑस्टिनचंच कठीण वाटतय, रूम फुल दिसताहेत मला. अमितने टेक्ससला मार्बल फॉल्सचं बुक केलंय आधीच. पण त्यालाही दोनच रूम मिळाल्या आहेत.''

२०१७ च्या या अनुभवातून, खगोलशास्त्रापेक्षा जास्त खगोलशास्त्रातील करामती बघण्यासाठी तयारी किती कमी पडू शकते हा धडा हजारो लोकांनी घेतला होता, फक्त मीच नव्हे. त्यामुळे २०२४ चे ग्रहण बघायला अभूतपूर्व गर्दी जमणार ह्यात तीळमात्र शंका नव्हती. त्यात भर म्हणजे २०२४ चे ग्रहण एप्रिल महिन्यात असल्यामुळे टोटॅलिटीच्या मार्गात असलेली बरीच शहरे तेव्हा ढगाळ असण्याची दाट शक्यता होती. मी ठरवलं की तीन/चार शहरांमध्ये हॉटेल बुक करून ठेवणं भाग आहे. माझ्याप्रमाणेच इतरही अनेक लोकांनी दीड-शहाणेपणाने अशीच हॉटेलं बुक करून ठेवली होती कारण टोटॅलिटीच्या मार्गातील शहरांची त्याच दिवशी, म्हणजे एका वर्षाआधीच हॉटेलं फुल झाली होती. हो, हो, तब्बल एक वर्ष आधी!

पुढचे काही महिने टेलीस्कोप, DSLR कॅमेरावर सराव करण्यात गेले. कुठल्या मित्राने कुठल्या फोकल लेंथची लेन्स वापरायची, बॅटरी नेमकी किती वाजता बदलायची, बॅटऱ्या किती लागतील, त्या वाटेत चार्ज कुठे करायच्या, लॅपटॉपची बॅटरी किती वेळ टिकते, USB केबल किती लांब आहे, SD कार्ड आयत्या वेळी खराब झाले तर काय करायचे, जादा सोलार फिल्टर, जादा सोलार गॉगल,आयत्या वेळी कुठली केबल तुटली तर दुरुस्त करायला सोल्डेरिंग किट असा सगळा ताफा तयार केला आणि लक्षात आलं की एवढं सामान विमानाने नेलं तर एखादी किडनी 'ई-बे'वर विकायला लागू शकते.

सगळ्यांना परत फोन केला... ''मला आचरट म्हणून तुम्ही माराल, पण विमानाऐवजी कारने जायचं का?'' माझेच मित्र ते... माझ्याहून आचरट. डालसपर्यंत जातोच आहोत तर ह्युस्टनला नासाला जाऊन येऊया का? ''फार'' लांब नाहीये. मनालीने कपाळाला हात मारला.

**४ एप्रिल २०२४**

सीॲटलला राहुलकडे कारने गेलो, आणि मग विमानतळावर टोयोटा सिएना गाडी ट्रीप-पुरती भाड्याने घेतली. पराग शिल्पा, मनाली, हर्षदा आणि मुलं विमानाने परस्पर डालसला ह्युस्टन मार्गे येणार होते.

५ एप्रिलला पहाटे मी, अमित, राहुल आणि निनाद असे चौघे निघालो. पहिल्या रात्री सॉल्ट-लेक सिटीला एका हॉटेलला उतरलो. टेक्ससमध्ये हवा सतत बदलत होती. ऑस्टिनला जावं की डालसला काही काळात नव्हतं. दुसऱ्या रात्री टेक्ससला ॲमॅरियोला (Amarillo) थांबलो. हवेचा हूल देण्याचा कार्यक्रम सुरूच. ७ एप्रिलला डालस पासून अवघ्या १ तासावर असताना छान ऊन पडलेलं पाहून ठरवलं की डालसमध्येच ग्रहण बघायचं. हॉटेलला चेक-इन केलं, रात्री उशिरा पराग, शिल्पा, मनाली आणि हर्षदा जणू येताना पॅसिफिक नॉर्थ-वेस्टचे ढग घेऊनच आले. टेलीस्कोप आणि कॅमेराचे अगदी शेवट-शेवटचे सेटिंग करता-करता झोपायला पहाटेचे तीन कधी वाजले कळलेच नाही.

**८ एप्रिल २०२४,**

सकाळी ७:३० ला जाग आली. रूमच्या पडद्याकडे बघितलं आणि इतकी अंधारी पाहून काळजात धस्सं झालं. नशीबाला दोष देत नाष्टा करायला हॉटेलच्या ब्रेकफास्ट रूममध्ये भेटलो. तेवढ्यात परागचा फोन वाजला. ''बोल सद्भाव. इकडे सगळीकडे ढग. काय? खरंच? नक्की? आलोच!'' परागचे हे शब्द ऐकताना मला समर्थ रामदास यांनी ''जगी सर्व सुखी असा कोण आहे?'' असा प्रश्न विचारला त्याचं उत्तर सुचलं ''मी! शैलेश श्रीधर भाटे!''

परागने आम्हाला काहीच सांगायची गरज नव्हती. ''लगेच निघायचं? १० मिनिटात. प्लेनो इकडून चाळीस मिनिटे दाखवत आहे.'' सगळे उठले आणि आपापल्या रूमकडे धावले. मी भराभर सगळे साहित्य मिळेल त्या ठिकाणी कोंबले आणि आम्ही निघालो.

पण नियतीने आमच्याशी खेळायचा चंग बांधला होता. सद्भावच्या घरापासून १० मैल दूर असताना चक्क वरुण राजाने आपणही टेक्ससला कधी-कधी येतो ह्याची प्रचिती दिली. खरं सांगतो, रडकुंडीला आलो होतो. एवढा सगळा खटाटोप रिकामाच! सद्भावकडे न जाता परत हॉटेलला जावं का असा विचार आम्ही सर्वच करू लागलो, पण मग ठरवलं की आता नशीबात असेल तर दिसेल अन्यथा नाही. सद्भावकडे पोहोचलो तेव्हा मळभ होतं. सद्भाव, अपर्णा दोघांनी अगत्याने स्वागत केलं खरं, पण मी ते स्वीकारण्याच्या पलीकडे कधीच गेलो होतो. त्याने आम्हाला त्याच्या अंगणात नेलं आणि मी आकाशाकडे बघताच इतक्या वेळ ढगात लपाछपी खेळत असलेला सूर्य ढगातून हळूच बाहेर डोकावताना मला भासला. तेव्हा का कुणास ठाऊक पण अंतर्मनातून एक आवाज आला ''दिसणार! आज दिसणार!''

अंगात काहीतरी संचारल्यासारखं झालं. भराभर टेलीस्कोप, ट्रायपॉड, कॅमेरे काढले. सद्भावने माझे साहित्य आणि लॅपटॉप पाहून आपणहूनच इलेक्ट्रिक एक्सटेन्शन कॉर्ड आणून दिली! बॅटरीचा प्रश्नच मिटला!

ग्रहणाचा 'फर्स्ट कॉन्टॅक्ट' (first contact), म्हणजे जेव्हा चंद्र सूर्याला झाकायला सुरुवात करतो तो क्षण आला नी गेला.. ढगात. आता सूर्य सोडला तर त्याच्या अवती-भवती निळं आकाश दिसायला लागलं होतं. मी सगळ्यांना सोलार गॉगल दिले. ग्रहण कसं बघावं, काय करावं, काय करू नये सगळं सांगितलं. एकीकडे वरून फोटो काढायला सुरू केले. टोटॅलिटीच्या दहा-एक मिनिटं आधी जेव्हा चंद्राने ८०% सूर्याला झाकले तेव्हा एक विचित्र असा संधीप्रकाश सर्वत्र पसरला. हलकासा वारा वाहू लागला. हवेत बऱ्यापैकी गारवा जाणवायला लागला. नेमकं ह्याच वेळी सूर्याच्या आजूबाजूचे ढग विरळ व्हायला लागले! आकाशात हे चित्र तर सद्भावच्या अंगणात जल्लोषाचं वातावरण! मला तर ब्लॅक-फ्रायडे किंवा बॉक्सिंग-डेच्या दिवशी मॉलच्या ऐन दारासमोरचे पार्किंग मिळाल्यावर होतो तशासारखा आनंद झाला! फोटोग्राफी करणारे आम्ही तिघं सोडलो तर बाकीचे सगळे गॉगल लावून चक्क गवतावर

आडवे झाले! उत्कंठा वाढतच होती.

आणि बघता-बघता लॅपटॉपच्या प्रोग्रामने घोषणा केली. "Remove solar filters!" मी भराभर फिल्टर काढायला लागलो आणि इकडे बाकीचे सगळे उत्साहात ओरडा-आरडा करायला लागले! मी माझ्या डोळ्यांवरचा गॉगल काढून वर बघितलं तर काय! डायमंड रिंग! सूर्यकिरणांची शेवटची तिरिप क्षणार्धात नाहीशी झाली. टोटॅलिटी!

सगळीकडे एक वेगळाच अंधारवजा मंद प्रकाश पसरला. जणू आम्ही स्वर्गातच आहोत. सूर्याच्या अवती-भवती एक जबरदस्त चंदेरी, लखलखणारी तेजाची झळाळी, ज्याला शास्त्रज्ञ कोरोना (Corona) म्हणतात! अत्यंत नाजूक पण अत्यंत तेजस्वी! मी आजवर ह्या कोरोनाचे असंख्य फोटो बघितले आहेत पण डोळ्यांना जे दिसतं तसच्या तसं दाखवणारा मी आजतागायत एकही फोटो पाहिला नाहीये. दोन ते अडीच मिनिटातच सृष्टीचा हा अद्भुत खेळ संपत आलेला होता. चंद्राच्या एका बाजूला हळू हळू प्रकाश वाढताना जाणवू लागला आणि हा हा म्हणताच परत एका सुंदर अशा डायमंड रिंगने पुन्हा आम्हा सर्वांना तृप्त केलं!

"Goggles on!" मी ओरडलो. सगळ्यांनी आपापले गॉगल घालायला सुरुवात केली. "Put filters on!" - माझ्या लॅपटॉपने घोषणा केली. सगळ्या टेलीस्कोप आणि लेन्सना फिल्टर परत लावले. आम्ही सगळे एकदम खुशीत, उत्साहात होतो. सगळेच आपापले अनुभव एकमेकांना उत्साहाने सांगू लागले. आजूबाजूचा प्रकाश वाढू लागला होता. मला इहलोकची थोडी जाणीव होऊ लागली. सकाळपासून पहिल्यांदा मला तहान लागल्याचं स्मरण झालं! अपर्णाने सगळ्यांसाठी चहा व खाऊ आणला. आम्ही ह्या सगळ्याचा आस्वाद घेत असतानाच ढग सूर्याला पुन्हा छोटसं ग्रहण लावू लागले. आम्ही सुटकेचा निश्वास टाकला. हे ढग दहा मिनिटे अगोदर आले असते तर नेमकी टोटॅलिटी पाहता आली नसती! देवाचे आणि दैवाचे आभार मानत आम्ही उर्वरित ग्रहण गप्पा मारत बघितले. ग्रहण पूर्णपणे संपेपर्यंत माझ्या DSLR मध्ये फोटोग्राफी सुरू होती. इतक्यात घरातून खमंग, गरमा-गरम जेवणाचा सुगंध येऊ लागला, पोटात आत्तापर्यंत झोपी गेलेले कावळे जोरजोरात ओरडू लागले. जेवणं झाली, टेलीस्कोप आणि इतर सामान आवरले, त्यानंतर सद्भाव आणि अपर्णाला मनापासून धन्यवाद देत आम्ही हॉटेलच्या दिशेने निघालो.

दुसऱ्या दिवशी ह्युस्टनमध्ये नासा पाहिले आणि मग १० एप्रिलला पहाटे मनाली, हर्षदा आणि मुलींना विमानतळावर सोडून आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो. डालसमध्ये अमित आणि निनादला बरोबर घेतले. रात्रीपर्यंत टेक्ससमधून न्यू-मेक्सिकोमध्ये शिरलो. आम्हा चौघा मित्रांना गाडी चालवण्याची इतकी हौस की एकदा हातात आली की चार-पाच तास कोणी ती सोडतच नसे! पहाटे पाचला ह्युस्टनहून निघालेलो आम्ही रात्री तीनच्या सुमारास कुठल्याशा गावाच्या हॉस्पिटलमध्ये गाडी पार्क केली आणि गाडीतच झोपलो! पहाटे साडे-पाचला मला जाग आली. निनादला अर्धवट जाग आली होती, त्याला म्हंटलं निघतो, तो आपला झोपेतच हो म्हणाला आणि मी पडत्या फळाची आज्ञा मानून लगेच गाडी हाकायला सुरुवात केली. दुपारी यूटाहमध्ये मोआबला (Moab) पोहोचलो. जेवलो आणि मग आर्चेस नॅशनल पार्कमध्ये दोन-एक तासांची हाइक केली. सगळेच दमलो होतो, पण गाडी चालवायची खाज अजूनही उतरली नव्हती. गाडी चालवत चालवत १२ एप्रिलच्या पहाटे दोनच्या सुमारास आयडाहोमध्ये बोईसीला (Boise) एका हॉटेलवर शेवटी थोडी विश्रांती घेतली. सकाळी दहाच्या सुमारास वॉशिंग्टनची सीमा ओलांडली आणि अमितच्या एका आवडत्या पक्षी-निरीक्षणाच्या जागेवर ब्लू-हेरॉन आणि इतर काही पक्ष्यांचे फोटो आम्ही सर्वांनी टिपले आणि संध्याकाळपर्यंत परत सीॲटलला पोहोचून परागकडून माझी गाडी घेऊन रात्री उशिरा बर्नबीला घरी पोहोचलो.

तब्बल नऊ दिवसांच्या कालावधीत आम्ही सुमारे ८००० किलोमीटर प्रवास केला होता. शरीर कदाचित थकले असेल, पण ते मनाला अजिबातच आठवत नाही.

राहुलला घरी सोडलं तेव्हा आम्ही एकमेकांशी हस्तांदोलन केलं. २०१७ ला जे ठरवलं ते फळास आलं. तोंडचा घास निसटता निसटता वाचला की त्याची खरी किंमत जाणवते आणि एकंदरीतच आपण किती भाग्यवान आहोत ह्याची पुन्हा एकदा खात्री पटते. कोरोनाची ती असीम सुंदरता, ते अद्वितीय दृश्य माझ्या अंतर्मनात इतकं कोरलं गेलंय की समर्थ रामदास स्वामींनी ''जगी सर्व सुखी असा कोण आहे'' हा प्रश्न मला उर्वरित आयुष्यात कधीही विचारला तरी माझं उत्तर पक्क असेल, ''मी! शैलेश श्रीधर भाटे!''

# सुगंधी वाऱ्यांच्या पाठशिवणीचा खेळ

**(भारत ते अमेरिका, आणि मग कॅनडा – एका मराठी मुलीचा प्रवास)**

**• कोमल बोंगाळे •**



कधी कधी आयुष्य एका गोडसर स्वप्नासारखे असते, ज्यात मातृभूमीचा, संस्कृतीचा आणि घरट्याचा असा सुवास असतो की तो कधीच विसरता येत नाही. पण काही वेळा, नवनवीन ठिकाणी, नवीन लोकांमध्ये, वेगळ्या भाषा बोलणाऱ्या संस्कृतीत स्थायिक होताना आपल्या पूर्वजांच्या आठवणींचा सुगंध या बदललेल्या वाऱ्यांत हरवून जातो,असंही घडतं. हा प्रवास केवळ एका देशापासून दुसऱ्या देशापर्यंतचा नसून, तो एका मुलीच्या अंतर्मनाचा, तिच्या ओळखीचा, तिच्या संस्कृतीशी आणि स्वतःशी असलेल्या नात्याचा असतो.

माझ्या मनात अनेकदा विचार येतो, की संस्कृती म्हणजे केवळ भाषा नाही, तर ती आपल्याला आकार देणारी, आपली ओळख जपणारी एक परंपरा आहे. आपल्या मातेच्या कुशीतल्या गोड गप्पा, आईच्या हातच्या पुरणपोळीची चव, आणि आजीच्या माणसांच्या गोष्टींमध्ये मिसळलेली मृदुता, हे सगळे आपल्या संस्कृतीचे खरे आधारस्तंभ आहेत. कोल्हापूरच्या मातीमध्ये जन्मलेली असल्यामुळे, ही संस्कृती माझ्या अस्तित्वाशी इतकी घट्ट जोडलेली आहे, की शरीराने कितीही दूर गेले तरी मनात नेहमीच जवळची वाटते.

मी कोल्हापूर, महाराष्ट्रात जन्मलेली आणि तिथल्या सांस्कृतिक वातावरणात वाढलेली एक मराठी मुलगी आहे. कोल्हापूरचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, इथल्या माणसांचा मऊ स्वभाव आणि त्यांची आत्मीयता माझ्या हृदयात खोलवर रुजलेली आहे. या ऐतिहासिक शहराच्या मातीचा सुवास आणि तिच्या जीवनशैलीचा ठसा माझ्या ओळखीचा अविभाज्य भाग बनून राहिला आहे. माझ्या बालपणाच्या आठवणींमध्ये तिथल्या तुळशीच्या कुंड्यांपासून ते शाळेच्या अंगणातील गोंगाटापर्यंत प्रत्येक क्षण माझ्या मनात ताजा आहे.

माझं सगळं बालपण भारतातच गेलं, एका प्रेमळ, परस्परांमध्ये जिव्हाळा असलेल्या संयुक्त कुटुंबाच्या कुशीत. घरात आजी-आजोबा, काका-काकू, चुलत भाऊ-बहीण, सततची गडबड. हसणं-खेळणं हेच माझं जग होतं. सकाळी अंगणातल्या तुळशीच्या वाऱ्याचा गंध, स्वयंपाकघरातून उठणाऱ्या फोडणीचा

सुवास, आणि शाळेतून परतताना येणारा मातीचा दरवळ, यांनी माझं बालपण विणलं गेलं. त्या काळात 'मी' असा काही वेगळा नव्हताच कारण सगळंच आपलं होतं. कुठेही गेलो तरी ऊबदार घरकुल, घट्ट नाती, आणि अंगणात बेधुंद फिरणारे वारे हेच माझे श्वास होते. या साऱ्याच क्षणांनी माझं बालपण हळुवार गुंफलं, जणू आठवणींनी तयार केलेला एक सुगंधी, नाजूक गजरा.

लग्नानंतर आयुष्याने अचानक नवं पान उघडलं, आणि मी अमेरिकेत आले, एका स्वप्नांच्या देशात, पण पूर्णपणे अनोळखी जगात! पहिल्याच दिवशी खूप काही जाणवलं, रस्ते मोठे होते, घरं सुंदर होती, पण आपुलकीचा वारा मात्र सापडत नव्हता. भारतात जेव्हा सण यायचे, तेव्हा शेजारी, नातेवाईक सगळे एकत्र जमायचे. इथे मात्र दिवाळी आली तरी रस्ते नेहमीसारखे शांत. गणपती आला तरी गल्लीत आवाज नाही, गुढीपाडव्याच्या सकाळी गुढ्या दिसत नाहीत. अमेरिकेचा वारा संधींचा होता, पण त्या वाऱ्यात माझ्या घराचा सुगंध नव्हता.

काळ जसजसा सरकत गेला, तसतसं अमेरिकेतील जीवनाशी जुळवून घेणं सुरू झालं. तिथल्या शिस्तबद्धतेने, वेळेच्या काटेकोरपणाने, आणि विविध संधींच्या विश्वाने मला नवी दिशा दिली. महिलांच्या नजरेतून परदेशातील आयुष्य हे एक आव्हान असतं. घर सांभाळणं आणि त्याचबरोबर स्वतःची ओळख जपण्याचं कठीण आव्हान ! भारतात जशी माणसांची गर्दी होती तसं अमेरिकेत नव्हतं, पण तिथे स्वातंत्र्य होतं, स्वतःचं वेगळं असं काहीतरी घडवता येईल अशी खात्री वाटत होती. तरीही, मनाच्या एका कोपऱ्यात भारताचा वारा नेहमी घुमायचा, "आता गणपती उत्सव सुरु झाला असेल", "आज दिवाळी आहे, आईच्या घरातले दिवे लागले असतील का?" हे प्रश्न वाऱ्याबरोबर माझ्या मनात येऊन बसायचे.

काही वर्षांनी आयुष्याने आणखी एक वळण घेतलं, मी कॅनडात आले. सुरुवातीला वाटलं, पुन्हा सुरुवात, पुन्हा नवा देश, पुन्हा नवे वारे. पण इथे आल्यावर जाणवलं की कॅनडा हा वेगळाच अनुभव आहे. इथल्या हवेत थंडी आहे, पण माणसांच्या मनात ऊब आहे. इथे बहुसांस्कृतिकतेचं वातावरण आहे. जगभरातून आलेली माणसं, वेगवेगळ्या भाषा, वेगवेगळ्या संस्कृती, पण एकमेकांचा सन्मान राखून जगतात. भारतीय सण साजरे करणारे ग्रुप्स, मंदिरे, मराठी मंडळं, या सगळ्यामुळे परदेशात असूनही आपलेपणाची जाणीव होते. तरीसुद्धा, इथल्या वाऱ्यांतही तो भारतीय सुगंध पूर्णपणे नाही. दिवाळीच्या रात्री भारतात जसं आकाशात दिव्यांची सरमिसळ दिसते, तसं इथे नाही. गुढीपाडव्याच्या सकाळी गल्लीत गुढ्या दिसत नाहीत आणि संक्रांतीला आकाश फुलोऱ्याने भरत नाही.

स्त्री म्हणून परदेशात जगताना जबाबदाऱ्या अधिक जाणवतात. घर सांभाळणं, नोकरी सांभाळणं, मुलांना भारतीय संस्कार देणं, या सगळ्यात मी भारतात शिकलेली मूल्यं माझ्याबरोबर घेऊन आले. कधी कधी प्रश्न पडतो, माझं मूल कोणत्या संस्कृतीचं होणार, भारतीय, अमेरिकन की कॅनेडियन? परक्या देशांत आपल्या संस्कृतीला जपणं किती कठीण आहे हे समजतं. पण मला खात्री आहे की संस्कृतीची खरी मुळं हळूवारपणे घराच्या अंगणात, आईच्या गोष्टींमध्ये, आणि मुलांच्या सवयींमध्ये रुजून राहतात. आज मी मागे वळून पाहते तेव्हा दिसतं, भारतातलं बालपण मला मातीचा सुगंध देऊन गेलं, अमेरिकेने मला उडायला शिकवलं, आणि कॅनडाने मला स्थैर्य दिलं. माझ्या जीवनाच्या या प्रवासात प्रत्येक वाऱ्याने वेगळा अनुभव दिला, प्रत्येक देशाने वेगळी शिकवण दिली.

म्हणून मी स्वतःला विचारते, मी इथली की तिथली? उत्तर मात्र स्पष्ट आहे, मी इथलीही आहे, आणि तिथलीही! माझी मुळं भारतात आहेत, पण माझे पंख मला जगभर घेऊन जातात. मी जिथे जाईन तिथल्या वाऱ्यांना माझ्या मातृभूमीच्या सुगंधाच्या आठवणी जोडत राहीन.

आज मला अभिमान आहे की, माझी मुलं जरी अमेरिकेत जन्मली असली, तरी त्यांच्यासाठी भारत ही मायभूमी आहे, जिथे त्यांची मुळं आहेत, जिथून त्यांची संस्कृती, भाषा आणि परंपरा सुरू झाल्या आहेत. कॅनडात राहूनही आम्ही आपल्या मुळांशी घट्ट जोडलेलो आहोत. माझ्या आयुष्यातील हा प्रवास म्हणजे सुगंधी वाऱ्यांच्या पाठशिवणीचा खेळ आहे, जिथे प्रत्येक वारा, प्रत्येक देश, प्रत्येक संस्कृती माझ्या आयुष्यात नवीन सुगंध आणि नवीन शिकवण घेऊन आली आहे.

माझं स्वप्न आहे की, माझ्या मुलांनी त्यांच्या जन्मभूमीचा मान राखावा, त्यांच्या मुळांची जाणीव ठेवावी आणि भविष्याच्या वाटचालीतही मराठी संस्कृतीचा दीप प्रज्वलित करत राहावं. मला खात्री आहे की, प्रत्येक मराठी मुलगी, जिने देश-विदेशात जाऊन आपल्या संस्कृतीला जपलं आहे, तीच खरी संस्कृतीची वाहक आहे. म्हणूनच सुगंधी वाऱ्यांचा शोध घेताना, मला उमगलं की वारा कुठलाही असो, त्याला भारताच्या सुगंधाची पाठशिवणी दिली की तो वारा आपलाच वाटतो. आणि या सुगंधानेच मला जपलं, मला उभं केलं आणि मला समजलं की माझं खरं घर कुठे आहे. ते माझ्या मनाच्या कोपऱ्यात आहे, माझ्या संस्कृतीत आहे, आणि माझ्या मातीच्या सुवासात आहे.

# माझ्या शाळेची कॅम्पिंग ट्रिप

**• आर्यन सोनजे •**



मला कॅम्पिंग खूप आवडते! दरवर्षी आमच्या शाळेत सातवीच्या मुलांची कॅम्पिंग ट्रीप असते. मला हे कळल्यापासून मी याचीच वाट पाहत होतो. आम्ही दोन दिवस आणि एक रात्र गेलो होतो. आम्ही ज्या कॅम्पमध्ये गेलो होतो त्याचे नाव ''कॅम्प एल्फिन्स्टन'' होते. मी एवढा खूष होतो की मी त्या ट्रिपच्या दोन आठवडे आधीच पॅकिंगला सुरुवात केली! माझी मराठी परीक्षा ट्रिपच्या दोन दिवसांनंतर होती म्हणून माझी आई म्हणाली, ''जर तुला ट्रिपला जायचे असेल तर अभ्यास करावा लागेल नाहीतर तू कॅम्पला जाऊ शकणार नाही.''

आमची कॅम्पिंग साईट एका बेटावर होती. आमच्या शाळेने बस केली होती . बसने आम्ही शाळेतून फेरी टर्मिनला गेलो. आम्ही बसमध्ये फेरी टर्मिनलकडे जाताना गाणी म्हणत होतो आणि खूप मजा करत होतो. बसमधून उतरल्यानंतर आम्ही समुद्रकिनाऱ्यावर गेलो आणि आमच्या फेरीसाठी एक तास वाट पाहिली. समुद्रकिनाऱ्यावर आम्ही छोटे छोटे खेकडे शोधले. छोटे खेकडे बहुतेक दगडाखाली होते आणि त्यांना क्लॉज (claws) नसल्यामुळे ते आम्हाला चावू शकत नव्हते. जेव्हा ते आमच्या हातावर चालत होते तेव्हा ते गुदगुल्या करत होते. थोडा वेळाने आम्ही आमच्या फेरीवर गेलो, तेव्हा मी आईस्क्रीम खाल्ले आणि थोडा वेळ बसलो. फेरीतून उतरल्यानंतर आम्ही कॅम्पसाईटवर चालत गेलो. मित्रांसोबत चालायला खूप मजा आली पण ऊन आणि चढामुळे मी खूप थकलो. या कॅम्पसाईटचा नियम खूप वेगळा आहे. या कॅम्पसाईटमध्ये घरचे जेवण आणू देत नाहीत . जंगलातील प्राण्यांनी आमचे अन्न खाऊ नये आणि आमच्या केबिनमध्ये येऊ

नये म्हणून आम्हाला आमच्याकडे असलेले अन्न फेकून द्यावे लागले. कॅम्पसाईट सांभाळणारे लोक आपल्या बॅगा पण एका हीटरमध्ये ठेवतात. हीटमुळे बॅगेतील सर्व कीटक मरतात त्यामुळे कॅम्पसाईटचे काहीही नुकसान होत नाही.

आमच्या शिक्षकांनी दोन दिवसांत आम्ही करणार असलेल्या सर्व ॲक्टिविटीजचे प्लॅनिंग केले होते. आम्ही लो रोप्स, आर्चरी, रॉक-वॉल, कयाकिंग आणि कॅम्पफायर केले. आमचा पहिला खेळ ''लो रोप्स'' होता. आम्ही झाडांवर चढत होतो आणि दोरीवर बॅलेन्स करत होतो. माझा एक मित्र दोरीवर बॅलेन्स करताना पडला. मी दोरीवर बॅलेन्स करण्याचा प्रयत्न केला, मात्र मी घाबरलो. मी असे म्हणणार नाही की मी त्यात यशस्वी झालो, पण मी असे काही करायचा प्रयत्न तर केला जे मी स्वतःहून कधीच केले नसते. बाकीची मुले खेळतांना आम्ही सर्वजण एकमेकांना cheer-up करत होतो. त्यानंतर आम्ही रॉक-वॉल केले. माझ्या पहिल्या प्रयत्नात मी भिंतीच्या अर्ध्या भागात पोहोचलो पण नंतर हार मानली. माझ्या दुसऱ्या प्रयत्नात मी वरच्या अगदी जवळ पोहोचलो पण नंतर माझा हात घसरला. सर्वांनी दोन वेळा ट्राय केल्यानंतर, आमच्याकडे वेळ कमी होता. त्यानंतर आम्ही पकडापकडी खेळण्यासाठी मैदानात गेलो. आम्हाला रात्रीच्या जेवणासाठी बोलावले तेव्हा आम्ही आमचा खेळ संपवला. रात्रीचे जेवण माझ्या खूप आवडीचे होते. रात्रीच्या जेवणासाठी छोले आणि भात होता. शाळेच्या ट्रिप मध्ये छोले आणि भात मिळेल असे मला वाटलेच नव्हते. रात्रीच्या जेवणानंतर, प्रत्येकाने स्वतःचे टेबल स्वच्छ करायचे होते. जेवण झाल्यानंतर, आम्ही आर्चरी खेळलो. मी माझा एक ॲरो चुकून जंगलात मारला. पण नंतर माझ्या पुढच्या वेळी मला चार पॉइंट मिळाले आणि शेवटी दोन पॉइंट मिळाले.

बाहेर अंधार पडताच, आम्ही कॅम्पफायरसाठी गेलो. कॅम्पफायरच्या बाजूला आम्ही मोठ्याने गाणी गात होतो आणि खूप मजा करत होतो. कॅम्पफायरनंतर आम्हाला आईस्क्रीम दिले आणि त्यानंतर आम्ही आमच्या केबिनमध्ये गेलो. आम्ही सर्व जण आमच्या केबिनजवळ लपाछपी खेळलो. मी आणि माझे मित्र झाडामागे लपलो जिथे आम्हाला कोणीही शोधणार नाही. नंतर आमच्या शिक्षकांनी आम्हाला केबिनमध्ये जाण्यास सांगितले. आम्ही केबिनमध्ये पण खूप वेळ उनो (Uno) खेळलो. असा आमचा पहिला दिवस ॲडवेंचर आणि एक्साईटमेंटचा होता. रात्री आम्ही केबिन मध्ये गात होतो. आम्ही शेजारच्या केबिनमध्ये जाऊन मित्रांना घाबरवण्याचा विचार केला पण शिक्षकांनी जाऊ दिले नाही. आम्ही रात्री ३ वाजता झोपलो. माझे काही मित्र त्यावेळी केबिनमध्ये व्यायाम करत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही 'पोलर बेअर स्विम'साठी समुद्रात गेलो, पाणी खूपच थंड होते. मी गुडघ्यापर्यंत पाण्यात गेलो आणि माझे पाय गोठले. मी आणि माझे काही मित्र परत येऊन इतरांची वाट पाहत होतो. कपडे बदलल्यानंतर ब्रेकफास्ट केला. आम्हाला कयाकिंग करताना पुरेशी एनर्जी मिळावी म्हणून पोटभर ब्रेकफास्ट करायला सांगितला होता. नाश्त्यानंतर आम्ही समुद्रात कयाकिंग करायला गेलो. मी माझे पाय पाण्यात बुडवले, ते पाणी खूप गार नव्हते. आम्ही पन्नास मिनिटे कयाकिंग केले आणि नंतर जेवलो. मग आम्ही "Capture The Flag" हा खेळ खेळलो.

मी जेव्हा ट्रिपला जातो तेव्हा मी नेहमी पडतो आणि मला लागते ते यावेळीही झाले. यावेळीही खेळतांना माझी आणि माझ्या मित्राची जोरात टक्कर झाली. आम्हाला दोघांनाही लागले. माझ्या हनुवटीवर जखम झाली आणि त्याच्या कपाळावर जखम झाली. कॅम्प सुपरवायझर्सनी आम्हाला आईस -पॅक दिले. आमचा खेळ संपल्यानंतर, आमच्या शिक्षकांनी सांगितले थोड्या वेळात आपण निघणार आहोत. आम्ही आमचे सामान गोळा केले, फेरीकडे चालत गेलो आणि घरी परतलो.

ही माझी प्राथमिक शाळेतील शेवटची फील्ड ट्रिप होती. मी ही ट्रिप कधीही विसरणार नाही. ही आत्तापर्यंतची सर्वात भारी फील्ड ट्रिप होती आणि सातवीची माझी एक छान आठवण! आता मी आठवीत जाणार आहे, हायस्कूलमधील ट्रिपसाठी मी खूप एक्साईटेड आहे.



# टीव्ही, मालिका आणि बरंच काही!

**• पुस्तक परिचय: निलेश अग्निहोत्री •**

**(लेखिका : मुग्धा गोडबोले)**

'असं कुठे असतं का?' – हा उपहासात्मक प्रश्न, आपल्या अभिरुचीशी विसंगत असलेली कलाकृती पाहताना किंवा वाचताना आपण अनेक वेळा स्वतःला किंवा दुसऱ्याला विचारतो. विशेषतः मराठी टीव्ही मालिकांच्या बाबतीत तर असा प्रश्न हमखास विचारला जातो. विंदांच्या शब्दात सांगायचं तर माझी अवस्था 'आम्हीही त्यात होतो खोटे कशास बोला' अशी आहे! मराठी मालिकांबद्दल असलेल्या 'टीव्ही, मालिका आणि बरंच काही!' या पुस्तकाबद्दल मी काहीसा अनुत्सुकच होतो. पण नव्वदीच्या दशकाच्या उत्तरार्धापासून मराठी दूरचित्रवाणी माध्यमात अभिनेत्री आणि लेखिका म्हणून कार्यरत असलेल्या मुग्धा गोडबोले यांच्या या पुस्तकाने मला सुखद धक्का दिला. या पुस्तकात लेखिकेने विविध वाहिन्यांवर प्रसारित होणाऱ्या अनेक मराठी मालिकांच्या पडद्यामागच्या अनभिज्ञ जगाची सफर वाचकांना घडवली आहे.

पुस्तकाच्या आरंभीच्या प्रकरणांमध्ये लेखिकेने दूरचित्रवाणी (television) चा संक्षिप्त इतिहास मांडला आहे. 'मालिका' या दृश्यप्रकाराचं स्थान 'दूरदर्शन' आणि त्याच्याशी निगडित अनेक निर्माते, कलाकार, तंत्रज्ञ यांनी विविध आव्हानांचा सामना करत कसं निर्माण केलं याचा रोचक आढावाही या पुस्तकात आहे. नव्वदीत उपग्रह वाहिन्यांचा उदय झाल्यानंतर मालिकांच्या स्वरूपाला आणि निर्मितीप्रक्रियेला कलाटणी मिळाली. तेव्हापासून ते आज भरमसाठ वाढलेल्या वाहिन्या आणि जाहिरातदारांचं वर्चस्व यामुळे मालिकानिर्मितीला आलेलं स्पर्धात्मक व्यवसायाचं स्वरूप या स्थित्यंतराचा आलेख लेखिकेने रंजकपणे मांडला आहे.

दूरचित्रवाणीच्या छोट्या पडद्यावर चकचकीत दिसणाऱ्या प्रत्येक मालिकेच्या, मग ती कोणत्याही भाषेतली असो किंवा कोणत्याही वाहिनीसाठी अथवा OTT साठी असो, निर्मितीमागे एक जगड्व्याळ तितकीच क्लिष्ट यंत्रणा असते. या पुस्तकात मराठी मालिकानिर्मितीच्या प्रक्रियेचे अंतरंग लेखिकेने उलगडले आहेत. वाहिन्यांचे आणि जाहिरातदारांचे अधिकारी, मालिका निर्माते, लेखक, पटकथालेखक, संवादलेखक, दिग्दर्शक, अभिनेते आणि तंत्रज्ञ अशा अनेक व्यक्ती आणि संस्था मिळून निर्मितीचा हा गाडा ओढत असतात. मालिकेची संकल्पना मांडण्यापासून ते ती मालिका प्रसारित होईपर्यंतचा प्रवास या पुस्तकात सविस्तरपणे वाचायला मिळतो. कुठल्याही मालिकेचा प्रत्यक्ष आरंभ हा निर्मात्यांनी संकल्पना ठरवून ती वाहिन्यांकडे सादर करण्यापासून होतो. मग काही pilot episodesचं चित्रीकरण झाल्यावर निर्माते आणि वाहिन्या यांच्यामध्ये

वाटाघाटी आणि करार होतात. असा करार झाला की निर्माते चित्रीकरणाची जुळवाजुळव सुरू करतात. यामधे लेखक, कलाकार, तंत्रज्ञ, निर्मितिस्थळे इत्यादी ठरवलं जातं. वेळापत्रक तयार केलं जातं. कथा लिहिली जाते. कथेच्या पडद्यावरच्या सादरीकरणाराला अनुरूप अशी पटकथा लिहिली जाते. पात्ररचना होते आणि मग संवादलेखक प्रत्येक भागासाठी संवाद लिहितात. वरकरणी हे जरी अगदी सरळ वाटत असलं तरी त्यात प्रचंड गुंतागुंत असते.

मालिका निर्मिती सुरू झाली आणि आधीच योजल्याप्रमाणे त्याचं चित्रीकरण आणि प्रक्षेपण पूर्ण झालं असं कधीच होत नाही. हा प्रकार पूर्वी दूरदर्शनच्या काळातच शक्य होता कारण मालिका तेरा भागात आटोपण्याचं बंधन होतं. पण आता तसं काही बंधन नसतं. उलट एकदा मालिकेचं प्रसारण सुरू झालं की मालिकेची लांबी आणि कथाविस्तार हे दोन्ही निर्मात्यांच्या आणि मालिकेसाठी काम करणाऱ्यांच्या नियंत्रणात रहात नाही. तिथे TRP (Target Rating Point) नावाचा समंध उभा ठाकतो. या TRP चे आकडे मालिकेचं भवितव्य आणि पुढची दिशा ठरवतात. कधी मूळ कथेला बगल देऊन एखाद्या उपकथानकाचा विस्तार करावा लागतो. काही पात्रांचं काम वाढवावं लागतं. काहींना डच्चू द्यावा लागतो. कधी तोळामासा जीव असलेली कथा TRP मिळतो म्हणून कृत्रिमपणे फुगवावी लागते तर कधी निर्मात्यांना आवडणारी कल्पना किंवा संबंध मालिकाच गुंडाळून ठेवावी लागते. प्रत्येक आठवड्याच्या TRP च्या आकड्यांनुसार वाहिन्या बदल करायला सांगतात आणि त्यापुढे मान तुकवावीच लागते. कलाकार किंवा तंत्रज्ञ आजारी पडतात, काही कारणाने सुट्टीवर जातात, किंवा इतर काही विघ्न येतात. मग आयत्या वेळी कथा-पटकथा-संवाद बदलावे लागतात. या सगळ्यात सर्वाधिक कस लागतो तो लेखकाचा. कारण मालिकालेखन करणाऱ्या लेखकाला स्फूर्ती येईल आणि मूड लागेल तेव्हाच लिहिण्याची चैन परवडत नाही! त्यांच्या लेखनावर मालिकानिर्मितीचा डोलारा, आणि मुख्य म्हणजे त्याचं अर्थकारण उभं असतं. 'मागणी तसा पुरवठा' स्वरूपाचं लेखनकौशल्य असलेले लेखकच या क्षेत्रात तग धरू शकतात. ही सगळी तारेवरची कसरतही या पुस्तकात वाचायला मिळते. शिवाय रोजच्या चित्रीकरणादरम्यान येणारी आव्हानही असतातच. 'शूटिंगच्या सेटवरचा एक दिवस' या प्रकरणात ही सगळी लगीनघाई वर्णन केलेली आहे. कोव्हीडकाळात lockdown मुळे या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांनाच अनेक आव्हानांना सामोरं जावं लागलं. त्या आव्हानांनावर मात करत हे मालिकाविश्व तरलं आणि पुन्हा नव्या उमेदीने वाटचाल करू लागलं याचं वर्णन 'खग्रास ग्रहणाचा काळ' या प्रकरणात आहे.

मालिकानिर्मितीचा अत्यंत महत्त्वाचा पण सर्वसामान्य प्रेक्षकांसाठी कधीच प्रक्षेपित न होणारा भाग म्हणजे या सगळ्या प्रक्रियेचं अर्थकारण. निर्मात्यांनी गुंतवलेला पैसा, वाहिन्यांना जाहिरातदार आणि प्रायोजकांकडून मिळणारं उत्पन्न, कलाकार आणि तंत्रज्ञांचं मानधन, जागेचं भाडं, आणि प्रवासापासून ते रोजचं जेवणखाण इत्यादींसाठी लागणारा पैसा हा एक अजब जमाखर्च आहे. त्यामुळे चित्रीकरणाचे दिवस आणि वेळ वाया जाऊ न देण्यासाठी निर्मात्यांचा आटापिटा सुरू असतो. कोणत्याही क्लिष्ट आकडेवारीचा आधार न घेता हे सगळं लेखिकेने सविस्तरपणे मांडलं आहे.

या पुस्तकात काय नाही? तर मालिकांबद्दल, त्यातल्या कलाकारांबद्दल कोणतेही 'गॉसिप' या स्वरूपात मोडणारे मसालेदार तपशील नाहीत. किंवा वाहिन्यांमधली चढाओढ आणि त्या अनुषंगाने एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी कळत-नकळत चालणारं राजकारण याविषयीचे सनसनाटी गौप्यस्फोट वगैरेही नाहीत. आपल्या अभिरुचीप्रमाणे आपण मालिका निवडतो आणि बघतो. त्या मालिका आपल्याला प्रत्येकवेळी आवडतातच असं नाही. मालिकेचा भाग किंवा मालिका संपली की आपण आपल्या कामांकडे वळतो. बहुतेक प्रेक्षक श्रेयनामावली वाचण्याची तसदी घेत नाहीत. (आजकाल तर दुर्दैवाने श्रेयनामावली दाखवली पण जात नाही.) पण सर्व सादरीकरण कलांप्रमाणे (performing art) छोट्या पडद्यावरच्या मालिका ही देखील एक समूहकला आहे कारण पडद्यावर झळकणाऱ्या कलाकारांइतकीच किंबहुना काकणभर जास्तच मेहनत पडद्यामागचे कलाकार/तंत्रज्ञ वगैरे मंडळी करत असतात. केवळ श्रेयनामावलीतच नावं असणाऱ्यांचं पडद्यामागचं पण पडद्यावरच्या झगमगाटात हमखास झाकोळलं जाणारं एक जग असतं. या कलेचं स्वरूपच असं आहे की पडद्यामागच्या या जगाबद्दल अनेक प्रेक्षक अनभिज्ञच असतात. अशा मराठी मालिकाविश्वाशी निगडित अज्ञात जगाची तोंडओळख या पुस्तकातून होते. या पुस्तकाचा आस्वाद घेण्यासाठी वाचकाने मराठी मालिकांचा प्रेक्षक असण्याची गरज नाही. मी स्वतः मराठी मालिकांचा प्रेक्षक नाही त्यामुळे पुस्तकात उल्लेख केलेल्या अनेक मालिका आणि त्याविषयीचे संदर्भ मला अनोळखी होते. तरीही पुस्तकातली इतर माहिती वाचताना त्याची अडचण जाणवत नाही, याचं श्रेय निर्विवादपणे लेखिकेचं आहे!

हिमनगाप्रमाणे असलेल्या मालिकांच्या जगाकडे, आपली वैयक्तिक मते काही वेळ बाजूला ठेवून 'एक व्यवसाय' म्हणून

पाहण्याची निखळ नजर हे पुस्तक देतं. केवळ एवढंच नाही तर, स्वतःला आवडत नाही म्हणून आपल्याकडून सहज डावलली जाणारी किंवा प्रसंगी आपल्या गप्पांमध्ये चेष्टेचा विषय ठरणारी एखादी मालिका पाहणारा प्रेक्षकवर्ग असतोच आणि अशी मालिका अनेक लोकांसाठी रोजच्या अस्तित्वासाठीचा आधार ठरू शकते, हे ही जाता जाता आपल्या मनावर हे पुस्तक बिंबवून जातं.

त्यामुळे टी.व्ही. वरच्या मालिकांपेक्षा या पुस्तकातलं ‘बरचं काही’ नक्कीच खूप जास्त गुंगवून टाकतं!

# हास्य कट्टा

डॉक्टर : सांग, तुला न्यूमोनियाचा त्रास पूर्वी कधी झाला होता का ?
पेशंट : हो, एकदाच.
डॉक्टर : कधी?
पेशंट : सरांनी त्याचे स्पेलिंग विचारले होते, तेव्हा!

नवरा : देशमुखांच्या नवीन सूनबाईंचं नाव काय ठेवलं ?
बायको : श्यामला. सावळी आहे ना!
नवरा : मग गोरी असती तर काय गोरीला ठेवलं असतं?

पहिला : हा शर्ट छान दिसतोय.
दुसरा : पण माझा नाही.
पहिला : हा कोटही छान दिसतोय.
दुसरा : हा पण माझा नाही.
पहिला : मग तुझे काय आहे?
दुसरा : लॉन्ड्री

बंड्या : पाच मिनिटात पेपर देऊन जाऊ लागतो.
शिक्षक : का रे! पेपरमधलं काही येत नाही का?
बंड्या : तसं नाही, मला उद्याच्या पेपरचा अभ्यास करायचा आहे, म्हणून लवकर चाललोय.

कारणे द्या :
गांडुळ शेतकऱ्याचा मित्र आहे.
उत्तर : शेतकरी शेतात एकट्याने राबतो आणि गांडुळ त्याच्याशी गप्पा मारते म्हणून.

# MSBC Events 2025


















किलबिल मराठी शाळा
2.0
परदेशात स्थायिक झालो तरी मातृभाषेविषयी आपल्याला
वाटणारं प्रेम, त्यातून मिळणारी शिकवण म्हणजे
न संपणारी शिदोरी! हीच प्रेमाची शिदोरी पुढच्या पिढ्यांना
मिळत राहावी यासाठीच केलेला अट्टाहास म्हणजे
किलबिल मराठी शाळा!
सुबद्ध अभ्यासक्रम, उत्तम, निःस्पृह शिक्षकवर्ग आणि मराठी
भाषेचे शिक्षण आनंदाचे करणारी शाळा म्हणजे आपली
किलबिल मराठी शाळा!
CONTACT : kilbil.marathishala@gmail.com


MSBC's AAVARTAN
MSBC
VANCOUVER
सहभागी होण्यासाठी, संपर्क साधा at msbcinquiry@gmail.com